# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.०३/२०१८** **दिनांक ०७.०३.२०१८**

**स्थळ- साईनिवास अतिथीगृह, शिर्डी** **वेळ- दुपारी १२.०० वाजता**

श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सर्वसाधारण सभा बुधवार दिनांक ०७.०३.२०१८ रोजी दुपारी १२.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहामध्ये आयोजित करण्यात आली असलेबाबत, इकडील जा.नं.एसएसएस/ वशी-०४/ ६४०१/ २०१८, दिनांक २८ फेब्रुवारी, २०१८ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार सदरहू सभा बुधवार दिनांक ०७.०३.२०१८ रोजी दुपारी १२.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहामध्ये मा.श्री.सुरेश काशिनाथ हावरे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

| | |
|---|---|
| ०१. मा.श्री.सुरेश काशिनाथ हावरे, अध्यक्ष | ०२. मा.श्री.चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, उपाध्यक्ष |
| ०३. मा.ॲड. मोहन मोतीराम जयकर, सदस्य | ०४. मा.श्री.प्रताप सखाहारी भोसले, सदस्य |
| ०५. मा.डॉ.राजेंद्र राजाबाली सिंग, सदस्य | ०६. मा.श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, सदस्य |
| ०७. मा.श्री.बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य | ०८. मा.सौ.योगिता अभय शेळकेपाटील, सदस्या |

मा.श्रीमती रुबल अग्रवाल, भा.प्र.से.
मुख्यकार्यकारी अधिकारी

सभेच्या सुरुवातीस श्री साईबाबांची प्रार्थना करणेत आली व संस्थानचे माजी अध्यक्ष मा.श्री.जयंत मुरलीधर ससाणे यांचे दिर्घ आजाराने निधन झाले, त्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. तसेच संस्थान रुग्णालयामध्ये विनातक्रार प्रदिर्घ सेवा दिलेले संस्थान कर्मचारी डॉ.पी.देशपांडे यांचे निधन झालेले असल्याने, त्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

सदरहू सभेसाठी मा.डॉ.मनीषा कायंदे, सदस्या यांनी ई-मेलव्दारे कळविले आहे की, श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीच्या दि.०७.०३.२०१८ रोजी होणाऱ्या बैठकीचे पत्र मिळाले. परंतु या बैठकीस मी हजर रहाणार नाही. हया संदर्भात शिवसेना सचिव श्री.अनिल देसाई व मा.पर्यावरण मंत्री श्री.रामदास कदम यांनी मा.मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा केली होती व मा.मुख्यमंत्र्यांनी शिवसेनेला व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष पद देण्यास संमती दिली होती. परंतु याबाबत कोणतीही कार्यवाही झालेली नसल्याने, त्याचा खेद वाटत आहे. त्यामुळे या बैठकीत उपस्थित राहण्यास मला स्वारस्य नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

मा.श्री.रविंद्र गजानन मिर्लेकर, सदस्य यांनी ई-मेलव्दारे कळविले आहे की, श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीच्या दि.०७.०३.२०१८ रोजी होणाऱ्या बैठकीचे पत्र मिळाले. या बैठकीस माझ्यासकट शिवसेनेचे तीनही सदस्य हजर राहणार नाहीत. कृपया याची नोंद घ्यावी. धन्यवाद.

मा.श्री.अमोल गजानन कीर्तिकर, सदस्य यांनी ई-मेलव्दारे कळविले आहे की, श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीच्या दि.०७.०३.२०१८ रोजी होणाऱ्या बैठकीचे पत्र मिळाले. या बैठकीस शिवसेनेचे तीनही सदस्य हजर रहाणार नाहीत. हया संदर्भात शिवसेना सचिव श्री.अनिल देसाई व मा.पर्यावरण मंत्री श्री.रामदास कदम यांनी मा.मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा केली होती व मा.मुख्यमंत्र्यांनी शिवसेनेला व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष पद देण्यास संमती दिली होती. याबाबत अजुनपर्यंत कोणतीही कार्यवाही झालेली नसल्यामुळे खेद वाटत आहे. त्यामुळे या बैठकीत उपस्थित राहणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी. धन्यवाद.

यानंतर साईभक्तांच्या सोयीसाठी संस्थानचे अद्ययावत करणेत आलेल्या संस्थानच्या संकेतस्थळाचे व नवीन मोबाईल ॲपचे उद्धाटन करणेत आले व विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.

---

**विषय नं.०१** **दिनांक ०२.०२.२०१८ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.१३९** दिनांक ०२.०२.२०१८ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करत असताना खालीलप्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या, त्यास मान्यता देण्यात आली.

**(१) निर्णय क्र.१२८-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

**प्रस्तावित ११ परिचारक/ परिचारीकांना सध्या रु.१५,४००/- मात्र प्रतिमहा एकत्रित वेतनावर बाहययंत्रणेद्वारे नेमणूक देण्यात यावी. त्याचबरोबर सदरहू परिचारक/ परिचारीका यांना पुर्वीप्रमाणे ११ महिने कालावधीसाठी नेमणूक देणेकामी शासनाचे मार्गदर्शन घेण्यासाठी प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.०२** **दिनांक २३.०२.२०१८ रोजी शिर्डी येथे झालेल्या स्थानिक उपसमिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.१४०** दिनांक २३.०२.२०१८ रोजी शिर्डी येथे झालेल्या स्थानिक उपसमिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील शिफारशींना पुष्टी देण्यात आली.

०१ **औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्रशिक्षणार्थ्यांकरीता प्रात्यक्षिकांसाठी कन्झुमेबल मटेरीयल खरेदी करणेसाठी उघडण्यात आलेल्या ई-निविदांवर चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय होणेबाबत.**

**सन २००४ महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ (भाग ४)** मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम १७ (२ढ) सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास सहाय्य करील, तसेच,शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी शैक्षणीक संस्था स्थापन करील.

**प्रस्ताविक:-** श्री साईबाबा औदयोगिक प्रशिक्षण संस्थेतील प्रशिक्षणार्थ्यांना नविन सत्र २०१७ -१८ साठी त्यांचे व्यवसायाचे प्रात्यक्षिकाकरीता आवश्यक असलेले कंन्झुमेबल (M.S.Flat, Round Bar, Grinding, Cutting material etc.) खरेदी विभागामार्फत ई-निविदा प्रक्रिया राबवुन खरेदी करणेकामी संदर्भीत टिपणीने रक्कम रु.४,७१,०८०/- मान्यता मिळालेली आहे.

सदरील ई-टेंडर वेबसाईटवर दि.२०/१२/२०१७ ते दि.२८/१२/२०१७ अशी प्रसिध्द करण्यात आली होती. याकाळात दोनच निविदा आल्याने पुन्हा दि. ०२/०१/२०१८ ते दि.१०/०१/२०१८ अशी मुदत वाढ देण्यात आलेली होती. अंतिम दिनांक पर्यंत प्राप्त झालेल्या तिन निविदाधारकांचे ई-निविदांचे तांत्रीक बीड हे मा.खरेदी समितीची दि.१७/०१/२०१८ रोजी झालेल्या सभेमध्ये उघडण्यात आलेले आहेत. यामध्ये तिनही निविदाधारक पात्र ठरल्याने दि.०९/०२/२०१८ रोजी झालेल्या मा.खरेदी समितीच्या सभेमध्ये प्राप्त तिनही निविदाधारकांचे कमर्शियल बीड उघडण्यात आलेले आहेत. याबाबतचा तुलनात्मक तक्त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशिल | अ.नं. | रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१ | तिन निविदाधारकांनी नमुद केलेले दर | २१,२२,२४,,३४,३५,३६,३७, ४०,४२,४३,४४,४५,४६,४७, ४८,५०,५२ व ६१ | रु.१,५०,९६८.४० | **रु.१,५०,९६८.४०** |
| ०२ | दोन निविदाधारकांनी नमुद केलेले दर | १ ते २०, २३,२५ ते ३३, ३८,३९,५३,५५ ते ५८,६२ | रु.२,११,५३६.८० | **रु.३,६९,१२६.८० पुन्हा ई-निविदा** |
| ०३ | एकच निविदाधारकांनी नमुद केलेले दर | ४१,४९,५१,५४,५९,६०,६३, ६७, ७० ते ७२ | रु. १,४७,५३०.०० | |
| ०४ | एकही निविदाधारकांनी नमुद न केलेले दर | ६५,६६,६८,६९ | रु.१०,०६०.०० | |

वरील तक्ता पाहाता अ.क्र.१ मधील दर हे ति निविदाधारकांनी नमुद केलेले असल्याने न्यूनतम दर असलेले मे.गांधी ब्रदर्स, मुंबई रु.३७,०८४.४०, मे.युनियम ट्रेडींग, नाशिक रु.२६,१८८/- व मे.के.पनकिट ॲण्ड कं.,मुबई रु.८७,६९६/- असे एकुण रु. १,५०,९६८.४० निविदाधारकांस पुरवठा आदेश देता येईल.

अ.क्र.२ अ.नं.चे दर हे दोन निविदाधारकांनी नमुद केलेले आहेत, अ.क्र.3 चे दर हे एकच निविदाधारकांनी नमुद केलेले आहेत व अ.क्र.४ अ.नं.चे दर हे कोणीही निविदाधारकाने नमुद केलेले नाहीत. त्यामुळे असे एकुण रक्कम रु.३,६९,१२६.८० च्या साहित्यांचे पुन्हा ई-निविदा प्रक्रिया करावी लागणार आहे.

**मागणी:-** अ.क्र.२ अ.नं.चे दर हे दोन निविदाधारकांनी नमुद केलेले आहेत, अ.क्र.३ चे दर हे एकच निविदाधारकांनी नमुद केलेले आहेत व अ.क्र.४ अ.नं.चे दर हे कोणीही निविदाधारकाने नमुद केलेले नाहीत. त्यामुळे असे एकुण रक्कम रु.३,६९,१२६.८० च्या साहित्यांचे पुन्हा ई-निविदा प्रक्रिया राबविणेकामी फेर निविदा सूचना संस्थानच्या संकेतस्थळावर प्रकाशित करता येईल.

**अनुमान :-** वरीलप्रमाणे कार्यवाही करता येईल.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** तरी तरी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील व्यवसायाचे प्रात्यक्षिकासाठी खरेदी करावयाच्या साहित्यांचा तुलनात्मक तक्ता सोबत सादर केला आहे. त्यातील न्यूनतम दर धारक मे.युनियन ट्रेडींग,नाशिक, मे.के.पनकिट ॲण्ड कं.,मुंबई व मे.गांधी ब्रदर्स,मुंबई यांना मा.स्थानिक उपसमितीपुढे समक्ष बोलावुन त्यांचेशी चर्चा करुन, त्यांना पुरवठा आदेश देणेस मान्यता असावी.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्रशिक्षणार्थ्यांकरीता प्रात्यक्षिकांसाठी कन्झुमेबल मटेरीयल खरेदी कामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यानुसार अ.क्र.१ मधील मटेरिअल करीता निम्नतम**

दरधारक यांचे निम्नतम दर स्विकारणेत यावेत तसेच अ.क्र.२ मधील मटेरिअल करीता दोन निविदाधारकांनी दर नमुद केले असल्याने त्यामधील आवश्यक असलेले मटेरिअल खरेदी कामी निम्नतम दर स्विकारणेत यावेत, तथापी ई-निविदेमध्ये प्राप्त झालेले निम्नतम दर हे बाजारभावापेक्षा जास्त असणार नाहीत याची औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या प्राचार्यांनी खरेदीपूर्वी खात्री करावी. त्यानंतर संबधीतांना पुरवठा आदेश देण्यात यावा व उर्वरीत मटेरिअल खरेदीकामी फेर ई-निविदा प्रक्रिया राबविणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस होती.

सदरहू इतिवृत्त वाचून करताना असे ठरले की, जे साहित्य खरेदी करणेकामी ०२ अथवा ०३ पुरवठाधारकांचे दर प्राप्त झालेले आहेत, त्यामधील निम्नतम दरधारकांचे दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा. तसेच औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्रशिक्षणार्थ्यांच्या परिक्षा जवळ आलेल्या आहेत व उर्वरित साहित्य हे कमी खर्चाचे असल्यामुळे निविदा प्रक्रियेमध्ये ज्या साहित्यांसाठी दोनपेक्षा कमी पुरवठाधारकांचे दर प्राप्त झालेले आहेत, किंवा दर प्राप्त झालेले नाहीत, असे साहित्य खरेदी करणेकामी दरपत्रकाची मागणी करणेत यावी. तसेच दरपत्रकांमधील दर व ई-निविदेमध्ये प्राप्त झालेला दर यांची तुलना करणेत येऊन, या दोहोमधील ज्या पुरवठाधारकाचे दर कमी असतील, त्या पुरवठाधारकास त्या-त्या साहित्याचा पुरवठा आदेश देण्यात यावा, असे ठरले. (कार्यवाही-प्राचार्य, आय.टी.आय.)

---

०२ **सन २०१८ चे श्री साईलीला व्दैमासिके सभासदांना वितरण करणेकामी ई-निविदेतील तांत्रिक बीडमध्ये पात्र निविदाकारांचे व्यावसायिक बीड (Commercial Bid) उघडले असता निम्नतम दर असलेल्या निविदाकारास कार्यादेश पारित करणेबाबत.**

सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ नुसार मा.व्यवस्थापन समितीची कर्तव्ये व अधिकाराबाबत. कलम नं.१७ (२) 'ठ' मध्ये खालील प्रकारे तरतुद आहे.

"श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार-प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील.

श्रीसाईबाबांच्या शिकवणूकीचाप्रचार-प्रसारकरण्याच्या उद्देशाने सन-१९२३ पासून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी चे वतीने श्री साईलीला अंक छपाई करुन वर्गणीदारांना पाठविले जात आहेत. त्यामध्ये श्रीसाईलीला अंकात साईबाबांचे भक्तांना आलेले अनुभव, संस्थान मार्फत घेण्यात आलेल्या नवीन योजना, सुधारणा, संस्थानचे उत्सव आदी माहिती प्रकाशित करण्यात येते.

सन २०१८ साठीचे मा. व्यवस्थापन समिती दि.१४.११.२०१७ रोजीच्या सभेत निर्णय क्र.९७६ अन्वये यावर सविस्तर चर्चा होऊन, सन-२०१८ साठीचे मराठी व हिंदी-इंग्रजी श्री साईलिला व्दैमासिक अंक छपाई करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदांची मागणी करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु.२२,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.

इकडील विभागाच्या दि.२३.११.२०१७ रोजीचा मंजूर प्रस्तावानुसार श्री साईलीला अंक छपाईकामी ई-निविदा सूचनेची वर्तमानपत्रात दि.१८.१२.२०१७ ते दि. ०१.०१.२०१८ अखेर प्रसिध्दी देऊन ०३ निविदा प्राप्त झालेल्या होत्या, पुन्हा जास्तीत जास्त निविदाकारांची स्पर्धा होणेकामी ०१.०८.२०१८ ते दि. १०.०१.२०१८ पर्यंत १० दिवस मुदतवाढ देऊन त्यात ०३ निविदा प्राप्त झालेल्या एकूण ०५ निविदाकारांनी सहभाग नोंदविला आहे.

मा.उपसमिती दि.१७.०१.२०१८ रोजीचे सभेत ई निविदा क्र.2017_sai_263467-1 निविदेतील तांत्रिक बीड (Technical Bid)उघडून निविदेतील कागदपत्रांची छाननी केली असता खालील प्राप्त स्पर्धक निविदाकारांचा तक्ता खालील प्रमाणे सादर केला आहे.

| अ.नं. | निविदाकारांचे नाव | पात्र व अपात्र |
|---|---|---|
| ०१ | अक्षय एंटरप्रायझेस प्रा.लि., मुंबई | पात्र. |
| ०२ | प्रिंट प्लस प्रा.लि.मुंबई | पात्र |
| ०३ | टॅको व्हिजन प्रा.लि.मुंबई | पात्र |
| ०४ | सोहेल एंटरप्रायझेस, मुंबई | पात्र |
| ०५ | रेप्रो व्हिजन प्रा.लि., मुंबई | पात्र |

मा. खरेदी समिती सभा दि ०९.०२.२०१८रोजीच्या सभेत ई निविदेतील तांत्रिक बीडमध्ये (Technical Bid) ०५ पात्र निविदाकार यांचे व्यवसायिक बीड उघडलेबाबतचा निविदाकारांचे दरपत्रकांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | छपाई तपशिल | प्रस्तावित छपाई संख्या | अक्षय एंटरप्राईजेस, मुंबई | सोहेल एंटरप्रायझेस, मुंबई | रिप्रो व्हिजन प्रिंटर्स प्रा.लि., मुंबई | प्रिंट प्लस प्रा.लि., मुंबई | टॅको व्हिजन प्रा. लि., मुंबई |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साईलीला अंक मराठी (०५ अंक x७००० प्रमाणे) ३२ +४ पाने=३६ पाने | ३५,००० | १५.६५ | १४.०२ | १८.०९ | १४.०० | **१३.०४** |
| ०२ | श्री साईलीला अंक हिंदी/ इंग्रजी (०५ अंक x१५,००० प्रमाणे) ३२ +४ पाने=३६ पाने | ७५,००० | १३.७५ | १३.८९ | १६.११ | १२.४५ | **११.६४** |
| ०३ | श्री साईलीला अंक मराठी (०१ अंक) ६४ +०४ पाने=६८ पाने विशेषांक | ७००० | २७.१७ | २४.४२ | ३०.२४ | २४.०५ | **२१.७७** |
| ०४ | श्री साईलीला अंक हिंदी-इंग्रजी (०१ अंक) ६४ +०४ पाने=६८ पाने विशेषांक | १५००० | २३.९० | २३.२३ | २७.०० | २१.५० | **२०.१५** |

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मतः**-सन २०१८ साठीचे श्री साईलीला व्दैमासिक अंकमराठी व हिंदी-इंग्रजी माहे जानेवारी-फेब्रुवारीछपाई करणेकामी लवकरात लवकर कार्यादेश पारीत करणे आवश्यक आहे.

सन-२०१८चे श्री साईलीला व्दैमासिके विहीत पध्दतीने छपाई करुन पुरवठा करणेकामी ई- निविदेतील व्यवसायिक बीड (Commercial Bid) उघडलेले असता, निम्नतम दरधारकनिविदाकार टॅको व्हिजन प्रा.लि., मुंबई यांना छपाई कार्यादेश पारित करणसे व येणा-या रक्कम रुपये. १७,८४,०४०/- मात्रच्या खर्चास मान्यता मिळणेकामी विषय मा. उपसमिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**प्रस्तावीत कामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतम दरधारक टॅको व्हिजन प्रा.लि. मुंबई हे आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. सभेने त्यांचेशी दर कमी करणेबाबत चर्चा केली असता त्यांनी दर कमी करण्यास असमर्थता दर्शविली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१८ चे श्री साईलीला व्दैमासिके सभासदांना वितरण करणेकामी निम्नतम दरधारक टॅको व्हिजन प्रा.लि. मुंबई यांचे उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील गडद व अधोरेखीत केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**०३ सन २०१८ मध्ये साजरे होणाऱ्या श्री रामनवमी, श्री गुरुपोर्णिमा व श्री पुण्यतिथी उत्सवाच्या निमंत्रण पत्रिका, पाकीटे छपाईकामी प्राप्त ई-निविदांचे वाणिज्यीक देकारांवर निर्णय होणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४-**

१) अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे. भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालववायाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.१४/११/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.९४३अन्वये सन २०१८ मध्ये संस्थान मार्फत साज-या करण्यात येणा-या तीन उत्सवासाठीच्या (प्रती उत्सव सभासद संख्या १८०,००० x ३ उत्सव = ५,४०,००० सभासदांसाठी) पत्रिका व पाकिटे छपाई करणेकामी विविध पद्धतीने ई- निवीदा मागविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु. १५,००,०००/- (रुपये पंधरा लाख मात्रचे) खर्चास मान्यता देण्यात आली आहे. सन २०१८ हे शताब्दी वर्ष चालू असल्याने उत्कृष्ट दर्जाची निमंत्रण पत्रिका पाठविण्याच्या दृष्टीने तीनही उत्सवाच्या निमत्रण पत्रिका दोन साईजमध्ये छपाई करुन घेणेसाठी दि.१३.०१.२०१८ ते दि. २३.०१.२०१८ अखेर ई-निविदा मागविणेसाठी वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. परंतु सदर कालावधीत फक्त तीनच निविदा प्राप्त झाल्याने तसेच याकामी अधिकाधिक स्पर्धा होणेकामी ई-निविदा मागविणेची मुदत दि.३१.०१.२०१८ पर्यंत वाढविण्यात आली होती. वाढीव मुदतीत आणखी ३ निविदा प्राप्त झाल्या त्यामुळे एकूण ६ निविदा प्राप्त झालेल्या आहेत, त्यानंतर मा. खरेदी समितीचे दि.०९.०२.२०१८ रोजीचे सभेत ई-निविदेचे तांत्रिक बीड (Technical Bid) उघडुन निविदेतील कागदपत्राची तपासणी केली असता, खाली नमुद केलेप्रमाणे निविदाधारक पात्र/ अपात्र ठरले आहेत.

| अ.नं. | निविदाधारकांचे नाव | पात्र/ अपात्र |
|---|---|---|
| १ | रोहन प्रिंटर्स अॅन्ड स्टेशनर्स, औरंगाबाद | पात्र |
| २ | अभियांकित प्रिंटर्स, नाशिक | पात्र |
| ३ | प्रवरा ऑफसेट, लोणी | पात्र |
| ४ | निट प्रिंटर्स, अहमदनगर | पात्र |
| ५ | आकाश एन्टरप्रायजेस, धुळे | अपात्र |
| ६ | कबीर एन्टरप्रायजेस, कोल्हापुर | अपात्र |

त्यानंतर मा. खरेदी समितीचे दि. १४.०२.२०१८ रोजीचे सभेत ई-निविदेतील तांत्रिक बीड मध्ये पात्र असलेल्या ४ निविदाकार यांचे व्यावसायिक बीड उघडण्यात आले, त्याचा तपशील खालील प्रमाणे.

| अ.नं | छपाई कामाचा तपशील | प्रस्तावीत छपाई संख्या | रोहन प्रिंटर्स अॅन्ड स्टेशनर्स, औरंगाबाद | निट प्रिंटर्स, अहमदनगर | प्रवरा ऑफसेट, लोणी | अभियांकित प्रिंटर्स, नाशिक | तीन उत्सवासाठी निम्नतम दराने होणारी रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अ) निमंत्रण पत्रिका- दोन्ही बाजूने (फोर कलर विथ फोल्डींग) साईज-९.५" x९.५" १३० GSM आर्ट पेपर<br>ब) पाकीटे (फोर कलर) साईज -५" x १०" ९० GSM आर्ट पेपर<br>क) पाकीटासाठी गेमटेप वापरणे ( नमुन्याप्रमाणे) | ५,४०,००० | २.५९ | २.३५ | <u>१.९०</u> | २.०५ | १०,२६,०००/- |
| २ | अ) निमंत्रण पत्रिका- दोन्ही बाजूने (फोर कलर विथ फोल्डींग) साईज-८.७५"X११.२५" २५० GSM आर्ट पेपर<br>ब) पाकीटे छपाई - (फोर कलर) साईज-६"X९.२५" १३० GSM मॅपलिथो पेपर<br>क) पत्रिका घडी करुन पाकीटात भरणे.<br>ड) पाकीटांसाठी गमटेप वापरणे | ५,४०,००० | ४.०९ | ३.०० | ३.१४ | <u>२.९१</u> | १५,७१,४००/- |

**विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत-** दि.०१.१०.२०१७ ते १८.१०.२०१८ अखेर संस्थानमार्फत शताब्दी वर्ष साजरे केले जात आहे. शताब्दी वर्षाची सुरुवात ही श्री साईबाबांच्या पुण्यतिथी उत्सवाने झाली आहे. पुण्यतिथी उत्सवाच्या निमंत्रण पत्रिका ह्या उपरोक्त तक्त्यात अ.नं.२ मध्ये दर्शविलेप्रमाणे उत्कृष्ट दर्जाच्या छापून घेण्यात आल्या होत्या आताही श्री रामनवमी उत्सवाच्या निमंत्रण पत्रिका अ.नं. २ प्रमाणे छपाई करुन घ्याव्यात असे नम्र मत आहे.

सन २०१८ हे शताब्दी वर्ष चालू असल्याने तीनही उत्सवांच्या निमंत्रण पत्रिका उत्कृष्ट दर्जाच्या असाव्यात म्हणून निविदेत नमुद केलेप्रमाणे वरील अ.नं.१ व २ नुसार निमंत्रण पत्रिकांचे दर मागविण्यात आले आहेत. त्याची माहिती खालीलप्रमाणे.

| नमुना क्रं. | निम्नतम निविदाधारकाचे नांव | निम्नतम दर | एका उत्सवासाठी सभासद संख्या | उत्सवाची संख्या | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | प्रवरा ऑफसेट, लोणी | १.९० | १,८०,००० | ०३ | १०,२६,०००/- |
| ०२ | अभियांकित प्रिंटर्स, नाशिक | २.९१ | १,८०,००० | ०३ | १५,७१,४००/- |

तरी उपरोक्त तक्त्यातील नमुना क्र.१ किंवा २ या मधील एक निमंत्रण पत्रिका छपाईसाठी निश्चित करणेस व नमुना क्र.२ निश्चित झाल्यास वाढीव रक्कम रु.७१,४००/-चे खर्चास मान्यतेसाठी सादर.

**प्रस्तावीत कामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतम दरधारक अभियांकित प्रिंटर्स, नाशिक हे आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. चर्चेअंती त्यांनी पत्रिका छपाईचे प्रति नग रु.२.७८ अंतिम दर देऊ केले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१८ मध्ये साजरे होणाऱ्या श्री रामनवमी, श्री गुरुपोर्णिमा व श्री पुण्यतिथी उत्सवाच्या निमंत्रण पत्रिका, पाकीटे छपाईकामी अभियांकित प्रिंटर्स, नाशिक यांचे प्रति नग रु.२.७८ अंतिम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

०४ **संस्थान मालकीचे मौजे शिर्डी व कोऱ्हाळे येथील जमिनीचे भोवती कुंपन करणेकामी प्राप्त ई-निविदांचे वाणिज्यीक देकारांवर निर्णय होणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:-** अधिनियम कलम २१(१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनासाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल, अशी तरतूद आहे.

**मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय:-**

१) मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २२/१२/२०१६ रोजीचे सभेत निर्णय क्रमांक ९१२ अन्वये खालील प्रमाणे झालेला आहे.

"…यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान मालकीचे मौजे शिर्डी व को-हाळे येथील जमिनी भोवती कुंपन करणेचे काम उत्पादक कंपन्यांकडुन करुन घेणेत यावे, असे समितीचे मत झाले. याकरीता सदरहु फेर ई-निविदा प्रक्रीया राबविणेस व याकामी येणा-या अपेक्षित खर्चास मान्यता देणेत आली."

२) मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०८/०९/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्रमांक ७६८ (०२) अन्वये खालील प्रमाणे झालेला आहे.

"…संस्थान मालकीचे मौजे शिर्डी व कोऱ्हाळे येथील जमिनीचे भोवती कुंपन करणेकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतम दरधारक आजचे उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. त्यांनी दर कमी करणेऐवजी जीएसटी कराची रक्कम वेगळी मिळणेबाबत सभेस विनंती केली.

यावर सविस्तर चर्चा होऊन, महाराष्ट्र शासनाने जीएसटी अंमलबजावणीनंतर शासकीय कंत्राटात होणारा बदल या विषयाचे दि.१९ ऑगष्ट, २०१७ रोजी प्रसिध्द केलेल्या परिपत्रकास अनुसरुन संस्थान मालकीचे मौजे शिर्डी व कोऱ्हाळे येथील जमिनीचे भोवती कुंपन करणेकामी राबविणेत आलेली ई-निविदा प्रक्रिया रद्द करणेत येऊन, याकामी नव्याने ई-निविदा प्रक्रिया राबविणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.."

**प्रस्तावना**:- संस्थान मालकीचे मौजे शिर्डी व को-हाळे येथील खालील क्षेत्राचे संरक्षणाचे दृष्टीने प्री कास्ट कुंपन करणेस मा.व्यवस्थापन समितीचे दि.२२/१२/२०१६ रोजीचे सभेत मान्यता देण्यात आली आहे.

| गावाचे नांव | गट नंबर/सर्व्हे नंबर | क्षेत्र- हेकटर-आर | लांबी. |
|---|---|---|---|
| को-हाळे | ९७ पै | ०१-६२ | ६२७ मिटर |
| शिर्डी | १२४/११ व १२ | ०१-२० | ५७६ मिटर |
| शिर्डी | २०७/२ | ००८० | ३६४.८० मिटर |

विषयांकीत कामासाठी सुधारीत जिल्हा दरसूची (DSR) सन २०१६-१७ नुसार येणारे रु.३६,७१,८६३/- मात्र इतका खर्च अपेक्षीत होता. मा.व्यवस्थापन समितीच्या निर्णयानुसार सदरहु कामी विहीत पध्दतीने ई निविदा मागविण्यात आल्या असून ई निविदा अपलोड करण्याच्या दि.०२/०२/२०१८ पर्यंतच्या अंतिम मुदतीत खालील ०४ ठेकेदारांनी ई निविदा जमा केल्या होत्या.

| अ.नं. | ठेकेदारांचे नांव / गांव |
|---|---|
| ०१ | रामदेव प्री स्ट्रेस ॲन्ड सिमेंट प्रॉडक्टस्, नागपूर. |
| ०२ | त्रिमुर्ती कन्स्ट्रक्शन, नासिक |
| ०३ | आर.एल.भुतडा, कोपरगाव. |
| ०४ | विश्वरुप इंटरप्राईजेस, कोपरगाव |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या ई-निविदांचा तांत्रिक माहितीचा लिफाफा मा. खरेदी समितीच्या दि.०९/०२/२०१८ रोजीच्या सभेपुढे उघडणेत आला असून ठेकेदार यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची छाननी केली असता तांत्रीक छाननी अहवालानुसार उपरोक्त ठेकेदारांपैकी खालील तीन ठेकेदार पात्र झाले आहेत. पात्रताधारक ठेकेदार यांनी सादर केलेला ई- निविदांचा वाणिज्यिक लिफाफा दि.१४/०२/२०१८ रोजीचे मा. खरेदी समितीचे सभेपुढे उघडणेत आले असून, त्यांनी सादर केलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | ठेकेदारांचे नांव / गांव | रक्कम | शेरा |
|---|---|---|---|
| ०१ | रामदेव प्री स्ट्रेस ॲन्ड सिमेंट प्रॉडक्टस्, नागपूर. | ३५,६९,८९०/- | |
| ०२ | त्रिमुर्ती कन्स्ट्रक्शन, नाशिक | ३४,९५,०४८/- | **निम्नतम** |
| ०३ | आर.एल.भुतडा, कोपरगाव. | ४१,५१,९९१/- | |

**प्रस्ताव:-** उपरोक्त तपशिलानुसार ०३ निविदाधारकांपैकी ठेकेदार त्रिमुर्ती कन्स्ट्रक्शन, नाशिक यांचे दर निम्नतम आहेत. तरी याकामी निम्नतम दराचे ठेकेदार यांना कार्यादेश देणेसाठी सदरील विषय मा. व्यवस्थापन समितीकडे शिफारस करणेकामी सदरचा विषय मा.उप समितीचे सभेपुढे सादर होणेस मान्यतेस्तव सविनय सादर.

**प्रस्तावीत कामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतम दरधारक त्रिमुर्ती कन्स्ट्रक्शन, नाशिक हे आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. सभेने त्यांचेशी दर कमी करणेबाबत चर्चा केली असता त्यांनी दर कमी करणेस असमर्थता दर्शविली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान मालकीचे मौजे शिर्डी व कोऱ्हाळे येथील जमिनीचे भोवती कुंपन करणेकामी निम्नतम दरधारक त्रिमुर्ती कन्स्ट्रक्शन, नाशिक यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग)

---

०५ **श्री साईप्रसादालय इमारतीचे आतील व बाहेरील बाजुने रंगकाम करणेकामी प्राप्त ई-निविदांचे वाणिज्यीक देकारांवर निर्णय होणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:-** अधिनियम कलम २१(१) अन्वये समितिकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनासाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल, अशी तरतूद आहे.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय:-**

१. मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०९/१०/२०१६ रोजीचे सभेत निर्णय क्रमांक ७१० अन्वये खालील प्रमाणे झालेला आहे.

*"...यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालय इमारतीचे आतील व बाहेरील भागास रंगकाम करणेकामी विहीत पध्दीतीने ई-निविदा मागविणेस तसेच याकामी येणा-या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देणेत आली."*

२.मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०८/०९/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्रमांक ७६८(०३)अन्वये खालील प्रमाणे झालेला आहे.

*"...श्री साई प्रसादालय इमारतीचे आतील व बाहेरील भागास रंगकाम करणेकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रिये मधील निम्नतम दरधारक आजचे उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी अनुपस्थित होते. परंतु त्यांनी दुरध्वनीद्वारे दर कमी करणेऐवजी जीएसटी कराची रक्कम वेगळी मिळणेबाबत सभेस विनंती केली.*

*यावर सविस्तर चर्चा होऊन, महाराष्ट्र शासनाने जीएसटी अंमलबजावणी नंतर शासकीय कंत्राटात होणारा बदल या विषयाचे दि.१९ ऑगष्ट, २०१७ रोजी प्रसिध्द केलेल्या परिपत्रकास अनुसरुन श्री साई प्रसादालय इमारतीचे आतील व बाहेरील भागास रंगकाम करणेकामी राबविणेत आलेली ई-निविदा प्रक्रिया रद्द करणेत येऊन, याकामी नव्याने ई-निविदा प्रक्रिया राबविणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली..”*

**प्रस्तावना-** मौजे निमगांव को-हाळे येथील संस्थानचे गट नं.८०,८५ मध्ये श्री साई प्रसादालय इमारतीचे बांधकाम करण्यात आले असून दि.०८/०१/२००९ पासून साईभक्तांना तेथे प्रसाद भोजन वाटप करणेत येत आहे. दररोज सरासरी ३५ ते ४० हजार भाविक प्रसाद भोजनचा लाभ घेतात. सदर इमारतीचा वापर सूरू होऊन ०८ वर्षापेक्षा आधिक कालावधी झालेला आहे. सततच्या वापरामुळे इमारतीचे अंतर्गत भागातील रंग ब-याच ठिकाणी खराब झालेला आहे. यामध्ये मुख्य किचन, चपाती किचन व बुंदी किचन मधील रंगकाम धुरामुळे बरेच खराब झालेले आहे. तसेच इमारतीचे बाहेरील बाजूस सिमेंट पेंन्टने रंगकाम करणेत आलेले आहे. वातावरणाच्या परीणामामुळे सदरचा रंग देखील खराब झालेला आहे. त्यामुळे प्रसादालय विभागाने इमारतीचे आतिल व बाहेरील बाजूने रंगकाम करून देणेस कळविले आहे. मा. व्यवस्थापन समितीचे दि.०९/१०/२०१६ रोजीचे सभेत याकामी ई निविदा मागविणेस तसेच येणा-या रक्कम रु.८५,८४,३१९/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/०९/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७६८(३) अन्वये महाराष्ट्र शासनाचे जी.एस.टी.अंमलबजावणीनंतर शासकीय कंत्राटात होणारा बदल याविषयाचे दि.१९/०८/२०१७ रोजीचे परिपत्रकानुसार याकामी करण्यात आलेली निविदा प्रक्रिया रद्द करुन नव्याने ई निविदा प्रक्रिया राबविणेबाबत निर्णय झालेला आहे.

उपरोक्त निर्णयानुसार याकामी वृत्तपत्रात तसेच संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करण्यात होती ठेकेदार यांना ई-निविदा अपलोड करण्याची अंतिम मूदत दि.३०/०१/२०१८ अखेर ठेवण्यात आली होती. ई-निविदा अपलोड करणेची अंतिम मूदतीतखालील ०६ ई-निविदा अपलोड झालेल्या आहे.

| अ.नं. | ठेकेदारांचे नांव / गांव |
|---|---|
| ०१ | डिसेंट डेकोरेटर्स, पुणे. |
| ०२ | भिवाई कन्स्ट्रक्शन, शिंगणापूर ता.माण जि.सातारा. |
| ०३ | समाधान इंटरप्राईजेस, दहीसर, नवी मुंबई. |
| ०४ | सौरव डेकोरेटर्स, पुणे. |
| ०५ | शुभराज सर्व्हीसेस, पुणे. |
| ०६ | सुयोगधाम इन्फ्रास्ट्रक्चर एल.एल.पी., पुणे. |

सदर प्राप्त ई-निविदांचे तांत्रीक लिफाफे मा. खरेदी समितीचे दि.०९/०२/२०१८ रोजीचे सभेपुढे उघडणेतआले असून ठेकेदार यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची छाननी केली असता तांत्रीक छाननी अहवालानुसार उपरोक्त ठेकेदारांपैकी खालील चार ठेकेदार पात्र झाले आहेत.

| अ.नं. | ठेकेदारांचे नांव / गांव |
|---|---|
| ०१ | डिसेंट डेकोरेटर्स, पुणे. |
| ०२ | भिवाई कन्स्ट्रक्शन, शिंगणापूर ता.माण जि.सातारा. |
| ०३ | समाधान इंटरप्राईजेस, दहीसर, नवी मुंबई. |
| ०४ | सौरव डेकोरेटर्स, पुणे. |

उपरोक्त ०४ पात्रताधारक ठेकेदार यांनी सादर केलेला ई- निविदांचा वाणिज्यिक लिफाफा दि.१४/०२/२०१८ रोजीचे मा.खरेदी समितीचे सभेपुढे उघडणेत आले असून, त्यांनी सादर केलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | ठेकेदारांचे नांव / गांव | रक्कम | शेरा |
|---|---|---|---|
| **०१** | **डिसेंट डेकोरेटर्स, पुणे.** | **६२,८३,१९६/-** | **निम्नतम .** |
| ०२ | भिवाई कन्स्ट्रक्शन, शिंगणापूर ता.माण जि.सातारा. | ७२,६४,१८३/- | |
| ०३ | समाधान इंटरप्राईजेस, दहीसर, नवी मुंबई. | ८९,८०,६५९/- | |
| ०४ | सौरव डेकोरेटर्स, पुणे. | १,०६,५१,७१४/- | |

उपरोक्त तपशिलानुसार ०४ निविदाधारकांपैकी ठेकेदार डिसेंट डेकोरेटर्स, पुणे यांचे दर निम्नतम आहेत. तरी याकामी निम्नतम दराचे ठेकेदार यांना कार्यादेश देणेसाठी सदरील विषय मा. व्यवस्थापन समितीकडे शिफारस करणेकामी सादर होणेस विनंती.

**प्रस्तावीत कामी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतम दरधारक डिसेंट डेकोरेटर्स, पुणे हे आजचे स्थानिक सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. चर्चेअंती त्यांनी रु.६२,७३,१९६/- मात्र अंतिम दर देऊ केले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालय इमारतीचे आतील व बाहेरील बाजुने रंगकाम करणेकामी निम्नतम दरधारक डिसेंट डेकोरेटर्स, पुणे यांचे रु.६२,७३,१९६/- मात्र अंतिम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, तसेच समाधी शताब्दी वर्षानिमीत्त संस्थानच्या ज्या ज्या इमारतींना आवश्यक आहे अशा इमारतींचे रंगकाम करुन घेणेबाबतचा सविस्तर प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग)

---

०६ **श्री साईबाबा संस्थान परिसरात लावणेत आलेल्या सर्व वॉटर कुलरचे सन २०१८-१९ या एक वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रक्ट (CAMC) देणेकामी उघडण्यात आलेल्या ई-निविदांवर पुढील कार्यवाही होणेबाबत.**

संस्थान परिसरातील सर्व वॉटर कुलर सुस्थीत कार्यरत राहणे आवश्यक असलेने संस्थान परिसरातील एकुण १८० नग वॉटर कुलरचे सन 2018 - 2019 या एक वर्ष कालावधी करीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह् सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणे आवश्यक असलेने महाराष्ट्र शासनाचे www//mahatenders.gov.in या संकेतस्थळावर जाहीरात नोटीस प्रसिध्द करून कंत्राटदारांकडून ई-निविदा मागविणेस व या कामी अपेक्षित खर्च रक्कम रूपये 6,05,000/- (अक्षरी रुपये सहा लाख, पाच हजार) मात्रचे खर्चास दिनांक ०८ डिसेंबर, २०१७ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती चे सभेतील निर्णय क्र. १०३९ अन्वये मान्यता मिळालेली आहे. सदर मान्यतेनुसार महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर दि. २३/०१/२०१८ रोजी ते०५/०२/२०१८ ई निविदा डाऊन लोडींगसाठी देण्यात आलेली होती. सदर मुदतीत खालील चार ई-निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| अ.नं. | ईनिविदाधारकांचे नांव- | अ.नं. | ईनिविदाधारकांचे नांव- |
|---|---|---|---|
| 1. | Kailas Refrigeration Works, | 3. | Heramb Enterprises |
| 2. | Classic Air Conditioning | 4. | Hiver Aircon Private Ltd |

वरील प्राप्त ४ निविदाचे टेक्नीकल बीड दि. १४/०२/२०१८ रोजीचे मा. खरेदी समितीचे सभेपुढे उघडण्यात आलेल्या आहेत. चारही निविदाच्या टेक्नीकल बाबी तपासल्या असता, अ.नं. १ ते ४ यांनी मागणीप्रमाणे सर्व कागदपत्राची पुर्तता केलेली आहे. प्राप्त ४ निविदा पात्र झालेल्या आहेत. पात्र निविदांचे कर्मशियल बीड दि. १४/०२/२०१८ रोजीचे खरेदी समितीचे सभेपुढे उघडण्यात आले असुन, खालीलप्रमाणे दर प्राप्त झालेले आहे.

| Sr. No. | Description | Kailas Refrigeration Works | Classic Air Conditioning | **Heramb Enterprises** | Hiver Aircon Private Ltd. |
|---|---|---|---|---|---|
| 1. | Compressive Annual Maintenance Contract of All Water Cooler in Sansthan Campus (As per the list attached) (91 + 89 Nos= 180 Nos) | 6,33,525/- | 8,10,900/- | **5,98,385/-** | 11,79,056/- |
| | **शेरा :** | L2 | L3 | **L1** | L-4 |

उपरोक्त आर्थिक (Financial Bid) बीडमधील दरानुसार M/s. Heramb Enterprises, Jalgaon यांचे रक्कम रु. ५,९८,३८५/- (अक्षरी रुपये- पाच लाख, आठ्यान्नव हजार, तीनशे, पंच्याऐंशी) मात्रचे दर निम्नत्तम आहे.

तरी संस्थान परिसरातील सर्व वॉटर कुलर कार्यरत राहणे आवश्यक असलेने सर्व वॉटर कुलरचे सन 2018 - 2019 या एक वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह् सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेकामी कामी उपरोक्त निम्नत्तम दरधारकासोबत दराबाबत चर्चा व वाटाघाटी करुन पुढील कार्यवाही करणेकामी सदरचा विषय/ प्रस्ताव मा. उपसमितीचे सभेपुढे सादर.

**प्रस्तावीत कामी राबविण्यात आलेल्या ई-निविदाप्रक्रियेमधील निम्नतम दरधारक** M/s. Heramb Enterprises, Jalgaon **यांचे प्रतिनिधी हे आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. चर्चेअंती त्यांनी रु.५,७०,०००/- अंतिम दर देऊ केले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान परिसरात लावणेत आलेल्या सर्व वॉटर कुलरचे सन २०१८-१९ या एक वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रक्ट (CAMC) देणेकामी निम्नतम दरधारक** M/s. Heramb Enterprises, Jalgaon **यांचे रु.५,७०,०००/- मात्र अंतिम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

०७ **गुरुस्थान मंदिर चौथराचे कडेला नवीन स्टेनलेस स्टील रिलींग बसविणेकामी उघडण्यात आलेल्या ई-निविदांवर पुढील कार्यवाही होणेबाबत.**

गुरुस्थान चौथरा भोवती चारही बाजुने नवीन ५ फुट उंची स्टेनलेस स्टील रिलींग तयार करुन बसवून घेणेस व याकरीता महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर तसेच वेबसाईटवर जाहिरात प्रसिध्द करुन ई- निविदा मागविणेस व याकामी रक्कम रूपये ४,७५,१००/- मात्रचे खर्चास मेकॅनिकल विभागाकडील दि. ११/१२/२०१७ रोजीचे मंजूर टिपणीने मान्यता मिळालेली आहे. सदर मान्यतेनुसार महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर दि. २३/०१/२०१८ रोजी ते०५/०२/२०१८ ई निविदा डाऊन लोडींगसाठी देण्यात आलेली होती. सदर मुदतीत खालील चार ई-निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| अ.नं. | ईनिविदाधारकांचे नांव- | अ.नं. | ईनिविदाधारकांचे नांव- |
|---|---|---|---|
| 1. | M/s. Apurva Engineering Work, Aurangabad | 3. | M/s.Mark Interiors, Mumbai |
| 2. | M/s. P.S. Tembhurnikar, Auragabad | 4. | M/s. Shahaji Prataprao Shelar, Shrigaonda |

वरील प्राप्त ४ निविदाचे टेक्नीकल बीड दि. ०९/०२/२०१८ रोजीचे मा. खरेदी समितीचे सभेपुढे उघडण्यात आलेल्या आहेत. चारही निविदाच्या टेक्नीकल बाबी तपासल्या असता मे. मार्क इंटेरियल, मुंबई यांनी अनुभवाचे प्रमाणपत्रे तसेच कंपनी रजिस्टेशन प्रमाणपत्र जोडलेले नसल्याने, त्यांना अपात्र ठरवून उर्वरित ३ निविदा पात्र झालेल्या आहेत. पात्र निविदांचे कर्मशियल बीड दि. १४/०२/२०१८ रोजीचे खरेदी समितीचे सभेपुढे उघडण्यात आले असुन, खालीलप्रमाणे दर प्राप्त झालेले आहे.

| Sr. No. | Description | **M/s. Apurva Engineering Work] Aurangabad** | M/s. P.S. Tembhurnikar, Auragabad | M/s. Shahaji Prataprao Shelar, Shrigaonda |
|---|---|---|---|---|
| 1. | Supply Fabrication & Erection of Stainless Steel Railing. | **4,47,090/-** | 5,57,500/- | 5,84,660/- |
| | Remark | L- 1 | L- 2 | L - 3 |

उपरोक्त आर्थिक (Financial Bid) बीडमधील दरानुसार गुरुस्थान चौथरा भोवती चारही बाजुने नवीन ५ फुट उंची स्टेनलेस स्टील रिलींग तयार करुन बसवून घेणेकामी मे .अपुर्वा इंजिनिअरिंग वर्क्स, औरंगाबाद यांचे रक्कम रु. ४,४७,०९०/- (अक्षरी रुपये- चार लाख, संत्तेचाळीस हजार, नव्वद ) मात्र निम्नत्तम आहे.

तरी गुरुस्थान चौथरा भोवती चारही बाजुने नवीन ५ फुट उंची स्टेनलेस स्टील रिलींग तयार करुन बसवून घेणेकामी उपरोक्त दरधारकांना दराबाबत चर्चा व वाटाघाटी करुन पुढील कार्यवाही करणेकामी सदरचा विषय/ प्रस्ताव मा. उपसमितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**प्रस्तावीत कामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतम दरधारक मे.अपुर्वा इंजिनिअरिंग वर्क्स, औरंगाबाद हे आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. सभेने त्यांचेशी दर कमी करणेबाबत चर्चा केली असता त्यांनी दर कमी करणेस असमर्थता दर्शविली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, गुरुस्थान मंदिर चौथराचे कडेला नवीन स्टेनलेस स्टील रिलींग बसविणेकामी निम्नतम दरधारक मे.अपुर्वा इंजिनिअरिंग वर्क्स, औरंगाबाद यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

०८ **श्री साईनाथ रुग्णालयाच्या इमारतीवरील वाढीव तिसऱ्या मजल्याचे विद्युतीकरणाचे काम करणेकामी उघडण्यात आलेल्या ई-निविदांवर चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय होणेबाबत.**

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५-०७-२०१७ रोजीचे सभेतील विषय नं.१०३ निर्णय क्र.६२३ अन्वये श्री साईनाथ रुग्णालय इमारतीवरील वाढीव तिस-या मजल्याचे विद्युतीकरण कामाकरीता विहित पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या रक्कम रुपये १,०३,१४,१९४/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.

श्री साईनाथ रुग्णालय इमारतीवरील वाढीव तिस-या मजल्याचे विद्युतीकरण कामाची ई-निविदा तसेच ड्रॉईंग तयार करुन विद्युत विभागाकडे तातडीने सादर करणेकरीता बांधकाम विभागाकडून नेमणूक करण्यात आलेले आर्किटेक्ट/ कन्सल्टंट मे.निकम पाटील असोसिएटस्, श्रीरामपूर यांना जा.नं.एसएसएसटी/ विद्युत/ ४४३१/ २०१७ दि.२४-११-२०१७ अन्वये पत्र पाठविण्यात आलेले होते. त्यानुसार मे.निकम पाटील असोसिएटस्, श्रीरामपूर यांचेकडून दि.३०-११-२०१७ रोजी श्री साईनाथ रुग्णालय इमारतीवरील वाढीव तिस-या मजल्याचे विद्युतीकरण कामाची ई-निविदा प्राप्त झालेली होती. विद्युत विभागाचे जा.नं.एसएसएसटी/ विद्युत/ ३५५७/ २०१७ दि.१३-१२-२०१७ अन्वये निविदा दस्तऐवज तपासणी समितीचे सदस्यांकडून संबंधीत कामाची ई-निविदा तपासून घेण्यात आली होती.

त्यानुसार सदर कामाचे ऑनलाईन निविदा मागविणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात देणेसाठी जनसंपर्क विभागामार्फत महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान विभागाकडे (महाटेंडर) कळविण्यात आले होते. विद्युत विभागाचे दिनांक २५-१२-२०१७ चे मंजुर टिपणी अन्वये महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत दि.११-०१-२०१८ रोजी दै.प्रहार, मुंबई व दै.पुण्यनगरी, पुणे, दि.१२-०१-२०१८ रोजी लाईफ ३६५, पुणे या वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात आली होती. तसेच संस्थानचे संकेतस्थळावर दि.०९-०१-२०१८ रोजी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. तसेच दि.१०-०१-२०१८, दि.२६-०१-२०१८ रोजी ४१ ठेकेदारांना व दि.०७-०२-२०१८ रोजी ४४ ठेकेदारांना संस्थानमधून ई-मेलव्दारे जाहिरात पाठविण्यात आली होती. तसेच महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन निविदा मागविणेकामी टेंडर नोटीस व टेंडर डाक्युमेंट दि.०५-०१-२०१८ रोजी अपलोड करण्यात आले होते. निविदा ऑनलाईन डाऊन लोडींगसाठी दि.११-०१-२०१८ रोजी सकाळी १०.०० वाजेपासून उपलब्ध करण्यात आली होती. तसेच निविदा ऑनलाईन दाखल करण्याची अंतिम मुदत दि. ०९-०२-२०१८ रोजी सायं ०५.०० वाजेपर्यंत ठेवण्यात आली होती.

दि.०९-०२-२०१८ रोजी संध्याकाळी ई-टेंडर सिस्टिममध्ये ई-निविदेची संख्या ई.डी.पी.ई-टेंडरींग विभागामार्फत चेक केली असता ई-टेंडर सिस्टिममध्ये ०३ ई-निविदा अपलोड केल्याचे आढळून आलेले होते.

त्यानुसार ऑनलाईन अपलोड करण्यात आलेल्या तीन निविदाधारकांचे तांत्रिक ई-निविदा दि.१४-०२-२०१८ रोजी मा.खरेदी समितीचे सभेत उघडून निविदाधारकांच्या निविदा फी, बयाणा रक्कम तसेच कागदपत्राची तपासणी संस्थानचे अंतर्गत लेखापरिक्षण विभागामार्फत करण्यात आलेली असून तीनही निविदाधारक पात्र झालेले आहे.

श्री साईनाथ रुग्णालय इमारतीवरील वाढीव तिस-या मजल्याचे विद्युतीकरण कामाकरीता दि.१४-०२-२०१८ रोजी खरेदी समितीचे सभेत उघडण्यात आलेल्या पात्र तांत्रिक निविदाधारकांचा तपशील खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | शेरा |
|---|---|---|
| १ | मे.आदिती इलेक्ट्रिकल्स्, नाशिक | पात्र. |
| २ | मे.साईसिद्धी एन्टरप्राईजेस, राहाता | पात्र. |
| ३ | मे.जय मुंजोबा लाईट हाऊस, अहमदनगर | पात्र. |

उपरोक्तप्रमाणे श्री साईनाथ रुग्णालय इमारतीवरील वाढीव तिस-या मजल्याचे विद्युतीकरण कामाकरीता तांत्रिक निविदेमध्ये पात्र झालेल्या ०३ ई-निविदा (कमर्शियल बीड) दि.१७-०२-२०१८ रोजी मा.खरेदी समितीचे सभेसमोर उपस्थित निविदाधारकासमक्ष उघडणेत येऊन यामधील मूळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आलेला आहे.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | निविदाधारकाने ई-निविदेत दिलेले दर |
|---|---|---|
| १ | मे.आदिती इलेक्ट्रिकल्स्, नाशिक | रु. ७९,०५,८३८/- |
| २ | मे.साईसिद्धी एन्टरप्राईजेस, राहाता | रु. ९६,४६,७४५/- |
| **३** | **मे.जय मुंजोबा लाईट हाऊस, अहमदनगर** | **रु. ७७,१३,६९६.८०** |

**मागणी** :- श्री साईनाथ रुग्णालय इमारतीवरील वाढीव तिस-या मजल्याचे विद्युतीकरण कामाकरीता दि.१७-०२-२०१८ रोजी झालेल्या मा.खरेदी समितीचे सभेत उघडण्यात आलेल्या ई-निविदा (कमर्शियल बीड) नुसार मे.जय मुंजोबा लाईट हाऊस, अहमदनगर यांचे दर न्युनतम येत असून त्यांचेशी मा.स्थानिक उप समितीचे सभेत चर्चा / वाटाघाटी करुन निर्णय होणेस विनंती.

**प्रस्तावित कामी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतम दरधारक मे.जय मुंजोबा लाईट हाऊस, अहमदनगर हे आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. सभेने त्यांचेशी दर कामी करणेबाबत चर्चा केली असता त्यांनी दर कमी करणेस असमर्थता दर्शविली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयाच्या इमारतीवरील वाढीव तिसऱ्या मजल्याचे विद्युतीकरणाचे काम करणेकामी निम्नतम दरधारक मे.जय मुंजोबा लाईट हाऊस, अहमदनगर यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

०९ **मंदिर व परीसरातील सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातुन भाडेतत्वावर सुरक्षा साहित्य घेणेकामी प्राप्त ई-निविदांचे वाणिज्यीक देकारांवर निर्णय होणेबाबत.**

श्रींचे दर्शनार्थ येणा-या साईभक्तांची संभाव्य गर्दी लक्षात घेता साईभक्तांचे तसेच मंदिर व परीसराचे सुरक्षेच्या दृष्टिकोनातुन तातडीची गरज म्हणून सुरक्षा साहीत्य भाडेतत्वावर घेणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/०१/२०१८ रोजीचे आयत्या वेळेचा विषय नं.१, निर्णय क्र. १ (४) अन्वये मान्यता घेण्यात आलेली आहे. सदर सुरक्षा साहित्य ०३ महिण्यांसाठी भाडे तत्वावर घेणेकामी दि.२७/०१/२०१८ ते दि.०३/०२/२०१८ अखेर या कालावधीत शासनाचे अधिकृत www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ई-निविदा प्रकाशित/अपलोड करण्यात आलेली होती. त्यामध्ये एकुण ०२ निविदाधारकांनी सहभाग नोंदविला. तथापी, ई-निविदेच्या नियमावलीप्रमाणे किमान ०३ निविदा असणे बंधनकारक असल्याने, सदर ई-निविदा प्रक्रीयेस पुन्हा दि.०४/०२/२०१८ ते दि.१२/०२/२०१८ अखेर ०८ दिवसांची ऑनलाईन मुदतवाढ देण्यात आलेली आहे. तदनंतर एकुण ३ निविदाधारकांनी सहभाग घेतल्यामुळे दि.१४/०२/२०१८ रोजी खरेदी समितीचे सदस्य यांचे समक्ष टेक्नीकल बीड उघडण्यात आले आहे. सदर टेक्नीकल बीडमध्ये..

१. Evolve Technologies Services Pvt. Ltd, Pune,
२. Reliance Electronics, D-1/2, M.I.D.C., Ambad, Nashik
३. Sai Automotive India Pvt.Ltd, Pune.

या तीन निविदाधारकांच्या ई-निविदा प्राप्त झालेल्या होत्या. सदर तीन निविदांपैकी अ.नं.३ Sai Automotive India Pvt.Ltd, Pune. यांची वार्षिक उलाढाल कमी असल्यामुळे, ते अपात्र ठरलेले होते. तथापी, महाराष्ट्र शासनाचे उद्योग, उर्जा व कामगार विभागाचे दि.०१/१२/२०१६ रोजीचे शासन निर्णयाच्या खरेदी कार्यपध्दती सुधारीत नियमपुस्तीकेतील कलम ४.४.३.१ (ब) नुसार पात्र असणा-या दोन निविदाधारकांच्या दि.१७/०२/२०१८ रोजी खरेदी समितींच्या सदस्यांसमक्ष कमर्शियल बीड उघडण्यात आलेल्या आहेत.

सदर कमर्शियल बीडमध्ये अनुक्रमे- १) Evolve Technologies Services Pvt. Ltd, Pune, २) Reliance Electronics, D-1/2, M.I.D.C., Ambad, Nashik या दोन निविदाधारकांच्या निविदा पात्र ठरलेल्या असुन, त्यांनी मागील दरापेक्षा कमी दर भरलेले आहेत. त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे –

| Sr. No. | Vendor Name | 01 X-ray Baggage Scanner | 02 DFMD | 03 HHMD | Total (Per Month) | यापुर्वीचे RFQ निवीदेतील दरमहा दर | नव्याने ई-निवेदेद्वारे दरमहा संस्थानचा होणारा फायदा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | Quantity:- | 04 Nos. | 09 Nos. | 15 Nos. | | | |
| 01 | Evolve Technologies Services Pvt. Ltd., Pune | 1,02,660/- (Per Nos) | ------ | ------ | 4,10,640/- | 4,62,560/- | 51,920/- |
| 02 | Reliance Electronics, Nashik | ------ | 14,974.20 (Per Nos) | 531.00 (Per Nos) | 1,42,732.80/- | 1,68,150/- | 25,417/- |
| | ( In Figures- Five Lakh Fiftythree Thousand Three Hundred & Seventy Three only) TOTAL- | | | | 5,53,373.00/- | 6,30,710/- | 77,337/- |

उपरोक्त दर्शविलेल्या तक्यानुसार ई-निविदेतील फायनान्सीयल बीडनुसार अ.नं.०१ यांचे एक्स-रे बॅगेज स्कॅनर या साहीत्याचे दर निम्नतम (L1) असल्याने तसेच अ.नं.२ यांचे डि.एफ.एम.डी., एच.एच.एम.डी. या साहीत्याचे दर निम्नतम (L1) असल्याने त्यांना कार्यादेश (work order) देणे आवश्यक आहे. तथापी यापुर्वी RFQ निवीदा प्रक्रीयेद्वारे भाडोत्री तत्वावर घेतलेले सुरक्षा साहित्याची मुदत दि.१३/०२/२०१८ रोजी संपृष्टात आलेली असुन आता नव्याने ई-निवीदा प्रक्रीया राबविलेनुसार यापुर्वीचेच ठेकेदार यांना भाडोत्री तत्वावर सुरक्षा साहित्य पुरवठा करणेस (L1) प्रमाणे कार्यादेश देणे गरजेचे आहे. तरी सदरचे पुरवठादार यांनी भाडोत्री तत्वावर पुरविलेले सुरक्षा साहित्य कार्यान्वीत ठेवलेले असल्याने कमर्शियल बिड उघडलेचे तारखेपासुन (दि.१७/०२/२०१८) पुढील ०३ महिन्याचे कालावधीसाठी कार्यादेश देण्यास तसेच त्याकामी दरमहा येणारे रु.५,५३,३७३/- चे खर्चास मान्यता असावी ही विनंती.

**प्रस्तावीत कामी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम दरधारक Evolve Technologies Services Pvt. Ltd., Pune व Reliance Electronics, Nashik हे आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. सभेने त्यांचेशी दर कमी करणेबाबत चर्चा केली असता त्यांनी दर कमी करणेस असमर्थता दर्शविली. तथापी त्यांनी दि.१३.०२.२०१८ पासुन कार्यादेश मिळेपर्यंत सध्या लावणेत आलेल्या सुरक्षा साहित्याचे भाडे माफ करणेस तयार असल्याचे सांगीतले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिर व परीसरातील सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातुन भाडेतत्वावर सुरक्षा साहित्य घेणेकामी एक्स-रे बॅगेज स्कॅनर या साहीत्याचे निम्नतम दरधारक Evolve Technologies Services Pvt. Ltd., Pune तसेच डि.एफ.एम.डी. व एच.एच.एम.डी. या साहीत्याचे निम्नतम दरधारक Reliance Electronics, Nashik यांचे निम्नतम दर स्विकारणेत यावेत तसेच सुरक्षेच्या दृष्टीने त्यांना प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे तात्काळ कार्यादेश देण्यात येऊन सदरचा प्रस्ताव कार्योत्तर मान्यतेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)

---

१० **सन २०१८- १९ (दि.०१.०३.२०१८ ते २८.०२.२०१९) या वर्षासाठी द्वारावती भक्तनिवास इमारत व परीसर हाऊसकिपींग/ स्वच्छता कामे आऊटसोर्सिंग पध्दतीने करणेकामी प्राप्त ई-निविदांचे वाणिज्यीक देकारांवर निर्णय होणेबाबत.**

**अधिनियम २००४ मधील तरतुद:-** ०१)२१चा (१) (ग) साईभक्तांना मंदिरात श्रींच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा कोणतीही धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी /सुविधा पुरविणे. ०२) (ख) साईभक्तांना राहण्यासाठी व वापर करण्याकरीता विश्रामगृहे बांधणे व त्याची देखभाल करणे.

**प्रस्तावीक:-** श्रींचे दर्शनासाठी राज्यभरातून, देशभरातून, देश-विदेशातून येणा-या साईभक्तांचे निवासाचे सोयीसाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीमार्फत व्दारावती भक्तनिवास विभागातील ३१६ खोल्यामधून साईभक्तांची निवासव्यवस्था करण्यात येते. विभागातील निवासी साईभक्तांना अधिकाधिक चांगली सेवा सुविधा उपलब्ध व्हावी याकरीता व्दारावती भक्तनिवास विभागातील यांत्रिकीकराणासह हाऊसकिपींग/ स्वच्छतेची कामे आऊटसोर्सिंग पध्दतीने करुन घेतली जातात.

सन २०१७-१८ या वर्षाकरीता या विभागातील यांत्रिकीरणासह हाऊसकिपींग/स्वच्छता कामे आऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेकामी बी.व्ही.जी.इंडिया लि,पुणे यांना दि.०१/०७/२०१७ ते दि.३०/०६/२०१८ अखेर एक वर्ष कालावधीकरीता खालील कोष्टकात नमुदप्रमाणे जा.नं.एसएसएस/वशी-व्दारावती भक्तनिवास/ १६५७/२०१७ दि.२९/०६/२०१७ अन्वये कार्यादेश देण्यात आला होता.

| मनुष्यबळ संख्या | स्वच्छता कामी मशिनरी संख्या | इतर साहीत्य | दरमहा सर्व करांसह रक्कम रु. | वर्षाला सर्व करांसह रुपये |
|---|---|---|---|---|
| ७६ | ०८ | ३२ | ९,४९,९२९/- | १,१३,९९,१५४/- |

उपरोक्त तक्त्यात नमुदप्रमाणे बी.व्ही.जी.इंडिया.लि,पुणे यांनी कार्यादेशानुसार सदर कामाचा करारनामा करुन दिलेला आहे.

परंतू सदर ठेकेदाराने कामास सुरुवात केलेनंतर जी.एस.टी ची अधिक रक्कम मिळणेबाबत मागणी केली होती. जी.एस.टी ची रक्कम अदा न केल्यास दि.०१/०१/२०१८ पासून काम बंद करत असलेबाबत कळविले होते.

त्या अनुषंगाने दि.२०/१२/२०१७ रोजी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कक्षेत चर्चेसाठी संबंधीत ठेकेदारास बोलविण्यात आले होते. चर्चेमध्ये दि.०१/०१/२०१८ पासून काम बंद करता येणार नाही कारण ई-निविदा प्रक्रिया राबविणेकामी किमान ०२ महिने कालावधी लागणार असल्याने ई-निविदा प्रक्रिया होईपावेतो आहे त्याच दरात काम करावे लागेल, असे सदर ठेकेदारास निर्देशित करण्यात आले होते.

त्यानुसार बी.व्ही.जी इंडिया,लि पुणे यांनी दि.२८/०२/२०१८ अखेर काम करत असलेबाबत लेखी पत्राव्दारे कळविले होते.

त्यास अनुसरुन संदर्भ क्र.१ मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/०१/२०१८ रोजीचे सभेत नव्याने सन २०१८-१९ मधील दि.०१/०३/२०१८ ते दि.२८/०२/२०१९ अखेर हाऊसकिपींग कामे आऊटसोर्स पध्दतीने करणेसाठी ई-निविदा प्रक्रिया राबविणेकामी प्रस्ताव सादर करणेत आला होता. त्यास विषय क्र.३८ निर्णय क्र.३८ " साईआश्रम भक्तनिवास, साईधर्मशाळा व व्दारावती भक्तनिवास विभागातील इमारत व इमारत परिसरातील यांत्रिकीरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबींग इ. मेन्टनन्स/स्वच्छता कामे एक वर्ष कालावधीसाठी आऊटसोर्सिंग पध्दतीने करुन घेणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या एकत्रित रु.१६,१२,७९,७००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली असुन त्यामध्ये "व्दारावती भक्तनिवास विभागासाठी साठी जी.एस.टी सह अंदाजे खर्च रक्कम रुपये १,४७,९६,१००/- (अक्षरी रुपये एक कोटी सत्तेचाळीस लाख शहान्नव हजार शंभर मात्र ) एवढी आहे ."

तसेच मा.व्यवस्थापन समितीच्या दि.०७/०८/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४७७ नुसार सर्व निवासस्थानाच्या हाऊसकिपींग/ स्वच्छता कामाच्या एकत्रित निविदा काढण्यात याव्यात. असे ठरले होते. सदरहू निर्णय रद्द करणेत येवून, प्रस्तावित तीनही विभागाकरीता तीन स्वतंत्र ई-निविदा मागविणेत याव्यात." असे ठरले.

त्यास अनुसरुन सन २०१८-१९ मधील दि.०१/०३/२०१८ ते दि.२८/०२/२०१९ अखेर एक वर्ष कालावधीसाठी वर्तमानपत्रत ई-निविदा सूचना जाहिरात जनसंपर्क विभागामार्फत दि.२५/०१/२०१८ रोजी प्रसिध्द करणेत आली. तसेच महाराष्ट्र शासनाच्या व संस्थानच्या अधिकृत संकेतस्थळावर ई-निविदा दि.२५/०१/२०१८ रोजी अपलोड करणेत आली.

ई-निविदाधारकांनी निविदा भरणेपूर्वी निविदा संदर्भात काही अडचणी असल्यास, त्याचे निरसन करणेकामी दि.३०/०१/२०१८ रोजी प्री-बीड मिटींग ठेवण्यात आली होती. सदर मिटींगचे इतिवृत्त माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत संस्थानचे संकेतस्थळावर व ई.डी.पी विभागामार्फत महाराष्ट्र शासनाचे www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर अपलोड करुन, ई-निविदा ऑनलाईन अपलोड करण्यातची अंतीम मुदत दि.०८/०२/२०१८ अखेर होती.

सदर ई-निविदे प्रक्रियेमध्ये मुदतीत पाच निविदाधारकांच्या निविदा प्राप्त झाल्या. ऑनलाईन प्राप्त तांत्रिक बीड (Technical Bid) दि.१४/०२/२०१८ रोजीचे खरेदी समिती सभे समोर उघडण्यात येवून, कागदपत्रांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन लेखाशाखा विभागाकडून तपासून घेण्यात आलेला आहे. त्यामधील पात्र/अपात्र निविदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | निविदाधारकांचे नांव | मिळालेले गुण | ६०% पैकी | पात्र/अपात्र |
|---|---|---|---|---|
| १ | बी.व्ही.जी.इंडिया लि, पुणे | १०० | ६० | पात्र |
| २ | एम.पी.एन्टरप्रायजेस ॲण्ड असोसिएटेड लि, पुणे | ८० | ४८ | पात्र |
| ३ | स्पिक-एन-स्पॅन सर्व्हिसेस, मुंबई | ६० | ३६ | पात्र |
| ४ | हिंदूस्थान फॅसिलिटी प्रा.लि. मुंबई | ४० | २४ | **अपात्र** |
| ५ | क्लिनेक्स हॉस्पीटॅलीटी, मुंबई | ३५ | १८ | **अपात्र** |

**मागणी:-** उपरोक्त पात्र तीनही निविदाधारकांचे दि.१७/०२/२०१८ रोजीचे खरेदी समिती सभेसमोर वाणिज्यिक बीड (Financial Bid) उघडण्यात आले असून, त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | निविदाधारकांचे नांव | GST वगळून वार्षिक दर रुपये पैसे | स्थिती |
|---|---|---|---|
| १ | बी.व्ही.जी.इंडिया लि, पुणे | १,३५,७६,८५२.५६ | L-3 |
| २ | स्पिक-एन-स्पॅन सर्व्हिसेस, मुंबई | १,२४,५०,७५६.०० | L-2 |
| ३ | एम.पी.एन्टरप्रायजेस ॲण्ड असोसिएटेड लि, पुणे | **१,०५,२९,३०५.५६** | L-1 |

उपरोक्त तक्त्यात दर्शविलेप्रमाणे अ.नं.३ एम.पी.एन्टरप्रायजेस ॲण्ड असोसिएटेड लि, पुणे हे निम्नतम दरधारक (L-1) ठरत आहे.

सध्याचे कंत्राटदार बी.व्ही.जी.इंडिया लि,पुणे यांची दि.२८/०२/२०१८ पर्यत मुदत असल्याने, मा.व्यवस्थापन समिती दि.०२/०२/२०१८ रोजीची सभा आयत्या वेळेचा विषय नं.१० नुसार सन २०१८-१९ मधील दि.०१/०३/२०१८ ते दि.२८/०२/२०१९ अखेर एक वर्षाकरीता निम्नतम दरधारकास मा.उपसमितीचे मान्यतेने कार्यादेश देणेबाबतची कार्यवाही करुन, मा.व्यवस्थापन समितीची कार्योत्तर मान्यता घेणेबाबत निर्णय क्र.११६ नुसार मान्यता मिळालेली आहे.

**विभागांचा अभिप्राय / स्पष्ट मत :-** सन २०१७-१८ या मागील वर्षाकरीता बी.व्ही.जी.इंडिया.लि,पुणे यांना सर्व करांसह वार्षिक रक्कम रु.१,१३,९९,१५४/- (अक्षरी रु.एक कोटी तेरा लाख नव्यान्नव हजार एकशे चौपन्न मात्र) चा हाऊसकिपींग कामाचा कार्यादेश देण्यात आला होता. सदर बी.व्ही.जी.इंडिया.लि,पुणे यांचा कामाचा कालावधी दि.२८/०२/२०१८ रोजी संपुष्टात येत आहे. सन २०१८-१९ (दि.०१/०३/२०१८ ते दि.२८/०२/२०१९ अखेर एक वर्षाकरीता) नव्याने ई-निविदा प्रक्रिया राबवितांना निविदाधारकांकडून GST वगळून दर मागविणेत आलेले आहेत. त्यानुसार पाच पैकी पात्र तीन निविदाधारकांचे वाणिज्यिक बीड (Financial bid) खरेदी समिती दि.१७/०२/२०१८ रोजी सभेत उघडून, त्यामध्ये अ.नं.३ एम.पी.एन्टरप्रायजेस ॲण्ड असोसिएटेड लि, पुणे यांचे निम्नतम वार्षिक दर रु.१,०५,२९,३०५.५६ (अक्षरी रु.एक कोटी पाच लाख एकोणतीस हजार तीनशे पाच पैसे छपन्न मात्र) प्राप्त झालेले आहेत.

| मनुष्यबळ संख्या | स्वच्छता कामी मशिनरी संख्या | इतर साहीत्य | GST वगळुन दरमहा रक्कम रुपये | GST वगळुन वार्षिक रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ७६ | ०८ | ३२ | ८,७७,४४२/- | १,०५,२९,३०५.५६ |

मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०२/०२/२०१८ निर्णय क्र.११६ अन्वये निम्नतम दरधारक एम.पी.एन्टरप्रायजेस ॲण्ड असोसिएटेड लि, पुणे यांना मा.स्थानिक उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी बोलविणेस, व हाऊसकिपींग कामाचा सन २०१८-१९ मधील दि.०१/०३/२०१८ ते दि.२८/०२/२०१९ अखेर एक वर्षाकरीता कार्यादेश देणेकामी सदरचा विषय मा.स्थानिक उपसमिती सभेसमोर सादर करणेस मान्यता असावी.

**प्रस्तावित कामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतम दरधारक एम.पी.एन्टरप्रायजेस ॲण्ड असोसिएटेड लि, पुणे हे आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. सभेने त्यांचेशी दर कमी करणेबाबत चर्चा केली असता त्यांनी दर कमी करणेस असमर्थता दर्शविली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१८- १९ (दि.०१.०३.२०१८ ते २८.०२.२०१९) या वर्षासाठी द्वारावती भक्तनिवास इमारत व परीसर हाऊसकिपींग/ स्वच्छता कामे आऊटसोर्सिंग पध्दतीने करणेकामी मा.व्यवस्थापन समितीच्या दि.०२.०२.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.११६ नुसार निम्नतम दरधारक एम.पी.एन्टरप्रायजेस ॲण्ड असोसिएटेड लि, पुणे यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना दि.१ मार्च,२०१८ पासून कार्यादेश देण्यात यावा. व सदरचा प्रस्ताव कार्योत्तर मान्यतेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणेत यावा. अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, व्दारावती भक्तनिवास)

---

११ **सन २०१८-१९ या वर्षासाठी साईआश्रम भक्तनिवास विभागातील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबींग इ.मेन्टनेन्स/ स्वच्छता कामांबाबत ऑनलाईन प्राप्त ई-निविदांचे वाणिज्यीक देकारांवर निर्णय होणेबाबत.**

**अधिनियम२००४मधीलतरतुद:-**०१)२१चा (१) (ग) साईभक्तांना मंदिरात श्रींच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा कोणतीही धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी /सुविधा पुरविणे. ०२) (ख) साईभक्तांना राहण्यासाठी व वापर करण्याकरीता विश्रामगृहे बांधणे व त्याची देखभाल करणे.

**प्रस्तावीक:-** श्रींचे दर्शनासाठी राज्यभरातून, देशभरातून, देश-विदेशातून येणा-या साईभक्तांचे निवासाचे सोयीसाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीमार्फत साईआश्रम भक्तनिवास विभागातील १५३६ खोल्यामधून साईभक्तांची निवासव्यवस्था करण्यात येते. विभागातील निवासी साईभक्तांना अधिकाधिक चांगली सेवा सुविधा उपलब्ध व्हावी याकरीता साईआश्रम भक्तनिवास विभागातील यांत्रिकीकराणासह हाऊसकिपींग विद्युत, प्लंबींग इ. मेन्टनन्स/ स्वच्छतेची कामेआऊटसोर्सिंग पध्दतीने करुन घेतली जातात.

सन २०१७-१८ या वर्षाकरीता या विभागातील यांत्रिकीरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबींग इ. मेन्टनन्स/स्वच्छता कामे आऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेकामी बी.व्ही.जी.इंडिया लि,पुणे यांना दि.०१/०७/२०१७ ते दि.३०/०६/२०१८ अखेर एक वर्ष कालावधीकरीता खालील कोष्टकात नमुदप्रमाणे जा.नं.एसएसएसवशी-साईआश्रम भक्तनिवास/१६६१/२०१७ दि.२९/०६/२०१७ अन्वये कार्यादेश देण्यात आला होता.

| मनुष्यबळ संख्या | स्वच्छता कामी मशिनरी संख्या | इतर साहीत्य | विभाग | उपकरणे | दरमहा सर्व करांसह रक्कम रु. | वर्षाला सर्व करांसह रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| ५३६ | ७१ | १६८ | विद्युत<br>पाणी पुरवठा (प्लंबींग)<br>बांधकाम (सुतारी/गवंडी) | २५<br>५४<br>१५४ | ६५,४९,६७२/- | ७,८५,९६,०६४/- |

उपरोक्त तक्त्यात नमुदप्रमाणे बी.व्ही.जी.इंडिया.लि, पुणे यांनी कार्यादेशानुसार सदर कामाचा करारनामा करुन दिलेला आहे.

परंतू सदर ठेकेदारानेकामास सुरुवात केलेनंतर जी.एस.टी ची अधिक रक्कम मिळणेबाबत मागणी केली होती. जी.एस.टी ची रक्कम अदा न केल्यास दि.०१/०१/२०१८ पासून काम बंद करत असलेबाबत कळविले होते.

त्या अनुषंगाने दि.२०/१२/२०१७ रोजी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कक्षेत चर्चेसाठी संबंधीत ठेकेदारास बोलविण्यात आले होते. चर्चेमध्ये दि.०१/०१/२०१८ पासून काम बंद करता येणार नाही कारण ई-निविदा प्रक्रिया राबविणेकामी किमान ०२ महिने कालावधी लागणार असल्याने ई-निविदा प्रक्रिया होईपावेतो आहे त्याच दरात काम करावे लागेल असे सदर ठेकेदारास निर्देशित करण्यात आले होते.

त्यानुसार बी.व्ही.जी इंडिया,लि पुणे यांनी दि.२८/०२/२०१८ अखेर काम करत असलेबाबत लेखी पत्राव्दारे कळविले होते.

त्यास अनुसरुन मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/०१/२०१८ रोजीचे सभेत नव्याने सन २०१८-१९ मधील दि.०१/०३/२०१८ ते दि.२८/०२/२०१९ अखेर हाऊसकिपींग कामे आऊटसोर्स पध्दतीने करणेसाठी ई-निविदा प्रक्रिया राबविणेकामी प्रस्ताव सादर करणेत आला होता. त्यास विषय क्र.३८ निर्णय क्र.३८"साईआश्रम भक्तनिवास, साईधर्मशाळा व व्दारावती भक्तनिवास विभागातील इमारत व इमारत परिसरातील यांत्रिकीरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबींग इ. मेन्टनन्स/स्वच्छता कामे एक वर्ष कालावधीसाठी आऊटसोर्सिंग पध्दतीने करुन घेणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या एकत्रित रु.१६,१२,७९,७००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आलीअसून "साईआश्रम भक्तनिवास विभागासाठी जी.एस.टी सह अंदाजे खर्च रक्कम रुपये १०,२०,१७,७००/- (अक्षरी रुपये दहा कोटी वीस लाख सतरा हजार सातशे मात्र) एवढी आहे."

तसेच मा.व्यवस्थापन समितीच्या दि.०७/०८/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४७७ नुसार सर्व निवासस्थानाच्या हाऊसकिपींग/ स्वच्छता कामाच्या एकत्रित निविदा काढण्यात याव्यात. असे ठरले होते. सदरहू निर्णय रद्द करणेत येवून, प्रस्तावित तीनही विभागाकरीता तीन स्वतंत्र ई-निविदा मागविणेत याव्यात."असे ठरले.

त्यास अनुसरुनसन २०१८-१९ मधील दि.०१/०३/२०१८ ते दि.२८/०२/२०१९ अखेर एक वर्ष कालावधीसाठी वर्तमानपत्रत ई-निविदा सूचना जाहिरात जनसंपर्क विभागामार्फत दि.२५/०१/२०१८ रोजी प्रसिध्द करणेत आली. तसेच महाराष्ट्र शासनाच्या व संस्थानच्या अधिकृत संकेतस्थळावर ई-निविदा दि.२५/०१/२०१८ रोजी अपलोड करणेत आली.

ई-निविदाधारकांनी निविदा भरणेपूर्वी निविदा संदर्भात काही अडचणी असल्यास त्याचे निरसन करणेकामी दि.३०/०१/२०१८ रोजी प्री-बीड मिटींग ठेवण्यात आली होती. सदर मिटींगचे इतिवृत्त माहिती तंत्रज्ञान विभागामार्फतसंस्थानचे संकेतस्थळावर व ई.डी.पी विभागामार्फत महाराष्ट्र शासनाचे www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर अपलोड करुन, ई-निविदा ऑनलाईन अपलोड करण्यातची अंतीम मुदत दि.०८/०२/२०१८ अखेर होती.

सदर ई-निविदे प्रक्रियेमध्ये मुदतीत तीन निविदाधारकांच्या निविदा प्राप्त झाल्या. ऑनलाईन प्राप्त तांत्रिक बीड (Technical Bid) दि.१४/०२/२०१८ रोजीचे खरेदी समिती सभे समोर उघडण्यात येवून, कागदपत्रांचा

तुलनात्मक तक्ता तयार करुन लेखाशाखा विभागाकडून तपासून घेण्यात आलेला आहे. त्यामधील पात्र/अपात्र निविदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | निविदाधारकांचे नांव | मिळालेले गुण | ६०% पैकी | पात्र/अपात्र |
|---|---|---|---|---|
| १ | बी.व्ही.जी.इंडिया लि, पुणे | १०० | ६० | पात्र |
| २ | बक्क्षी सिक्युरिटी अॅण्ड पर्सनल सर्व्हिसेस.प्रा.लि,मुंबई | ८५ | ५१ | पात्र |
| ३ | एम.पी.एन्टरप्रायजेस अॅण्ड असोसिएटेड लि, पुणे | ८० | ४८ | पात्र |

**मागणी:-** उपरोक्त पात्र तीनही निविदाधारकांचे दि.१७/०२/२०१८ रोजीचे खरेदी समिती सभेसमोर वाणिज्यिक बीड (Financial Bid) उघडण्यात आलेअसून, त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | निविदाधारकांचे नांव | GST वगळून वार्षिक दर रुपये पैसे | स्थिती |
|---|---|---|---|
| १ | बी.व्ही.जी.इंडिया लि, पुणे | ९,३०,२६,५३०.९२/- | L-2 |
| २ | बक्क्षी सिक्युरिटी अॅण्ड पर्सनल सर्व्हिसेस.प्रा.लि,मुंबई | १०,०८,५२,२००.००/- | L-3 |
| ३ | एम.पी.एन्टरप्रायजेस अॅण्ड असोसिएटेड लि, पुणे | **७,२७,४८,२८४.००/-** | L-1 |

उपरोक्त तक्त्यात दर्शविलेप्रमाणे अ.नं.३ एम.पी.एन्टरप्रायजेस अॅण्ड असोसिएटेड लि, पुणे हे निम्नतम दरधारक (L-1) ठरत आहे.

सध्याचे कंत्राटदार बी.व्ही.जी.इंडिया लि,पुणे यांची दि.२८/०२/२०१८ पर्यत मुदत असल्याने, मा.व्यवस्थापन समिती दि.०२/०२/२०१८ रोजीची सभा आयत्या वेळेचा विषय नं.१० नुसार सन२०१८-१९ मधील दि.०१/०३/२०१८ ते दि.२८/०२/२०१९ अखेर एक वर्षाकरीता निम्नतम दरधारकास मा.उपसमितीचे मान्यतेने कार्यादेश देणेबाबतची कार्यवाही करुन, मा.व्यवस्थापन समितीची कार्योत्तर मान्यता घेणेबाबत निर्णय क्र.११६ नुसार मान्यता मिळालेली आहे.

**विभागांचाअभिप्राय/ स्पष्ट मत:-** सन २०१७-१८ या मागील वर्षाकरीता बी.व्ही.जी.इंडिया.लि, पुणे यांना सर्व करांसह वार्षिक रक्कम रु.७,८५,९६,०६४/-(अक्षरी रु.सात कोटी पंच्याऐंशी लाख शहाण्णव हजार चौसष्ट मात्र) हाऊसकिपींग कामाचा कार्यादेश देण्यात आला होता. सदर बी.व्ही.जी.इंडिया.लि, पुणे यांचा कामाचा कालावधी दि.२८/०२/२०१८ रोजी संपुष्टात येत आहे. सन २०१८-१९ (दि.०१/०३/२०१८ ते दि.२८/०२/२०१९ अखेर एक वर्षाकरीता) नव्याने ई-निविदा प्रक्रिया राबवितांना निविदाधारकांकडून GST वगळून दर मागविणेत आलेले आहेत. त्यानुसारपात्र तीन निविदाधारकांचे वाणिज्यिक बीड (Financial bid) खरेदी समिती दि.१७/०२/२०१८ रोजी सभेत उघडून, त्यामध्येअ.नं.३ एम.पी.एन्टरप्रायजेस अॅण्ड असोसिएटेड लि, पुणेयांचे निम्नतम वार्षिक दर रु.७,२७,४८,२८४/- (अक्षरी रु.सात कोटी सत्तावीस लाख आठेचाळीस हजार दोनशे चौ-याऐंशी मात्र) प्राप्त झालेले आहेत.

| मनुष्यबळ संख्या | स्वच्छता कामी मशिनरी संख्या | इतर साहीत्य | विभाग | उपकरणे | GST वगळुन दरमहा रक्कम रुपये | GST वगळुन वार्षिक रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| ५३६ | ७८ | १६१ | विद्युत<br>पाणी पुरवठा (प्लंबींग)<br>बांधकाम(सुतारी/गवंडी) | २५<br>१३८<br>१५४ | ६०,६२,३५७/- | ७,२७,४८,२८४/- |

मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०२/०२/२०१८ निर्णय क्र.११६ अन्वये निम्नतम दरधारक एम.पी. एन्टरप्रायजेस अॅण्ड असोसिएटेड लि, पुणे यांना मा.स्थानिक उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी बोलविणेस, व हाऊसकिपींग कामाचा सन२०१८-१९ मधील दि.०१/०३/२०१८ ते दि.२८/०२/२०१९ अखेर एक वर्षाकरीता कार्यादेश देणेकामी सदरचा विषय मा.स्थानिक उपसमिती सभेसमोर सादर.

**प्रस्तावित कामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतम दरधारक एम.पी.एन्टरप्रायजेस अॅण्ड असोसिएटेड लि, पुणे हे आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. सभेने त्यांचेशी दर कमी करणेबाबत चर्चा केली असता त्यांनी दर कमी करणेस असमर्थता दर्शविली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१८-१९ या वर्षासाठी साईआश्रम भक्तनिवास विभागातील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबींग इ.मेन्टनेन्स/ स्वच्छता कामांबाबत मा.व्यवस्थापन समितीच्या दि.०२.०२.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.११६ नुसार निम्नतम दरधारक एम.पी.एन्टरप्रायजेस अॅण्ड असोसिएटेड लि, पुणे यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना दि.१ मार्च,२०१८ पासून कार्यादेश देण्यात यावा व सदरचा प्रस्ताव कार्योत्तर मान्यतेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस होती.**

**सदरहू इतिवृत्त वाचून कायम करत असता, उपसमितीच्या उपरोक्त शिफारशीस व एम.पी.एन्टरप्रायजेस ॲण्ड असोसिएटेड लि, पुणे यांना दिलेल्या कार्यादेशास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास)

---

१२ **साईधर्मशाळा या ठिकाणी यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबींग इ.मेन्टनेन्स/ स्वच्छतेची कामे आऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेकामी प्राप्त ई-निविदांचे वाणिज्यीक देकारांवर निर्णय होणेबाबत.**

**अधिनियम २००४ मधील तरतुद:-** ०१) २१चा (१) (ग) साई भक्तांना मंदिरात श्रींच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा कोणतीही धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी /सुविधा पुरविणे.०२)(ख) साईभक्तांना राहण्यासाठी व वापरकरण्याकरीता विश्रामगृहे बांधणे व त्याची देखभाल करणे.

**प्रस्तावीक :-** श्रींचे दर्शनासाठी राज्यभरातून, देशभरातून, देश-विदेशातून येणा-या साईभक्तांचे निवासाचे सोयीसाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत निवासव्यवस्था करण्यात येत. साई धर्मशाळा विभागात एकुण ०६ इमारती असुन. एका इमारतीत ३२ हॉल या प्रमाणे एकुण १९२ हॉल आहेत. त्यापैकी एक इमारत कनिष्ठ महाविद्यालयास विद्यार्थांचे शैक्षणिक वापरात आहे. ५ इमारतीमधील १६० हॉल मध्ये साईभक्तांची निवासव्यवस्था करण्यात येते. विभागातील निवासी साईभक्तांना अधिकाधिक चांगली सेवा सुविधा उपलब्ध व्हावी याकरीता साई धर्मशाळा विभागातील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग विद्युत, प्लंबींग इ.मेन्टनन्स/स्वच्छतेची कामे आऊटसोर्सिंग पध्दतीने करुन घेतली जातात.

सन २०१७-१८ या वर्षाकरीता या विभागातील यांत्रिकीरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबींग इ. मेन्टनन्स/ स्वच्छता कामे आऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेकामी बी.व्ही.जी.इंडिया लि, पुणे यांना दि.०१/०७/२०१७ ते दि.३०/०६/२०१८ अखेर एक वर्ष कालावधीकरीता खालील कोष्टकात नमुदप्रमाणे जा.नं.एसएसएस/ वशी-साई धर्मशाळा/१६५५/२०१७ दि.२९/०६/२०१७ अन्वये कार्यादेश देण्यात आला होता.

| मनुष्यबळ संख्या | स्वच्छता कामी मशिनरी संख्या | इतर साहीत्य | विभाग | उपकरणे | दरमहा सर्व करांसह रक्कम रु. | वर्षाला सर्व करांसह रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| २३१ | ४२ | ६६ | विद्युत<br>पाणी पुरवठा (प्लंबींग)<br>बांधकाम<br>(गवंडी/सुतारी) | २५<br>१०९<br>११६ | २८,५४,७७१/- | ३,४२,५७,२५५.७० |

उपरोक्त तक्त्यात नमुदप्रमाणे बी.व्ही.जी.इंडिया.लि,पुणे यांनी कार्यादेशानुसार सदर कामाचा करारनामा करुन दिलेला आहे.

परंतू सदर ठेकेदाराने कामास सुरुवात केलेनंतर जी.एस.टीची अधिक रक्कम मिळणेबाबत मागणी केली होती. जी.एस.टी ची रक्कम अदा न केल्यास दि.०१/०१/२०१८ पासून काम बंद करत असलेबाबत कळविले होते.

त्या अनुषंगाने दि.२०/१२/२०१७ रोजी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कक्षेत चर्चेसाठी संबंधीत ठेकेदारास बोलविण्यात आले होते. चर्चेमध्ये दि.०१/०१/२०१८ पासून काम बंद करता येणार नाही कारण ई-निविदा प्रक्रिया राबविणेकामी किमान ०२ महिने कालावधी लागणार असल्याने ई-निविदा प्रक्रिया होईपावेतो आहे त्याच दरात काम करावे लागेल असे सदर ठेकेदारास निर्देशित करण्यात आले होते.

त्यानुसार बी.व्ही.जी इंडिया,लि पुणे यांनी दि.२८/०२/२०१८ अखेर काम करत असलेबाबत लेखी पत्राव्दारे कळविले होते.

त्यास अनुसरुन संदर्भ क्र.१ मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/०१/२०१८ रोजीचे सभेत नव्याने सन २०१८-१९ मधील दि.०१/०३/२०१८ ते दि.२८/०२/२०१९ अखेर हाऊसकिपींग कामे आऊटसोर्स पध्दतीने करणेसाठी ई-निविदा प्रक्रिया राबविणेकामी प्रस्ताव सादर करणेत आला होता. त्यास विषय क्र.३८ निर्णय क्र.३८ “साईआश्रम भक्तनिवास, साईधर्मशाळा व व्दारावती भक्तनिवास विभागातील इमारत व इमारत परिसरातील यांत्रिकीरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबींग इ. मेन्टेनन्स/स्वच्छता कामे एक वर्ष कालावधीसाठी आऊटसोर्सिंग पध्दतीने करुन घेणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या एकत्रित रु.१६,१२,७९,७००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली असुन "साईधर्मशाळा विभागासाठी GST सह अंदाजे रक्कम रुपये ४,४४,६५,९००/- (अक्षरी रुपये चार कोटी चव्वेचाळीस लाख पासष्ठ हजार नऊशे मात्र) एवढी आहे."

तसेच मा.व्यवस्थापन समितीच्या दि.०७/०८/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४७७ नुसार सर्व निवासस्थानाच्या हाऊसकिपींग/ स्वच्छता कामाच्या एकत्रित निविदा काढण्यात याव्यात. असे ठरले होते. सदरहू निर्णय रद्द करणेत येवून, प्रस्तावित तीनही विभागाकरीता तीन स्वतंत्र ई-निविदा मागविणेत याव्यात."असे ठरले.

त्यास अनुसरुन सन २०१८-१९ मधील दि.०१/०३/२०१८ ते दि.२८/०२/२०१९ अखेर एक वर्ष कालावधीसाठी वर्तमानपत्रात ई-निविदा सूचना जाहिरात जनसंपर्क विभागामार्फत दि.२५/०१/२०१८ रोजी प्रसिध्द करणेत आली. तसेच महाराष्ट्र शासनाच्या व संस्थानच्या अधिकृत संकेतस्थळावर ई-निविदा दि.२५/०१/२०१८ रोजी अपलोड करणेत आली.

ई-निविदाधारकांना निविदा भरणेपूर्वी निविदा संदर्भात काही अडचणी असल्यास त्याचे निरसन करणेकामी दि.३०/०१/२०१८ रोजी प्री-बीड मिटींग ठेवण्यात आली होती. सदर मिटींगचे इतिवृत्त माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत संस्थानचे संकेतस्थळावर व ई.डी.पी विभागामार्फत महाराष्ट्र शासनाचे www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर अपलोड करुन, ई-निविदा ऑनलाईन अपलोड करण्याची अंतीम मुदत दि.०८/०२/२०१८ अखेर होती.

सदर ई-निविदे प्रक्रियेमध्ये मुदतीत तीन निविदाधारकांच्या निविदा प्राप्त झाल्या. ऑनलाईन प्राप्त तांत्रिक बीड (Technical Bid) दि.१४/०२/२०१८ रोजीचे खरेदी समिती सभेसमोर उघडण्यात येवून, कागदपत्रांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन लेखाशाखा विभागाकडून तपासून घेण्यात आलेला आहे. त्यामधील पात्र/अपात्र निविदांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | निविदाधारकांचे नांव | मिळालेले गुण | ६०% पैकी | पात्र/अपात्र |
|---|---|---|---|---|
| १ | बी.व्ही.जी.इंडिया लि, पुणे | १०० | ६० | पात्र |
| २ | बक्षी सिक्युरिटी ॲण्ड पर्सनल सर्व्हिसेस.प्रा.लि,मुंबई | ८५ | ५१ | पात्र |
| ३ | एम.पी.एन्टरप्रायजेस ॲण्ड असोसिएटेड लि, पुणे | ८० | ४८ | पात्र |

**मागणी:-** उपरोक्त पात्र तीनही निविदाधारकांचे दि.१७/०२/२०१८ रोजीचे खरेदी समिती सभेसमोर वाणिज्यिक बीड (Financial Bid) उघडण्यात आले असून, त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | निविदाधारकांचे नांव | GST वगळून वार्षिक दर रुपये पैसे | स्थिती |
|---|---|---|---|
| १ | बी.व्ही.जी.इंडिया लि, पुणे | ४,०६,०८,०३३.३६ | L-2 |
| २ | बक्षी सिक्युरिटी ॲण्ड पर्सनल सर्व्हिसेस.प्रा.लि,मुंबई | ४,३१,५०,०५६.०० | L-3 |
| ३ | एम.पी.एन्टरप्रायजेस ॲण्ड असोसिएटेड लि, पुणे | २,९९,७९,०८७.९६ | L-1 |

उपरोक्त तक्त्यात दर्शविलेप्रमाणे अ.नं.३ एम.पी.एन्टरप्रायजेस ॲण्ड असोसिएटेड लि, पुणे हे निम्नतम दरधारक (L-1) ठरत आहे.

सध्याचे कंत्राटदार बी.व्ही.जी.इंडिया लि,पुणे यांची दि.२८/०२/२०१८ पर्यत मुदत असल्याने, मा.व्यवस्थापन समिती दि.०२/०२/२०१८ रोजीची सभा आयत्या वेळेचा विषय नं.१० नुसार सन २०१८-१९ मधील दि.०१/०३/२०१८ ते दि.२८/०२/२०१९ अखेर एक वर्षाकरीता निम्नतम दरधारकास मा.उपसमितीचे मान्यतेने कार्यादेश देणेबाबतची कार्यवाही करुन, मा.व्यवस्थापन समितीची कार्योत्तर मान्यता घेणेबाबत निर्णय क्र.११६ नुसार मान्यता मिळालेली आहे.

विभागांचा अभिप्राय/ स्पष्ट मत:- सन २०१७-१८ या मागील वर्षाकरीता बी.व्ही.जी.इंडिया.लि,पुणे यांना सर्व करांसह वार्षिक रक्कम रु ३,४२,५७,२५५.७०./-(अक्षरी रु. तीन कोटी बेचाळीस लाख सत्तावन हजार दोनशे पच्चावण पैस सत्तर मात्र) हाऊसकिपींग कामाचा कार्यादेश देण्यात आला होता. बी.व्ही.जी. इंडिया.लि, पुणे यांचा कामाचा कालावधी दि.२८/०२/२०१८ रोजी संपुष्टात येत आहे. सन २०१८-१९ (दि.०१/०३/२०१८ ते दि.२८/०२/२०१९ अखेर एक वर्षाकरीता) नव्याने ई-निविदा प्रक्रिया राबवितांना निविदाधारकांकडून GST वगळून दर मागविणेत आलेले आहेत. त्यानुसार पात्र तीन निविदाधारकांचे वाणिज्यिक बीड (Financial bid) खरेदी समितीचे दि.१७/०२/२०१८ रोजी सभेत उघडून, त्यामध्ये अ.नं.३ एम.पी.एन्टरप्रायजेस ॲण्ड असोसिएटेड लि, पुणे यांचे निम्नतम वार्षिक दर रु. २,९९,७९,०८७.९६/-(अक्षरी रु.दोन कोटी नव्यान्नाव लाख एकोनऐंशी हजार सत्याऐंशी पैसे शहान्नव मात्र) प्राप्त झालेले आहेत.

| मनुष्य बळ संख्या | स्वच्छता कामी मशिनरी संख्या | इतर साहीत्य | विभाग | उपकरणे | GST वगळुन दरमहा रक्कम रु. | GST वगळुन वार्षिक रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| २३१ | ४२ | ६६ | विद्युत, पाणी पुरवठा (प्लंबींग) बांधकाम (गवंडी/ सुतारी) | २५ १०९ ११६ | २४,९८,२५७/- | २,९९,७९,०८७.९६ |

मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०२/०२/२०१८ निर्णय क्र.११६ अन्वये निम्नतम दरधारक एम.पी.एन्टरप्रायजेस ॲण्ड असोसिएटेड लि, पुणे यांना मा.स्थानिक उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी बोलविणेस, व हाऊसकिपींग कामाचा सन २०१८-१९ मधील दि.०१/०३/२०१८ ते दि.२८/०२/२०१९ अखेर एक वर्षाकरीता कार्यादेश देणेकामी सदरचा विषय मा.स्थानिक उपसमिती सभेसमोर सादर.

**प्रस्तावित कामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतम दरधारक एम.पी.एन्टरप्रायजेस ॲण्ड असोसिएटेड लि, पुणे हे आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. सभेने त्यांचेशी दर कमी करणेबाबत चर्चा केली असता त्यांनी दर कमी करणेस असमर्थता दर्शविली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, साईधर्मशाळा या ठिकाणी यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबींग इ.मेन्टनेन्स/ स्वच्छतेची कामे आऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेकामी मा.व्यवस्थापन समितीच्या दि.०२.०२.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.११६ नुसार निम्नतम दरधारक एम.पी.एन्टरप्रायजेस ॲण्ड असोसिएटेड लि, पुणे यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना दि.१ मार्च,२०१८ पासून कार्यादेश देण्यात यावा. व सदरचा प्रस्ताव कार्योत्तर मान्यतेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस होती.**

**सदरहू इतिवृत्त वाचून कायम करत असता, उपसमितीच्या उपरोक्त शिफारशीस व एम.पी.एन्टरप्रायजेस ॲण्ड असोसिएटेड लि, पुणे यांना दिलेल्या कार्यादेशास कार्योत्तर मान्यता देण्यात आली..**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईधर्मशाळा)

---

१३ **ब्लिचींग पावडरचे डेमोस परवानगी मिळणेबाबत.**

आदित्य बिर्ला ग्रुपचे श्री राजेंद्र बी. परब, असि. मॅनेजर, Grasim Industries Ltd. यांनी आवक नं. २३०६८ दि.०९/०२/२०१८ चे पत्राने त्यांचे कडील विक्रम ब्रॅड असलेल्या ब्लिचिंग पावडर बाबत माहिती दिली असून सदर पावडरचा उपयोग जिल्हा परिषद, नगरपालिका येथे टॉयलेट/ बाथरुम व त्या भोवतीचा परिसर स्वच्छतेसाठी केला जातो तसेच सदर पावडर पाणी प्रक्रियासाठी वापरण्यात येत असल्याचे पत्रात नमुद केले आहे. २०१६ ला उज्जैन येथे कुंभमेळा करिता व २०१७ ला महालक्ष्मी मंदिर कोल्हापुर येथे सदर पावडर विनाशुल्क वितरीत केली असल्याचे कळविलेले आहे.

सदरहू पत्रात त्यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी येथे समाधि मंदिर परिसरात जनरल टॉयलेट/ बाथरुम व त्या भोवतीच्या परिसरात दि. १२/०३/२०१८ ते १६/०३/२०१८ या कालावधी पैकी एक दिवस ब्लिचिंग पावडर उपयोगाबाबतचा ४५ मिनिट डेमो दाखविण्यास परवानगी मिळणेबाबत विनंती केली आहे, तसेच डेमोचे वेळी कंपनीला कळविणेकामी व्हिडीओ शुटींग करावी लागणार असुन त्यासंदर्भात बॅनर लावावे लागतील व डेमोसाठी ५-६ कर्मचारी लागणार असल्याचे कळविलेले आहे. तसेच स्वच्छ अभियान अंतर्गत सामाजिक बांधिलकी या दृष्टीने सदर कार्यक्रमाचे प्रयोजन आहे. असे कळविलेले आहे.

तरी संदर्भिय पत्रास अनुसरुन आदित्य बिर्ला ग्रुप यांना मंदिर परिसरात दि. १२/०३/२०१८ते १६/०३/२०१८ या कालावधी पैकी एक दिवस ब्लिचिंग पावडर उपयोगाबाबतचा ४५ मिनिट डेमो दाखविण्यास व व्हिडीओ शुटींग करणेस व त्याबाजूस स्क्रीनवर डिस्प्ले करणेस परवानगी देणे बाबतचा विषय मा. स्था. उपसमिती सभेसमोर निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्ताव अमान्य करण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, आरोग्य विभाग)

---

१४ **जुने प्रसादालय परिसरामध्ये असलेले सुलभ प्रसाधनगृह वापराचे दर वाढवून मिळणेबाबत सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्व्हिस ऑर्गनाईजेशन, मुंबई यांनी मागणी केलेले वाढीव दराबाबत निर्णय होणेबाबत.**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम 2004 मधील तरतुद : अधिनियम कलम 17 (2) (झ) अन्वये, सर्वसाधारणपणे, विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील. अशी तरतुद आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय: मा.व्यवस्थापन समितीचे दि.28 डीसेंबर, 2015 रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक 647.

प्रस्ताविक: सुलभ इंटरनॅशनल यांचेमार्फत सदर प्रकल्प संस्थान निधीतून सन 1997 मध्ये उभारणेत आला असून, त्यासाठी एकुण रु.1,42,78,539/- मात्र खर्च करणेत असून, सदरहू सुलभ कॉम्पलेक्समध्ये खालील प्रमाणेच्या सुविधा आहेत.

01. 120 संडास (60 स्त्रीयांसाठी व 60 पुरुषांसाठी)
02. 108 बाथरुम (54 स्त्रीयांसाठी व 54 पुरुषांसाठी) व वॉटर स्टोअरेज टँक.
03. 28 विशेष स्वरुपाची स्पेशल सुलभ प्रसाधनगृहे (14 स्त्रीयांसाठी व 14 पुरुषांसाठी)
04. कपडे बदलण्यासाठी स्त्रीयांसाठी व पुरुषांसाठी स्वतंत्र खोलीची व्यवस्था.
05. साईभक्तांना आपले सामान, बॅग लगेज ठेवण्यासाठी लॉकर रुमची विशेष सोय.
06. प्रसाधन गृहाच्या मलमुत्रा पासून बायोगॅस व त्यापासून अपारंपारिक उर्जा निर्मीतीवरुन प्रकल्पात स्नानासाठी गरम पाण्याची सोय वलाईट लाईट व्यवस्था.
07. प्रसाधन प्रकल्पापुढे प्रसन्न बगीचा.

वरिल प्रमाणे सोयी सुविधा असलेली इमारत सुलभ इंटरनॅशनल यांना 30 वर्षेपर्यंत त्याचे सर्व सुरळीत व्यवस्थापण व दैनंदिन देखभाल (उदा. स्वच्छता, नळदुरुस्ती, दिव्यांची दुरुस्ती, स्वच्छता साहीत्य, तुटलेली सर्व सॅनेटरी फिटींग, लाद्या आदी बदलणे, खिडक्या व दरवाजांची दुरुस्ती, नोकरांची नेमणूक व त्यांचे पगार अदा करणे, नगरपंचायत कर भरणे.) इत्यादी यांची सर्व जबाबदारी मे. सुलभ इंटरनॅशनल यांच्याकडे दि.01/05/1996 रोजी झालेल्या करारनाम्यानुसार सोपविण्यात आली आहे.

तसेच संस्थानमार्फत सदर इमारतीस पाणी पुरवठा केला जातो. विद्युत आकाराबाबत मिटर रिडींग प्रमाणे विद्युत आकार सुलभ इंटरनॅशनल यांचेकडून वसुल केला जात असून, सदरहू इमारतीमध्ये असलेली लॉकर व्यवस्था सध्या श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि., शिर्डी यांचेमार्फत चालविणेत येत आहे.

सुलभ शौचालयाची सुविधा वापरणा-यांकडून सुलभ इंटरनॅशनल यांचेमार्फत करारनाम्यातील दर, सध्या घेण्यात येणारे दर व सुधारीत दर मिळणेबाबतचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे

| अ.नं. | सुलभ इंटरनॅशनल यांचेमार्फत देण्यात येणारी सुविधा | करारनाम्यातील दर | सध्याघेत असलेले दर | वाढीव मागणीचे दर |
|---|---|---|---|---|
| ०१ | मुतारी | विनाशुल्क | विनाशुल्क | रु. ०१.०० मात्र |
| ०२ | संडास वापरणेस प्रती व्यक्ती | रु. ०१.०० मात्र. | रु. ०१.०० मात्र. | रु. ०४.०० मात्र |
| ०३ | बाथरुम वापरणेस प्रती व्यक्ती | रु. ०२.०० मात्र | रु. ०२.०० मात्र | रु. ०५.०० मात्र |
| ०४ | बाथरुमसाठी (गरम पाणी) प्रती व्यक्ती | रु. ०२.०० मात्र | रु. ०२.०० मात्र | -- |

संस्थानचे आरोग्य विभागामार्फत नेमलेले डयुटी शिप्ट सुपरवायझर व सदर डयुटीचे मुकादम यांचेकडून वेळावेळी राउंड घेऊन स्वच्छता व इतर सोयी सुविधा व दराबाबत पाहणी करुन ठरल्याप्रमाणे दर आकारणे व चांगली स्थिती राहील याबाबत कार्यवाही करणेत येत आहे. सध्या घेत असलेले दराबाबत पहाणी केली असता मुतारी वापरणेस विनाशुल्क, संडास वापरणेस प्रती व्यक्ती रु. ०१.००, बाथरुम वापरणेस प्रती व्यक्ती रु. ०२.०० व बाथरुमसाठी (गरम पाणी) प्रती व्यक्ती रु. ०२.०० मात्र आकारणी करत असल्याचे निदर्शनास आले आहे.

सुलभ इंटरनॅशनल यांनी त्यांचेकडील दिनांक 03/11/2015 रोजीचे पत्रान्वये मुतारीचे साफ-सफाई साहीत्य, विद्युत आकार, कुशल अकुशल स्वयंसेवकाकडून काम करुन घेण्याचे खर्चामध्ये वाढ झाली असल्याने खालील प्रमाणे सुधारीत दर मिळणेबाबत विनंती केली आहे. वरीलप्रमाणे सुलभ इंटरनॅशनल यांनी मागणी केलेले वाढीव दराबाबतचे प्रस्तावावर मा. व्यवस्थापन समितीचे दि.२८ डिसेंबर, २०१५ रोजीचे सभेत निर्णय क्र.647 खालीलप्रमाणे झालेला आहे.

"यावर सविस्तर चर्चा होऊन, जुने प्रसादालय परिसरामध्ये साईभक्तांच्या सोयीसाठी उभारणेत आलेल्या सुलभ प्रसाधनगृहामधील वापरावयाचे सुविधांसाठी सुलभ इंटरनॅशनल यांनी सध्या आकारणेत येत

असलेल्या शुल्कामध्ये दुपटीपेक्षा जास्त रकमेची वाढ केलेली असल्यामुळे इतर सार्वजनिक ठिकाणी प्रसाधनगृह वापराबाबत किती शुल्क आकारले जाते, याचा तौलानिक अभ्यास करुन सविस्तर फेर प्रसाव सादर करणेत यावा, असे ठरले."

उपरोक्त निर्णयानुसार माहिती मागविली असता, त्यांनी दि.०९/११/२०१७ रोजीचे पत्रान्वये नागपूर महानगरपालिका, नागपूर येथे शौचास रु.4/-. व स्नानास रु.5/-. शुल्क आकारणेत येत असलेने, शिर्डी येथील सुलभ शौचालयाचे दर वाढवून मिळणेबाबत कळविले आहे. तसेच मा. उपजिल्हाधिकारी सो यांचे निर्देशानुसार आरोग्य विभागामार्फत दि. ०६/०१/२०१८ रोजी सुलभ इंटरनॅशनल यांचे शिर्डी येथील प्रतिनिधी श्री. विजय झा यांना समक्ष बोलावून घेवून नगर जिल्ह्यातील नगरपालिका/नगर पंचायत हद्दतील शुलभ शौचालयाचे दराबाबत अधिकृत माहितीपत्र दोन दिवसाचे आत सादर करणेबाबत सांगितले. तसेच वेळोवेळी फोनवरुन दराबाबत सुचित केले आहे. परंतु आज अखेर सुलभ इंटरनॅशनल, शिर्डी यांनी नगर जिल्ह्यातील नगरपालिका/ नगर पंचायत हद्दितील शुलभ शौचालयाचे दराबाबत माहिती दिलेली नाही

सुलभ इंटरनॅशनल यांनी वरीलप्रमाणे केलेले विंनती बाबत त्यांचेशी झालेले करारनाम्यानुसार सदरहू इमारतीमध्ये प्रसाधनगृह चालविणेसाठी त्यांचे समवेत 30 वर्षाचा करारनामा करणेत आलेला आहे. सदर करारनाम्यातील पान नं. 08 मधील अ. नं. 15 मध्ये खालील प्रमाणे नमूद आहे.

The complex will remain open for public use for 21 hours in a day. On pay and retained by the party of the second part. The charges to be so recovered and retained by the party of the second part from the users shall be at rates to be mutually settled from time to time by the parties to this agreement. Soap powder will be provided free of cost by sulabh international to users of W. C. S.

सदरचे सुलभ शौचालयाचे आरोग्य विभाग पर्यवेक्षक/ विभागप्रमुख यांनी दैनंदिन प्रत्यक्ष भेट देवून पहाणी व स्वच्छता चांगली राहील व भक्तांना चांगली सोयी सुविधा मिळतील असे पहाणे. तसेच सुलभ इंटरनॅशनल यांचेकडून आकारणेत येणारे दराबाबत वेळोवेळी नियंत्रण ठेवणेचे काम आरोग्य विभागामार्फत करणेत येत आहे.

सुलभ इंटरनॅशनल यांचेमार्फत आकरणेत येणारे दराबाबत दि.26/06/2017 रोजीचे पत्रान्वये साईभक्त यांनी वाढीव दर आकरणीबाबत केलेले तक्रार अर्जानुसार दि.08/08/2017 रोजी मे. सलुभ इंटरनॅशनल यांचे प्रतिनीधी यांना समक्ष बोलवून समज देणेत आलेली आहे. तसेच मे. सुलभ इंटरनॅशनल यांना आरोग्य विभागामार्फत जा. नं.4528/2017 दि.29/11/2017 रोजीचे पत्रान्वये, संस्थानने नेमून दिलेले दरानुसार दर आकरणेबाबत कळविले आहे.

**प्रस्ताव:-** तरी जुने प्रसादालय परिसरात असलेले सुलभ शौचालय वापरासाठी सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्व्हिस ऑरगनाईजेशन, मुंबई यांनी शौचास रु.1/- एवेजी रु.4/- व बाथरुम वापरासाठी रु.2/- ऐवजी रु.5/- मागणी केलेले शुल्क आकारणीबाबत सुलभ इंटरनॅशनल यांचे समवेत झालेले करारनाम्यातील पान नं.08 मधील अ.नं.15 मध्ये नमूद केलेले अटीनुसार निर्णयार्थ सादर.

यावर सविस्तर चर्चा होऊन, **जुने प्रसादालय परिसरामध्ये असलेले सुलभ प्रसाधनगृह वापराचे दर शौचास रु.२/- व बाथरुम वापरासाठी गरमपाण्यासह रु.५/- या प्रमाणे दर वाढवुन देण्यात यावेत, तसेच गर्दीचे कालावधीत तेथील कर्मचारी साईभक्तांकडून जादा पैसे घेतात अशा तक्रारी येत असल्याने याबाबत योग्य ती कार्यवाही करणेस व सुलभ प्रसाधनगृह वापराचे दरपत्रक फलक दर्शनी भागात लावणेबाबत संबधीतांना सुचना करणेत याव्यात, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. तसेच सदरहू इतिवृत्त वाचून कायम करताना, सुलभ प्रसाधनगृहामधील मुतारी सर्वांसाठी पुर्वीप्रमाणेच निशुल्क ठेवणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, आरोग्य विभाग)

---

१५ **"श्रीकृष्ण भव्यनाटय" या भव्यनाटयाचे संस्थानने आयोजन करणेसाठी श्रीमती उज्वला खंदारे, फिल्म टेलिव्हीजन ॲण्ड थिएटर सोसायटी ऑफ सेंट्रल इंडीया, नागपूर यांचे मा.कार्यकारी अधिकारी महोदया यांना अग्रेषित केलेल्या दि.१०/१०/२०१७ रोजीच्या ई-मेल पत्राबाबत निर्णय घेणे.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद :-**

१. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये,राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने

व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील.

२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

३. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

४. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ड) श्री साईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे.

**मा. व्यवस्थापन समिती ठरावः-**

१) मा. व्यवस्थापन समितीचे दि.०९/०३/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१७१

२) मा. व्यवस्थापन समितीचे दि.२७/०३/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२७७

३) मा. व्यवस्थापन समितीचे दि.२८/०४/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२८०

४) मा. व्यवस्थापन समितीचे दि.२३/०५/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३५८

५) मा. व्यवस्थापन समितीचे दि.१५/०६/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५१९

६) मा. व्यवस्थापन समितीचे दि.२५/०७/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६५४, ६७१, ६७२

७) मा. व्यवस्थापन समितीचे दि.२०/०८/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६८२ खालीलप्रमाणे संमत झाला आहे.

"श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव वर्षभर आयोजित करण्यात येणा-या विविध प्रस्तावित धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमाची सुधारीत रुपरेषा ठरविण्यात आली. तसेच शताब्दी महोत्सवामध्ये आयोजित करावयाच्या धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमासाठीचे कलाकार व त्यांचे मानधन याचे परिशिष्ट ब, क ड व ई सोबत सादर केलेले आहे. या यादीतील कार्यक्रम, कलाकार व त्यांचे मानधन स्थानिक उपसमितीने छाननी करुन कार्यक्रम निश्चित करावे त्यामधील विनामुल्य सेवा करणा-या कलाकारांना प्राधान्य देण्यात येऊन, वर्षभर संधी देण्यात यावी.कार्यक्रमाची निश्चिती झाल्यानंतर त्यामध्ये गरजेनुसार/ परिस्थितीनुसार आवश्यक ते बदल करण्याचे अधिकार व्यवस्थापन समितीला राहतील, असे ठरले.

या निश्चित केलेल्या सर्व प्रकारच्या कार्यक्रमांसाठी, अपवाद वगळता मानधन व प्रवास असे सर्व मिळून प्रत्येकी एका कार्यक्रमासाठी जास्तीत जास्त रु.३ लाख मात्रचे खर्चास तसेच शताब्दी वर्षात आयोजीत केलेल्या कार्यक्रमांसाठी स्टेज, मंडप, साउंड सिस्टीम, विद्युत रोषणाई, सीसीटीव्ही, सुरक्षा व्यवस्था, आवश्यक जादाचे मनुष्यबळ यावर होणारा खर्च व इतर अनुषंगिक खर्चासही मान्यता देण्यात आली.

८) मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८/०९/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७५० खालीलप्रमाणे संमत झाला आहे.

"श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव २०१७-१८ या कालावधीत आयोजीत करावयाचे विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रम व पादुका दर्शन सोहळा कार्यक्रमांबाबत सविस्तर चर्चा होऊन त्यास अंतीम स्वरुप देण्यात आले. "

**प्रस्तावना:-** श्री साईबाबा यांच्या समाधीस दि.ऑक्टोबर २०१८ रोजी १०० वर्षे पुर्ण होत आहेत. श्री साईबाबा संस्थानच्यावतीने दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर २०१८ हा कालावधी श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष म्हणून साजरा करीत आहे.

श्री. शैलेंद्र क्रिष्णा, दिग्दर्शक व श्रीमती उज्वला खंदारे, मार्केटींग मॅनेजर, श्रीकृष्णा भव्यनाट्य, नागपूर यांनी दि.१०/१०/२०१७ रोजीचे ई-मेलद्वारे मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया यांना अग्रेषित केलेल्या पत्रात, श्रीकृष्णाच्या जीवनावर आधारीत असलेले "श्रीकृष्ण भव्यनाट्य" यामध्ये नाटक व नृत्याचा संगम आहे. यामध्ये २५० कलाकार व ५० तंत्रज्ञांचा समावेश आहे. प्रकाश (Light) आणि ध्वनी (Sound) चा समावेश असलेल्या या भव्यनाट्यासाठी ७००० स्क्वे. फुट आकाराचा स्टेज, ११ विविध स्टेजेस, ५० फुट उंचीचे २ मोठे टॉवर्स, घोडे, बैलगाड्या, सिंहासन, स्पेशल इफेक्टस् असलेले भव्यनाटय आहे. भव्यनाट्यासाठी श्री.सुरेश वाडकर, श्रीमती वैशाली सामंत, श्री.प्रसेनजीत कोशंबी यांनी पार्श्वगायन केले आहे.

श्रीकृष्ण भव्यनाट्यामध्ये भगवान श्रीकृष्णांच्या विविध लीलांचा समावेश करण्यात आला आहे. जसे श्रीकृष्ण जन्म लीला, बाल लीला, पुतना वध, कालिया दमन, रास लीला, कंसवध आणि महाभारतातील

महत्वाच्या प्रसंगाचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये भगवान श्रीकृष्णाच्या पुजा, प्रेम, मित्रता, कर्तव्य, आनंद आणि मोक्ष या दैवी व्यक्तिमत्वाचा सुंदर मिलाप असणार आहे. हे भव्यनाटय भगवान श्रीकृष्णाच्या जन्मापासून ते विराट रुपासह, आध्यात्मिक ज्ञान, गीता सार यांचे दर्शन घडविते.

**प्रस्ताव**:- श्री. शैलेंद्र क्रिष्णा, दिग्दर्शक श्रीकृष्णा भव्यनाट्य, नागपूर यांनी श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात आयोजन करावयाचे झाल्यास दोन प्रयोगांसाठी रक्कम रु.२४ लाख मात्र (अक्षरी रक्कम रुपये चोवीस लाख मात्र) खर्चाचे खालीलप्रमाणे अंदाजपत्रक कळविले आहे.

PRODUCTION BUDGET

| Sr.No. | PRODUCTION | DESCRIPTION & EQUIPMENTS |
|---|---|---|
| 1 | Stage | Centre Stage 40*50 foot and 6" & 8 ft Height, with background.<br>Two side stage 25*32, 6ft Height with background.<br>Two side stage 20*24, 8ft Height with background front stage 120*40, 5.5 ft Height with background.<br>One Galleries 28 ft Height with background<br>Total stage area 7000 sq. ft. (Area 200*200 sq.ft.) |
| 2 | Settings | Tree, Zula, Jail, Kans Mahal, Nand House, Sudama's House, Krishna Mahal, Radha House & Swarg etc. |
| 3 | Backdrops | Kans Mahal, Krishna Mahal, Landscape, Gowardhan Mountain & Swarg etc. |
| 4 | Lighting | 125 to 135 par light, 2 scanner, 2 sharpi, 12 stobe light, 2 follow, 2 foco,<br>1 riley, 72 channel pulsar, 2*28 ft tower, 10 stands, 4 blasting,<br>1 electronic moon etc. |
| 5 | Array Sound | Ultra-modern area sound 16 elements stereophonic sound kit,<br>12 stages, monitor, 8 H.F., base bin, cordless mike, 3.4 amplifier (top), 4 low amplifier, 2 H.F. amplifier, 32 channel mixers, 1 DVD player etc. |
| 6 | Drama Property | 2 Rath, 2 Bullockcart, 12 Sinhaasan, 2 large nagade, vaadyayantra,<br>1 Tree, 1 Deer, 1-Jhula, Dhol, Tasha, Gada etc. |
| 7 | Makeup & Costume | Makeup, costumes and jewellery etc for around 250 artists. |
| 8 | Artist & Technician's Payments | Payments to all 250 artists, technicians and non-technicians. |
| 9 | Food Arrangement | Food arrangement for all Artist & Technicians. |
| 10 | Transport | 3 trucks for stage, 3 trucks property, 1 truck for lights & sound<br>(7 trucks) and travelling allowance for all artists and technicians<br>(upto 1000 kms) |
| 11 | Tower | 2 Towes of 50 ft height and 4 towers of 30 ft for lights |
| 12 | Firework | 24 Ariel shots, $CO_2$ fire bolls, cold piro 16 shots, fire shower, fire effects etc. |
| 13 | Special Effects | Vishnu Prakat roop on roller box, Krishna prakat roop on roller effect, Sudarshan Chakra, lifting of Govardhan Mountain, Kifting of Dahi Handi, Vastra Haran effects & Arrow special effect. |
| 14 | Animals | Two horses & four bulls. |

सदर भव्यनाट्यासाठी उपरोक्तप्रमाणे दोन प्रयोगाच्या सादरीकरणासाठी रक्कम रु.२४ लाख मात्र (सर्व शासकीय करांसह) कळविली आहे. त्यासोबत नियम व अटींबरोबरच आयोजकांनी पुरवावयाचे मटेरीयल व आवश्यक व्यवस्था खालीलप्रमाणे कळविली आहे.

१) प्रयोगासाठी २५,००० दर्शक सामावू शकतील या क्षमतेचे मैदान किंवा स्टेडीयमची व्यवस्था करुन स्टेज उभारणीसाठी ते ७ दिवस अगोदर व २ दिवस प्रयोगानंतर उपलब्ध करावे. त्यासाठी डेकोरेशन, साईडींग बॅरीकेडींग व लाईटची व्यवस्था करावी.

२) स्टेज उभारणीदरम्यान मटेरीयलच्या सुरक्षीततेसाठी ५ सुरक्षा रक्षकांची नेमणूक करावी.

३) स्टेज उभारणीसाठी २५० बांबू आणि ७५ बल्ली उपलब्ध कराव्यात.

४) कामगारांची राहण्याची व्यवस्था.

५) पुरुष व महिलांसाठी कलाकार तसेच तंत्रज्ञांसाठी स्वतंत्र फिरत्या स्वच्छतागृहांची व्यवस्था करावी.

६) प्रयोगाची प्रसिद्धी करणे.

७) निर्माता, दिग्दर्शक, कलाकार व तंत्रज्ञ यांची निवास, पिण्याचे पाण्याची व भोजन व्यवस्था करावी.

८) प्रयोगाचे दोन दिवस आधीपर्यंत आवश्यक त्या सर्व शासकीय परवानग्या घेणे आवश्यक आहे. (Permission for the Ground, NOC from the local department, NOC from the local Electric Board, NOC from the local Police Department, NOC for the sound, etc.)

९) प्रयोगासाठीची ५० टक्के रक्कम आगाऊ द्यावी लागेल. तसेच उर्वरीत रक्कम प्रयोगाच्या अगोदर एक आठवडा द्यावी लागेल.

१०) प्रयोगाचे एक दिवस अगोदर ६५ के.व्ही. क्षमतेचा जनरेटर (लाईट व सालऊंडसाठी) उपलब्ध करावा.

११) प्रयोगासाठी १२५ के.व्ही. क्षमतेचे दोन जनरेटरचे उपलब्ध करावे. (प्रयोगा दरम्यान ५ ते ६ तास विद्युतपुरवठा होईल या क्षमतेचे)

१२) प्रयोगासाठीची व्हीडीओ शुटींग काढता येणार नाही.

**श्रीकृष्ण भव्यनाट्याचे प्रयोगासाठी संस्थानने खालील खर्चाच्या बाबींवर निर्णय घेणे आवश्यक आहे.**

| अ.नं. | तपशिल | अंदाजित खर्च रक्कम रु. |
|---|---|---|
| ०१ | प्रयोगासाठी २५,००० दर्शक सामावू शकतील या क्षमतेचे मैदान किंवा स्टेडीयमची व्यवस्था करुन स्टेज उभारणीसाठी ते ७ दिवस अगोदर व प्रयोगानंतर उपलब्ध करावे.<br>(२५ एकर जागा X रु.१,०००/- प्रति एकर, प्रति दिवस – एकुण ९ दिवस)<br>डेकोरेशन, साईडींग बॅरीकेडींग व लाईटची व्यवस्था करावी. | २,२५,०००/- |
| ०२ | प्रयोगासाठीचे प्रेक्षकांसाठी बसण्यासाठी खुर्च्या (भाडेतत्वावर)<br>(एकुण २५,००० X रु.४/- प्रति खुर्ची प्रति दिवस | १,००,०००/- |
| ०३ | डेकोरेशन, साईडींग बॅरीकेडींग व लाईटची व्यवस्था करावी. (भाडेतत्वावर)<br>रु.३०,०००/- प्रति दिवस X ९ दिवस | २,७०,०००/- |
| ०४ | स्टेज उभारणीदरम्यान मटेरीयलच्या सुरक्षिततेसाठी ५ सुरक्षा रक्षक - एकुण ९ दिवस<br>३ शिफ्टमध्ये (हजेरी रु.४१५/-) | ५६,०२५/- |
| ०५ | स्टेज उभारणीसाठी २५० बांबू आणि ७५ बल्ली (भाडेतत्वावर)<br>(बांबू रु.१/- X रु.२५०/-, बल्ली रु.२/- X ७५ (एकुण ९ दिवस) | ३,६००/- |
| ०६ | कामगारांची राहण्याची व्यवस्था एकुण २५० व्यक्ती (रु.५००/- X १० हॉल X ९ दिवस) | ४५,०००/- |
| ०७ | पुरुष व महिलांसाठी कलाकार तसेच तंत्रज्ञांसाठी स्वतंत्र फिरते शौचालये (भाडेतत्वावर)<br>(रु.४००/- प्रति दिवस X १० शौचालये) एकुण ९ दिवस | ३६,०००/- |
| ०८ | प्रयोगाची प्रसिद्धी करणे | २५,०००/- |
| ०९ | निर्माता, दिग्दर्शक, कलाकार व तंत्रज्ञ यांची निवासव्यवस्था<br>एकुण ५० व्यक्ती (रु.५००/- प्रति रुम X १७ रुम) – ९ दिवस | ७६,५००/- |
| १० | प्रयोगाचे एक दिवस अगोदर ६५ के.व्ही. क्षमतेचा जनरेटर (लाईट व साऊंडसाठी)<br>(रु.८,०००/- प्रति दिवस)<br>प्रयोगासाठी १२५ के.व्ही. क्षमतेचे दोन जनरेटर (रु.९,०००/- प्रति दिवस)<br>(प्रयोगा दरम्यान ५ ते ६ तास विद्युतपुरवठा होईल या क्षमतेचे डिझेलसह) | ५५,०००/- |
| | **एकुण अंदाजित खर्च :-** | **८,९२,१२५/-** |

श्रीकृष्ण भव्यनाट्य प्रयोगाचे संस्थानने आयोजन करावयाचे झाल्यास खालील बाबींवर धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे.

१) सदर भव्यनाट्याचे ०२ प्रयोगांसाठीचे मानधन रक्कम रु.२४,००,०००/- मात्र (सर्व शासकीय करांसह) देणेबाबत निर्णय घेणे.

२) सदर भव्यनाट्य प्रयोगासाठी संस्थानने अंदाजे रक्कम रु.८,९२,१२५/- मात्र इतका खर्च करणे अपेक्षित आहे.

३) सदर भव्यनाट्य प्रयोगासाठी २५ एकर जागा उपलब्ध करणेबाबत निर्णय घेणे.

४) प्रयोगासाठीची मानधनाच्या रक्कमेच्या ५० टक्के रक्कम प्रयोग निश्चितीच्यावेळी देणे. तसेच उर्वरित ५० टक्के रक्कम प्रयोगाच्या एक आठवडा आधी देणेबाबत निर्णय घेणे.

५) सदर भव्यनाट्याची संस्थानला व्हीडीओ शुटींग करता येणार नाही.

६) सदर भव्यनाट्य प्रयोगासाठी आवश्यक असणा-या सर्व शासकीय परवानग्या घेणे.

तरी श्रीकृष्ण भव्यनाट्याचे आयोजन करावयाचे झाल्यास सदरकामी अंदाजित **रक्कम रु.३३ लाख मात्र खर्च** अपेक्षित आहे. तरी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्ताव अमान्य करण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही-बांधकाम विभाग, शताब्दी कक्ष)

---

१६ **मे.अपशॉट युटिलिटी सर्व्हीसेस, चैन्नई यांचा प्रसादालयातील हाऊसकिपींग व वाढपीबाबतचा कार्यादेश रद्द करुन, त्यांचा संस्थानचे काळया यादीत समावेश करणेबाबत.**

अधिनियम 2004मधील तरतुदः- सन2004चा महाराष्ट्र अधिनियम क्रं.14 (भाग-4) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचेअधिनियम व राज्यपालांनी प्रस्थापीत केलेले अध्यादेश वकेलेले विनीयम मधील14 (2घ) नूसार भक्तांना सोयीसाठी आवश्यकते उपाययोजना हाती घेण्याचे. तसेच21 (1घ) नूसार भक्तांना जेवण पुरविणे आणि अन्नछत्र चालविणेयाबाबतची तरतुद केलेली आहे.

**प्रस्तावना** :- श्री साई प्रसादालयातील स्वच्छता, हाऊसकिपींग व पेस्टकंट्रोलची कामे तसेच दररोज ५० वाढपी कामगार आऊटसोर्स पध्दतीने पुरविणेकामी इकडील जा.नं.एसएसएस/वशि/प्रसादा/३२६६/२०१७ दि.१९/०९/२०१७ चा कार्यादेशानूसार दि.०१/१०/२०१७ ते ३०/०९/२०१८ या कालावधीसाठी एकत्रित कामाची दरमहा सर्व करांसहीत (GST वगैरेसह) रक्कम रु.१८,९८,०००/- (अक्षरी रक्कम रु.अठरा लाख अठ्ठयान्नव हजार मात्र) या मंजूर दराने संदर्भिय क्रं.१ नूसार मे.अपशॉट युटिलिटी सर्व्हीसेस, चेन्नई यांना कामाचा कार्यादेश देण्यात आलेला आहे.

श्री साई प्रसादालयातील स्वच्छता, हाऊसकिपींग व पेस्टकंट्रोलची कामे तसेच दररोज ५० वाढपी कामगार आऊटसोर्स पध्दतीने पुरविणेकामी दि.०१/१०/२०१७ ते ३०/०९/२०१८ या कालावधीसाठी आवश्यक त्या अटी व शर्ती घालून संबंधीत ठेकेदार व संस्थान यांचेमध्ये करारनामाही करणेत आलेला आहे.

मे.अपशॉट युटिलिटी सर्व्हीसेस, चेन्नई यांचे काम सुरु होणेपुर्वी ११ दिवस अगोदर कार्यादेश देण्यात आलेला होता. तदनंतर काम सुरु होवून जवळपास ११ दिवस झालेले होते तरी देखील त्यांनी श्री साई प्रसादालयात स्च्छता व हाऊसकिपींगकामी मशिनरी व इतर आवश्यक साहीत्य पुरवठा केलेले नव्हते. त्यामुळे स्वच्छते अभावी भक्तांची गैरसोय झालेली होती, करीता सदर साहीत्य तातडीने पुरविणेकामी अन्यथा निविदेतील अटी/ शर्तीनूसार दंडात्मक कारवाई करणेबाबत जा.नं.एसएसएस/वशि/प्रसादा/३७६१/२०१७ दि.१२/१०/२०१७ रोजीचे पत्रानूसार कळविणेत आलेले होते.

तसेच श्री साई प्रसादालयातील हाऊसकिपींग, स्वच्छता व पेस्टकंट्रोलकामी निविदेतील व करारनाम्यातील अटी/ शर्तीनूसार १४२ कामगार लावणे गरजेचे असतांनाही मे.अपशॉट युटिलिटी सर्व्हीसेस,चेन्नई यांनी दररोज कमी कामगार लावलेले होते. तसेच स्वच्छतेकामी मशिनही वापरत नव्हते. त्यामुळे करारनाम्यानूसार कर्मचारी लावावेत, अन्यथा कमी लावणेत येणा-या कर्मचा-यांचे किमान वेतन दराप्रमाणे होणारी रक्कम आपले मासिक बिलातून कपात करणेत येवून, पुढील काळात असे निदर्शनास आल्यास दंडात्मक कारवाई करणेबाबत इकडील जा.नं.एसएसएस/ वशि/प्रसादा/ ३९८३/ २०१७ दि.०१/११/२०१७ रोजीचे पत्रानूसार कळविणेत आलेले होते.

श्री साई प्रसादालयातील हाऊसकिपींग, स्वच्छता व पेस्टकंट्रोलचे कामाबाबत प्रसादालय पर्यवेक्षक यांनी समक्ष राऊंड घेवून पाहणी केली असता, प्रसादालयातील सर्व स्वच्छता गृहे, टॉयलेट,फरशी,खराब झालेली होती, पिवळे डाग पडलेले होते, टॉयलेटमध्ये डांबर गोळया टाकल्या जात नव्हत्या. त्यामुळे मोठयाप्रमाणात दुर्गंधी येत होती. याबाबत भक्तांच्याही तोंडी तक्रारी येतअसल्यामुळे भक्त नाराजी व्यक्त करत होते. त्यानूसार सदरची

स्वच्छता करणेबाबत संबंधीत ठेकेदार यांना जा.नं.एसएसएस/वशि/प्रसादा/१२५/ २०१७ दि.१५/११/२०१७ रोजीचे पत्रानूसार कळविणेत आलेले होते.

वरीलप्रमाणे संबंधीत ठेकेदार यांना पत्र देवून कळविणेत येवूनही तसेच वारंवार तोंडी सुचना देवूनही, हाऊसकिपींग, स्वच्छता व पेस्टकंट्रोलकामी निविदेतील व करारनाम्यातील अटी/शर्तीनूसार पुरेशा प्रमाणात कामगार लावत नव्हते. किमान वेतन ॲक्टनूसार पगार केलेला नाही.

दोन महिन्यापासून कामगारांचा पगार नाही. पगार बीलासाठी आवश्यक असलेली कागदपत्रांची पुर्तता केलेली नाही. या सर्व बाबींमुळे संबंधीत ठेकेदार यांना इकडील जा.नं.एसएसएस/वशि/प्रसादा/४९२०/२०१७ दि.१८/१२/२०१७ रोजीचे पत्रानूसार करारनाम्यातील अटी/ शर्ती अन्वये दंडात्मक कारवाई करणेत येवून कोणतीही पुर्वसूचना न देता पुढील कार्यवाही करणेबाबतचे पत्र देण्यात आलेले आहे.

इकडील दि.०४/०१/२०१८ रोजीचे टिपणीवरील निर्देशानूसार, संबंधीत ठेकेदार यांचेबाबत त्यांचेकडील कामगारांच्या किमान वेतन दरानूसार पगाराबाबतच्या तक्रारी, निविदेतील अटी/शर्तीनूसार कामगार कमी लावणे व स्वच्छतेकामी लागणारे मशिनरी, केमिकल वगैरे इत्यादी साहीत्याचा पुरवठा वेळोवेळी केलेला नसल्यामुळे वारंवार दिल्या जाणा-या सुचना. या सर्व बाबींचा विचार इकडील विभागामार्फत करुन दंडात्मक कारवाई होणेबाबत टिपणी सादर करणेत आलेली होती. सदर टिपणीवर मा.मुख्य का.अ. यांनी ''करार नाम्यातील उल्लंघन झालेल्या अटी व शर्ती नमूद करुन सदर एजन्सीला तात्काळ कारणे दाखवा नोटीस देऊन ०३ दिवसात सर्व बाबींची पुर्तता न केल्यास कार्यादेश रद्द करुन ईनिविदा प्रक्रीया तातडीने राबवावी.'' अशा सुचना वजा निर्देश दिलेले आहेत.

निविदेतील अटी/शर्तीचा वेळोवेळी पत्र देवून सुध्दा भंग करणे, कामगारांचे पगार वेळेत न करणे, किमान वेतन दराप्रमाणे वेतन न करणे. यामुळे संबंधीत ठेकेदार यांना जा.नं.एसएसएस/वशि/प्रसादा/५४१७/२०१८ दि.१०/०१/२०१८ रोजीचे पत्र देवून रक्कम रु.९४,९००/-(अक्षरी चौ-यान्नव हजार नऊशे मात्र) दंडात्मक कारवाई करणेत आल्याचे पत्र देण्यात आलेले आहे.

इकडील जा.नं.एसएसएस/वशि/प्रसादा/५४१८/२०१८ दि.११/१/२०१८ तसेच जा.नं.एसएसएस/ वशि / प्रसादा/ ५७६३/२०१८ दि.२७/०१/२०१८ रोजीचे पत्रानूसार संबंधीत ठेकेदार यांना बिलासोबत दयावयाची सर्व कागदपत्रांची पुर्तता करणेबाबत सुचित करणेत आले होते. तरी देखील संबंधीत ठेकेदार यांनी आजपावेतो कागदपत्रांची पुर्तता केलेली नाही. त्यामुळे आजअखेर त्यांची दोन बिले प्रलंबीत आहेत. शिवाय त्यांनी आजपावेतो दोन महिन्याचे पगार कामगारांना आदा केलेले नाहीत. तसेच पुढील काळात महाशिवरात्री, श्री रामनवमी, गुरुपौर्णिमा यासारख्या महत्वाच्या गर्दीच्या काळात कामगार काम बंद करणेचा धोका नाकारता येत नाही. त्यामुळे संस्थानच्या नावलौकीकास बाधा पोहोचेल.

तसेच संबंधीत ठेकेदार यांनी यापुर्वी कर्मचा-यांना दिलेले वेतन हे किमान वेतन दराप्रमाणे दिलेले नाही व संस्थानकडे प्रलंबित असलेले बीलांसाठी आवश्यक असलेली कागदपत्रे अदयापपावेतो परिपुर्ण सादर केलेली नाहीत. त्यामुळे पुन्हा कामगारांचे पगार त्यांचा पुर्वानूभव विचारात घेता ते वेळेत करतील असे वाटत नाही.

उपरोक्त सर्व अहवाल कामगार विभागाकडे सादर केला असता, त्यांनी संस्थानचे कायदेविषयक सल्लागार यांचा अभिप्राय घेण्यात यावेत असे निर्देश दिले होते. त्यानूसार जा.नं.एसएसएस/ वशि/ प्रसादा/ ५४१६/२०१८ दि.१०/०१/२०१८ रोजी ॲड.जे.के.गोंदकर,शिरडी यांचेकडून अभिप्राय मागविणेत आलेले आहे. त्याचा तपशिलाचा सारांश खालीलप्रमाणे.

''मे.अपशॉट युटिलिटी सर्व्हीसेस, चेन्नई यांना वेळोवेळी सुचना देवूनही त्यांनी निविदेतील व करारातील अटींचा व शर्तीचा भंग केलेला आहे. कामात दिरंगाई केली, कुचराई केली तसेच कामावर लावलेल्या मजुरांना वेतनही दिलेले नाही व ठरल्यावेळी ठरलेली कामे केली नाही. तसेच आऊटसोर्सिंगचे कामगारही कराराप्रमाणे पुरविले नाही. त्यामुळे संस्थानला सदरचा करार कोणतीही पुर्वसुचना न देता रद्द करण्याचा अधिकार आहे. त्यामुळे त्याचे वर्तनावरुन हा करार आपणास तात्काळ पुर्वसूचना न देता रद्द करता येईल व तसे परिस्थितीत त्यास त्याने दिलेले बिल अदा करण्याचे कारण नाही. कारण मुळातच त्याने कराराचे पालन केलेले नाही. हेतुपूरस्करपणे सुचना देवूनही त्याकडे डोळेझाक करुन कराराचा भंग केलेला आहे. त्यामुळे त्यांना त्याचे बिल अदा न करणे उचित राहील, तसेच त्यांचेकडून आपणांस झालेले नुकसानही मागता येईल.''

मागणी:- संबंधीत ठेकेदार, यांना वेळोवेळी पत्र देवून, वारंवार तोंडी सुचना देवूनही नियमित करारनाम्याचा भंग केलेला आहे. त्याबाबत त्यांचेवर दंडात्मक कारवाई करुन सुध्दा, अंतीम नोटीस देवून सुध्दा त्यांच्यात कोणतीही सुधारणा होत नसून वारंवार तक्रारी वाढत आहेत व कोणत्याही क्षणी कामगार काम बंद

करण्याचा प्रसंग येवू शकतो. त्यामुळे भक्तांची गैरसोय होवून भविष्यात संस्थानला अशा स्वरुपाचा त्रास होवू नये व साईभक्तांनाही चांगल्या प्रकारची सेवा मिळावी. याकरीता संबंधीत ठेकेदार यांचा उपरोक्त कामाचा कार्यादेश रद्द करणे व काळया यादीत समावेश करुन करारनाम्यातील अटी/शर्ती क्रं.२५ नूसार त्यांची सुरक्षा अनामत रक्कम जप्त करणेत यावी. असे नम्र मत आहे.

त्याचप्रमाणे प्रसादालयातील स्वच्छतेअभावी भक्तांची गैरसोय होवू नये, याकरीता पुढील कालावधीसाठी नव्याने ई-निविदा प्रक्रिया राबविणेत यावी. दरम्यानचे काळात उपरोक्त कामे संस्थानमधील इतर ठेकेदारामार्फत आहे त्याच अटी/शर्तीवर व मंजूर दरात करुन घेणेकामी मा.स्थानिक उपसमिती सभेमध्ये तातडीने निर्णय होणे गरजेचे आहे. असे नम्र मत आहे.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय:-** उपरोक्त प्रास्तविक व मागणी तसेच संस्थानचे कायदेविषयक सल्लागार ॲड.जे.के.गोंदकर, शिरडी यांचे अभिप्रायचा विचार करता, संबंधीत ठेकेदार मे.अपशॉट युटिलिटी सर्व्हीसेस, चेन्नई यांचा उपरोक्त कामाचा कार्यादेश रद्द करुन त्यांचा संस्थानचे काळया यादीत समावेश करुन, त्यांची सुरक्षा अनामत रक्कम जप्त करणेत यावी.

त्याचप्रमाणे प्रसादालयातील स्वच्छतेअभावी भक्तांची गैरसोय होवू नये, याकरीता पुढील कालावधीसाठी नव्याने ई-निविदा प्रक्रिया राबविणेत यावी. तसेच दरम्यानचे काळात प्रसादालयातील उपरोक्त कामे संस्थानमधील इतर ठेकेदारामार्फत स्विकृती पत्र घेवून संबंधीत कामगारांचे वेतन स्विकृती ठेकेदारामार्फत त्वरीत आदा होणे आवश्यक आहे.

तरी मे.अपशॉट युटिलिटी सर्व्हीसेस, चेन्नई यांचा उपरोक्त कामाचा कार्यादेश रद्द करुन त्यांचा संस्थानचे काळया यादीत समावेश करुन सुरक्षा अनामत रक्कम जप्त करणेबाबत तसेच ई-निविदा प्रक्रीया पुर्ण होईपर्यंतच्या कालावधीसाठी स्विकृती ठेकेदाराकडून आहे त्याच मंजूर दराने कामे करुन घेणेकामी सदरहु प्रस्ताव मा.स्थानिक उपसमिती सभेत निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावातील विभागाचा अभिप्राय व संस्थानचे कायदेविषयक सल्लागार ॲड.जे.के.गोंदकर, शिरडी यांचे अभिप्राय विचारात घेता, श्री साई प्रसादालयातील हाऊसकिपींग, स्वच्छता व पेस्टकंट्रोलकामीचे ठेकेदार मे.अपशॉट युटिलिटी सर्व्हीसेस, चेन्नई यांनी अटी/ शर्तीचा भंग केलेला असल्यामुळे, त्यांना याकामी दिलेला कार्यादेश रद्द करणेत यावा व त्यांची सुरक्षा अनामत रक्कम जप्त करणेत येऊन, त्यांचा संस्थानचे काळया यादीत समावेश करणेत यावा व त्यांची प्रलंबीत बीलेही आदा करणेत येऊ नये.**

**श्री साई प्रसादालयातील हाऊसकिपींग, स्वच्छता, पेस्टकंट्रोलकामी तात्काळ नव्याने ई-निविदा प्रक्रिया राबविणेत यावी व नवीन ठेकेदार नियुक्त होईपर्यंत प्रसादालयातील स्वच्छतेअभावी भक्तांची गैरसोय होवू नये, याकरीता संस्थानमधील इतर ठेकेदार १) मे.बी.व्ही.जी.इंडीया लि.पुणे कॅम्प शिर्डी, २) मे. एम.पी.एन्टरप्रायजेस ॲण्ड असोसिएटेड लि.पुणे कॅम्प शिर्डी, ३) मे.स्पीक ॲण्ड स्कॅन सर्व्हिसेस, मुंबई कॅम्प शिर्डी यांना दि.१४.०२.२०१८ रोजी लेखी पत्र देऊन विचारणा केली होती. यांचेपैकी मे. एम.पी.एन्टरप्रायजेस ॲण्ड असोसिएटेड लि.पुणे कॅम्प शिर्डी यांनी दि.१५.०२.२०१८ रोजी स्विकृती पत्र देऊन प्रसादालयातील उपरोक्त कामे पुर्वीचे दरात करण्यास तयार असलेबाबत लेखी कळविले आहे.**

**यावर सविस्त चर्चा होऊन, दोन महिने कालावधीसाठी अथवा ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत एम.पी. एन्टरप्रायजेस ॲण्ड असोसिएटेड लि.पुणे यांचेकडून पुर्वीचे मंजुर दरात व अटी शर्तीनुसार स्विकृती पत्र घेवून संबंधीत काम व कामगारांचे थकित वेतन करुन घेण्यात यावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- प्रसादालय विभागप्रमुख)

---

**विषय नं.०३** **संस्थानमधील महत्वाचे चालु व प्रस्तावित असलेल्या प्रकल्पांचा आढावा.**

**निर्णय क्र.१४१** आजचे सभेमध्ये संस्थानमधील चालु व प्रस्तावित असलेल्या उपरोक्त महत्वाच्या प्रकल्पांच्या सद्यस्थितीची माहिती घेऊन, त्याचा आढावा घेण्यात आला व त्यानुशंगाने पुढील कार्यवाही करणेबाबत सुचना करण्यात आल्या. तसेच सर्व प्रकल्पांची दर आठवडयाची सद्यथिती अद्ययावत करुन सर्व समिती सदस्यांना ई-मेलद्वारे पाठविणेत यावी, असे ठरले.

(कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम)

---

**विषय नं.०४** **श्री गुरुपौर्णिमा उत्सव-२०१७ चे प्रत्यक्ष झालेल्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१७ मधील खर्चाकरीता मा. व्यवस्थापन समितीचे दि.२३.०५.२०१७ चे सभेतील निर्णय क्र.३५ नुसार एकूण रु.४१,५६,४६३/- मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

| अ. क्र | खर्च तपशिल | अंदाजे खर्च | प्रत्यक्ष खर्च | तरतुदीपेक्षा जादा खर्च | तरतुदीपेक्षा कमी खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | मंडप, कमानी, स्टेज व इतर | ४,१९,१०९.०० | ४२०३५४.०० | १२४५.०० | - |
| २ | कलाकार बिदागी (किर्तनकार व निमंत्रीत कलाकार कार्यक्रमासह) | ५,००,०००.०० | ३८,९३९.०० | - | ४,६१,०६१.०० |
| ३ | भक्तांना मिष्टान्न (श्रम परिहार मजुरीसह) | ८,३७,३५४.०० | ६०७३४०.०० | - | २३००१४.०० |
| ४ | विदयुत रोषणाई (जनरेटर भाडे, इंधन खर्च) | १,००,०००.०० | ७३१४८.०० | - | २६८५२.०० |
| ५ | निमंत्रण पत्रिका, जाहिरात, पोष्टेज, (आश्रयदाते विदेशी भक्तांसह) | १३,००,०००.०० | १२६०९१७.०० | - | ३९०८३.०० |
| ६ | जादा कर्मचारी स्वयंसेवक (विदयार्थी) मानधन | ४,००,०००.०० | २९७३७९.०० | - | १,०२,६२१.०० |
| ७ | पालख्याचे ठिकाणी पिण्याची पाण्याची व्यवस्था खर्च (टॅंकर डिझेलसह) | ३,००,०००.०० | २०१४९.०० | - | २७९८५१.०० |
| ८ | मंदिर व मंदिर परीसर फुलाचे डेकोरेशन | २,००,०००.०० | - | - | २०००००.०० |
| ९ | इतर खर्च | १,००,०००.०० | १२०८०.०० | - | ८७,९२०.०० |
| | **एकुण रुपये** | **४१,५६,४६३.००** | **२७,३०,३०६.००** | **१२४५.००** | **१४,२७,४०२.००** |

उपरोक्त तपशिल पाहता श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१७ करीता रक्कम **४१,५६,४६३/-** (अक्षरी रुपये एकेचाळीस लाख, छपन्न हजार, चारशे त्रेसष्ट) मात्र मंजूर करण्यात आलेले आहे. या रकमेतून उत्सवाकरीता प्रत्यक्षात एकूण रु.२७,३०,३०६/- (अक्षरी रुपये सत्ताविस लाख तीस हजार तीनशे सहा) मात्र खर्च झालेला आहे.

तरी सदरचे प्रत्यक्षात झालेल्या एकूण खर्चास मान्यता मान्यतेसाठी सादर .

**निर्णय क्र.१४२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री गुरुपौर्णिमा उत्सव- २०१७ करीता प्रत्यक्षात झालेल्या रक्कम रु.२७,३०,३०६/- मात्रचे खर्चाची नोंद घेण्यात येऊन, त्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**विषय नं.०५** **श्री पुण्यतिथी उत्सव- २०१७ चे प्रत्यक्ष झालेल्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे मार्फत श्री रामनवमी,श्री गुरुपौर्णिमा, व श्री पुण्यतिथी हे मुख्य उत्सव साजरे करण्यात येतात.

पुण्यतिथी उत्सव-२०१७ दि.२९.०९.२०१७ ते दि.०२.१०.२०१७ या कालावधी मधील खर्चाकरीता मा. व्यवस्थापन समितीचे दि २०/८/२०१७ चे सभेतील निर्णय क्र.७१२ अन्वये एकुण रुपये ६४,६५,०००/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे. श्री पुण्यतिथी उत्सव -२०१७ साठी प्रत्यक्षात खालील प्रमाणे खर्च झालेला आहे.

| अ.न | तपशिल | अंदाजपत्रकातील मंजूर रक्कम | प्रत्यक्ष खर्च | तरतूदी पेक्षा जादा खर्च | तरतूदी पेक्षा कमी खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | मंडप, कमानी व स्टेज खर्च (बॅरीकेटींगसह) | ६,२५,०००.०० | ४,१५,२१८.०० | - | २,०९,७८२.०० |
| २ | कलाकार बिदागी–कीर्तनकार व निमंत्रित कलाकार कार्यक्रमासह) | १०,००,०००.०० | ८,१९,५९२.०० | - | १,८०,४०८.०० |
| ३ | भक्तांना मिष्टान्न (गावजेवण व मजूरी) | ८,००,०००.०० | ८,४९,३५१.०० | ४९,३५१.०० | - |
| ४ | विद्युत रोषणाई खर्च ( भाडोत्री जनरेटर, डिझेल बिलांसह) | १०,५०,०००.०० | ११,१२,३४८.०० | ६२,३४८.०० | - |
| ५ | निमंत्रण पत्रिका, जाहिरात, बोर्ड,पोष्टेज – उदीप्रसादासह | २५,००,०००.०० | २४,४८,७९२.०० | - | ५१,२०८.०० |
| ६ | जादा कामगार | २,००,०००.०० | ५,६०,१९९.०० | ३,६०,१९९.०० | - |
| ७ | पालख्यांचे पिण्याचे पाणी व्यवस्था खर्च. | ५०,०००.०० | - | - | ५०,०००.०० |
| ८ | इतर खर्च फर्निचर भाडे | ४०,०००.०० | ६४,९६९.०० | २४,९६९.०० | - |
| ९ | मंदीर व मंदीर परिसर फुलांची सजावट खर्च | २,००,०००.०० | - | - | २,००,०००.०० |
| | **एकुण रु.** | ६४,६५,०००.०० | ६२,७० ४६९.०० | ४,९६,८६७.०० | ६,९१,३९८.०० |

उपरोक्त तपशीलात नमुद केलेप्रमाणे श्री पुण्यतिथी उत्सव-२०१७ करिता रक्कम रु.६४,६५,०००.००/- (रु. चौसष्ठ लाख पासष्ट हजार ) मात्र मंजूर करण्यात आलेले होते, या उत्सवाकरीता प्रत्यक्षात एकूण रुपये रु. ६२,७०,४६९/- (रु.बासष्ट लाख सत्तर हजार चारशे एकोणसत्तर) मात्र इतका खर्च झालेला आहे.

तरी प्रत्यक्षात एकुण रु.६२,७०,४६९/- चे झालेल्या खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.१४३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री पुण्यतिथी उत्सव- २०१७ करीता प्रत्यक्षात झालेल्या रक्कम रु.६२,७०,४६९/- मात्रचे खर्चाची नोंद घेण्यात येऊन, त्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**विषय नं.०६** **श्रीरामनवमी उत्सवातील वीणा, पोथी, फोटो, पाद्यपुजा, रुद्राभिषेक इ. साठी मा.व्यवस्थापन समितीच्या सदस्यांची नावे निश्चित करणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थान मार्फत श्री रामनवमी उत्सव, श्री गुरुपौर्णिमा उत्सव व श्री पुण्यतिथी उत्सव पुर्व परंपरेनुसार पार पाडले जातात. सदरच्या प्रत्येक उत्सवात पहाटे व्दारकामाईत अखंड पारायणास सुरुवात होते तत्पूर्वी श्रींचा फोटो /पोथी/ वीणा मिरवणूकीने गुरुस्थानमार्गे व्दारकामाईत येतात व मा.व्यवस्थापन समितीचे सदस्यांच्या हस्ते अंखड साईसच्चरित पारायणास व्दारकामाईत सुरवात होते. तसेच श्रींचे स्नान झाल्यानंतर समाधि मंदिरात मा. व्यवस्थापन समितीचे सदस्य यांचे हस्ते पाद्यपुजा पार पाडली जाते.

श्री पुण्यतिथी उत्सव २०१६ पासून सदरच्या कार्यक्रमात भाग घेतलेल्या मा. व्यवस्थापन समितीच्या सदस्यांची माहिती खालीलप्रमाणे..

**श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव २०१६ पाद्यपुजा व इतर कार्यक्रम.**

| दिनांक | वेळ | कार्यक्रमात सहभागी झालेल्या मान्यवरांची नावे |
|---|---|---|
| १०/१०/२०१६. सोमवार | पहाटे ५.०० वाजता | **उत्सवाचा प्रथम दिवस** |
| | | **वीणा-** मा.श्री.सचिन भागवत तांबे, सदस्य<br>**पोथी**– मा.श्री. सुरेश काशिनाथ हावरे, अध्यक्ष<br>**प्रतिमा-** मा.ॲड.मोहन मोतीराम जयकर, सदस्य/ मा.डॉ.संदीप आहेर, उपकार्यकारी अधिकारी |
| | पहाटे ५.१५ वाजता | **अध्याय वाचन** –<br>**अध्याय क्र.१ -** मा.श्री.प्रताप सखाहरी भोसले – सदस्य<br>**अध्याय क्र.२ -** मा. सौ.अनिताताई विजय जगताप – पदसिध्द सदस्य<br>**अध्याय क्र.३ -** मा.सौ.सरस्वती भाऊसाहेब वाकचौरे, सदस्य<br>**अध्याय क्र.४-** मा.ॲड.मोहन मोतीराम जयकर, सदस्य<br>**अध्याय क्र.५ -** मा.श्री.सचिन भागवत तांबे, सदस्य |
| | सकाळी ६.०० वाजता | **श्रींची पाद्यपूजा** – मा.श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम – उपाध्यक्ष |
| ११/१०/२०१६. मंगळवार | पहाटे ५.०० वाजता | **उत्सवाचा मुख्य दिवस** |
| | | **वीणा -** मा. श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम – उपाध्यक्ष<br>**पोथी** – मा. श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे – सदस्य |
| | | **प्रतिमा-** १) मा.श्री.सचिन भागवत तांबे, सदस्य, २) मा.श्री. बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य |
| | सकाळी ६.०० वाजता | **श्रींची पाद्यपूजा-** १) मा.श्री. सुरेश काशिनाथ हावरे, अध्यक्ष २) मा.ॲड.मोहन मोतीराम जयकर, सदस्य ३) मा.डॉ. संदीप आहेर, उपकार्यकारी अधिकारी |
| | सकाळी ९.०० वाजता | **भिक्षा झोळी कार्यक्रम** – १) मा. श्री सुरेश हावरे, अध्यक्ष २)चंद्रशेखर कदम , उपाध्यक्ष ३) श्री. भाऊसाहेब वाकचौरे, सदस्य ३) श्री.सचिन तांबे, सदस्य ४) मा.ॲड.मोहन जयकर, सदस्य<br>५) मा.डॉ. संदीप आहेर, उपकार्यकारी अधिकारी |
| | सकाळी १०.४५ वाजता | **आराधना विधी कार्यक्रम-** मा.अध्यक्ष व उपस्थित सदस्य |
| १२/१०/२०१६. बुधवार | सकाळी ६.०० वाजता | **तृतीय दिवस** |
| | | **श्रींची पाद्यपूजा-** मा.श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे – सदस्य व श्री.सचिन तांबे, सदस्य |

| | | |
|---|---|---|
| १३.१०.२०१६<br>गुरुवार | सकाळी ६.०० वाजता | उत्सवाचा सांगता दिवस<br>**श्रींची पाद्यपूजा-** मा.श्री. बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य |
| | सकाळी ६.४५ वाजता | **गुरुस्थान येथे रुद्राभिषेक – मा.श्री.बाजीराव शिंदे , कार्यकारी अधिकारी** |

**श्री रामनवमी उत्सव २०१७ पाद्यपुजा व इतर कार्यक्रम.**

| दिनांक | वेळ | कार्यक्रमात सहभागी झालेल्या मान्यवरांची नावे |
|---|---|---|
| ०३/०४/२०१७.<br>सोमवार | पहाटे ५.०० वाजता | **उत्सवाचा प्रथम दिवस** |
| | | **वीणा-** मा.श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम , उपाध्यक्ष<br>**पोथी–** मा.सौ. योगिता अभय शेळके पाटील, सदस्य<br>**प्रतिमा-**०१)मा. श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे , सदस्य ०२) मा.श्री.सचिन भागवत तांबे, सदस्य |
| | पहाटे ५.१५ वाजता | **अध्याय वाचन** –<br>**अध्याय क्र.१ -** मा.श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम , उपाध्यक्ष<br>**अध्याय क्र.२ -** मा.श्री.सचिन भागवत तांबे, सदस्य<br>**अध्याय क्र.३ -** मा. श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, सदस्य<br>**अध्याय क्र.४ -** मा.ॲड.मोहन मोतीराम जयकर, सदस्य<br>**अध्याय क्र.५ -** मा.सौ. योगिता अभय शेळके पाटील , सदस्य |
| | सकाळी ६.०० वाजता | **श्रींची पाद्यपूजा** – मा.श्रीमती रुबल अग्रवाल, भा.प्र.से.- कार्यकारी अधिकारी |
| ०४/०४/२०१७.<br>मंगळवार | पहाटे ५.०० वाजता | **उत्सवाचा मुख्य दिवस** |
| | | **वीणा -** मा. श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, सदस्य<br>**पोथी –** मा.श्री. बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य |
| | | **प्रतिमा-** १) मा.श्री.प्रताप सखाहरी भोसले २) मा.डॉ.राजेंद्र राजाबली सिंग , सदस्य |
| | सकाळी ६.०० वाजता | **श्रींची पाद्यपूजा-** मा.श्री. सुरेश काशिनाथ हावरे, अध्यक्ष |
| ०५.०४.२०१७<br>बुधवार | सकाळी ६.०० वाजता | **उत्सवाचा सांगता दिवस**<br>**श्रींची पाद्यपूजा-** मा.श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम , उपाध्यक्ष |
| | सकाळी ६.३० वाजता | **गुरुस्थान येथे रुद्राभिषेक** – मा.डॉ. संदीप आहेर, उपकार्यकारी अधिकारी |

**श्री गुरुपौर्णिमा उत्सव -२०१७ पाद्यपुजा व इतर कार्यक्रम.**

| दिनांक | वेळ | कार्यक्रमात सहभागी झालेल्या मान्यवरांची नावे |
|---|---|---|
| ०८/०७/२०१७.<br>शनिवार | पहाटे ५.०० वाजता | **उत्सवाचा प्रथम दिवस** |
| | | **वीणा-** मा.श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम – उपाध्यक्ष<br>**पोथी–** मा. श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे – सदस्य<br>**प्रतिमा-** मा.ॲड.मोहन मोतीराम जयकर, सदस्य व मा.श्री.सचिन तांबे, सदस्य |
| | पहाटे ५.१५ वाजता | **अध्याय वाचन** –<br>**अध्याय क्र.१ -** मा.श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम – उपाध्यक्ष<br>**अध्याय क्र.२** मा. श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे – सदस्य<br>**अध्याय क्र.३ -** मा.सौ.योगिता शेळके पाटील सदस्या<br>**अध्याय क्र.४ -** मा.श्री.सचिन भागवत तांबे, सदस्य<br>**अध्याय क्र.५ -** मा. ॲड.मोहन मोतीराम जयकर, सदस्य |
| | सकाळी ६.०० वाजता | **श्रींची पाद्यपूजा** – मा.श्रीमती रुबल अग्रवाल, भा.प्र.से.- कार्यकारी अधिकारी |
| ०९/०७/२०१७.<br>रविवार | पहाटे ५.०० वाजता | **उत्सवाचा मुख्य दिवस** |
| | | **वीणा -** मा.श्री. बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य<br>**पोथी –** मा. श्री सुरेश काशिनाथ हावरे, अध्यक्ष |
| | | **प्रतिमा-** १) मा.श्री.प्रताप सखाहरी भोसले व मा. ॲड.मोहन मोतीराम जयकर, सदस्य |
| | सकाळी ६.०० वाजता | **श्रींची पाद्यपूजा-** मा.श्री. सुरेश काशिनाथ हावरे, अध्यक्ष |

| | | |
|---|---|---|
| १०.०७.२०१७<br>सोमवार | सकाळी ६.०० वाजता | **उत्सवाचा सांगता दिवस**<br>**श्रींची पाद्यपूजा-** मा.श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, उपाध्यक्ष |
| | सकाळी ६.१५ वाजता | **गुरुस्थान येथे रुद्राभिषेक** – मा.डॉ.संदीप आहेर - उपकार्यकारी अधिकारी |

**श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव २०१७ पाद्यपुजा व इतर कार्यक्रम**

| दिनांक | वेळ | कार्यक्रमात सहभागी झालेल्या मान्यवरांची नावे |
|---|---|---|
| २९/०९/२०१७<br>शुक्रवार | पहाटे ५.०० वाजता | **उत्सवाचा प्रथम दिवस** |
| | | **वीणा-** मा.श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, उपाध्यक्ष<br>**पोथी-** मा. श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, सदस्य<br>**प्रतिमा-** मा.ॲड.मोहन जयकर, सदस्य व मा.श्री. धंनजय निकम, उपजिल्हाधिकारी |
| | पहाटे ५.१५ वाजता | **अध्याय वाचन-**<br>**अध्याय क्र.१-** १.मा. सौ. सरस्वती वाकचौरे व मा. श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे–सदस्य<br>**अध्याय क्र.२** ते ४ - २. मा. ॲड. मोहन मोतीराम जयकर, सदस्य<br>**अध्याय क्र.५** - ३.मा. सौ. शेळके पाटील |
| | सकाळी ६.०० वाजता | **श्रींची पाद्यपूजा -** मा.श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, उपाध्यक्ष |
| ३०/०९/२०१७.<br>शनिवार | पहाटे ५.०० वाजता | **उत्सवाचा मुख्य दिवस** |
| | | **वीणा -** मा.श्री. बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य<br>**पोथी -** मा. श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, सदस्य |
| | | **प्रतिमा-** १) मा. ॲड.मोहन जयकर, सदस्य व मा.श्री.प्रताप सखाहरी भोसले, सदस्य |
| | सकाळी ६.०० वाजता | **श्रींची पाद्यपूजा-** मा.श्री. सुरेश काशिनाथ हावरे, अध्यक्ष |
| | सकाळी ९.०० वाजता | **भिक्षा झोळी कार्यक्रम -** १) मा.श्री. सुरेश काशिनाथ हावरे, अध्यक्ष<br>२) चंद्रशेखर कदम, उपाध्यक्ष<br>३) श्री. भाऊसाहेब वाकचौरे, सदस्य<br>४) मा.श्री.प्रताप सखाहरी भोसले, सदस्य<br>५) मा.सौ.योगितांताई शेळके पाटील, सदस्य<br>६) मा.श्री. धंनजय निकम,उपजिल्हाधिकारी<br>७) मा.श्री. मनोज घोडेपाटील, उपजिल्हाधिकारी. |
| | सकाळी १०.३० वाजता | **आराधना विधी कार्यक्रम-** मा.श्री. सुरेश काशिनाथ हावरे, अध्यक्ष व उपस्थित सदस्य |
| ०१/१०/२०१७.<br>रविवार | | **तृतीय दिवस** |
| | सकाळी ६.०० वाजता | **श्रींची पाद्यपूजा-** मा.श्रीमती रुबल अग्रवाल, भा.प्र.से. मुख्य कार्यकारी अधिकारी |
| ०२.१०.२०१७<br>सोमवार | सकाळी ६.०० वाजता | **उत्सवाचा सांगता दिवस**<br>**श्रींची पाद्यपूजा-** मा.श्री. बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य |
| | सकाळी ६.४५ वाजता | **गुरुस्थान येथे रुद्राभिषेक -** मा.श्री. मनोज घोडेपाटील, उपजिल्हाधिकारी |

आता श्री रामनवमी उत्सव २०१८ मध्ये पाद्यपुजा व इतर कार्यक्रमासाठी मान्यवरांची निश्चिती करणे आहे. तरी वीणा, पोथी, श्रींचा फोटो, अध्यायाचे वाचन, श्रींची पाद्यपुजा, रुद्राभिषेक कोणी करावा याबाबत निर्णय होणे आवश्यक आहे. .

तरी खालील तक्त्यात दर्शविलेप्रमाणे मान्यवरांची नावे निश्चित होणेस मान्यतेसाठी सादर.

| दिनांक | वेळ | कार्यक्रमात सहभागी होणा-या मान्यवरांची नावे |
|---|---|---|
| २४/०३/२०१८.<br>शनिवार | पहाटे ५.०० वाजता | **उत्सवाचा प्रथम दिवस** |
| | | **श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक**<br><br>**वीणा-**<br>**पोथी–**<br>**प्रतिमा -** |

| | | |
|---|---|---|
| | पहाटे ५.१५ वाजता | **अध्याय वाचन**<br>१.<br>२.<br>३.<br>४.<br>५. |
| | सकाळी ६.०० वाजता | **श्रींची पाद्यपूजा** – |
| २५/०३/२०१८. रविवार | पहाटे ५.०० वाजता | **उत्सवाचा मुख्य दिवस**<br>**श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक**<br><br>**वीणा** -<br>**पोथी** –<br>**प्रतिमा** - |
| | सकाळी ६.०० वाजता | **श्रींची पाद्यपूजा**- |
| २६.०३.२०१८ सोमवार | सकाळी ६.०० वाजता | **उत्सवाचा सांगता दिवस**<br>**श्रींची पाद्यपूजा**- |
| | सकाळी ६.३० वाजता | **गुरुस्थान येथे रुद्राभिषेक** – |

निर्णय क्र.१४४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री रामनवमी उत्सव- २०१८ मध्ये सर्व इच्छुक समिती सदस्यांना श्रींची पाद्यपुजा करता यावी याकरीता या उत्सवामध्ये श्रींची पाद्यपुजा प्रत्येक दिवशी दोन वेळा करणेचे ठरले व श्रींची पाद्यपुजा तसेच इतर कार्यक्रमासाठी खालील मान्यवरांची निश्चिती करणेत आली.**

| दिनांक | वेळ | कार्यक्रमात सहभागी होणा-या मान्यवरांची नावे |
|---|---|---|
| २४/०३/२०१८. शनिवार | पहाटे ५.०० वाजता | **उत्सवाचा प्रथम दिवस**<br>**श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक**<br><br>**वीणा**- मा.श्री.चंद्रशेखर कदम, उपाध्यक्ष<br>**पोथी**– मा.ॲड मोहन जयकर, सदस्य<br>**प्रतिमा** – मा.श्री.बिपीनदादा कोल्हे, सदस्य व मा.श्री.घोडेपाटील, उपजिल्हाधिकारी |
| | पहाटे ५.१५ वाजता | **अध्याय वाचन**<br>१. मा.श्री.चंद्रशेखर कदम, उपाध्यक्ष<br>२. मा.श्री.भाऊसाहेब वाकचौरे, सदस्य<br>३. मा.ॲड मोहन जयकर, सदस्य<br>४. मा.श्री.बिपीनदादा कोल्हे, सदस्य<br>५. मा.सौ. योगिता शेळकेपाटील, सदस्या |
| | सकाळी ६.०० वाजता | **श्रींची पाद्यपूजा** – मुख्यकार्यकारी अधिकारी |
| | सायंकाळी ६.०० वाजता | **श्रींची पाद्यपूजा** – मा.श्री.भाऊसाहेब वाकचौरे, सदस्य |
| २५/०३/२०१८. रविवार | पहाटे ५.०० वाजता | **उत्सवाचा मुख्य दिवस**<br>**श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक** |

| | | |
|---|---|---|
| | | **वीणा -** मा.श्री.बिपीनदादा कोल्हे, सदस्य<br>**पोथी –** मा.सौ. योगिता शेळकेपाटील, सदस्या<br>**प्रतिमा-** मा.ॲड मोहन जयकर, सदस्य व मा.श्री.धनंजय निकम, उपजिल्हाधिकारी |
| | सकाळी ६.०० वाजता | **श्रींची पाद्यपूजा-** मा.श्री.प्रताप भोसले, सदस्य |
| | सायंकाळी ६.०० वाजता | **श्रींची पाद्यपूजा** – मा.श्री.बिपीनदादा कोल्हे, सदस्य |
| २६.०३.२०१८ सोमवार | सकाळी ६.०० वाजता | **उत्सवाचा सांगता दिवस**<br>**श्रींची पाद्यपूजा-** उपाध्यक्ष **महोदय** |
| | सायंकाळी ६.०० वाजता | **श्रींची पाद्यपूजा**– अध्यक्ष महोदय |
| | सकाळी ६.३० वाजता | **गुरुस्थान येथे रुद्राभिषेक** – मा.ॲड मोहन जयकर, सदस्य |

(कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**विषय नं.०७** **श्री.ज्ञानेश्वर गोंदकर पा., अध्यक्ष, श्रीसाई रामनवमी यात्रा कमिटी, शिर्डी यांचे श्रीरामनवमी यात्रेसाठी रक्कम मिळणेबाबतच्या पत्रावर निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूदः-**

१) अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे. भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

**मा. व्यवस्थापन समिती सभेतील निर्णयः-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.०२.०२.२०१८ चे सभेतील निर्णय क्र.७९ नुसार श्री रामनवमी उत्सव-२०१८ साजरा करणेकरीता तसेच उत्सवाचे अंदाजित खर्चास मान्यता देण्यात आली आहे. अंदाजपत्रकीय खर्चाचे तरतुदीत अ.नं. १६ मध्ये कुस्ती हगामाकरीता रु. १५ लाख रकमेची तरतुद करण्यात आली आहे.

**प्रस्तावः-** श्री. ज्ञानेश्वर (आबा) गोंदकर पा. अध्यक्ष, श्री साई रामनवमी यात्रा कमिटी, शिर्डी यांनी दि.०७.०२.२०१८ रोजीचे पत्रात, "श्री रामनवमी यात्रा कमिटीच्या वतीने आम्ही आपणांस विनंतीव्दारे निवेदन देऊ इच्छितो की, सालाबादप्रमाणे यावर्षी रामनवमी उत्सवामध्ये विविध सांस्कृतीक कार्यक्रम तसेच कुस्ती व विविध कामांसाठी श्री साईबाबा संस्थान रक्कम खर्च करत असते. यावर्षी समाधी शताब्दी महोत्सव असल्याने आम्ही शिर्डी ग्रामस्थांनी या वर्षीची यात्रा अधिक आकर्षक व नियोजनबद्ध पद्धतीने साजरा करणार आहोत. त्यासाठी या वर्षी अधिक रक्कमेचा खर्च होणार आहे. आम्ही शिर्डी ग्रामस्थ श्री साई संस्थानच्या रकमेमध्ये काही रक्कम लोकवर्गणी गोळा करत असतो. तरी यावर्षी आम्ही केलेल्या नियोजनाप्रमाणे यात्रेचा तसेच सर्व कार्यक्रमांचा अंदाजे खर्च हा २० लाख रु. राहील. सदर रक्कम आपले संस्थानचे लेखाशाखेतील अधिकारी यांचे समक्ष विविध कलाकारांना व सर्व ठिकाणी खर्च करत असतो. तरी आपण आमच्या वरील मागणीचा विचार करुन दरवर्षी प्रमाणे यात्रेसाठी वरील रक्कम द्यावी ही विनंती, असे नमूद केले आहे.

**प्रस्तावनाः-** श्री साईबाबा यांच्या समाधीस ऑक्टोबर-२०१८ मध्ये १०० वर्ष पूर्ण होत असल्याने श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्यातर्फे दि.०१ऑक्टोबर,२०१७ ते दि.१८ऑक्टोबर,२०१८ या कालावधीमध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे केले जात आहे. यासाठी शताब्दीचे संपूर्ण वर्षभर वेगवेगळया धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करणेत येत असून संपूर्ण वर्षभरात शिर्डीमध्ये भक्तीमय वातावरण राहून श्रीसाईबाबा महासमाधी शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल, या दृष्टीने कामकाज चालू आहे.

यास अनुसरुन शताब्दी महोत्सवी वर्षातील येणारे पारंपारीक उत्सवही भव्य स्वरुपात साजरे करणेचे संस्थान विचाराधीन आहे. दरवर्षी श्री रामनवमी उत्सवास मोठया प्रमाणावर गर्दी असते रामनवमी उत्सवात शिर्डी गावकरी व श्री साईबाबा संस्थान यांचे समन्वयाने भव्य स्वरुपात कुस्ती स्पर्धेचे आयोजन केले जाते. मागिल वर्षी रामनवमी उत्सवात कुस्ती हगामा करीता रु.१० लाख रकमेची तरतुद करण्यात आली होती. प्रत्यक्षात रु.९,०१,५००/- मात्र इतका खर्च झालेला आहे. मा.व्यवस्थापन समितीचे दि.०२.०२.२०१८ चे सभेतील निर्णय क्र.७९ नुसार श्री रामनवमी उत्सव-२०१८ साजरा करणेकरीता तसेच उत्सवाचे अंदाजित खर्चास मान्यता देण्यात आली आहे. अंदाजपत्रकीय खर्चाचे तरतुदीत अ.नं. १६ मध्ये कुस्ती हगामाकरीता रु. १५ लाख रकमेची तरतुद करण्यात आली आहे. मागिल वर्षापेक्षा ५ लाखाने तरतुद वाढविण्यात आलेली आहे.

तथापी श्री.ज्ञानेश्वर (आबा) गोंदकर पा.अध्यक्ष, श्री साई रामनवमी यात्रा कमिटी, शिर्डी यांनी दि.०७.०२.२०१८ रोजीचे पत्रान्वये रामनवमी यात्रेसाठी (सांस्कृतीक कार्यक्रम तसेच कुस्ती व विविध कामांसाठी) रु.२०,००,०००/- (अक्षरी रुपये वीस लाख) मात्रची मागणी केलेली आहे.

तरी या वर्षीचे रामनवमी उत्सवातील कुस्ती हगामासाठी मा.व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार रु.१५/- लक्ष मात्र इतकी रक्कम द्यावी किंवा श्री. ज्ञानेश्वर (आबा) गोंदकर पा. अध्यक्ष, श्री साई रामनवमी यात्रा कमिटी, शिर्डी यांनी मागणी केलेप्रमाणे रु. २०/- लक्ष मात्र इतकी रक्कम द्यावी याबाबत निर्णयार्थ सविनय सादर.

निर्णय क्र.१४५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सध्या समाधी शताब्दी वर्ष चालू असल्यामुळे अध्यक्ष, श्रीसाई रामनवमी यात्रा कमिटी, शिर्डी यांचे मागणीप्रमाणे श्रीरामनवमी उत्सवातील कुस्ती हगामा व विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करणेसाठी त्यांना एक विशेष बाब म्हणून रु.२० लाख मात्र रक्कम देण्यात यावी व उत्सवाची सांगता झाल्यानंतर या रकमेमधून खर्च वजा जाता राहीलेली शिल्लक रक्कम संस्थानकडे जमा करुन घेण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

विषय नं.०८ **श्रीरामनवमी उत्सव २०१८ मध्ये दि.२६ मार्च २०१८ रोजी आयोजित केलेल्या श्री.श्रीधर फडके यांचे “गीत रामायण” कार्यक्रमासाठी संस्थानमार्फत करावयाच्या व्यवस्थेबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद :-**

१. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील.
२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.
३. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम २(ठ) अन्वये, श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण यांबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील.

**मा.व्यवस्थापन समितीच्या सभेतील निर्णय:-** मा. व्यवस्थापन समितीचे दि.०२/०२/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.८०

**प्रस्तावना:-** श्री साईबाबा यांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर २०१८ रोजी (विजयादशमी) १०० वर्षे पूर्ण होत आहेत. श्री साईबाबा संस्थानच्यावतीने दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर २०१८ हा कालावधी श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष म्हणून साजरा करीत आहे. यासाठी शताब्दीचे संपूर्ण वर्षभरात वेगवेगळया धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक व प्रबोधनपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. जेणेकरुन संपूर्ण वर्षभरात शिर्डीमध्ये भक्तीमय वातावरण राहून श्री साईबाबा समाधी शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल यादृष्टीने कामकाज चालू आहे. यास अनुसरुन मा.व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार दि.०१/१०/२०१७ ते दि.११/०२/२०१८ अखेरपर्यंत विविध प्रकारचे धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे यशस्वीपणे आयोजन करण्यात आलेले आहे.

**प्रस्ताव:-** श्रीरामनवमी उत्सव २०१८ मध्ये दि.२४/०३/२०१८ ते दि.२६/०३/२०१८ या कालावधीत आयोजित करावयाच्या सांस्कृतिक कार्यक्रमांसाठीचे कलाकार व त्यांचे मानधन ठरविणेबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.०२/०२/२०१८ रोजीचे सभेत सादर करण्यात आला होता. यामध्ये दि.२६/०३/२०१८ रोजी श्री.श्रीधर फडके, मुंबई यांच्या "गीत रामायण" या कार्यक्रमाचा समावेश होता. सदर कार्यक्रमासाठी श्री.श्रीधर फडके यांना मानधन रु.१,२५,०००/- + प्रवास खर्चास (२ कारकरिता मुंबई ते शिर्डी व शिर्डी ते मुंबई) निर्णय क्र.८० अन्वये मान्यता मिळाली आहे. याबाबत श्री.श्रीधर फडके यांना कळविण्यात आले आहे.

आता श्री.श्रीधर फडके यांनी दि.१५ व १६ फेब्रुवारी २०१८ रोजीच्या ई-मेलद्वारे "गीत रामायण" कार्यक्रमाचे आयोजनासाठी संस्थानकडून आवश्यक असलेल्या साऊंड सिस्टीम व स्टेजवरील पलॅटफॉर्मचा तपशिल कळविला आहे. त्यासाठी ध्वनीक्षेपण व बांधकाम विभागाकडून प्राप्त माहितीनुसार संस्थानकडून होणा-या अंदाजित अतिरिक्त खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे :-

**"गीत रामायण" कार्यक्रमासाठी संस्थानकडून होणारा अंदाजित अतिरिक्त खर्च :-**

| Sr. No. | Particulars | Approximate Amount Rs. |
|---|---|---|
| 01 | Two mikes, both Mikes will be attachad to tall stands .<br>The tall stands are required as one will be used for singing and one for the Harmonium.<br>One mike for Tabla Player.<br>Two mikes for Side Rhythm Player.<br>One Line out connection fro the Synthesizer to Sound Mixer.<br>One mike for Electronic Tanpura.<br>One Mike for Nivedak.<br>Three mikes for Chorus singers.<br>Microphone ( Mike ) Model SURE SM 58. | 50,000/- |
| 02 | A) 4 Platforms are required for sitting and they have to be arranged in U shape Platform size<br>Length. 6 ft<br>Width. 4 ft<br>Height 1 1/2 ft<br>B) One stool of size<br>Height 1 1/4 ft<br>Width 2 ft<br>Breadth 2 ft<br>For placing the Harmonium | 5,000/- |
| | Total :- | 55,000/- |
| | GST (18%) | 9,900/- |
| | **Grand Total :-** | **64,000/-** |

उपरोक्त सर्व खर्च विचारात घेता, मा.व्यवस्थापन समितीने दि.०२/०२/२०१८ रोजीचे सभेत निर्णय क्र.८० अन्वये मान्य केलेल्या खर्चापेक्षा (मानधन रु.१,२५,०००/- + मुंबई ते शिर्डी व शिर्डी ते मुंबई प्रवास खर्च) साऊंड सिस्टीम व स्टेजवरील प्लॅटफॉर्मकरिता अतिरिक्त रक्कम रु.६४,०००/- इतका खर्च संस्थानला करावा लागणार आहे.

तरी श्री.श्रीधर फडके, मुंबई यांच्या "गीत रामायण" कार्यक्रमासाठी साऊंड सिस्टीम व स्टेजवरील प्लॅटफॉर्मकरिता अतिरिक्त रक्कम रु.६४,०००/- मात्रचे खर्चाबाबत निर्णय होणेकामी सदरचा प्रस्ताव सादर.

निर्णय क्र.१४६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीरामनवमी उत्सव २०१८ मध्ये दि.२६ मार्च २०१८ रोजी संस्थानमार्फत आयोजित केलेल्या श्री.श्रीधर फडके यांचे "गीत रामायण" कार्यक्रमासाठी मानधन व प्रवास खर्च याव्यतिरिक्त साऊंड सिस्टीम तसेच स्टेजवरील प्लॅटफॉर्मकरिता अतिरिक्त येणाऱ्या रु.६४,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**विषय नं.०९** **श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षातील श्रीरामनवमी उत्सव-२०१८ चे कार्यक्रमात झांज व ढोल पथक सादरीकरण करणेचे विनंती अर्जाबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद :-**

१. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये,राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील.

२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

३. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

**प्रस्ताव-** श्री.बालाजी श्रीचिप्पा, साईराम ड्रेपरिज, सोलापुर यांनी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया यांना अग्रेषित केलेल्या उपरोक्त संदर्भिय पत्रात आमच्या झांज व ढोल पथकास श्री रामनवमी उत्सवात सेवा सादर करण्याची संधी मिळावी. आमच्या पथकात २५ कलाकार असून आम्हा सर्वांची निवासाची व जेवणाची व्यवस्था करावी हि विनंती, असे नमूद केले आहे.

**प्रस्तावना-** श्री साईबाबा यांच्या महासमाधीस सन २०१८ मध्ये १०० वर्ष पूर्ण होत असल्याने श्रीसाईबाबा संस्थानमार्फत श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष दि.०१ ऑक्टोबर, २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर, २०१८ या कालावधीमध्ये साजरे केले जात आहे. श्री साईबाबा समाधी शताब्दी कालावधीमध्ये संपूर्ण वर्षभर वेगवेगळया धार्मिक व सांस्कृतिक तसेच सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. या संपूर्ण वर्षभरात शिर्डीमध्ये भक्तीमय वातावरण राहून, श्री साईबाबा समाधी शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल त्या दृष्टीकोनातून संस्थानचे विविध विभागांमार्फत कार्यवाही करण्यात येत आहे.

**विभागाचा अभिप्राय-** श्रीरामनवमी, श्री गुरुपौर्णिमा, श्रींची पुण्यतिथी इ. उत्सवामध्ये रथ/ पालखी मिरवणूकीमध्ये ढोल ताशा, झांज पथक इ. कलाकार मोफत सेवा देत असतात. श्री.बालाजी श्रीचिप्पा, साईराम ड्रेपरिज, सोलापुर यांनी विनंती केल्याप्रमाणे त्यांना श्रीरामनवमी उत्सव- २०१८ श्रींचे रथ/ पालखी मिरवणूकीमध्ये सेवा देणेस व त्यांना साईधर्मशाळेत ०२ दिवस एक मोफत हॉल, श्री साईप्रसादालयात मोफत जेवणाची व्यवस्था होणेसाठी तसेच यापुढेही शताब्दी वर्ष कालावधीत अशा प्रकारचे मोफत सेवा देणेसाठी अर्ज आलेस (ढोल ताशा, झांज पथक, बॅंड इ.) त्यांची संस्थानमार्फत जेवण व राहण्याची व्यवस्था मोफत करणेकामी सदरचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.१४७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.बालाजी श्रीचिप्पा, साईराम ड्रेपरिज, सोलापुर यांनी विनंती केल्याप्रमाणे, त्यांना श्रीरामनवमी उत्सव- २०१८ निमित्ताने श्रींचे रथ/ पालखी मिरवणूकीमध्ये झांज, ढोल वाद्यांची सेवा देणेस व त्यांना साईधर्मशाळेत ०२ दिवस एक हॉल तसेच श्री साईप्रसादालयामध्ये भोजनाची व्यवस्था संस्थानमार्फत मोफत करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच समाधी शताब्दी महोत्सव कालावधीतील विविध उत्सवांमध्ये ढोल ताशा, झांज पथक, बॅंड इ. प्रकारच्या मोफत सेवा देणेबाबत अर्ज प्राप्त झाल्यास, त्यांनाही परवानगी देण्यात येऊन, सदरहू अर्जदारांचीही निवास व भोजन व्यवस्था संस्थानमार्फत मोफत करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**विषय नं.१०** **साई प्रतिष्ठाण, शिर्डी यांना श्री रामनवमी उत्सवात दि.२५ किंवा २६ मार्च २०१८ रोजी सांस्कृतिक कार्यक्रमासाठी श्री साईबाबा समाधी मंदिर शताब्दी मंडप किंवा साईनगर मैदानावर कार्यक्रम करणेस अनुमती मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री.नितीन उत्तमराव कोते, अध्यक्ष साई प्रतिष्ठाण, शिर्डी यांनी दि.२६/०१/२०१८ रोजीचे पत्रान्वये श्री साई बाबांनी सुरु केलेल्या रामनवमी उत्सवानिमित्त दरवर्षी साई भक्त व ग्रामस्थांसाठी भव्य दिव्य स्वरुपाच्या

सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. त्यासाठी २५ किंवा २६ मार्च २०१८ रोजी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजनसाठी जागा मिळणेबाबत विनंती केली आहे.

"सबका मालिक एक है", "शिवपुत्र संभाजी" "मराठी पाऊल पडते पुढे" अशा स्वरुपाचे महानाट्याचे आजवर साई प्रतिष्ठानने रामनवमी उत्सवानिमित्त् शिर्डी शहरामध्ये आयोजन केलेले आहेत. याचप्रमाणे याही वर्षी येणा-या रामनवमी उत्सवानिमित्त समाधी शताब्दी वर्ष असल्या कारणाने साई प्रतिष्ठान सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करणार आहे. तरी साई प्रतिष्ठाण यांना श्री साईबाबा समाधी मंदिर शताब्दी मंडप किंवा साईनगर मैदान या ठिकाणी दि.२५ किंवा २६ मार्च २०१८ या दिवशी सांस्कृतिक कार्यक्रम करणेस अनुमती देणेबाबत विनंती केली आहे.

**विभागाचा अभिप्राय-** मा. व्यवस्थापन समितीचे दि.०९.१०.२०१६ चे सभेतील निर्णय क्र.६९७ नुसार "रुग्णालयामधील रुग्ण व साईनगर येथील रहिवाशी यांना कार्यक्रमाच्या आवाजाचा त्रास होणार नाही, या अटीवर राजकीय कार्यक्रम वगळता वैद्यकिय शिबीरे व धार्मिक कार्यक्रमासाठी साईनगर मैदान वापरासाठी उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

संस्थानतर्फे साज-या होणा-या तिनही उत्सवातील (श्रीरामनवमी, श्रीगुरुपौर्णिमा व श्रीपुण्यतिथी) तीन्ही दिवसांचे कार्यक्रम पुर्वापार प्रथेप्रमाणे संस्थानतर्फेच आयोजित केले जातात.

आपत्ती व्यवस्थापनाचे दृष्टीकोणातून श्रीरामनवमी उत्सव व श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सवातील सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन ब-याच वर्षापासून मंदिर परिसरात न करता साईनगर मैदान येथे केले जाते.

श्री रामनवमी उत्सव शनिवार दिनांक २४.०३.२०१८ ते सोमवार दिनांक २६.०३.२०१८ (चैत्र शु.७ शके १९४० ते चैत्र शु.१० शके १९४०) असा तीन दिवस साजरा करण्यात येणार आहे. श्री रामनवमी उत्सवात मंदिर परिसरात साईभक्तांची प्रचंड गर्दी दरवर्षी होत असते त्यामुळे श्री साईबाबासमाधी मंदिर शताब्दी मंडप (१६ गुंठे) श्री.नितीन उत्तमराव कोते, अध्यक्ष साई प्रतिष्ठाण, शिर्डी यांना कार्यक्रमासाठी उपल्ब्ध करुन देता येणार नाही. असे नम्र मत आहे.

उपरोक्त बाबींचा विचार करता श्री.नितीन उत्तमराव कोते, अध्यक्ष साई प्रतिष्ठाण, शिर्डी यांना साईनगर मैदान दि.२५ व २६ मार्च २०१८ रोजी साईनगर मैदान अथवा श्री साईबाबा समाधी मंदिर शताब्दी मंडप (१६ गुंठे) उपलब्ध करुन देता येणार नाही. सदरचे साईनगर मैदान दि.२७ मार्च २०१८ रोजी त्यांना सांस्कृतिक कार्यक्रमास उपलब्ध करुन देता येईल. सदरचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१४८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, साई प्रतिष्ठाण, शिर्डी यांना फक्त मैदान हवे असल्यास, साईनगर मैदान उपलब्ध करुन देण्यात यावे व स्टेजसहीत मैदान हवे असल्यास दि.२७ मार्च २०१८ रोजी जुने प्रसादालय परिसरामधील मैदान उपलब्ध करुन देण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

विषय नं.११ **श्रींचे पादुका दर्शन सोहळ्याचे आयोजन करणेसंबंधी देशातील विविध राज्ये, शहरे व आयोजक इ. बाबी निश्चित करणेसाठी दि.१७/०२/२०१८ रोजी झालेल्या पादुका दर्शन सोहळा समितीचे इतिवृत्तास मान्यता देणे बाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा यांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर, २०१८ रोजी १०० वर्षे पूर्ण होत आहेत. यानिमित्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्यातर्फे दि.०१ ऑक्टोबर, २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर, २०१८ या कालावधीमध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे केले जात आहे. यासाठी संपूर्ण वर्षभर वेगवेगळया धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करणेत येत असून, त्याचाच एक भाग म्हणून महाराष्ट्रासह संपूर्ण देशभरातील विविध राज्यामध्ये साईबाबा पादुका दर्शन सोहळा याकार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे दि. २०/०८/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६८७ अन्वये श्रींचे पादुका दर्शन सोहळा आयोजित करणेकामी प्राप्त झालेले अर्ज, पादुका दर्शन सोहळयाच्या अर्जांची छाननी करणेकामी गठीत करण्यात आलेल्या समितीसमोर सादर करावा व या समितीने पादुका दर्शन सोहळयाची रूपरेषा ठरवून त्याचा प्रस्ताव पुढील सभेसमोर सादर करावा असे ठरलेले आहे.

तसेच मा.व्यवस्थापन समितीचे दि.०२/०२/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१०८ अन्वये समाधी शताब्दी निमित्ताने कर्नाटक राज्यामध्ये पादुका दर्शन सोहळा आयोजित करणेसाठी प्राप्त झालेल्या अर्जधारकांना पादुका दर्शन सोहळयाच्या अर्जांची छाननी करणेसाठी गठीत करणेत आलेल्या समितीसमोर चर्चेसाठी बोलविणेत येऊन, पादुका दर्शन सोहळयासाठीची ठिकाणे निश्चित करावीत व त्याठिकाणाची पहाणी केल्यानंतर पादुका दर्शन सोहळयाची रूपरेषा ठरविणेत यावी, असे ठरलेले आहे.

त्यानुसार श्रींचे पादुका दर्शन सोहळयाचे कार्यक्रमाचे आयोजन होणेसाठी श्री. चंद्रशेखर कदम, उपाध्यक्ष श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी तसेच पादुका दर्शन छाननी समितीचे अध्यक्ष श्री. बिपीनदादा कोल्हे मा. ॲड. श्री. मोहन जयकर, सदस्य व मा. भाऊसाहेब वाकचौरे, सदस्य यांची शनिवार, दि.१७/०२/२०१८ रोजी दुपारी ३.०० वाजता संस्थानचे श्री साईनिवास अतिथीगृह येथे बैठक पार पडलेली आहे.

सदर बैठकीस खालीलप्रमाणे श्री साईबाबा संस्थानचे मा.विश्वस्त व अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

१) मा. चंद्रशेखर कदम, उपाध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी.
२) मा. श्री. बिपीनदादा कोल्हे, अध्यक्ष, पादुका अर्ज छाननी समिती.
३) मा. ॲड. श्री. मोहन जयकर, सदस्य, पादुका अर्ज छाननी समिती.
४) मा. भाऊसाहेब वाकचौरे, सदस्य, पादुका अर्ज छाननी समिती.
५) मा. मनोज घोडे पाटील, उपजिल्हाधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी
६) श्री. एस.व्ही. गमे, प्रशासकीय अधिकारी
७) श्री. यु.पी. गोंदकर, प्रशासकीय अधिकारी
८) श्री.डि.टी. उगले, प्रशासकीय अधिकारी
९) श्री. ए.आर. औटी, प्रशासकीय अधिकारी
१०) श्री. राजतिलक बागवे, प्र.अधिक्षक, शताब्दी कक्ष
११) श्री. अतुल कुंभकर्ण, लिपिक-टंकलेखक, शताब्दी कक्ष

श्री साईबाबा समाधी शताब्दी निमित्ताने कर्नाटक राज्यामध्ये पादुका दर्शन सोहळा आयोजित करणेसाठी खालील तक्त्यात नमूद संपूर्ण माहिती सादर केलेल्या अर्जधारकांना पादुका दर्शन सोहळ्याच्या अर्जांची छाननी करणेसाठी गठीत करणेत आलेल्या समितीसमोर चर्चेसाठी बोलविणेत आलेले असून, उपस्थित आयोजक व त्यांचे प्रतिनधी यांची नोंद घेण्यात येऊन सभेस सुरवात करण्यात आली.

| अ.नं. | शहर | मंदिर / ट्रस्टचे नांव | आयोजकांचे नांव | बैठकीस उपस्थिती |
|---|---|---|---|---|
| ०१. | तुमकुर | श्री शिर्डी साईनाथा सेवा समिती, | श्री गुरूसिध्दप्पा व प्रतिनिधी | हजर |
| ०२. | बिदर | साईबाबा मंदिर, बिदर | श्री संजय जाधव | **गैरहजर** |
| ०३. | बंगलौर | आखील भारतीय शिर्डी साई संघ | श्री. अभिषेक कुमार व प्रतिनिधी | हजर |
| ०४. | बेंगलोर | श्री साई मंडळी, मल्लेश्वरम | श्री. भास्करण सर | **गैरहजर** |
| ०५. | मंगलोर | श्री शिर्डी साईबाबा मंदिर, लेडी हिल्स, मंगलोर, | श्री. विश्वास कुमारदास व प्रतिनिधी | हजर |
| ०६. | बेळगांव | शिर्डी साईबाबा मंदिर अभिवृध्दी सोसायटी | श्री. कृष्णा कांगलकर व प्रतिनिधी | हजर |
| ०७. | बेळगांव | श्री ओम साई समाज साईमंदिर तिलकवाडी | श्री. सदानंद प्रभु व प्रतिनिधी | हजर |
| ०८. | उडपी | शिर्डी साईबाबा मंदिर (कोडवरू) उडपी | श्री. दिवाकर शेट्टी व प्रतिनिधी | हजर |

मा. छाननी समिती सदस्य यांनी प्रस्तांवधारकाशी विविध मुद्यांवर चर्चा करून खालीलप्रमाणे खालील प्रमाणे शिफारसी केलेल्या आहेत.

१) माहे-मार्च महिन्यामध्ये श्री रामनवमी उत्सव असल्याकारणामुळे कर्नाटक राज्यातील दौरा हा दोन टप्प्यात करावा.
२) कोपरगांव येथील साईबाबा तपोभूमी हे श्री साईबाबांच्या पदस्पर्शाने पावन झालेली भूमी असून, त्यांना ही ०१ दिवसाकरीता श्रींचे मुळ पादुका दर्शनासाठी उपलब्ध करून देण्यात याव्यात.
३) बेळगांव येथील दोन आयोजकांनी श्रींचे पादुकांची मागणी केलेली आहे. यावर सविस्तर चर्चा होऊन श्री ओम साई समाज साईमंदिर तिलकवाडी व शिर्डी साईबाबा मंदिर अभिवृध्दी सोसायटी एकत्र येऊन श्रींचे पादुका दर्शन सोहळयाचे अयोजन करावे असे ठरले. पंरतू सदरहू आयेजनाबाबत आयोजकांनी संमती दर्शविलेली नसल्याने त्यांचा निर्णय स्थगीत ठेवण्यात आला.
४) कर्नाटक राज्यातील मंगलौर व उडपी येथे श्रींचे पादुका दर्शन सोहळयाचे आयोजन हे माहे-मे महिन्यामध्ये तिस-या आठवडयात करण्यात यावे. त्यांना या समितीचे पुढील बैठकीचे वेळी दिनांक कळविण्यात यावी.

५) मध्यप्रदेश राज्यातील रतलाम येथे दि.०४ मे, २०१८ रोजी श्रींचे पादुका दर्शन सोहळयाचे अयोजन करण्यात यावे. परंतू भोपाळ, इंदौर व हारदा येथील अयोजकांना पुढील बैठकीसाठी बोलवावे व दौरा निश्चित करावा.

६) पादुका दर्शन सोहळयासाठी प्रवासादरम्यान नाष्टा, भोजन, निवासव्यवस्था, इंधन खर्च व इतर अनुषंगिक खर्च संस्थानमार्फत करावा. तसेच छाननी समितीने श्रींचे पादुका दौरा निश्चित केलेनंतर त्यामध्ये बदल करण्यात येऊ नये.

७) देशातील संपूर्ण माहिती सादर केलेले व सक्षम प्रस्तावधारकांना पुढील दौऱ्याचे नियोजनासाठी दि.०३ मार्च, २०१८ रोजी सकाळी १०.०० वाजता शिर्डी येथे बैठकीसाठी बोलविण्यात यावे असे ठरले.

अ) मा. पादुका दर्शन छाननी समिती मार्फत अंतिम करण्यात आलेले शहर,दिनांक व आयोजकांचे नांवः-

| अ.नं. | राज्य | शहर | मा. छाननी समिती मार्फत निश्चती करण्यात आलेली दिनांक व महिना | आयोजकांचे/ प्रतिनिधीचे नांव |
|---|---|---|---|---|
| ०१. | कर्नाटक | बंगलौर | दि.१० व ११ मार्च, २०१८ | श्री. अभिषेक कुमार, आखील भारतीय शिर्डी साई संघ, बंगलौर |
| ०२. | कर्नाटक | तुमकुर | दि.१२ व १३ मार्च, २०१८ | श्री गुरूसिध्दप्पा, श्री शिर्डी साईनाथा सेवा समिती, |
| ०३. | महाराष्ट्र | कोपरगांव | दि.१८, मार्च, २०१८ | श्री. चंद्रशेखर कोहकडे, साईभक्त कलाक्रीडा सांस्कृतिक सत्संग मंडळ, कोपरगांव |

तरी मा.पादुका दर्शन छाननी समितीच्या दि.१७/०२/२०१८ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्तातील शिफारसी मा.व्यवस्थापन समितीचे सभेपूढे निर्णयासाठी सादर.

**निर्णय क्र.१४९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रींचे पादुका दर्शन सोहळयाचे आयोजन करणेसंबंधी देशातील विविध राज्ये, शहरे व आयोजक इ. बाबी निश्चित करणेसाठी दि.१७/०२/२०१८ रोजी झालेल्या पादुका दर्शन सोहळा समितीच्या इतिवृत्ताचे अवलोकन आले. यामधील अ.नं.४ श्री साई मंडळी, मल्लेश्वरम यांनाही श्रींच्या मुळ पादुका दर्शनास उपलब्ध करुन देणेत याव्यात. याचा कालावधी पादुकासोबतच्या पथक प्रमुखांनी परिस्थितीनुरुप घ्यावा, असे ठरले.**

**यावेळी अशीही चर्चा झाली की, आमदार ॲड आशिष शेलार यांनी दिनांक १२.०२.२०१८ रोजीचे पत्रान्वये, गुडीपाडव्याच्या पुर्व संध्येला दि.१७.०३.२०१८ रोजी एमईटी मैदान, वांदे पश्चिम येथे मोठया धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले असून त्या कार्यक्रमासाठी श्रींच्या मुळ पादुकांची मागणी केलेली आहे. त्यांचे मागणीनुसार त्यांना दि.१७.०३.२०१८ रोजी धार्मिक कार्यक्रमासाठी श्रींच्या मुळ पादुका उपलब्ध करुन देण्यात याव्यात, असे ठरले.** (कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**विषय नं.१२** **श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवामध्ये माहे एप्रिल व मे- २०१८ मध्ये आयोजित करावयाच्या सांस्कृतिक कार्यक्रमासाठी कलाकार व त्यांचे मानधन ठरविणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद :-**

१. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये,राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयः-**

१) मा. व्यवस्थापन समितीचे दि.२०/०८/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६८२

२) मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८/०९/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७५०

३) मा. व्यवस्थापन समितीचे दि.०२/०२/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.८१

**प्रस्तावना:-** श्री साईबाबा यांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर २०१८ रोजी (विजयादशमी) १०० वर्षे पूर्ण होत आहेत. श्री साईबाबा संस्थानच्यावतीने दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर २०१८ हा कालावधी श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष म्हणून साजरा करीत आहे. यासाठी शताब्दीचे संपूर्ण वर्षभरात वेगवेगळया धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक व प्रबोधनपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. जेणेकरुन संपूर्ण वर्षभरात शिर्डीमध्ये भक्तीमय वातावरण राहून श्री साईबाबा समाधी शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल यादृष्टीने कामकाज चालू आहे.

**प्रस्ताव:-** श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात आयोजित करावयाचे धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे प्रारुप वेळापत्रकास मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/०९/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्र.७५० अन्वये मान्यता मिळालेली आहे.

माहे एप्रिल व मे २०१८ या कालावधीत आयोजित करावयाच्या सांस्कृतिक कार्यक्रमासाठी खालील तक्त्यात प्रत्येक दिवसासाठी पर्याय नमूद केले आहेत. यामध्ये मानधन घेऊन सेवा देणारे व मोफत सेवा देणारे कलाकार यांची यादी नमूद केली आहे. या पर्यायांमधून प्रत्येक दिवसाचे कार्यक्रमासाठी एका कलाकाराची निवड करता येईल.

| अ. नं. | वार, दिनांक व वेळ | प्रस्तावित कलाकाराचे नांव | ठिकाण | संपर्क | कलाप्रकार | कलाकार संख्या | मानधन रक्कम रु. | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | शनिवार, १४/०४/२०१८ सायं.७ ते ९.३० | बेला सुलाखे | मुंबई | ९८२११३००६८ | भक्तीगीत | ०९ | ५०,०००/- | |
| | | अनंत पांचाळ | मुंबई | ९९३०१२६३२७ | हिंदी साईभजन | १५ | प्रवास खर्च २५,०००/- | |
| | | सुरेंद्र बुरसे | नाशिक | ९४२२२४९२३० | भक्तीसंध्या | १५ | २५,०००/- | मा. विश्वस्त श्री.जयकर सो. यांची शिफारस |
| | | प्रशांत पेडणेकर | मुंबई | ८९७६३३१९३६ | भक्ती गीत | २१ | प्रवास खर्च २१,०००/- | |
| | | निनाद ग्रुप – श्रीमती पद्मावती पारेकर | पुणे | ९६०४६१९५८४ | भक्तीगीत | १५ | मोफत | |
| | | मंगेश अमदुरकर | नागपूर | ८८८८११११८६ | साईभजन | २० | मोफत | |
| | | पं. मनिष शर्मा | आग्रा | ९२५८०२३८८२ | साईभजन | ३० | मोफत | |
| | | धीरज पांडे | नागपूर | ९८९००७११९८ | हिंदी साईभजन | २० | मोफत | |
| ०२ | शनिवार, २८/०४/२०१८ सायं.७ ते ९.३० | सुनिल कुलकर्णी (मा.श्री.प्रकाश जावडेकर, केंद्रीय कॅबिनेट मंत्री यांचे स्वीय सहाय्यक) | दिल्ली | ९९१०१८८८५६ | भजन | १० | मोफत | मा.अध्यक्ष सो. यांची शिफारस |
| ०३ | शनिवार, १२/०५/२०१८ सायं.७ ते ९.३० | रविराज नासेरी | मुंबई | ९८९२३०६१७३ | साईभजन | १४ | ४,००,०००/- | मा. विश्वस्त श्री. वाकचौरे सो. यांची शिफारस |
| | | डॉ.लक्ष्मीकांत सहकारी | गोवा | ७७२१०२०३७० | शास्त्रीय गायन | १० | ४५,०००/- | |
| | | हरिष ग्वाला | मुंबई | ९८६७४९१४९९ | हिंदी साईभजन | १० | ४५,०००/- | |
| | | शुभदा बाम तांबट | नाशिक | ९८२२२८१५८४ | सुगम संगित | १० | २५,०००/- | मा. विश्वस्त श्री.जयकर सो. यांची शिफारस |
| | | साई सावली भजन | वडाळा, | ८८९८९५६८३८ | साईभजन | २० | मोफत | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मंडळ – देवेंद्र गावंड | मुंबई | ८७६७६४५५५३ | | | | |
| | | अंचल शर्मा | रायपुर | ९८२७१८०९५० | साईभजन | १५ | मोफत | |
| | | टी.व्ही. हरीहरन | बंगळुरू | ९७४१०२६६५७ | साईभजन | २० | मोफत | |
| | | राजेश अय्यर | मुंबई | ९८२१५६२३८५ | भजन | २० | मोफत | |

तरी माहे एप्रिल व मे २०१८ मध्ये आयोजित करावयाच्या सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी कलाकार पसंतीचे पर्याय क्र.१ व २ निवडणेस व त्यांचे मानधन ठरविणेसाठी सदरचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१५० **यावर सविस्तर चर्चा होऊन, समाधी शताब्दी निमित्ताने माहे एप्रिल व मे २०१८ मध्ये आयोजित करावयाच्या सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी खालीलप्रमाणे कलाकार व त्यांचे मानधन ठरविणेत आले. तसेच याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.**

| अ. नं. | वार, दिनांक व वेळ | प्राधान्यक्रम | प्रस्तावित कलाकाराचे नांव | ठिकाण | कलाप्रकार | कलाकार संख्या | मानधन रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | शनिवार, १४/०४/२०१८ सायं.७ ते ९.३० | १ | सुरेंद्र बुरसे | नाशिक | भक्तीसंध्या | १५ | २५,०००/- |
| | | २ | निनाद ग्रुप – श्रीमती पद्मावती पारेकर | पुणे | भक्तीगीत | १५ | मोफत |
| ०२ | शनिवार, २८/०४/२०१८ सायं.७ ते ९.३० | १ | सुनिल कुलकर्णी (मा.श्री.प्रकाश जावडेकर, केंद्रीय कॅबिनेट मंत्री यांचे स्वीय सहाय्यक) | दिल्ली | भजन | १० | मोफत |
| ०३ | शनिवार, १२/०५/२०१८ सायं.७ ते ९.३० | १ | शुभदा बाम तांबट | नाशिक | सुगम संगित | १० | २५,०००/- |
| | | २ | टी.व्ही. हरीहरन | बंगळुरू | साईभजन | २० | मोफत |

(कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

विषय नं.१३ **मा.व्यवस्थापन समितीचे दि.१४/११/२०१७ रोजीचे सभेतील कलाकारासंबंधीचा निवासव्यवस्थेबाबत निर्णय क्र.९४४ चे पुनःनिर्णयाबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद :-**

१. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये,राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील.

२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

३. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम २(ठ) अन्वये, श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण यांबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील.

**मा.व्यवस्थापन समितीच्या सभेतील निर्णय:-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.१४/११/२०१७ रोजीचे सभेपुढे श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवात वर्षात आयोजित धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमासाठी निमंत्रित कलाकार व मान्यवर यांना मोफत निवास, भोजन व दर्शन/आरती व्यवस्था उपलब्ध करुन देणे व त्यांचा सत्कार करणे यास मान्यता मिळणेबाबतचा विषय सादर करण्यात आला होता. त्यावर निर्णय क्र.९४४ खालीलप्रमाणे झाला आहे.

"श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात आयोजित धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रम विनामुल्य सादर करणा-या निमंत्रित कलाकारांची चहा-पाणी, निवास, भोजन व दर्शन व्यवस्था संस्थानतर्फे मोफत करणेत

यावी. तसेच मानधन घेऊन, कार्यक्रम सादर करणा-या कलाकारांची फक्त दर्शनव्यवस्था संस्थानमार्फत मोफत करण्यात यावी. त्याचप्रमाणे या विनामुल्य व मानधन घेऊन कार्यक्रम करणा-या कलाकार व मान्यवर यांना 3D फोटो, साईचरित्र ग्रंथ, उदी व लाडू प्रसाद पाकीट भेट देण्यात येऊन, त्यांचा सत्कार करण्यात यावा, असे ठरले."

**प्रस्तावना:-** श्री साईबाबा यांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर २०१८ रोजी (विजयादशमी) १०० वर्षे पूर्ण होत आहेत. श्री साईबाबा संस्थानच्यावतीने दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर २०१८ हा कालावधी श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष म्हणून साजरा करीत आहे. यासाठी शताब्दीचे संपूर्ण वर्षभरात वेगवेगळ्या धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक व प्रबोधनपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. जेणेकरुन संपूर्ण वर्षभरात शिर्डीमध्ये भक्तीमय वातावरण राहून श्री साईबाबा समाधी शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल यादृष्टीने कामकाज चालू आहे. यास अनुसरुन मा.व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार दि.०१/१०/२०१७ ते दि.११/०२/२०१८ अखेरपर्यंत विविध प्रकारचे धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे यशस्वीपणे आयोजन करण्यात आलेले आहे.

श्री साईबाबा संस्थानतर्फे जेव्हापासून निरनिराळे उत्सव साजरे केले जातात, तेव्हापासून त्या-त्या उत्सवात सेवा देणा-या कलाकारांची मोफत निवास, भोजन, चहा, पाणी, नाश्ता, दर्शन इ. व्यवस्था संस्थानतर्फे निशुल्क केली जाते.

तथापि, मा.व्यवस्थापन समितीचे दि.१४/११/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.९४४ अन्वये मानधन घेऊन कार्यक्रम सादर करणा-या कलाकारांची सशुल्क निवासव्यवस्था करणेबाबत निर्णय झालेला आहे. परंतु याबाबत काही कलाकारांनी संस्थानकडे एवढया मोठया प्रमाणावर निवासव्यवस्था असतांनासुद्धा सशुल्क निवासव्यवस्थेबाबत नापसंती व्यक्त केली आहे. तथापि, त्यानंतर मा.व्यवस्थापन समितीचे सदस्य श्री.मोहन जयकर सो. व श्री.प्रतापराव भोसले सो. यांचे निर्देशाप्रमाणे अनुक्रमे श्री.अशोक हांडे व डॉ.स्वाती दैठणकर यांची निशुल्क निवासव्यवस्था करण्यात आलेली आहे. तसेच याकामी मा.व्यवस्थापन समितीचे काही सदस्यांनीही नाराजी व्यक्त केली आहे.

**प्रस्ताव:-** श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात यापुढेही धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमात नामवंत प्रवचनकार, कीर्तनकार, कलाकार यांचे विनामूल्य व मानधन देऊन कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. यासाठी उपरोक्त निर्णयाप्रमाणेच कार्यवाही करावी किंवा पुर्वापार चालत आलेल्या परंपरेनुसार साज-या होणा-या प्रत्येक उत्सवात सेवा देणा-या कलाकारांची निवास, भोजन, चहा, पाणी, नाश्ता, दर्शन इ. व्यवस्था संस्थानतर्फे मोफत करावी किंवा कसे याबाबत तसेच मोफत निवासव्यवस्था पुरवावयाची झाल्यास त्यांना किती व कोणत्या प्रकारची निवासव्यवस्था (ए.सी./नॉन ए.सी.) उपलब्ध करुन देण्यात यावी याबाबत निर्णय होणे आवश्यक आहे.

तरी मा.व्यवस्थापन समितीचे दि.१४/११/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.९४४ मध्ये पुनःनिर्णय होणेबाबत सदरचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१५१ **यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.व्यवस्थापन समितीचे दि.१४/११/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.९४४ मधील मानधन घेऊन सेवा सादर करणाऱ्या कलाकारांच्या निवासव्यवस्थेबाबतचा मजकुर वगळणेस मान्यता देण्यात आली व यापुढे मानधन घेऊन, सेवा सादर करणाऱ्या कलाकारांनाही संस्थानमार्फत विनामुल्य निवासव्यवस्था पुरविणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

विषय नं.१४ **माहे एप्रिल २०१८ मध्ये नियोजित अवधूत शिवानंदजी महाराज यांचा सत्संग कार्यक्रम (ऋषी ते कृषी) कार्यक्रम रद्द झालेची नोंद घेणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा यांच्या समाधीस दि. १८ ऑक्टोबर, २०१८ रोजी १०० वर्षे पूर्ण होत आहेत. यानिमित्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्यातर्फे दि.१ ऑक्टोबर २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर २०१८ या कालावधीमध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे केले जात आहे. या वर्षात विविध धार्मिक, सामाजिक, साईबाबांची शिकवण, सेवाभाव दर्शविणा-या भव्य स्वरूपाच्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

उपरोक्त अनुषंगाने श्री अवधूत शिवानंदजी महाराज यांना दि. ०५/०४/२०१८ ते ०८/०४/२०१८ या चार दिवसाचे कालावधीत सायंकाळी ७.०० ते रात्री १०.०० वेळेत कार्यक्रमासाठी जा.नं. एसएसएसटी/बांधकाम-शताब्दी कक्ष/ १९९४/२०१७ दि. १३ जुलै २०१७ अन्वये निमंत्रण पत्र देण्यात आले होते व मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८/०९/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७५० अन्वये सदरहु कार्यक्रमाचा शताब्दीच्या वेळापत्रकात समावेश करण्यात आला होता.

आता दिनांक १०/०२/२०१८ रोजीचे ई-मेल पत्राव्दारे श्री अवधूत शिवानंदजी महाराज यांचे प्रतिनिधी श्री दिपक व्ही. हेडा, नागपूर यांनी दि. ५ ते ८ एप्रिल २०१८ मध्ये नियोजित सदरहु सत्संग कार्यक्रम रद्द करण्यात येत असल्याचे कळविले आहे. सदरहु कार्यक्रम रद्द झाल्याची नोंद घेणेसाठी सादर.

**निर्णय क्र.१५२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाची नोंद घेण्यात आली.** (कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**विषय नं.१५** **शताब्दी कालावधीत महंत अरुणजी महाराज, भामाठाण यांचा भागवत कथा प्रवचन कार्यक्रम निश्चित करणेस व त्याकामी येणा-या खर्चाच्या सर्व समावेशक बाबींवर विचार विनिमय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद :**

१) अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये,राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालववयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील.

२) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

३) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

**मा. व्यवस्थापन समिती सभा निर्णय-**

१) मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०९/०३/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्रमांक १७१ खालीलप्रमाणे पारीत झालेला आहे.

“श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवानिमित्ताने दि. ०१ ऑक्टोबर, २०१७ ते दि. ३१ ऑक्टोबर, २०१७ अखेर ३८६ दिवस दररोज साईभक्तांसाठी धार्मिक, सामाजिक, साईबाबांची शिकवण, सेवाभाव दर्शविणा-या भव्य स्वरूपाच्या कार्यक्रमांचे आयोजन करणेत यावे”, असे ठरले आहे.

२) मा. व्यवस्थापन समितीचे दि.२०/०८/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६८२ खालीलप्रमाणे पारीत झालेला आहे.

श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव वर्षभर आयोजित करण्यात येणा-या विविध प्रस्तावित धार्मिक, सांस्कृतिक व सामाजीक कार्यक्रमाची सुधारीत रुपरेषा ठरविण्यात आली. तसेच शताब्दी महोत्सवामध्ये आयोजित करावयाच्या धार्मिक, सांस्कृतिक व सामाजीक कार्यक्रमासाठीचे कलाकार व त्यांचे मानधन यांचे परिशिष्ठ ब, क ड व ई सोबत सादर केलेले आहे. या यादीतील कार्यक्रम, कलाकार, व त्यांचे मानधन स्थानिक उप-समितीने छाननीकरुन कार्यक्रम निश्चित करावेत. त्यामधील विनामुल्य सेवा करणा-या कलाकारांना प्राधान्य देण्यात येऊन, वर्षभर संधी देण्यात यावी. कार्यक्रमाची निश्चिती झाल्यानंतर त्यामध्ये गरजेनुसार / परिस्थितीनुसार आवश्यक ते बदल करण्याचे अधिकार व्यवस्थापन समितीला राहतील, असे ठरले. या निश्चित केलेल्या सर्व प्रकारच्या कार्यक्रमांसाठी,अपवाद वगळता मानधन व प्रवास असे सर्व मिळून प्रत्येकी एका कार्यक्रमासाठी जास्तीत जास्त रुपये ३ लाख मात्रचे खर्चास तसेच शताब्दी वर्षात आयोजित केलेल्या कार्यक्रमांसाठी स्टेज, मंडप, साऊंड सिस्टीम, विदयुत रोषणाई, सीसीटिव्ही, सुरक्षा व्यवस्था व आवश्यक जादाचे मनुष्यबळ यावर होणरा खर्च व इतर अनुषंगीक खर्चासही मान्यता देण्यात आली.

**प्रस्तावनाः** महंत अरुणजी महाराज, श्री क्षेत्र अडबंगनाथ संस्थान ट्रस्ट, भामाठाण यांनी मा. कार्यकारी अधिकारी महोदया यांना अग्रेशित केलेल्या दि ०५/०१/२०१८ रोजीचे पत्रात, "श्री साई समाधी निमित्त साई संस्थानमध्ये भागवत कथा करण्यासाठी इच्छूक आहे मला साधारण

१) दि. २०/०२/२०१८ ते दि. २७/०२/२०१८ – वेळ दुपारी -०२ ते ०५
२) दि. ०६/०३/२०१८ ते दि. १३/०३/२०१८- वेळ दुपारी -०२ ते ०५
३) दि.१६/०३/२०१८ ते दि.२३/०३/२०१८ – वेळ दुपारी – ०२ ते ०५
४) दि. २०/०३/२०१८ ते दि. २७/०३/२०१८ – वेळ दुपारी -०२ ते ०५

या तारखे दरम्यान मला सेवा करण्याची संधी मिळावी तसेच माझ्या सोबत माझे गायक वादक व संगितकार असे मिळून ०७ ते १० लोक असतील त्यासाठी राहण्याची व जेवणाची व्यवस्था करावी तसेच साई

संस्थानतर्फे त्यांची आपले इच्छेनुसार दक्षिणा व मानधन द्यावे व महाराजांचे व संगितकार यांचे मानधन देण्यात यावेहि नम्र विनंती, असे कळविलेले आहे.मा. उपाध्यक्ष सो. यांनी सदर प्रस्तावाचासमावेश मा. व्यवस्थापन समिती सभेच्या आयत्या वेळेच्या विषयात करावा, असे निर्देश दिलेले आहेत.

**प्रस्ताव:** श्री साईबाबा यांच्या समाधीस ऑक्टोबर-२०१८ मध्ये १०० वर्ष पूर्ण होत असल्याने श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्यातर्फे दि.०१ऑक्टोबर,२०१७ ते दि.१८ऑक्टोबर,२०१८ या कालावधीमध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे केले जात आहे. यासाठी शताब्दीचे संपूर्ण वर्षभर वेगवेगळया धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करणेत येत आहे, जेणे करुन संपूर्ण वर्षभरात शिर्डीमध्ये भक्तीमय वातावरण राहून श्रीसाईबाबा महासमाधी शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल, या दृष्टीने कामकाज चालू आहे.

या अनुषंगाने शताब्दी वर्षात येणा-या साईभक्तांसाठी

१) श्री.शंकर अभ्यंकर- विषय - संत/महंत, महापुरुष/ राष्ट्रपुरुष,- ०१ फेब्रुवारी, २०१८ ते ०३ फेब्रुवारी, २०१८

२) श्री अवधूत शिवानंद महाराज- विषय- ऋषी ते कृषी, - ०५ एप्रील, २०१८ ते ०७ एप्रील, २०१८

३) श्री शिवकृपानंद स्वामी (आत्मज्ञान व मानवधर्म),- २३ एप्रील, २०१८ ते ३० एप्रील, २०१८

४) ह.भ.प.श्री.रामराव महाराज ढोक – विषय - रामायण, दि.०६ जून, २०१८ ते दि. १२ जून, २०१८,

५) श्री.मोरारी बापू– विषय– रामचरीत मानस- प्रस्तावित कार्यक्रम

६) श्री श्री रवि शंकर महाराज- विषय– आर्ट ऑफ लिव्हींग (प्रस्तावित कार्यक्रम)

७) श्री.प्रल्हाद दादा पै-जीवन विद्या- विषय - (विद्यार्थी, महिला, कौटुंबीक),- (प्रस्तावित कार्यक्रम)

अशा विविध नामवंत प्रवचनकार, किर्तनकार तथा नामवंत कलाकारांचे धार्मिक, सांस्कृतिक व प्रबोधनपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

आता महंत अरुणजी महाराज, भामाठाण यांनी समाधी शताब्दी महोत्सवी वर्षात भागवत कथा कार्यक्रम करण्यासाठी परवानगी मागितली असून सदर कार्यक्रम निश्चितीसाठी वेगवेगळया तारखा दिलेल्या आहेत तसेच सदर कार्यक्रमासाठी संस्थानच्या इच्छेनुसार दक्षिणा व मानधन देण्याबाबत विनंती केलेली आहे.

सदर भागवत कथा कार्यक्रमाचे आयोजन करावयाचे झाल्यास खालील बाबींवर धोरणात्मक निर्णय होणे आवश्यक आहे.

१) कार्यक्रमाची निश्चिती- महंत अरुणजी महाराज, श्री क्षेत्र अडबंगनाथ संस्थान ट्रस्ट, भामाठाण यांचा भागवत कथा कार्यक्रम आयोजित करणेबाबत.

२) कार्यक्रमासाठी मानधन- महंत अरुणजी महाराज व त्यांचे सोबतचे गायक, वादक व संगीतकार यांचे मानधन निश्चिती करणेबाबत.

३) कार्यक्रमाची तारीख- महंत अरुणजी महाराज यांचे कार्यक्रमाचे आयोजन करावयाचे झाल्यास त्यांनी त्यांचे प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे १) माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये २०/०२/२०१८ ते २७/०२/२०१८ तसेच माहे मार्च, २०१८ मध्ये २) ०६/०३/२०१८ ते १३/०३/२०१८ ३) १६/०३/२०१८ ते २३/०३/२०१८ ४) २०/०३/२०१८ ते २७/०३/२०१८ या तारखांमधून कार्यक्रमासाठी तारीख निश्चित करणेबाबत. (माहे मार्च २०१८ मध्ये दि. २४/०३/२०१८ ते २६/०३/२०१८ या कालावधीत श्री रामनवमी उत्सव असल्याने अ.नं.०३ व ०४ च्या तारखांना सदर कार्यक्रमाचे आयोजन करता येणार नाही)

४) कार्यक्रमाचे ठिकाण-सदर कार्यक्रमाचे आयोजन त्यांचे प्रतिनिधींनी समक्ष विनंती केलेप्रमाणे श्री साईबाबा समाधी शताब्दी मंडपात करणेबाबत.

५) इतर अनुषंगिक व्यवस्था- महंत अरुणजी महाराज यांच्यासह १० व्यक्तींची निवास, प्रसाद भोजन, चहा, पाणी, नाष्टा, बिस्कीटेतसेच आवश्यकतेनुसार दर्शन आदि व्यवस्था करणेबाबत.

**विभागाचा अभिप्राय-** महंत अरुणजी महाराज, श्री क्षेत्र अडबंगनाथ संस्थान ट्रस्ट, भामाठाण हे शिर्डी व पंचक्रोशीत नामांकित किर्तनकार तसेच रामायणाचार्य म्हणून प्रसिध्द आहेत. शिवाय शताब्दी वर्षात अद्यापपर्यंत मराठी भागवत कथा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले नाही. करीता सदर कार्यक्रमाचे आयोजन करावे किंवा कसे याबाबत निर्णय घेणे तसेच सदर कार्यक्रमाचे आयोजन करावयाचे झाल्यास ते माहे मार्च,२०१८ मध्ये दि.०६/०३/२०१८ ते दि.१३/०३/२०१८ या कालावधीत निश्चित करता येईल.

तरी महंत अरुणजी महाराज, श्री क्षेत्र अडबंगनाथ संस्थान ट्रस्ट, भामाठाण यांचा भागवत कथा प्रवचन कार्यक्रम आयोजित करावयाचा झाल्यास उपरोक्त नमूद बाबींवर धोरणात्मक निर्णय होणेसाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.१५३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, महंत अरुणजी महाराज, भामाठाण यांचेकडून मे महिन्यातील अथवा उपलब्धतेनुसार तारीख घेऊन, त्यावेळेस शताब्दी मंडपामध्ये त्यांचा भागवत कथा प्रवचन कार्यक्रम आयोजित करणेत यावा. तसेच महंत अरुणजी महाराज, भामाठाण व त्यांचे सहकारी अशा १० व्यक्तींची निवास, भोजन, चहा-पाणी, नाष्टा, दर्शन व्यवस्था संस्थानमार्फत मोफत करणेत येऊन, त्यांना प्रत्येकी रु.१०,०००/- याप्रमाणे एकूण रु.१,००,०००/- मात्र मानधन देण्यात यावे, असे ठरले. तसेच हा कार्यक्रम आयोजित करणेसाठी येणाऱ्या सर्व समावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**विषय नं.१६** **श्री साईबाबा समाधी शताब्दी कालावधीत श्री. ह.भ.प.श्री.रामरावजी महाराज ढोक यांचे दि.०६/०६/२०१८ ते दि.१२/०६/२०१८ या कालावधीत रामकथा प्रवचन कार्यक्रमासाठी येणा-या खर्चाच्या सर्व समावेशक बाबींवर विचार विनिमय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद :**

१) अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये,राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील.

२) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

३) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

**मा. व्यवस्थापन समिती सभा निर्णय-**

१) मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०९/०३/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक १७१

"श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवानिमित्ताने दि. ०१ ऑक्टोबर, २०१७ ते दि. ३१ ऑक्टोबर, २०१७ अखेर ३८६ दिवस दररोज साईभक्तांसाठी धार्मिक, सामाजिक, साईबाबांची शिकवण, सेवाभाव दर्शविणा-या भव्य स्वरूपाच्या कार्यक्रमांचे आयोजन करणेत यावे", असे ठरले आहे.

२) मा. व्यवस्थापन समितीचे दि.२०/०८/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६८२

श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव वर्षभर आयोजित करण्यात येणा-या विविध प्रस्तावित धार्मिक, सांस्कृतिक व सामाजीक कार्यक्रमाची सुधारीत रुपरेषा ठरविण्यात आली. तसेच शताब्दी महोत्सवामध्ये आयोजित करावयाच्या धार्मिक, सांस्कृतिक व सामाजीक कार्यक्रमासाठीचे कलाकार व त्यांचे मानधन यांचे परिशिष्ठ ब, क ड व ई सोबत सादर केलेले आहे. या यादीतील कार्यक्रम, कलाकार, व त्यांचे मानधन स्थानिक उप-समितीने छाननी करुन कार्यक्रम निश्चित करावेत. त्यामधील विनामुल्य सेवा करणा-या कलाकारांना प्राधान्य देण्यात येऊन, वर्षभर संधी देण्यात यावी. कार्यक्रमाची निश्चिती झाल्यानंतर त्यामध्ये गरजेनुसार / परिस्थितीनुसार आवश्यक ते बदल करण्याचे अधिकार व्यवस्थापन समितीला राहतील, असे ठरले. या निश्चित केलेल्या सर्व प्रकारच्या कार्यक्रमांसाठी,अपवाद वगळता मानधन व प्रवास असे सर्व मिळून प्रत्येकी एका कार्यक्रमासाठी जास्तीत जास्त रुपये ३ लाख मात्रचे खर्चास तसेच शताब्दी वर्षात आयोजित केलेल्या कार्यक्रमांसाठी स्टेज, मंडप, साऊंड सिस्टीम, विदयुत रोषणाई, सीसीटिव्ही, सुरक्षा व्यवस्था व आवश्यक जादाचे मनुष्यबळ यावर होणरा खर्च व इतर अनुषंगीक खर्चासही मान्यता देण्यात आली.

३) मा. व्यवस्थापन समितीचे दि.०२/०२/२०१८रोजीचे सभेतील निर्णय क्र.८१

यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षानिमित्ताने यापुढेही साईभक्तांसाठी नामवंत प्रवचनकार, किर्तनकार, कलाकार कार्यक्रम आयोजित करण्यात येणार असून सदर कार्यक्रमासाठी उपरोक्त प्रस्तावनेत नमूद केलेप्रमाणे कलाकार मानधन व इतर अनुषंगिक बाबींसाठी रु. ०३ लाखांपेक्षा अधिक खर्च होण्याची शक्यता असल्यामुळे, मा. व्यवस्थापन समितीचे दि. ३०/०८/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ६८२ मध्ये कलाकार मानधनाबाबत समिती वेळोवेळी निर्णय घेईल, त्याप्रमाणे मानधन अदा करणेत यावे, असा बदल करणेत यावा.

**प्रस्तावः** श्री हभप रामरावजी महाराज ढोक, आळंदी यांनी दि.०४/०७/२०१७ रोजीचे पत्रान्वये श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवी वर्षात दि.०६/०६/२०१८ ते दि.१२/०६/२०१८ या कालावधीत रामकथा प्रवचन कार्यक्रम करण्याची आमची तयारी आहे. सदर कार्यक्रमासाठी माझ्यासह एकूण ०६ गुणीजन असून या गुणीजनांचे मिळून आम्हांला रु.३,५०,०००/- मात्र इतक्या मानधनाची अपेक्षा आहे. यामध्ये निवास व भोजन व्यवस्था आपलेकडून अपेक्षित आहे. तरी श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात रामकथा प्रवचन करण्याची संधी द्यावी हि विनंती, असे कळविलेले आहे.

**प्रस्तावना:** श्री साईबाबा यांच्या समाधीस ऑक्टोबर-२०१८ मध्ये १०० वर्ष पूर्ण होत असल्याने श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्यातर्फे दि.०१ऑक्टोबर,२०१७ ते दि.१८ऑक्टोबर,२०१८ या कालावधीमध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे केले जात आहे. यासाठी शताब्दीचे संपूर्ण वर्षभर वेगवेगळया धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करणेत येत असून संपूर्ण वर्षभरात शिर्डीमध्ये भक्तीमय वातावरण राहून श्रीसाईबाबा महासमाधी शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल, या दृष्टीने कामकाज चालू आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.०९/०३/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र. १७१ नुसार साईभक्तांसाठी धार्मिक, सांस्कृतिक सामाजिक, साईबाबांची शिकवण -सेवाभाव दर्शविणा-या कार्यक्रमांचे प्रारुप वेळापत्रक तयार करणेत आले होते.त्यानंतर मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८/०९/२०१७ रोजीचे सभेत शताब्दी महोत्सवी वर्षात आयोजित करावयाच्या विविध प्रस्तावित धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमाची सुधारित रुपरेषा ठरविणेबाबत प्रारुप वेळापत्रकाचा सविस्तर प्रस्ताव सादर करणेत आला. त्यामध्येदि.०६/०६/२०१८ ते दि.१२/०६/२०१८ या कालावधीत अधिकमासाचे औचित्य साधून श्री हभप रामरावजी महाराज ढोक, आळंदी यांच्या रामकथा प्रवचन कार्यक्रमाचा समावेश केलेला होता. त्यास निर्णय क्र. ७५० नुसार मान्यता देण्यात आलेली आहे.

**विभागाचा अभिप्राय-** श्री हभप रामरावजी महाराज ढोक हे शिर्डी व पंचक्रोशीतील नामांकित किर्तनकार तसेच रामकथा प्रवचनकार म्हणून प्रसिध्द आहेत. श्री ढोक महाराज यांचा रामकथा प्रवचन कार्यक्रम हा यापुर्वीही शिर्डी व शिर्डी पंचक्रोशीत अनेक वेळा झालेला आहे. सदर कार्यक्रमासाठी नागरीकांचा मोठा प्रतिसाद असतो. त्यामुळे सदर कार्यक्रमाचा दररोज सुमारे ३ ते ५ हजार भाविक निश्चितच लाभ घेतील असा अंदाज आहे.

तरी श्री हभप रामरावजी महाराज ढोक, आळंदी यांचा रामकथा प्रवचन कार्यक्रम आयोजित करणेसाठी कार्यक्रमाचे मानधन, ठिकाणव इतर अनुषंगिक व्यवस्था यासाठी खालील बाबींवर धोरणात्मक निर्णय होणे आवश्यक आहे.

१) ***कार्यक्रमाचे मानधन-*** सदर कार्यक्रमासाठी श्री हभप रामरावजी महाराज ढोक यांनी मागणी केलेप्रमाणे रु.३,५०,०००/- मात्र इतके मानधन देणेबाबत.

२) ***कार्यक्रमाचे ठिकाण-*** खालील तीनपैकी एका जागेची निश्चिती करणे.

अ) श्री साईबाबा समाधी शताब्दी मंडपात सदर कार्यक्रमाचे आयोजन केल्यास –

१) स्टेज, जनरेटर, आदि व्यवस्था नव्याने उभारणेची गरज नाही.

२) सदर मंडपात सुमारे १००० व्यक्तींची आसन व्यवस्था होईल.

ब) साईनगर मैदानावर सदर कार्यक्रमाचे आयोजन केल्यास –

१) दि.०६/०६/२०१८ ते दि.१२/०६/२०१८ या कालावधीत पावसाळा असल्याने साईनगर मैदानावर पत्राशेड मंडप, स्टेज, मंडपात कारपेट, बॅरेकेडींग, लाईट,साऊंड सिस्टीम आदि व्यवस्था उभारावी लागेल.(सदर व्यवस्थेसाठी सुमारे रु.१८ लक्ष इतका अपेक्षित खर्च येईल.)

२) साईनगर मैदानावर पत्राशेड मंडपात सुमारे ०३ ते०५ हजार व्यक्तींची आसन व्यवस्था करता येईल.

क) साईआश्रम भक्तनिवास इमारतीचे प्रांगणात नव्याने श्री साईआश्रम समाधी शताब्दी मंडपाचे काम करणे प्रस्तावित आहे. सदरचा मंडप माहे मे, २०१८ अखेर पूर्ण झाल्यास सदर कार्यक्रमाचे आयोजन सदर मंडपात केल्यास-

१) स्टेज, कारपेट, साऊंड सिस्टीम आदि अनुषंगिक व्यवस्था उभारावी लागेल. (यासाठी सुमारे रु. ०७ लक्ष मात्र इतका खर्च अपेक्षित आहे.)

२) सदर मंडपात सुमारे १५०० ते १८०० व्यक्तींची आसन व्यवस्था होईल.

३) इतर अनुषंगिक व्यवस्था-श्री हभप रामरावजी महाराज ढोक यांच्यासह ०६ गुणीजन यांची निवास, प्रसाद भोजन, चहा, पाणी, नाष्टा, बिस्कीटेतसेच आवश्यकतेनुसार दर्शन आदि व्यवस्था करणेबाबत.

उपरोक्त नमूद केलेल्या मंडपात फायबर खुर्च्या, व्हीआयपी सोफे आदि व्यवस्था आवश्यकतेनुसार संस्थानचे संबंधीतविभागाकडून उपलब्ध करुन देता येईल.

तरी उपरोक्त नमूद बाबींवर धोरणात्मक निर्णय होणेसाठी सविनय सादर.

निर्णय क्र.१५४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी निमित्ताने दि.०६/०६/२०१८ ते दि.१२/०६/२०१८ या कालावधीत ह.भ.प.श्री.रामरावजी महाराज ढोक यांचा रामकथा प्रवचनाचा कार्यक्रम साईआश्रम भक्तनिवास येथील मंडपामध्ये आयोजित करणेत यावा व त्यांना रु.३,५०,०००/- मात्र मानधन देणेत यावे, असे ठरले. तसेच सदरहू कार्यक्रम आयोजनासाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व त्यानुशंगाने येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

विषय नं.१७ **श्रीगुरुपौर्णिमा उत्सवासाठी कीर्तन कार्यक्रम निश्चित करणेबाबत.**

प्रस्ताव- ह.भ.प .चारुदत्त गोविंदस्वामी आफळे,कीर्तनकार यांनी दि.२७/१२/२०१७ रोजीचे ईमेल पत्राव्दारे संस्थान मार्फत साजराहोणा-या गुरुपौर्णिमा उत्सवात दि.२६,२७,२८ जुलै २०१८ असे तीन दिवस कीर्तन सेवेची संधी मिळावी तसेच तीन दिवसाचे तीन कीर्तन सेवांचे साथीदारांसह मानधन किती देऊ शकाल हे कळवावे, आपले आज्ञेबाहेर आम्ही नाही, शताब्दी निमित्त साई सेवा घडावी अशी इच्छा, अशी विनंती केली होती. सदर विंनतीनुसार दि. १५/०१/२०१८ रोजी कार्यालयीन टिपणी सादर करणेत आली होती. सदर टिपणीवर उपजिल्हाधिकारी सो यांनी मानधनाबाबतचा तपशिल नमूद करावा, असे निर्देश दिले. सदर निर्देशानुसार त्यांना विचारणा करण्यात आली असता, दि. १७/०१/२०१८ रोजीचे ईमेल पत्राव्दारे तीन किर्तन सेवांचे साथीदारासह मानधन रु. ५१,०००/- मिळावे, असे कळविले आहे.

**प्रस्तावना:**– संस्थानतर्फे साजरे केल्या जाणा-या उत्सवातील कीर्तन मंदिराच्या उत्तर बाजूच्या स्टेजवर होते.

ह.भ.प. दासगणू महाराज प्रतिष्ठाण, गोरटे यांनी पाठविलेल्या कीर्तनकाराचे कीर्तन श्री रामनवमी उत्सवात ठेवण्यात येते ही परंपरा ह.भ.प. दासगणू महाराज यांनी स्वतःरामनवमी उत्सवात कीर्तन सेवा देण्यास सुरुवात केल्यापासून आजतागायत अखंडीत सेवा चालू आहे. त्यानुसार ह.भ.प. दासगणू महाराज प्रतिष्ठाण, गोरटे यांनी पाठविलेल्या कीर्तनकाराचे कीर्तन शताब्दी वर्षातील रामनवमी उत्सवात परंपरेनुसार ठेवले जाते.

संस्थानमार्फत गुरुपौर्णिमा व पुण्यतिथी उत्सवात कीर्तनकारांचे प्राप्त झालेले सर्व अर्ज एकत्रित करुन कीर्तनकारांचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेत ठेवण्यात येतो, सदर प्रस्तावावर चर्चा होऊन योग्य कीर्तनकाराची निवड व मानधनाबाबत निर्णय घेण्यात येतो.तथापि श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१८ करीता कीर्तन सेवेकरीता आजपर्यंत कीर्तनकाराचे अर्ज प्राप्त झालेले नाहीत.

श्री.गुरुपौर्णिमा व श्री पुण्यतिथी उत्सवात श्री रामनवमी उत्सवाप्रमाणे कोणत्याही कीर्तनकाराची कीर्तन सेवा करण्याची परंपरा नाही. मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयाप्रमाणे कीर्तनकाराची निवड केली जाते.

**श्री. गुरुपार्णिमा उत्सवात सेवा दिलेल्या कीर्तनकारांची नांवे खालीलप्रमाणे..**

| अ.नं. | कीर्तनकाराचे नाव | गुरुपौर्णिमा उत्सवात कीर्तन सेवा दिलेले साल |
|---|---|---|
| ०१ | ह.भ.प .डॉ.ग्र.प्र.परांजपे,पुणे | दि. १९/०७/१९९७ ते दि.२१/०७/१९९७ |
| ०२ | ह.भ.प .श्री.रा .आळेकर, इंदौर | दि. ०८/०७/१९९८ ते दि.१०/०७/१९९८ |
| ०३ | ह.भ.प.श्री.उत्तमराव विष्णूजी बडधे, कोपरगांव यांचे प्रथम व दुस-या दिवशी कीर्तनह.भ.प.श्री.माधव तुकाराम आजेगांवकर,परभणी यांचे तिस-या दिवशी काल्याचे कीर्तन | दि. २७/०७/१९९९ ते दि.२९/०७/१९९९ |
| ०४ | ह.भ.प .श्री.उत्तमराव विष्णूजी बडधे, कोपरगांव | दि.१५/०७/२००० ते दि.१७/०७/२००० |
| ०५ | ह.भ.प .श्री.महादेव शंकर गोखले, विरार | दि.०४/०७/२००१ ते दि.०६/०७/२००१ |
| ०६ | ह.भ.प .श्री.शरद नेरळकर, नांदेड | दि.२३/०७/२००२ ते दि.२५/०७/२००२ |

| | | |
|---|---|---|
| ०७ | ह.भ.प .गंगाधर नरहर व्यास )सन २००३ (डोंबिवली )पूर्व (जिल्हा-ठाणे | सन२००३ |
| ०८ | ह.भ.प .गंगाधर नरहर व्यासडोंबिवली )पूर्व (जिल्हा-ठाणे | दि.०१/०७/२००४ ते दि.०३/०७/२००४ |
| ०९ | ह.भ.प.माधव तु.आजेगांवकर,परभणी | दि.२०/०७/२००५ते दि.२२/०७/२००५ |
| १० | ह.भ.प.प्रा.डॉ.माधवराव दिक्षीत पुणे | दि.१०/०७/२००६तेदि.१२/०७/२००६ |
| ११ | ह.भ.प .गंगाधर नरहर व्यासडोंबिवली )पूर्व (जिल्हा-ठाणे | दि.२८/०७/२००७तेदि.३०/०७/२००७ |
| १२ | ह.भ.प.माधव तु.आजेगांवकर,परभणी | दि.१७/०७/२००८तेदि.१९/०७/२००८ |
| १३ | ह.भ.प.माधव तु.आजेगांवकर,परभणी | दि.०६/०७/२००९तेदि.०८/०७/२००९ |
| १४ | ह.भ.प.मंदार गंगाधर व्यासबुवा, डोंबिवली | दि.२४/०७/२०१०तेदि.२६/०७/२०१० |
| १५ | ह.भ.प .मनोहर महाराज कोकलेगांवकर विठ्ठलवाडी, नांदेड. | दि.१४/०७/२०११तेदि.१६/०७/२०११ |
| १६ | ह.भ.प.माधव तु.आजेगांवकर,परभणी | दि ०२/०७/२०१२तेदि.०४/०७/२०१२ |
| १७ | ह.भ.प .गंगाधर नरहर व्यासडोंबिवली )पूर्व (जिल्हा-ठाणे | दि.२१/०७/२०१३तेदि.२३/०७/२०१३ |
| १८ | ह.भ.प .माधवराव तुकारामपंत आजेगावकर, परभणी | दि.११/०७/२०१४ ते दि.१३/०७/२०१४ |
| १९ | ह.भ.प .माधवराव तुकारामपंत आजेगावकर, परभणी | दि.३०/०७/२०१५ ते दि.०१/०८/२०१५ |
| २० | ह.भ.प .माधवराव तुकारामपंत आजेगावकर, परभणी | दि.१८/०७/२०१६ ते दि . २०/०७/२०१६ |
| २१ | ह.भ.प.सौ.अंजली श्रीकृष्ण जोशी, डोंबिवली | दि. ०८/०७/२०१७ ते दि.१०/०७/२०१७ |

श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१७ मध्ये केलेल्या कीर्तनकारास तीन दिवसाची एकत्रीत बिदागी/मानधन ११,००१/- देण्यात आले होते.

**विभागाचा अभिप्राय:** ह.भ.प .चारुदत्त गोविंदस्वामी आफळे हे राष्ट्रीय स्तरावरील महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकार असून, त्यांनी स्वतःहून साईबाबांच्या दरबारात गुरुपौर्णिमा उत्सवात दि.२६,२७,२८ जुलै २०१८ असे तीन दिवस कीर्तन सेवा करण्याची इच्छा प्रकट केली आहे. शताब्दी वर्षात येणा-या गुरुपौर्णिमा, पुण्यतिथी या उत्सवात नेहमीप्रमाणे सर्वसाधारण कीर्तनकारांची कीर्तने ठेवणेऐवजी प्रसिद्ध नामवंत किर्तनकाराचे कीर्तन ठेवल्यास शताब्दी वर्षात साईभक्तांना कीर्तनातून एक वेगळया प्रकाराचे प्रबोधन होऊ शकेल. ह.भ.प . चारुदत्त गो. आफळे नामवंत कीर्तनकार यांनी तीन दिवसांचे किर्तन सेवांसाठी साथीदारांसह रु.५१,०००/- मानधनाची रक्कम कळविलेली आहे.

संस्थानमार्फत उत्सवात होणारी कीर्तने ही पूर्वी श्रींचे समोर समाधी मंदिरात होत असत. परंतु दर्शन रांगेचे नियंत्रण आणि सर्वांनाकीर्तनाच्या श्रवणाचा लाभ घेता यावा, या उद्देशाने सन २०१० पासून मंदिराचे उत्तर बाजूकडील मोकळया जागेवर स्वतंत्र मंचाची उभारणी करुन कीर्तन सेवेचा कार्यक्रम आयोजित केला जातो. मंच उभारणी व अन्य व्यवस्थेची मान्यता संबंधीत विभांगाकडून प्रथेप्रमाणे घेण्यात येते. तसेच संस्थानतर्फे जेव्हापासून निरनिराळे उत्सव सादर केले जातात, तेव्हापासून त्या-त्या उत्सवात किर्तन सेवा करणा-या कीर्तनकारांची मोफत निवास, भोजन, चहा, पाणी, नाश्ता, दर्शन इ. सर्व व्यवस्था संस्थानतर्फे निशुल्क केली जाते.

तथापि श्री गुरुपौर्णिमा उत्सवात ह.भ.प .चारुदत्त गोविंदस्वामी आफळे महाराज यांचे कीर्तन ठेवावयाचे असल्यास उपरोक्त नमूद मानधना व्यतिरिक्त खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| | | |
|---|---|---|
| (१) निवास- साईआश्रम २ रुम्स x रु.२००/- = रु.४००/- x ४ दिवस (४ व्यक्ती) = | | रु.१,६००/- |
| (२) भोजन- सध्या मोफत प्रसादभोजन सुरु असल्याने भोजनखर्च होणार नाही. | | रु. -- |
| (३) चहा, पाणी- | ४ व्यक्ति x रु. २/- x २ वेळा x ४ दिवस = | रु. ६४/- |
| (४) नाश्ता- | ४ व्यक्ति x रु. ५/- x १ वेळा x ३ दिवस = | रु. ६०/- |
| (५) दर्शन - उत्सवात कार्यक्रमासाठी आलेल्या कलाकारांची तसेचकीर्तनकारांची दर्शनाची व्यवस्था वरील व्यवस्थेसोबत करण्याचीपूर्वापार प्रथा आहे. किंबहुना बहुतांशी कीर्तनकार श्रींचे दर्शन घेऊनच कीर्तनास सुरुवात करतात. | | रु. -- |

-----------------------------
रु. १,७२४/-
----------------------------

श्री गुरुपौर्णिमा उत्सवात ह.भ.प .चारुदत्त गोविंदस्वामी आफळे महाराज यांचे कीर्तन ठेवावयाचे असल्यास खालील बाबींवर निर्णय होणे आवश्यक आहे.

१) प्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प .चारुदत्त गो. आफळे महाराज यांचे कीर्तन ठेवणेबाबत.

२) कीर्तनकार ह.भ.प. चारुदत्त गो. आफळे महाराज यांचे मानधनाबाबत.

३) कीर्तनकार ह.भ.प .चारुदत्त गो. आफळे महाराज व त्यांचे बरोबर असलेले साथीदारांची मोफत निवास/ प्रसादभोजन, चहापाणी, नास्ता, दर्शन व्यवस्था आदि बाबींसाठी येणा-या रक्कम रु.१,७२४/- मात्रचे खर्चाबाबत.

तरी सदरचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१५५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीगुरुपौर्णिमा उत्सवामध्ये प्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प .चारुदत्त गो. आफळे महाराज यांना एकत्रित रु.५१,०००/- मात्र मानधन देण्यात येऊन, त्यांचे कीर्तनाचा कार्यक्रम आयोजित करणेत यावा, अस ठरले. तसेच ह.भ.प. चारुदत्त गो.आफळे महाराज व त्यांचे बरोबर असलेले साथीदारांची निवास/ प्रसादभोजन, चहा, पाणी, नास्ता, दर्शन व्यवस्था संस्थानमार्फत मोफत करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१,७२४/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

विषय नं.१८ **श्रीरामनवमी उत्सव २०१८ मध्ये दि.१४ मार्च, २०१८ रोजी आयोजित केलेल्या श्री.नितिन मुकेश, मुंबई यांचे “ऑर्केस्टा” कार्यक्रमासाठी संस्थानमार्फत करावयाच्या व्यवस्थेबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद :-**

१. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये,राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील.

२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

३. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम २(ठ) अन्वये, श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण यांबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील.

**मा.व्यवस्थापन समितीच्या सभेतील निर्णय :-**

मा. व्यवस्थापन समितीचे दि.०२/०२/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.८०

**प्रस्तावना**:- श्री साईबाबा यांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर २०१८ रोजी (विजयादशमी) १०० वर्षे पूर्ण होत आहेत. श्री साईबाबा संस्थानच्यावतीने दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर २०१८ हा कालावधी श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष म्हणून साजरा करीत आहे. यासाठी शताब्दीचे संपूर्ण वर्षभरात वेगवेगळ्या धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक व प्रबोधनपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. जेणेकरुन संपूर्ण वर्षभरात शिर्डीमध्ये भक्तीमय वातावरण राहून श्री साईबाबा समाधी शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल यादृष्टीने कामकाज चालू आहे. यास अनुसरुन मा.व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार दि.०१/१०/२०१७ ते दि.२४/०२/२०१८ अखेरपर्यंत विविध प्रकारचे धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे यशस्वीपणे आयोजन करण्यात आलेले आहे.

**प्रस्ताव**:- श्रीरामनवमी उत्सव २०१८ मध्ये दि.२४/०३/२०१८ ते दि.२६/०३/२०१८ या कालावधीत आयोजित करावयाच्या सांस्कृतिक कार्यक्रमांसाठीचे कलाकार व त्यांचे मानधन ठरविणेबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.०२/०२/२०१८ रोजीचे सभेत सादर करण्यात आला होता. यामध्ये निर्णय क्र.८० अन्वये दि.२४/०३/२०१८ रोजी श्रीरामनवमी उत्सवाचा प्रथम दिवस असल्याने, गर्दीची परिस्थिती पाहून समाधी मंदिर रात्रभर उघडे राहणार असल्यामुळे श्री.नितिन मुकेश, मुंबई यांच्या “ऑर्केस्ट्रा” या कार्यक्रमाची ऐनवेळी

निश्चिती करणेत आली. सदर कार्यक्रमासाठी श्री.नितिन मुकेश यांना मानधन व प्रवास खर्च असे एकुण रु.४,००,०००/- + जी.एस.टी. चे खर्चास मान्यता मिळाली आहे.

श्री.नितिन मुकेश यांचा कार्यक्रम निश्चित झाल्याने संस्थानचे ध्वनीक्षेपण विभागाने श्री.नितिन मुकेश यांचेशी साऊंड सिस्टीमविषयी चर्चा केली असता त्यांनी त्यांचे साऊंड इंजिनिअर यांचेशी संपर्क करण्यास सांगितले. त्यानुसार सस्थानचे ध्वनीक्षेपण विभागाने साऊंड इंजिनिअर श्री.प्रवीण कोळी यांचेशी संपर्क साधून माहिती घेतली असता सदरहू कार्यक्रमाच्या साऊंड सिस्टीमसाठी अतिरिक्त खर्च होणार असल्याची बाब निदर्शनास आली.

परंतु मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सदरहू कार्यक्रम निश्चित होत असतांना उपरोक्त निर्णयात नमूद केलेल्या रक्कमेत साऊंड सिस्टीमच्या खर्चाची रक्कमही अंतर्भूत आहे, अशी चर्चा झाल्याचे मा.उपजिल्हाधिकारी सो. यांनी समक्ष सांगितले आहे. तथापि, याचा उल्लेख इतिवृत्तात आलेला नाही.

त्यामुळे मा.उपजिल्हाधिकारी सो. यांनी सदरहू कार्यक्रम सुचविणारे मा.व्यवस्थापन समितीचे सदस्य मा.श्री.मोहन जयकर सो. यांचेशी संपर्क साधून माहिती घ्यावी असे निर्देश दिले. त्यानुसार मा.श्री.जयकर सो. यांचेशी संपर्क साधला असता त्यांनी श्री.नितिन मुकेश यांचे साऊंड इंजिनिअर यांचेशी संपर्क साधणेस सांगितले. त्यानुसार साऊंड इंजिनिअर श्री.प्रवीण कोळी यांचेशी संपर्क साधला असता त्यांनी ध्वनीक्षेपण विभागास कार्यक्रमासाठी आवश्यक असलेल्या साऊंड सिस्टीमचा तपशिल कळविला आहे असे सांगितले. त्यानुसार ध्वनीक्षेपण विभागाकडे विचारणा केली असता संस्थानकडून होणा-या अंदाजित अतिरिक्त खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे :-

<u>"ऑर्केस्ट्रा" कार्यक्रमासाठी संस्थानकडून होणारा अंदाजित अतिरिक्त खर्च</u> :-

| SR. NO. | DESCRIPTION | MAKE | MODEL | QTY | Approximate Amount Rs. |
|---|---|---|---|---|---|
| 01 | SUB'S & TOP'S | RCF/JBL | VMAX / STX / SRX | 8+8 | 50,000/- |
| 02 | 32 CHANNLE DIGITAL CONSOLE | BEHRINGER / SOUNDCRAFT | X32 / SI IMPACT | 1 | |
| 03 | SIDE FILL | RCF/JBL | V45 / SRX725 / STX 825 | 2 | |
| 04 | STAGE MONITORS | QSC/JBL | K12 / PRX 715 / VRX 915 | 8 | |
| 05 | DI BOX | BEHRINGER/ BSS | DI 800 | 1 | |
| 06 | CORDLESS | SHURE/ SENNIHZER | SM58 SLX /. EW 500 G3 | 2 | |
| 07 | VOX WIRE MIC | SHURE/AKG | SM 58 / D7 | 15 | |
| 08 | INSTRUMENT MIC | SHURE/SAMSON | SM 57 / CO2 | 5 | |
| 09 | DRUM MIC KIT | AKG | ---- | 1 | |
| 10 | MIC STAND BIG | GS | ----- | 8 | |
| 11 | MIC STAND SMALL | GS | ------ | 12 | |
| 12 | KEYBOARD STAND | -- | ------ | 2 | |
| 13 | LYRICS STAND | -- | ----- | 1 | |
| 14 | G00SENECK MIC | SHURE | ----- | 2 | |
| | | | | Total :- | 50,000/- |
| | | | | GST (18%) | 9,000/- |
| | | | | Total Amount Rs. | **59,000/-** |

उपरोक्त सर्व खर्च विचारात घेता, मा.व्यवस्थापन समितीने दि.०२/०२/२०१८ रोजीचे सभेत निर्णय क्र.८० अन्वये मान्य केलेल्या खर्चापेक्षा (मानधन व प्रवास खर्च रु.४,००,०००/- + जी.एस.टी.) साऊंड सिस्टीम करिता एक दिवसाचे भाडयापोटी अतिरिक्त रक्कम रु.५९,०००/- इतका खर्च संस्थानला करावा लागणार आहे.

तरी श्री.नितिन मुकेश, मुंबई यांच्या "ऑर्केस्ट्रा" कार्यक्रमासाठी साऊंड सिस्टीमकरिता अतिरिक्त रक्कम रु.५९,०००/- मात्रचे खर्चाबाबत निर्णय होणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

निर्णय क्र.१५६ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीरामनवमी उत्सव- २०१८ मध्ये दि.१४ मार्च, २०१८ रोजी आयोजित केलेल्या श्री.नितिन मुकेश, मुंबई यांच्या "साईभजन संध्या" कार्यक्रमाचे साऊंड सिस्टीमकरिता अतिरिक्त येणाऱ्या रक्कम रु.५९,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.

यावेळी अशीही चर्चा झाली की, श्रीरामनवमी उत्सव- २०१८ मधील सर्व कार्यक्रम जुने प्रसादालय परिसरामध्ये आयोजित करण्यात आलेले असल्यामुळे, त्याठिकाणी तात्पुरते स्टेज, लाईट, साऊंड इ. व्यवस्था करणेत यावी व यासाठी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख/ कार्यकारी अभियंता, बांधकाम)

---

विषय नं.१९ श्री साईबाबा मंदिर परिसरातील फ्लोअरींगचे नुतनीकरण (दुसरा टप्पा) करणेसाठीचे कामाचे ठेकेदार आर.के. सावंत यांचे मुदतवाढ मागणीबाबत.

प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम 2004 मधील तरतुद:

अधिनियमाचे कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनासाठी करणेबाबत तरतूद आहे. त्यातील पोट कलम (क) अन्वये", मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनासाठी करण्यात येईल अशी तरतूद आहे.

**मा. व्यवस्थापन समिती निर्णय: -**

१. मा.व्यवस्थापन समितीचे दि.२२/१२/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.९०५.

२. मा.व्यवस्थापन समितीचे दि.२३-२४/०५/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३६१.

३. मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५/०७/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्र.६६०.

**प्रस्तावना:-** श्री साईबाबा मंदिर परिसराचे नूतनीकरण सन १९९९ मध्ये करण्यात आले आहे. त्यावेळी मंदिर परिसरात रफ शहाबाद फरशी बसविण्यात आलेली आहे. सदर फ्लोअरींगचे नूतनीकरण होवून १७ वर्षे झालेली आहे. सततचे वापराने सदर सदर रफ शहाबाद फ्लोअरींग ब-याच ठिकाणी खराब झालेले असल्याने समाधी मंदिराचे उत्तरेकडील व पश्चिमेकडील काही भागात ग्रेनाईट + व्हाईट इंजि. आर्टीफीशियल टाईल्स बसविणे प्रस्तावीत करणेत आले होते. याकामी मा. व्यवस्थापन समितीचे दि.२२/१२/२०१६ रोजीचे निर्णय क्र.९०५ अन्वये ई– निविदा प्रक्रिया राबविण्यात आली.

याकामी प्राप्त ०३ ई– निविदांचे वाणिज्यीक देकार दि.०६/०५/२०१७ रोजीचे मा. खरेदी समितीचे सभेत उघडणेत येवून त्यावर मा. व्यवस्थापन समितीचे दि.२३-२४/०५/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्र.३६१ अन्वये खालीलप्रमाणे समंत झालेला आहे.

"... यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे श्री समाधी मंदिर परिसरात २९७५ चौ.मी. जागेत ग्रेनाईट फ्लोअरींग व व्हाईट मायक्रोक्रिस्टल इंजि. टाईल्स बसविणेकामी राबविणेत आलेल्या ई- निविदा प्रक्रियेमधील निम्नतम दरधारक आर.के. सांवत, नाशिक यांचे एकत्रित रु.७४,८२,०००/- मात्र दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले. तसेच मंदिर परिसरातील उर्वरीत ६,९७० चौ.मी. जागेतही ग्रेनाईट फ्लोअरींग बसविणेकामी विहीत पध्दतीने ई– निविदा प्रक्रिया राबविणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली."

उपरोक्त निर्णयानुसार ठेकेदार आर.के.सावंत, नाशिक यांना इकडील जा.क्र.एसएसएसटी/ बांधकाम-११०४/ २०१७, दि.०२/०६/२०१७ रोजी श्री साईसमाधी मंदिर परिसरातील २९७५ चौ. मी. जागेत ग्रेनाईट फ्लोअरींग व व्हाईट मायक्रोक्रिसटल इंजि. टाईल्स बसविणेकामी रु.७४,८२,०००/- मात्र इतक्या रक्कमेचा कार्यादेश देणत आला होता व त्यानुसार ठेकेदार यांनी पहिल्या टप्यातील काम पूर्ण केले आहे.

तसेच सदर निर्णयानुसार (दुसरा टप्पा) उर्वरीत ६९७० चौ.मी. जागेत ग्रेनाईट फ्लोअरींग व व्हाईट मायक्रोक्रिस्टल इंजि. टाईल्स बसविणेकामी इकडील विभागामार्फत दि.०५/०६/२०१७ रोजीचे टिपणी अन्वये वृत्तपत्रात व संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन ई- निविदा मागविणेत आल्या होत्या.

याकामी प्राप्त ०३ ई– निविदांचे वाणिज्यीक देकार दि.२५/०७/२०१७ रोजीचे सभेत उघडणेत येवून त्यावर मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५/०७/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्र.६६० अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

उपरोक्त निर्णयानुसार श्री साईबाबा समाधी मंदिर परिसरतील फ्लोअरींगचे नूतनीकरणाचे दुस-या टप्प्याचे कामासाठी ठेकेदार श्री.आर.के.सावंत, नाशिक यांना यांना इकडील जा.नं.२७५६/२०१७, दि.१९/०८/२०१७ अन्वये कार्यादेश देण्यात आला आहे.

सदरहू कामाचा तपशिल व सद्यस्थिती खालील प्रमाणे–

| | | |
|---|---|---|
| १. | कामाचे नांव | श्री साईबाबा समाधी मंदिर परिसरतील फ्लोअरींगचे नूतनीकरणाचे काम करणे. (दुसरा टप्पा) |
| २. | ठेकेदार | आर.के. सांवत, नाशिक |
| 3. | मंजूर निविदा रक्कम | रु.२,७५,००,०००/- |
| ४. | कार्यादेश क्र. व दिनांक | जा.नं.२७५६/२०१७ दि.१९/०८/२०१७ |
| ५. | करारनाम्यानुसार काम सुरु करण्याचा दिनांक | दि.२१/०८/२०१७ |
| ६. | काम पूर्ण करण्याचा कालावधी व दिनांक | ०५ महिने ( दि.२०/०१/२०१८ अखेर) |
| ७. | कामाची सद्यस्थिती | १. गेट नं.०१ व ०५ जवळ फ्लोरींगचे काम प्रगतीत आहे.<br>२. मंदिराचे उत्तरेकडील सभाकुंडाचे ठिकाणी फ्लोरींगचे काम प्रगतीत आहे.<br>३. ग्रेनाईट पॉलीशींग व लेदर फीनीशींगचे काम प्रगतीत.<br>४. लेंडीबागेतील दिपस्तंभाजवळील काम प्रगतीत आहे.<br>५. जवळपास– ९०% काम पूर्ण झाले आहे. |

**प्रस्ताव:-** ठेकेदार यांचा करारनाम्यानुसार काम करण्याचा कालावधी पाच महिने दि.२१/०८/२०१७ ते २०/०१/२०१८ अखेर असा होता. सदरचे मुदतीत ठेकेदार यांनी ९०% काम पूर्ण केले आहे. ठेकेदार यांनी उर्वरीत काम पूर्ण करणेसाठी दि.१८/०१/२०१८ रोजीचे पत्रान्वये खालील १ ते ७ मुद्दे व अडचणी नमूद करुन ०१ महिना मुदतवाढ मिळणेची विनंती केली आहे.

1. Hon. President of India Visit on 1st October 2017.
2. Visit of Hon.Vice President of India on 23rd December 2017.
3. Connected Christmas Holidays & Insruction to for Work Stoppage during the Christmas & New year period.
4. Deepmal Area Lendi Baug – No Handover of site due to Construction of Deepmal by other agency in the area.
5. Well Area Lendi Baug – No Handover of site due to Construction of Dome to well by other agency.
6. Amphi theather – Due to the Hugh Rush due to festival season and various dignetary visits this area could not be proceded as it being semi finished during prime period was not acceptable.
7. Gate No.1 Near PRO – Due to the Huge Rush due to festival season it was heavily barricaded so working there was not possible.
8. 26th January Connecting Holiday – In the month of January 2018 from Govt. holiday of 26th January onwards connecting weekend was there hence there was huge rush and we could not able to work during that period.
9. Unavailability of Natural Sand: From the second week of January there was huge scarcity of natural sand all around Shirdi area. Hence it was unavaliable for the day to day works of flooring. This is big issue & which is not in control of us. Work was affected more than 20 days due to that.

साईभक्तांचे गर्दीचे कालावधीत तसेच मा. राष्ट्रपती महोदय मा. उप राष्ट्रपती महोदय यांचे दौ-यांचे कालावधीत तसेच नाताळ व नविन वर्षानिमित्त होणा-या गर्दीमुळे सदर काम बंद ठेवावे लागले होते. त्यामुळे ठेकेदार यांना दिलेल्या मुदतीत फ्लोअरींगचे काम पूर्ण करता आलेले नाही. ठेकेदार यांनी सदर काम करणेसाठी

आणखी एक महिन्याची मुदतवाढ मिळावी अशी विनंती केली आहे. तरी सदरकामी ठेकेदार यांना एक महिन्याची दि.०५/०३/२०१८ अखेर पर्यंत मुदतवाढ देता येईल असे मत आहे.

तरी ठेकेदार यांच्या विनंती नुसार त्यांना दि.०५/०३/२०१८ पर्यंत मूदत वाढीबाबतचे प्रस्तावास मान्यता मिळणेस सविनय सादर.

निर्णय क्र.१५७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा मंदिर परिसरातील फ्लोअरींगचे नुतनीकरण (दुसरा टप्पा) करणे कामाचे ठेकेदार आर.के. सावंत यांचे काम अंतीम टप्प्यामध्ये असल्यामुळे, त्यांना सदरहू काम पुर्ण करणेकरीता माहे मार्च, २०१८ अखेर पर्यंत मुदतवाढ देण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

विषय नं.२० **संस्थानचे शैक्षणिक संकुलातील इमारतींना बाहेरील बाजूने रंगकाम करणेबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूदः-** अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये "मंदिराच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे" या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

**प्रस्तावनाः** श्री साईबाबा संस्थानचे शैक्षणिक संकुलातील इंग्लिश मिडीयम स्कुल, कन्या विद्या मंदिर, औद्योगिक प्रशिक्षण संस्था व वर्कशॉप या सर्व इमारती असून या इमारतींचे बाहेरील भागाचे रंगकाम करुन सुमारे पाच वर्ष झालेली आहेत. सदरहू इमारतीमध्ये विद्यार्थ्यांची असलेली वर्दळ तसेच पावसाचे पाणी व उन्हामुळे या इमारतीचे बाहेरील रंगकाम खराब झालेले आहे. यापुर्वी या इमारतींना सिमेंट पेंन्ट देणेत आलेला आहे. तथापि सिमेंट पेन्ट ४ ते ५ वर्षात खराब होतो. सिमेंट पेंन्ट पेक्षा वेदर शिल्ड पेंन्टवर वातावरणाचा परिमाण लवकर होत नाही. त्यामुळे सदरचे रंगकाम जास्त कालावधीकरीता टिकतो तसेच आकर्षक व उठावदार दिसतो. त्यामुळे वेदर शिल्ड पेन्ट देणे उचित होईल असे मत आहे. याकामी खालील प्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.नं. | इमारतीचे नांव | परिमाण/एकक | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | संस्थानचे शैक्षणिक संकुलातील इंग्लिश मिडीयम स्कुल, कन्या विद्या मंदिर, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, वर्कशॉप व संरक्षण भिंतीस बाहेरील बाजूने रंगकाम करणे. जुना रंग घासून साफसफाई करुन दोन कोट exterior wheather shield पेंट व एक कोट प्रायमरसह रंगकाम करणे. | १८४०४.०० चौ.मी. | १९२.०० | ३५,३३,५६८.०० |
| | | | एकूण | ३५,३३,५६८.०० |
| | | | + 5 % contengency | १,७६,६७८.०० |
| | | | **एकूण रक्कम -** | ३७,१०,२४६.०० |
| | | | + 18% GST | ६,६७,८४४.०० |
| | | | **एकूण रक्कम -** | ४३,७८,०९०.०० |

**प्रस्तावः-** संस्थानचे शैक्षणिक संकुलातील सर्व इमारतींना बाहेरील बाजुने रंगकाम करणेसाठी सन २०१७-१८ चे State Sehedule of Rate नुसार अंदाजपत्रक तयार केले असून रु. ४३,७८,०९०.०० मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. दि.०२/०२/२०१८ रोजी मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र. १२९ अन्वये अंदाजपत्रकीय रकमेत २०% कपात करुन B-2 म्हणजे Item Rate पध्दतीने यापुढे ई-निविदा मागवाव्यात, असे ठरले. त्यानुसार शैक्षणिक संकुलातील इमारतींचे बाहेरील रंगकामासाठी अंदाजपत्रकीय रकमेतून २०% कपात करुन रु.३५,०२४,७२ मात्र इतक्या रकमेची ई-निविदा मागविता येईल.

तरी शैक्षणिक संकुल इमारतींचे बाहेरील रंगकाम करणेसाठी ई-निविदा प्रक्रिया मागवून करुन घेणेस व त्याकामी येणारे खर्चास सदरचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.१५८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे शैक्षणिक संकुलामधील इमारतींचे बाहेरील बाजूने रंगकाम करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.३५,०२४,७२/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच समाधी शताब्दी महोत्सवानिमित्ताने संस्थान मालकीच्या नवीन रंगकाम झालेल्या इमारती वगळता इतर सर्व इमारतींचे रंगकाम करणे व क्लॅडींग (Cladding) करणे अशा दोन्ही प्रकारचे अंदाजपत्रक चर्चेसाठी सभेसमोर सादर करावे, असे ठरले.** (कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग)

---

विषय नं.२१ **श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव २०१७-१८ मधील उत्सव व सुट्टयांच्या कालावधीत शिर्डी येथे येणारे साईभक्तांचे तात्पुरत्या निवास व्यवस्था तसेच सांस्कृतीक कार्यक्रमाकरीता संस्थान परिसरात मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था उभारणीकामी येणाऱ्या वार्षिक खर्चाबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम,२००४ मधिल तरतूदः-**

अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट- कलम (१) च्या खंड (ख) अन्वये "रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पुजा- अर्चा, समारंभ व उत्सव आयोजीत करणे व पार पाडणे" या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

तसेच अधिनियमाच्या पोट कलम (१) च्या खंड (ग) अन्वये "भक्तांना मंदिरात देवेतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी सुविधा पुरविणे" या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

**प्रस्तावनाः-** संस्थान मार्फत वर्षभरात साजरे करणेत येणारे उत्सव तसेच दिपावली, नाताळ, उन्हाळा, पावसाळयाचे कालावधीत, तसेच संस्थान मार्फत वेळोवेळी आयोजित विविध कार्यक्रमाचे वेळी मंडप व्यवस्था केली जाते. याकामी ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप, बॅरेकेडींग, स्टेज, कनात, कमानी इ. अनुषंगीक व्यवस्था करणेत येते. सदर व्यवस्था करणेकामी येणारे रक्कम रु.४३.५२ लक्ष मात्र खर्चास दि.२०/०८/२०१७ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेत मान्यता घेण्यात आली आहे. सदरहु व्यवस्था पावसाळा व उन्हाळाचा कालावधी विचारात घेता ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप उभारणेसाठी ई-निविदा मागविणेत येऊन ठेकेदार यांना कार्यादेश देण्यात आलेला आहे. संस्थानमार्फत समाधी शताब्दी महोत्सव २०१७-१८ या कालावधीत साजरा करणेत येत असुन सांस्कृतिक कार्यक्रमासाठी तसेच गर्दीचे कालावधीत तातडीने कापडी मंडपाची आवश्यकता भासते. ताडपत्रीचे छत असलेले मंडप उभारणेस जादा कालावधी लागतो व ताडपत्री विरहीत कापडी मंडप तातडीने उभारता येतात.

श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव २०१७- १८ मधील उत्सव व सुट्टयांच्या कालावधीत साईभक्तांची गर्दी होणार असल्याने साईभक्तांचे तात्पुरत्या निवास व्यवस्थेसाठी तसेच सांस्कृतिक कार्यक्रमाकरीता संस्थान परिसरात मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करावी लागेल. तसेच ऐनवेळी आयोजित करणेत येणारे कार्यक्रमासाठी मंडप व्यवस्था करावी लागेल. त्यासाठी बांबु बल्ल्या/ एम एस पाईपचे स्ट्रक्चर असलेले कापडी मंडप उभारणेसाठी खालील प्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

साई आश्रम (२०० x ६०), साईबाबा भक्तनिवासस्थान (३२०x४५), साईधर्मशाळा (१८०x३५, १००x६०, १००x४५) व जुने प्रसादालय परिसर येथे (२००x१०० चे २ मंडप) अशा प्रकारे एकुण ९४९३५ चौ.फुट मंडप साईभक्तांचे तात्पुरते निवास व्यवस्थेसाठी उभारता येतील. तसेच सांस्कृतिक कार्यक्रमाकरीता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी (एम.एस. पाईप, कैच्या/ बांबु बल्यांचे स्ट्रक्चर सुशोभित काडप असलेले मंडप उभारणे.)

**अ) ०१ दिवसासाठी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था**

| **अ.नं.** | **मंडपाचा तपशिल** | **परिमाण** | **कालावधी** | **दर** | **रक्कम** |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | एम.एस. पाईप, कैच्या/ बांबु बल्यांचे स्ट्रक्चर सुशोभित काडप असलेले मंडप उभारणे. | ९४९३५.०० चौ. फुट | ०१ दिवस | १.०० प्र.चौ. फुट प्र. दिवस | ९४,९३५.०० |
| ०२ | बिछायत (सिंथेटीक मॅटीन) | ९४९३५.०० चौ. फुट | ०१ दिवस | ०.३५ प्र.चौ. फुट प्र. दिवस | ३३,२२७.२५ |
| ०३ | कनात | ३०५५ र. फुट | ०१ दिवस | ५.०० प्र.र. फुट प्र. दिवस | १५,२७५.०० |
| ०४ | बाथरुम व मुतारीसाठी पत्राचे पार्टीशन करणे. | ४५० र. फुट | ०१ दिवस | ७.५० प्र.र. फुट प्र. दिवस | ३,३७५.०० |
| | | | | **एकूण रक्कम रु (अ)** | **१,४६,८१२.००** |

ब) ०३ दिवसासाठी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था

| अ.नं. | मंडपाचा तपशिल | परिमाण | कालावधी | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | एम.एस. पाईप, कैच्या/ बांबु बल्यांचे स्ट्रक्चर सुशोभित काडप असलेले मंडप उभारणे. | ९४९३५.०० चौ. फुट | ०३ दिवस | ०.६० प्र.चौ. फुट प्र. दिवस | १,७०,८८३.०० |
| ०२ | बिछायत (सिंथेटीक मॅटीन) | ९४९३५.०० चौ. फुट | ०३ दिवस | ०.३० प्र.चौ. फुट प्र. दिवस | ८५,४४१.५० |
| ०३ | कनात | ३०५५ र. फुट | ०३ दिवस | ४.०० प्र.र. फुट प्र. दिवस | ३६,६६०.०० |
| ०४ | बाथरुम व मुतारीसाठी पत्राचे पार्टीशन करणे. | ४५० र. फुट | ०३ दिवस | ६.०० प्र.र. फुट प्र. दिवस | ८,१००.०० |
| | | | | **एकूण रक्कम रु (ब)** | **३,०१,०८४.५०** |

क) ०७ दिवसासाठी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था

| अ.नं. | मंडपाचा तपशिल | परिमाण | कालावधी | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | एम.एस. पाईप, कैच्या/ बांबु बल्यांचे स्ट्रक्चर सुशोभित काडप असलेले मंडप उभारणे. | ९४९३५.०० चौ. फुट | ०७ दिवस | ०.५० प्र.चौ. फुट प्र. दिवस | ३,३२,२७२.५० |
| ०२ | बिछायत (सिंथेटीक मॅटीन) | ९४९३५.०० चौ. फुट | ०७ दिवस | ०.२० प्र.चौ. फुट प्र. दिवस | १,३२,९०९.०० |
| ०३ | कनात | ३०५५ र. फुट | ०७ दिवस | २.५० प्र.र. फुट प्र. दिवस | ५३,४६२.५० |
| ०४ | बाथरुम व मुतारीसाठी पत्राचे पार्टीशन करणे. | ४५० र. फुट | ०७ दिवस | ३.७५ प्र.र. फुट प्र. दिवस | ११,८१२.५० |
| | | | | **एकूण रक्कम रु (क)** | **५,३०,४५६.५०** |

ड) १० दिवसासाठी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था

| अ.नं. | मंडपाचा तपशिल | परिमाण | कालावधी | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | एम.एस. पाईप, कैच्या / बांबु बल्यांचे स्ट्रक्चर सुशोभित काडप असलेले मंडप उभारणे. | ९४९३५.०० चौ. फुट | १० दिवस | ०.४० प्र.चौ. फुट प्र. दिवस | ३,७९,७४०.०० |
| ०२ | बिछायत (सिंथेटीक मॅटीन) | ९४९३५.०० चौ. फुट | १० दिवस | ०.१५ प्र.चौ. फुट प्र. दिवस | १,४२,४०२.०० |
| ०३ | कनात | ३०५५ र. फुट | १० दिवस | २.२५ प्र.र. फुट प्र. दिवस | ६८,७३७.५० |
| ०४ | बाथरुम व मुतारीसाठी पत्राचे पार्टीशन करणे. | ४५० र. फुट | १० दिवस | ३.५० प्र.र. फुट प्र. दिवस | १५,७५०.०० |
| | | | | **एकूण रक्कम रु. (ड)** | **६,०६,६२९.५०** |

इ) १५ दिवसासाठी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था

| अ.नं. | मंडपाचा तपशिल | परिमाण | कालावधी | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | एम.एस. पाईप, कैच्या / बांबु बल्यांचे स्ट्रक्चर सुशोभित काडप असलेले मंडप उभारणे. | ९४९३५.०० चौ. फुट | १५ दिवस | ०.३० प्र.चौ. फुट प्र. दिवस | ४,२७,२०७.५० |
| ०२ | बिछायत (सिंथेटीक मॅटीन) | ९४९३५.०० चौ. फुट | १५ दिवस | ०.१० प्र.चौ. फुट प्र. दिवस | १,४२,४०२.३ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ०३ | कनात | ३०५५ र. फुट | १५ दिवस | २.०० प्र.र. फुट प्र. दिवस | ९१,६५०.०० |
| ०४ | बाथरुम व मुतारीसाठी पत्राचे पार्टीशन करणे. | ४५० र. फुट | १५ दिवस | ३.२५ प्र.र. फुट प्र. दिवस | २१,९३७.५० |
| | | | | **एकूण रक्कम रु. (इ)** | **६,८३,१९७.३०** |

**ई) २५ दिवसासाठी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था**

| अ.नं. | मंडपाचा तपशिल | परिमाण | कालावधी | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | एम.एस. पाईप, कैच्या/ बांबु बल्यांचे स्ट्रक्चर सुशोभित काडप असलेले मंडप उभारणे. | ९४९३५.०० चौ. फुट | २५ दिवस | ०.२० प्र.चौ. फुट प्र. दिवस | ४,७४,६७५.०० |
| ०२ | बिछायत (सिंथेटीक मॅटीन) | ९४९३५.०० चौ. फुट | २५ दिवस | ०.१० प्र.चौ. फुट प्र. दिवस | २,३७,३३७.५० |
| ०३ | कनात | ३०५५ र. फुट | २५ दिवस | १.८० प्र.र. फुट प्र. दिवस | १,३७,४७५.०० |
| ०४ | बाथरुम व मुतारीसाठी पत्राचे पार्टीशन करणे. | ४५० र. फुट | २५ दिवस | ३.०० प्र.र. फुट प्र. दिवस | ३३,७५०.०० |
| | | | | **एकूण रक्कम (ई)** | **८,८३,२३७.५०** |

उपरोक्त प्रमाणे श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव २०१७- १८ मधील उत्सव व सुट्टयांच्या कालावधीत साईभक्तांची गर्दी होणार असल्याने साई आश्रम, साईबाबा भक्तनिवासस्थान, साईधर्मशाळा व जुने प्रसादालय येथे साईभक्तांचे निवास व्यवस्था तसेच सास्कृतिक कार्यक्रमाकरीता मंडप व्यवस्था करणेकामी खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे–

| अ.नं. | मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्थेचा कालावधी | अपेक्षित खर्च रु. |
|---|---|---|
| अ) | ०१ दिवसासाठी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणे. | १,४६,८१२.०० |
| ब) | ०३ दिवसासाठी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणे. | ३,०१,०८५.०० |
| क) | ०७ दिवसासाठी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणे. | ५,३०,४५७.०० |
| ड) | १० दिवसासाठी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणे. | ६,०६,६३०.०० |
| इ) | १५ दिवसासाठी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणे. | ६,८३,१९७.०० |
| ई) | २५ दिवसासाठी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणे. | ८,८३,२३७.०० |

**प्रस्तावः-** वर नमूद केलेप्रमाणे श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव २०१७- १८ मधील उत्सव व सुट्टयांच्या कालावधीत तसेच ऐनवेळी आयोजित करावयाचे कार्यक्रमासाठी साईभक्तांची गर्दी होणार असल्याने साई आश्रम, साईबाबा भक्तनिवासस्थान, साईधर्मशाळा व जुने प्रसादालय येथे साईभक्तांचे निवास व्यवस्था तसेच सास्कृतिक कार्यक्रमाकरीता मंडप व्यवस्था करणेकामी वरील तपशिलात नमूद केलेप्रमाणे खर्च अपेक्षित आहे. याकामी वर्षभरातील १, ३, ७, १०, १५ व २५ दिवस या कालावधीकरीता दर मागविणेकामी ई – निविदा मागविता येतील.

तरी उपरोक्त व्यवस्था करणेकामी येणा-या खर्चास व याकामी ई– निविदा मागविणेस निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१५९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव २०१७-१८ मधील उत्सव व सुट्टयांच्या कालावधीत शिर्डी येथे येणाऱ्या साईभक्तांची तात्पुरत्या निवास व्यवस्था तसेच सांस्कृतीक कार्यक्रमाकरीता संस्थान परिसरात मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था उभारणीकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग)

---

**विषय नं.२२** **श्री साईबाबा मंदिर व परिसराचे श्री डी मॉडेल तयार करणेकामाचे सादरीकरणाबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) अधिनियम -२००४ मधिल तरतूद:-** अधिनियमाच्या कलम २१ मधील पोटकलम (१) च्या. खंड (क) अन्वये, मंदिराची व विश्वस्त मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी विश्वस्तव्यवस्थेचा निधी समितीकडून खर्च करण्याची तरतूद आहे.

**प्रस्तावना:-** श्री साईबाबा मंदिर व परिसरात अचनाक आपतकालीन परिस्थीती उद्भवल्यास त्या परीस्थीतीचा सामना करण्यासाठी सुरक्षेच्या दृष्टीकोनातून संभाव्य परिस्थीती योग्य पध्दतीने हताळण्या करिता श्री साईबाबा मंदिर व परिसरांचे थ्री डी मॉडेल ची आवश्यकता असल्याने दोन सेटअपमध्ये तयार करुन मिळणेबाबत शिर्डी पोलीस स्टेशन, शिर्डी यांनी त्यांचे दि.२२/०५/२०१७ रोजीचे पत्रान्वये कळविले होते. त्यानुसार श्री साईबाबा मंदिर व परिसराचे एकूण ०३ थ्री डी मॉडेल तयार करुन घेणेसाठी येणा-या खर्चास मान्यतेस्तव मा. व्यवस्थापन समितीचे दि. १५/०६/२०१७ रोजीचे सभेपुढे प्रस्ताव सादर करणेत आला होता. सदरहु सभेतील निर्णय क्र. ५०० अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

*"यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा मंदिर परिसराचे प्रस्तावातील पर्याय क्र.०२ प्रमाणे ०२ नग थ्रीडी मॉडेल तयार करुन घेण्यात यावे, असे ठरले. तसेच त्याकामी विहीत पध्दतीने ई-निविदांची मागणी करणेस व याकामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली. त्याचबरोबर श्रीसाईबाबा मंदिर परिसराचे संगणकीय प्रणालीमध्येही थ्रीडी मॉडेल तयार करुन घेण्यात यावे, असेही चर्चेअंती ठरले."*

सदरहू निर्णयानुसार याकामी विहीत पद्धतीने वर्तमान पत्रात व संस्थानचे संकेतस्थाळावर ई-निवीदा सुचना प्रसिद्ध करून ई- निविदा मागवीणेत आल्या आहेत. प्राप्त झालेल्या निवीदांचे वाणिज्यीक प्रस्तावांवर निर्णय होणेसाठी मा. व्यवस्थापन समितीचे दि.०२/०२/२०१८ रोजीचे सभेपुढे प्रस्ताव सादर करणेत आला होता. सदरहु सभेतील निर्णय क्र. ७६(०२) अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

*"प्रस्तावितकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतमदरधारक कमल मॉडेल्स प्रा.लि., नवी दिल्ली हे आजचे उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. चर्चेअंती त्यांनी मुळदरावर रु.५०,०००/- मात्र सुट देऊन, रु.८,९४,०००/- मात्र अंतीम दर देऊ केले.*

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीसाईबाबा मंदिर व परिसराचे 3D मॉडेल तयार करणेकामी कमल मॉडेल्स प्रा.लि., नवी दिल्ली यांचे रु.८,९४,०००/- मात्र अंतीम दर स्विकारणेत यावेत. परंतु कमल मॉडेल्स प्रा.लि., नवी दिल्ली यांचेकडून प्रथम प्रारुपआराखडयाचेसादरीकरणघेण्यातयेऊन, त्यास अंतीम स्वरुप देण्यात यावे व त्यानंतर कमल मॉडेल्स प्रा.लि., नवी दिल्ली यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली."

मा. व्यवस्थापन समितीचेउपरोक्त निर्णयानुसार ठेकेदार कमल मॉडेल्स प्रा.लि., नवी दिल्ली यांचेकडून प्रथम प्रारुप आराखडयाचे सादरीकरण घेण्यात येऊन, त्यास अंतीम स्वरुप देण्यात यावे, असे ठरले आहे.

तरी श्री साईबाबा मंदिर व परिसराचे थ्री डी मॉडेल तयार करणेकामाचे सादरीकरण पाहून त्यावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.१६०** **श्रीसाईबाबा मंदिर व परिसराचे तयार केलेल्या 3D मॉडेलचे सादरीकरण कमल मॉडेल्स प्रा.लि., नवी दिल्ली यांनी आजचे सभेसमोर सादर केले व सभेने विचारलेल्या प्रश्नांची समर्पक उत्तरे दिली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिर परिसराच्या पाचही महाद्वारांच्या आतील परिसराचे 3D मॉडेल तयार करणेकामी कमल मॉडेल्स प्रा.लि., नवी दिल्ली यांना मंजुर दराने कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग)

---

**विषय नं.२३** **संस्थानच्या वतीने गोशाळा तयार करणेकामी बगीचा, बांधकाम, विद्युत, पाणीपुरवठा विभाग यांचेमार्फत होणाऱ्या एकत्रित खर्चास तसेच गोशाळेसाठी आवश्यक कर्मचारी वर्गास मंजुरी मिळणेसाठी न्याय व विधी विभागाची मान्यता घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम2004मधील तरतूद- 21 (1)(ड) मधील श्री साईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे.

प्रास्ताविक- दि.30/11/2016 रोजीच्या मा. व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्रं. 859 अन्वये, संस्थानच्या वतीने गोशाळा सुरु करणेस मान्यता देण्यात आली. तसेच संस्थानच्या गोशाळेमध्ये गावरान गायांचा समावेश करण्यात यावा असे ठरले. त्यानुसार बांधकाम, विद्युत, पाणीपुरवठा विभागास पत्रव्यवहार करुन त्यांचेमार्फत गोशाळा सुरु करणेकामी होणाऱ्या एकुण खर्चाचा अहवाल मागविण्यात आलेला होता. बगीचा, बांधकाम, विद्युत, पाणीपुरवठा विभागाचा असा एकुण रु.2,28,66,306/- (दोन कोटी अठ्ठाविस लाख सहासष्ट

हजार तिनशे सहा) मात्र खर्चाच्या अंदाजपत्रकास मान्यता मिळणेकामी मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता.

दि.25/02/2017 रोजीच्या मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्रं.22 अन्वये, संस्थानच्या वतीने भारतीय वंशाच्या गायांची गोशाळा तयार करण्यात यावी. या गायांचा मुक्त गोठा करणेत यावा. या गोठ्याच्या भोवती भक्तांना प्रदक्षिणा करता येईल व गो सेवा करता येईल अशी व्यवस्था करावी. तसेच संस्थान मालकिच्या शक्य त्या जमिनींमध्ये गायींच्या चाऱ्याची व्यवस्था करावी. तसेच आवश्यकतेनुसार चारा विकत घेणेसाठी प्रस्ताव सादर करावा. या गायींच्या तपासणीसाठी सरकारी डॉक्टर्सची नियुक्ती करावी व गायींपासुन गो अर्काचे उत्पन्न घेण्यात यावे. असे समितीचे मत झाले. यासाठी गोशाळेची माहिती असलेले समिती सदस्य मा.श्री प्रताप भोसले यांना संस्थानच्या वतीने गोशाळा तयार करणेकामीचे अधिकार प्रदान करणेत आले.

समिती सदस्य मा.श्री प्रताप भोसले व कृषी सहाय्यक बगीचा विभाग यांनी परिसरातील गोशाळांचा आभ्यास करुन सविस्तर अहवाल व्यवस्थापन समितीसमोर सादर करावा असे ठरले.

त्यानुसार गोशाळेचे माहिती असलेले समिती सदस्य मा.श्री प्रताप भोसले यांचेशी दि.27/03/2017 रोजी मा.श्री प्रताप भोसले- विश्वस्त यांचेशी गोशाळा सुरु करणेसंदर्भात झालेल्या चर्चेअंती त्यांनी संस्थानच्या गोशाळेत गीर, गावरान गाय ऐवजी रेडसिंध्दी व कॉंक्रेज गायांचे पालन करणेकामी सुचविलेले आहे. त्यानुसार Gujrat livestock development board यांचेकडून कॉंक्रेज प्रजातीच्या व Uttarakhand livestock development board यांना रेडसिंधी प्रजातीच्या प्रथम वेताच्या गायी खरेदी करणेकामी गायींच्या उपलब्धतेबाबत माहीती मागविणेबाबत पत्रव्यवहार करणेत आलेला आहे.

मागणी– संस्थानमार्फत गोशाळा तयार करणेसाठी बगीचा, बांधकाम, पाणीपुरवठा व विद्युत विभागामार्फत होणाऱ्या खर्चाची खालीलप्रमाणे अंदाजपत्रकीय तरतुद आवश्यक आहे.

अ) बगीचा विभाग-

| अ.नं | तपशिल | एकुण | अंदाजे दर | | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०1 | गायी खरेदी | 100 गायी | रु.1,00,000/- प्रति गाय | रु.1 लाखापर्यंत (चांगल्या प्रतिची) | 1,00,00,000/- |
| ०2 | चारा खरेदी | दररोज हिरवा चारा-3 टन व वाळलेला चारा 1.5 टन | रु.3 प्रति किलो<br>रु. ३ प्रति किलो | रु.13,500/- रोजाप्रमाणे | 49,27,500/- (वार्षिक) |
| ०3 | औषधे | - | - | | 50,000/- |
| ०4 | खाद्य (पेंड) | व्यालेल्या व गाभण गायींसाठी | 23 प्रति किलो | रु.5,500/- रोजाप्रमाणे | 20,07,500/- (वार्षिक ) |
| ०5 | कर्मचारी खर्च (कंत्राटी) | एकुण50 कर्मचारी (3 शिफट मध्ये ) | रु.250/- रोजाप्रमाणे | | 45,62,500/- (वार्षिक् ) |
| ०6 | मशिनरी खरेदी | 1 गायी पिळणे -10 मशीन<br>2 दुध साठविणे –25 कॅन<br>3 कुटटीमशीन - 2 | रु 50,000/-<br>रु. 2,000प्रती<br>रु30,000 प्रती | 5,00,000/-<br><br>60,000/- | 5,00,000<br>50,000<br>60,000/- |
| | | | | एकुण खर्च | 2,21,57,500/- |

तसेच गोशाळेसाठी खालीलप्रमाणे कर्मचारी वर्गाची आवश्यकता आहे.

| अ.नं | पदनाम | संख्या | कामे |
|---|---|---|---|
| 1 | डॉक्टर ((B.V.S.C) | 2 | जनावरांची देखभाल करणे |
| 2 | लिपीक | 2 | आलेल्या मालाची आवकजावक नोंदी घेणे |
| 3 | सुपरवायझर | 4 | कर्मचा'याकडूनकामे करुन घेणे |
| 4 | कंत्राटी कर्मचारी | 50<br>3 शिफट | शेण काढणे, जनावरांना पाणी देणे, चारा घालणे, दररोज गाया पिळणे इ. कामासाठी |

ब) बांधकाम विभाग- संस्थानच्या वतीने गोशाळा सुरु करणेकामी सुमारे दोन एकर क्षेत्रात चेनलींक फेन्सींग करुन गोशाळेतील गायींचे ऊन, पाऊस, थंडी यापासुन रक्षण होणेकरिता पत्राशेड, तसेच चारा/खाद्य डेपोसाठी व्यवस्था, चारा खाणेसाठी आर.सी.सी. पाईपचे गव्हाण, पिण्याच्या पाण्याची व्यवस्थाकरिता हौदाची

निर्मिती, जाणे-येणेसाठी रस्ता, देखरेखी करिता नेमण्यात आलेलले कर्मचारी यांचेकरिता कार्यालय तसेच स्टोअर रुम इ. सुविधा तयार करणेकामी खालीलप्रमाणे खर्च कळविलेला आहे.

टप्पा क्रमांक- 1

| अ.नं | तपशिल | खर्च |
|---|---|---|
| 01 | 2 एकर जागेत मुरुम टाकणे (102 मी x 78 मी.) | 3,99,132 |
| 02 | २ एकर क्षेत्रावर चेनलींक फेन्सींग करणे, (102 मी x 78 मी.) | 8,06,815 |
| 03 | चारा शेडसाठी चेनलींक फेन्सींग मुरुम टाकणेसह (12 मी x 24 मी.) | 1,22,562 |
| 04 | गायीसाठी शेड तयार करणे (09 मी x 30) | 10,16,820 |
| 05 | गव्हाण 12 मिटरचे 5 ठिकाणी | 1,21,530 |
| 06 | पिण्यासाठी पाण्याचे स्टोअरेज | 2,24,883 |
| 07 | पाणी साठवण टाकी 20,000 लिटर क्षमता | 1,80,000 |
| 08 | 600 मिटर लांबीची 6 इंच व्यासाची पीव्हीसी पाईप लाईन कनकुरी तळयापासुन टाकणे | 61,200 |
| 09 | गायीचे खाद्य स्टोअर दुधासाठी खोली (09 मी x 12 मी.) | 5,45,638 |
| 10 | कर्मचारी व कार्यालय शेड | 2,26,820 |
| 11 | अंतर्गत रस्ता | 1,59,411 |
| | एकुण अंदाजीत रक्कम रुपये (अ) | 38,64,811 |
| | अधिक 5 टक्के कन्टेजेन्सी | 1,93,241 |
| | एकुण रुपये | 40,58,052 |

टप्पा क्रमांक- 2

| अ.नं | तपशिल | खर्च |
|---|---|---|
| 01 | प्रदक्षिणा मार्ग पेव्हींग ब्लॉकसह | 13,69,860 |
| 02 | पावसाचे पाणी वाहुन जाणेसाठी 30 से.मी. व्यासाची पाईपलाईन (400मी) | 3,26,400 |
| 03 | पार्किंग व्यवस्था | 1,11,931 |
| 04 | भक्तांसाठी टॉयलेट ब्लॉक | 9,70,192 |
| | एकुण अंदाजीत रक्कम रु. (ब) | 27,78,383 |
| | अधिक 5 टक्के कन्टेजेन्सी | 1,38,919 |
| | एकुण रुपये | 29,17,302 |

क) विद्युत विभाग- संस्थानच्या वतीने गोशाळा सुरु करणेकामी सदर ठिकाणी विद्युत व्यवस्थेच्या येणाऱ्या खर्चाचा प्रस्ताव मागितला असता विद्युत विभागामार्फत गोशाळा पत्राशेड, कर्मचारी कार्यालय,स्टोअर रुम यांचे वायरिंग करणे तसेच सदरील प्लॉटमध्ये स्ट्रीटलाईट उभारणी करणे,आर्थिंग करणे, महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीकडून विद्युतपुरवठा जोडुन घेणेकरिता पोल उभे करुन कंडक्टर ओढणे इ. कामासाठी खालीलप्रमाणे खर्च कळविलेला आहे.

| अ.नं | तपशिल | एकुण रक्कम |
|---|---|---|
| 01 | विद्युतीकरण खर्च | 12,00,000 |
| 02 | विद्युत पुरवठा जोडुन घेणेकामी येणारा खर्च + डिपॉझीट खर्च | 60,000 |
| | एकुण रक्कम | 12,60,000 |

ड) पाणीपुरवठा विभाग- संस्थानच्या वतीने गोशाळा सुरु करणेकामी सदर ठिकाणी पाण्याच्या सोयीसाठी पाणीपुरवठा विभागाकडे खर्चाचा प्रस्ताव मागितला असता पाणीपुरवठा विभागामार्फत खालीलप्रमाणे खर्च कळविलेला आहे.

| अ.नं | साहीत्य तपशिल | कंपनी | परिमाण | एकक | अंदाजे दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| 01 | 4” पि.व्ही.सी. पाईप (6 kg ग्रे कलर) | फिनोलेक्स | 3000 | फुट | 92.00 | 2,76,000 |
| 02 | 4’’ पि.व्ही.सी. बेन्ड (90 ) | फिनोलेक्स | 15 | नग | 269.00 | 4,035 |
| 03 | 4” पि.व्ही.सी. टि | फिनोलेक्स | 6 | नग | 312.20 | 1,873.20 |
| 04 | 4”x 2” पि.व्ही.सी. टि | फिनोलेक्स | 3 | नग | 128.40 | 385.20 |
| 05 | 4” पि.व्ही.सी. टेलपिस | फिनोलेक्स | 12 | नग | 59.70 | 716.40 |
| 06 | 4” पि.व्ही.सी. गेटव्हॉल | फिनोलेक्स | 6 | नग | 900 | 5,400 |
| 07 | नॉन रिटर्न बटरफ्लाय व्हॉल (गियर टाईप) | फिनोलेक्स | 3 | नग | 3,400 | 10,200 |
| 08 | 2” पि.व्ही.सी. गेटव्हॉल | फिनोलेक्स | 6 | नग | 300 | 1,800 |
| 09 | 1” ऐअर व्हॉल (ब्रास, इटालियन मॉडेल) | | 6 | नग | 450 | 2,700 |
| 10 | 4’’x 1’’ सॅडल | फिनोलेक्स | 6 | नग | 118.40 | 710.40 |
| 11 | 2’’x 1m रिंग पाईप फिटींग सकट (6 kg ग्रे कलर) | फिनोलेक्स | 20 | नग | 107 | 2,140 |
| 12 | 2.1/2’’x 1 m रिंग पाईप फिटींग सकट (6 kg ग्रे कलर) | फिनोलेक्स | 20 | नग | 149 | 2,980 |
| 13 | 3’’x 1 m रिंग पाईप फिटींग सकट (6 kg ग्रे कलर | फिनोलेक्स | 20 | नग | 213 | 4,260 |
| 14 | 4’’x 1 m रिंग पाईप फिटींग सकट (6 kg ग्रे कलर) | फिनोलेक्स | 20 | नग | 308 | 6,160 |
| 15 | 4’’ पि.व्ही.सी. बेन्ड (45 ) | फिनोलेक्स | 10 | नग | 184.20 | 1,842 |
| 16 | 5 HP इलेक्ट्रीक मोटार, 33ते45 मिटर हेड | टेक्समो | 2 | नग | 24,000 | 48,000 |
| 17 | स्टार्टर-9-14 रिलेसह | एल ॲन्ड टी | 2 | नग | 1,500 | 3,000 |
| 18 | 32 Amp मेनस्वीच | स्टेनले | 2 | नग | 1,350 | 2,700 |
| 19 | 63 Amp कटाऊट | स्टेनले | 6 | नग | 300 | 1,800 |
| | मटेरियल एकुण खर्च तपशिल | | | | | 3,76,702.20 |
| 01 | विहीर खोदाई व बांधकाम खर्च तरतुद | | 1 | नग | 4,00,000 | 4,00,000 |
| 02 | जे.सी.बी.मशिन भाडोत्री लावणेसाठी (खोदाईसाठी) | | 40 | तास | 700 | 28,000 |
| | एकुण खर्च | | | | | 8,04,702.20 |

संस्थानमार्फत गोशाळा सुरु करणेकामी होणारा एकुण खालीलप्रमाणे एकत्रीत खर्च अपेक्षीत आहे.

| अं.नं. | विभाग | एकुण खर्चाचा तपशिल |
|---|---|---|
| 01 | बगीचा विभाग | रु.2,21,57,500/- |
| 02 | बांधकाम विभाग (टप्पा क्रं.1 व 2) | रु. 69,75,354/- |
| 03 | विद्युत विभाग | रु.12,60,000/- |
| 04 | पाणीपुरवठा विभाग | रु.8,04,702/- |
| | एकुण सर्वसमावेशक खर्च | रु.3,11,97,556/- |

विभागाचा अभिप्राय- संस्थानमार्फत निमगाव कोऱ्हाळे शिवारात गोशाळा सुरु करणेकामी परराज्यातुन गायी खरेदी करुन त्यांची सुरक्षित वाहतुक करणेसाठी इतर राज्यातुन गायी आणणेसाठी संबंधीत राज्याकडून नाहरकत दाखला घेणेस तसेच बगीचा, बांधकाम, विद्युत, पाणीपुरवठा विभागामार्फत प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे संबंधीत कामे करणेस व याकामी होणाऱ्या रु.3,11,97,556/- (तीन कोटी अकरा लाख सत्त्यान्नव हजार पाचशे छप्पन) मात्र एकत्रीत खर्चास तसेच सदर गोशाळेसाठी लागणाऱ्या आवश्यक कर्मचारी वर्ग मंजुर होणेस महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभागाची मान्यता घेणेबाबत निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१६१ **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानच्या वतीने गोशाळा तयार करणेकामी यापुर्वी निश्चित केलेली जागा योग्य होणार नाही, असे समिती सदस्यांचे मत झाले. याकरीता मंदिर परिसर अथवा भक्तनिवास परिसरामध्ये योग्य जागेची निवड करुन, जागा निश्चितीचा तसेच समिती सदस्य मा.श्री. प्रताप भोसले यांचे मार्गदर्शनाखाली गोशाळेच्या व्यवस्थापन बाबतचा सविस्तर प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख)

---

विषय नं.२४ **श्री साईबाबा संस्थानमध्ये सीसीटीव्ही व Security Surveillance यंत्रणा कार्यान्वित करणेकरीता माहिती तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेमार्फत पाठविण्यात आलेल्या DPR व चर्चा होऊन निर्णय होणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम २००४ मधील तरतुद**– सन २००४ च्या महाराष्ट्र अधिनियम क्र. १४ मधील ३५५ (घ) साईभक्तांच्या सुरक्षिततेसाठी किंवा सोयीसाठी आवश्यक ते तातडीचे दुरुस्तीचे काम किंवा उपयायोजना हाती घेणे.

**मा. व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.**– निरंक

**प्रास्ताविक**- श्री साईबाबा संस्थानमध्ये व शिर्डी शहरामध्ये सीसीटीव्ही व Security Surveillance यंत्रणा कार्यान्वित करणेबाबत मा.देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांचे दि. ०६/०७/२०१७ रोजी मुंबई येथे श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव कृती आराखडा समितीचे आढावा बैठकीमध्ये सदरहु विषयावर चर्चा झाली असता, त्यांनी महाराष्ट्र शासनाचे माहिती तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेमार्फत सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करणेबाबत कार्यवाही करावी असे निर्देश दिलेले आहेत. त्यास अनुसरुन संस्थानमध्ये व शिर्डी शहराकरीता सीसीटीव्ही व Security Surveillance यंत्रणा कार्यान्वित करणेकरीता मा. प्रधान सचिव, न्याय व विधी विभागामार्फत मा. प्रधान सचिव, माहिती तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडुन प्रकल्प अहवाल, निवीदा प्रक्रीया व प्रकल्प उभारणी संदर्भात कार्यवाही करणेबाबत जा.नं.एसएसएस/ सीसीटीव्ही सेल/ २४६९/२०१७, दि.२२/०७/२०१७ रोजीचे पत्रान्वये कळविणेत आलेले आहे.

- दि. २६/०७/२०१७ रोजी मा. श्री विजय गौतम साहेब, प्रधान सचिव, माहिती तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, महाराष्ट्र शासन,मुंबई यांचे अध्यक्षतेखाली सदरहु विषयावर चर्चा होणेकामी शिर्डी येथे बैठक घेण्यात आलेली आहे.
- उपरोक्त बैठकीमध्ये शिर्डी शहराचा पॉईंट टु पॉईंट सर्व्हे होणे, सॅटेलाईट यंत्रणा, जीपीएस सिस्टीम अशा अधुनिक यंत्रणेचा वापर करणे, सीसीटीव्ही डेटा स्टोरेज वाढविणे व इतर अनुषंगीक माहिती तंत्रज्ञान विभाग, मुंबई यांना निर्देश दिलेले आहेत.
- दि.२५/०८/२०१७ रोजी माहिती तंत्रज्ञान विभाग, मुंबई यांचे प्रतिनीधी यांनी शिर्डी येथील LI-DAR, $360^0$ मशिनद्वारे सर्व्हे केलेला आहे.
- ऑक्टोबर व नोव्हेंबर-२०१७ मध्ये माहिती तंत्रज्ञान विभाग, मुंबई यांचे प्रतिनीधी यांनी संस्थान व शिर्डी परिसराचा सर्व्हे केलेला आहे.
- दि.१९/०९/२०१७ रोजीचे पत्रान्वये माहिती तंत्रज्ञान विभाग, मुंबई व सीसीटीव्ही विभाग यांचे संस्थानमधील सर्व विभागाने दिलेले सीसीटीव्ही तपासुन अभिप्राय घेण्यात आलेला आहे.
- दि. १५/०९/२०१७ रोजी सचिव, महाआयटी, मुंबई व मा. मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया व संस्थानचे अधिकारी यांनी याबाबतचा प्राथमिक स्वरुपात आढावा घेतला.
- दि. ०३/०१/२०१८ रोजीचे ई-मेलद्वारे माहिती तंत्रज्ञान विभाग, मुंबई विभागाने DPR सादर केलेला आहे.

माहिती तंत्रज्ञान विभाग, मुंबई यांनी सदरच्या DPR मध्ये संस्थानचे माहिती तंत्रज्ञान विभाग, ध्वनीक्षेपण विभाग, Security विभाग व CCTV विभाग या विविध विभागांचा एकत्रित प्रस्ताव सादर केलेला आहे.

सदर DPR मध्ये माहिती तंत्रज्ञान विभाग, मुंबई यांनी सीसीटीव्ही व Security Surveillance बाबत खालीलप्रमाणे साहित्य व त्यासाठी लागणारा खर्च कळविलेला आहे –

१) सीसीटीव्ही कॅमेरा -

| Camera Type Qty | | | | Total |
|---|---|---|---|---|
| Fixed | PTZ | Eagle camera | FRC | |
| 1231 | 40 | 13 | 22 | 1306 |

२) Security Equipments -

| Secutiry Device | | | | | | | | | Walkie Talkie | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| DFMD | HHMD | Baggage Scanner | Body Scanner | Bomb Jammer | Mobile Jammer | Vehicle Scanner | Turn Style | Ballards | Walkie Talkie | VHF base Sets |
| 46 | 45 | 32 | 1 | 5 | 15 | 7 | 13 | 2 | 102 | 3 |

३) खर्चाचा तपशील -

| Sl No. | Component | Total Cost (Excluding Taxes) |
|---|---|---|
| 01 | Network – Active Components | Rs. 387,216,661.05 |
| 02 | Network – Passive Components | Rs. 81,781,526.00 |
| 03 | CyberSecurity | Rs. 120,000,000.00 |
| 04 | Services | Rs. 75,862,899.50 |
| 05 | City Wi-Fi | Rs. 6,111,058.00 |
| 06 | CCTV Surveillance | Rs. 221,760,056.40 |
| 07 | Smart Lights | Rs. 28,461,100.00 |
| 08 | VHF Walkie Talkies | -- |
| 09 | Emergency Call Box - SoS | Rs. 17,706,535.00 |
| 10 | Public Announcement | Rs. 10,482,265.20 |
| 11 | Human Security Devices | -- |
| 12 | ICCC, Analytics, Mobile App | Rs. 166,250,000.00 |
| 13 | Cloud Storage | Rs. 7,683,858.00 |
| 14 | Misc – EMS, Helpdesk etc | Rs. 52,400,000.00 |
| 15 | O & M for 5 Years | Rs. 431,500,000.00 |
| 16 | Contigency – 10% | Rs. 160,721,595.92 |
| | Grand Total:- | Rs. 1,767,937,555.07 |

सदर प्राप्त झालेल्या DPR मध्ये VHF Walkie Talkies व Human Security Devices यांचे खर्चाचा उल्लेख आलेला नाही. तरी, उपरोक्तप्रमाणे माहिती तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी DPR मध्ये साहित्य व त्यासाठी येणा-या खर्चाचे रु.१७७ कोटी मात्र रक्कमेवर निर्णय होणेकामी सदरचा DPR मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करता येईल.

**मागणी**– उपरोक्त प्रास्ताविकेत नमुद केल्याप्रमाणे, माहिती तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी सदरच्या DPR मध्ये संस्थानचे माहिती तंत्रज्ञान विभाग, ध्वनीक्षेपण विभाग, Security विभाग व CCTV विभागा या विविध विभागांचा एकत्रित प्रस्ताव सादर केलेला आहे. सदर प्राप्त झालेल्या DPR मध्ये VHF Walkie Talkies व Human Security Devices यांचे खर्चाचा उल्लेख आलेला नाही. तरी, उपरोक्तप्रमाणे माहिती तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी DPR मध्ये कळविलेले साहित्य व त्यासाठी येणा-या खर्चाचे रु.१७७ कोटी मात्र रक्कमेवर निर्णय होणेकामी सदरचा DPR मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करत आहे.

**संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान** - तांत्रिक व आर्थिक व कायदेशीर.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय**- उपरोक्त प्रास्ताविकेत व मागणीमध्ये नमुद केल्याप्रमाणे माहिती तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी सदरच्या DPR मध्ये संस्थानचे माहिती तंत्रज्ञान विभाग, ध्वनीक्षेपण विभाग,

Security विभाग व CCTV विभाग या विविध विभागांचा एकत्रित प्रस्ताव सादर केलेला आहे. सदर प्राप्त झालेल्या DPR मध्ये VHF Walkie Talkies व Human Security Devices यांचे खर्चाचा उल्लेख आलेला नाही. तरी, उपरोक्तप्रमाणे माहिती तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी DPR मध्ये कळविलेले साहित्य व त्यासाठी येणा-या खर्चाचे रु.१७७ कोटी मात्र रक्कमेवर निर्णय होणेकामी सदरचा DPR मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.१६२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थानमध्ये सीसीटीव्ही व Security Surveillance यंत्रणा कार्यान्वित करणेकरीता माहिती तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेला DPR सर्व मा.सदस्यांना ई-मेलद्वारे पाठविणेत यावा तसेच माहिती तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे प्रतिनिधीनींना DPR चे सादरीकरण व चर्चेसाठी सभेसमोर बोलविणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- सीसीटीव्ही कंट्रोल सेलप्रमुख)

---

**विषय नं.२५** **मे.स्मृती प्रोडक्ट प्रा.लि., अंबाला यांचे शुध्द तुप पुरवठयापोटी संस्थानकडे जमा असलेल्या सुरक्षा अनामत रक्कम परत करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधिल तरतूद** – २१ (१) (घ) भक्तांना जेवण पुरविणे व अन्नछत्र चालविणे

**प्रास्ताविक**– संस्थानने जुन ते सप्टेंबर-२०१७, ऑक्टोबर ते डिसेंबर-२०१७ व जानेवारी ते मार्च-२०१८ या कालावधीसाठी तीन टप्प्यांमध्ये तुपाचे अंदाजित परिमाणासाठी निविदा काढल्या होत्या. यामध्ये संस्थान आवश्यकतेप्रमाणे तुप खरेदी करील, अशी अट होती. या तीनही टप्प्यांमध्ये मे.स्मृती प्रॉडक्ट्स प्रा.लि., अंबाला यांचे प्रती किलो रु.३९६/- हे दर न्यूनतम होते. म्हणून मा.व्यवस्थापन समितीने दिनांक २५.०७.२०१७ चे सभेतील निर्णयानुसार मे.स्मृती प्रॉडक्ट्स प्रा.लि., अंबाला यांना प्रायोगिक तत्वावर तीन महिन्यांसाठी पुरवठा आदेश दिला होता. यामध्ये त्यांनी पुरविलेल्या तुपाचे परिक्षण करण्यात येऊन पुढील कालावधीसाठीच्या पुरवठा आदेशाबाबत निर्णय घेण्याचे ठरले होते.

पुरवठा आदेश दिल्यानंतर मे.स्मृती प्रॉडक्ट्स प्रा.लि., अंबाला यांनी तुपाचा पुरवठा सुरु केला. यामध्ये त्यांनी पुरविलेले तुपाचे बॅच नं.५३ चे ३ सॅम्पल व ६८ चे २ सॅम्पल चे Central Food Technological Research Institute, Mysore या केंद्र शासनाच्या लॅबचे रिपोर्टमधील Test of Rancidity – Positive (As per FSSAI Norms – Negative) आली होती. तसेच तुपाचे बॅच नं.५३ व ५८ च्या प्रत्येकी १ सॅम्पलचे BRR Test Report Reading अनुक्रमे ३९.२ व ३९.५ (As per FSSAI Norms 40-43) असे प्राप्त झाले होते. त्यामुळे मे.स्मृती प्रॉडक्ट्स प्रा.लि., अंबाला यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती. याचा खुलासा केला होता.

दरम्यान संस्थानच्या भांडार विभागामार्फत हे लॅब रिपोर्ट्स मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २३.१०.२०१७ चे सभेत सादर केले असता मे.स्मृती प्रॉडक्ट्स प्रा.लि., अंबाला यांचेकडून तुप खरेदी करण्याचे थांबवून, पुढील कालावधीसाठी दरपत्रके व ई-निविदा मागविणेचे ठरले होते. तसेच मे.स्मृती प्रॉडक्ट्स प्रा.लि., अंबाला यांचा ३ महिन्यांचा तुप पुरवठा कालावधी दिनांक २६.१०.२०१७ रोजी संपुष्ठात आला होता.

तथापि मे.स्मृती प्रॉडक्ट्स प्रा.लि., अंबाला यांना त्यांना दिलेल्या कारणे दाखवा नोटीस संदर्भात दिनांक १४.११.२०१७ च्या सभेसमोर खुलासा करणेची संधी देण्यात आली होती. याचा त्यांनी लेखी खुलासा व संस्थानचे मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १४.११.२०१७ चे सभेत समक्ष केला होता. परंतु त्यांचा खुलासा अमान्य करण्यात येऊन त्यांना पुढील कालावधीसाठी पुरवठा आदेश न देण्याचा पुन्हा निर्णय घेतला होता. मात्र मे.स्मृती प्रॉडक्ट्स प्रा.लि., अंबाला यांना काळ्या यादीत समावेश करण्याची अट शिथील करण्यात येऊन, यापुढील गाईचे तुप खरेदीकामीच्या निविदा प्रकियेमध्ये सहभागी होणेस त्यांना मुभा देण्यात यावी, असे ठरले होते. सदर निर्णयास अनुसरुन, मे.स्मृती प्रॉडक्ट्स प्रा.लि., अंबाला यांची सुरक्षा अनामत रक्कम रु.३३,२६,४००/- (रुपये तेहतीस लाख सव्वीस हजार चारशे) मात्र आदा करणेबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यावर सदर सुरक्षा अनामत रक्कम प्रलंबित ठेवणेचे ठरले होते.

तसेच मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २३.१०.२०१७ च्या सभेतील निर्णयाप्रमाणे १,५०० क्विंटल तूप खरेदीसाठी दरपत्रके मागविलेले होते. यामध्ये निन्मतम दरधारक मे. व्हीएसपी कार्पोरेशन, उमरगांव जि.वलसाड गुजरात यांचेकडून १२०० क्विंटल व महाराष्ट्र राज्यातील मे.गोदावरी खोरे नामदेवरावजी परजणे पाटील तालुका सहकारी दुध उत्पादक संघ मर्यादित, कोपरगाव यांचेकडून ३०० क्विंटल तुप खरेदी करण्यात आले होते.

तसेच नव्याने सन २०१८ वर्षासाठी ४ टप्प्यांमध्ये ई-निविदा मागविणेत आलेल्या होत्या. यामध्ये १८ निविदाधारकांनी भाग घेतला होता. यामध्ये ११ निविदाधारक तांत्रिक निविदेमध्ये पात्र ठरले होते. या निविदाधारकांचे दिनांक १६.१२.२०१७ रोजी कमर्शियल बीड उघडल्यानंतर यामध्ये मे.हर्ष फ्रेश डेअरी प्रॉडक्ट्स प्रा.लि., भगवानपुर, जि.हरिव्दार यांचे दर न्युनतम होते. त्यांचे तुपाचे नमुना सॅम्पलचा रिपोर्टही FSSAI Norms प्रमाणे प्राप्त झाला होता.

सदर नवीन ई-निविदा प्रक्रियेत मे.स्मृती प्रॉडक्ट्स प्रा.लि., अंबाला यांना सहभाग घेण्याची संधी देण्यात आली होती. परंतु तांत्रिक निविदेमध्ये ते अपात्र ठरले होते. त्यानंतर त्यांनी दिनांक २६.१२.२०१७ रोजी संस्थानविरुद्ध अंबाला (हरियाणा) न्यायालयात अनाधिकारे पुरवठा आदेश रद्द केला व संस्थानला तुप पुरवठा करणेचा त्यांचा आदेश कायम करणेबाबत व संस्थानच्या तुपाचे नवीन ई-निविदा प्रक्रियेस स्थगिती मिळावी, याबाबत दावा क्र.३६२७/२०१७ दाखल केला होता. मात्र मा.न्यायालयाने संस्थानचे म्हणणे मान्य करुन सुरु असलेल्या निविदा प्रक्रियेस स्थगिती देण्याची त्यांची मागणी नाकारली होती. तथापि सदर बाब न्यायप्रविष्ट असून दावा न्यायालयात प्रलंबित आहे.

संस्थानकडून शुद्ध तुप खरेदीची सन २०१८ या वर्षाची निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात असल्यामुळे व मे.स्मृती प्रॉडक्टस प्रा.लि., अंबाला यांनी संस्थानविरुध्द दावा दाखल केलेमुळे व ही बाब न्यायप्रविष्ट असल्यामुळे त्यांची संस्थानकडे असलेली सुरक्षा अनामत रक्कम रु.३३,२६,४००/- परत करणेबाबत संस्थानचे विधी सल्लागार ॲड.श्री.नितीन भवर यांचे मार्गदर्शन/सल्ला घेण्याचे ठरले होते.

**संस्थानचे वकिलांचे अभिप्राय-** ॲड.श्री.नितीन भवर यांनी दिनांक ०८.०२.२०१८ चे पत्रान्वये सदर प्रकरणी खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेले आहेत.

1. As you know, an Agreement was entered in beween Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi and M/s.Smriti Products Pvt.Ltd., Ambala for supply of 2800 Quintal Desi Pure Ghee, for the period from 27.07.2017 to 26.10.2017. In pursuant of the said Agreement, M/s.Smriti Products Pvt.Ltd., Ambala supplied 1639.62 Quintal Desi Pure Ghee to Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi and the bills thereof have already been paid. The agreement dated 09.08.2017 was for three months. It is already expired on 09.11.2017. It appears from the record that, as Desi Pure Ghee supplied by M/s.Smriti Products Pvt.Ltd., Ambala to Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi was not as per the FSSAI Norms, therefore, in view of the Resolution dated 23.10.2017 adopted by the Managing Committee, a letter was issued to M/s.Smriti Products Pvt.Ltd., Ambala by Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi on 16.11.2017 informing that, the Managing Committee of Sansthan has resolved not to give supply orders to M/s.Smriti Products Pvt.Ltd., Ambala.

2. Now, M/s.Smriti Products Pvt.Ltd., Ambala have filed Civil Suit No.3627/2017, in the Court of the Civil Judge Senior Division at Ambala, challenging the letter dated 16.11.2017 issued by Shri Saibaba Sansthan Trust Shirdi treating the letter dated 16.11.2017 as an order terminating the contract for supply of Desi Pure Ghee. Apart from above, several wild, incorrect, false, baseless and concocted allegations are made by M/s.Smriti Products Pvt.Ltd., Ambala in the Civil Suit against Shri Saibaba Santhan Trust Shirdi that the contract work for supply of Desi Pure Ghee was already given to them for the period from January 2018 to March 2018.

The Civil Suit No.3627/2017 is subjudice before the Court of the Civil Judge Senior Division at Ambala. It is required to be defended by Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi.

3. In view of the circumstances stated herein above, as per my opinion, it is would be desirable for Shri Saibaba Sansthan Trust Shirdi to withhold the amount of Security Deposit of M/s.Smriti Products Pvt.Ltd. Ambala till disposal of the Civil Suit No.3627/2017 pending in the Court of the Civil Judge Senior Division at Ambala, to avoid further complications in near future.

सदर अभिप्राय पत्र दिनांक ०८.०२.२०१८ ची प्रत तात्काळ संदर्भासाठी सोबत जोडली आहे.

**विभागाचे अभिप्राय** – मे.स्मृती प्रॉडक्ट्स प्रा.लि., अंबाला यांना ३ महिन्यांसाठी २८०० क्विंटल तूप पुरविणेचा आदेश दिलेला होता. त्यापोटी त्यांनी १६३९.६२ तूपाचा पुरवठा केला होता. सदर सर्व तूप वापरुन संपले आहे. त्या तूपाची बीलेही आदा करण्यात आलेली आहेत. सदर पुरवठाधारकाला दिलेला ३ महिन्यांचा पुरवठा कालावधीही संपला आहे. करारनाम्यामध्ये पुरवठा कालावधी संपल्यानंतर सुरक्षा अनामत रक्कम परत केली जाईल अशी तरतूद आहे. तसेच संस्थानला तूपाच्या खरेदीसाठी जास्त रक्कम लागल्यास जादा आलेल्या खर्चाची वसुली करुन घेणेबाबत व्यवस्थापन समितीचा निर्णय होता. परंतू संस्थानने जी तूपाची खरेदी केली ते दर मे.स्मृती प्रॉडक्ट्स प्रा.लि., अंबाला यांचे दरापेक्षाही कमी असल्यामुळे जादा खर्च आला नाही व वसुलीचा प्रश्न उद्भवला नाही. व्यवस्थापन समितीने सदर पुरवठाधारकाला पुढील कालावधीसाठी पुरवठा आदेश न देण्याचा निर्णय घेऊन त्यांना काळया यादीत टाकण्याची अट शिथिल केलेली आहे. तसेच संस्थानच्या पुढील निविदा प्रक्रियेत भाग घेण्याची संधीही दिलेली आहे.

मे.स्मृती प्रॉडक्ट्स प्रा.लि., अंबाला यांनी संस्थान विरुध्द दाखल केलेल्या कोर्ट केसमध्ये संस्थानचे वकीलांनी अंबाला कोर्टामध्ये सदर पुरवठाधारकांचा पुरवठा कालावधी संपलेला आहे व संस्थानने पुढील कालावधीसाठी त्यांना पुरवठा आदेश दिलेला नाही तसेच मे.स्मृती प्रॉडक्टस प्रा.लि., अंबाला हे संस्थानचे तूपासाठीचे नवीन ई-निविदा प्रक्रियेत अपात्र ठरलेनंतर संस्थानविरुध्द दावा दाखल केला आहे. या सर्व बाबींचा विचार करुन, त्यांनी मागीतलेला स्टे मे. कोर्टाने मान्य केलेला नाही व त्यामुळे संस्थानची पुढील ई-निविदा प्रक्रिया पुर्ण झालेली आहे.

वरील बाबी विचारात घेता मे.स्मृती प्रॉडक्ट्स प्रा.लि., अंबाला यांची सुरक्षा अनामत रक्कम संस्थानकडे ठेवल्यास सदर रकमेवर ते व्याज मागणी करण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच ही रक्कम परत केल्यास संस्थानचा व त्यांचा व्यावहारिक संबंध संपुष्ठात येईल असे मत आहे.

**मागणी**– तरी वर नमुद बाबी व विधी सल्लागार यांनी दिलेले वरील मार्गदर्शन विचारात घेऊन मे.स्मृती प्रॉडक्ट्स प्रा.लि., अंबाला यांची संस्थानकडे जमा असलेली सुरक्षा अनामत रक्कम रु.३३,२६,४००/- (रुपये तेहतीस लाख सव्वीस हजार चारशे) मात्र त्यांना परत करावी अगर कसे? या बाबत निर्णय होणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेत विचारार्थ सादर.

**निर्णय क्र.१६३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू बाब न्यायप्रविष्ठ असल्यामुळे मे.स्मृती प्रोडक्ट प्रा.लि., अंबाला यांचे शुध्द तुप पुरवठयापोटी संस्थानकडे जमा असलेल्या सुरक्षा अनामत रक्कम परत करणेबाबतचा उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**विषय नं.२६** **माहे नोव्हेंबर, डिसेंबर- २०१७ मध्ये विविध प्रयोगशाळांमार्फत करण्यात आलेल्या तपासण्यांचे प्राप्त अहवाल मा.व्यवस्थापन समितीसमोर सादर.**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८.१०.२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्र.८०० अन्वये "यापुढे मोतीचुर लाडु प्रसाद निर्मीती करीता खरेदी करणेत येत असलेल्यागावरान तुपाचे प्रत्येक नमुन्याची तपासणी अश्वमेध इंजिनीअर्स ॲण्ड कन्सलटंटस नासिक, या NABL मान्यताप्राप्त प्रयोगशाळेकडुन करुन घेण्यात यावी", असे ठरलेले आहे.

खरेदी विभागाचे दि.१४.०७.२०१७ रोजीचे टिपणी वरील निर्देश नुसार संस्थानला प्राप्त होणा-या गावरान तुप व खाद्यतेलाची तपासणी राज्य/ केंद्र शासनाच्या प्रयोगशाळेमधून करुन घेणेबाबत निर्देश झालेले आहेत.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.३१.०८.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६३७अन्वये"संस्थानसाठी किराणा माल अथवा इतर ज्या साहित्यांच्या नमुन्यांची लॅब तपासणी करण्यात येते अशा लॅब तपासण्यांचा अहवाल सभेसमोर सादर करण्यात यावा", असे ठरलेले आहे.

उपरोक्त निर्णयानुसार गावरान तुपाची तपासणी संस्थानचे प्रयोगशाळेसह अश्वमेध इंजिनीअर्स ॲण्ड कन्सलटंटस नासिक (NABL Lab) व जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा (शासकीय प्रयोगशाळा) यांचेकडून करणेत येते, तसेच आवश्यकतेनुसार केंन्द्रीय खाद्य प्रोद्योगिक अनुसंधान संस्थान, मैसूर, यांचेकडूनही तपासणी करणेत येत आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.३१.०८.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६३७ नुसार माहे ऑक्टोबर२०१७ पर्यंतचे सर्व प्रयोगशाळा तपासणी अहवाल यापुर्वी मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर

करणेत आलेले आहेत. आता माहे नोव्हेंबर व डिसेंबर २०१७ या कालावधीतील तपासणी अहवालव त्यांचे परिशिष्ठ यासोबत सादर केले आहे.

गावरान तुपाचे पुरवठादारगोदावरी खोरे नामदेवरावजी परजणे पा. तालूका सहकारी दूध उत्पादक संघ मर्यादित, कोपरगांव, यांचेकडून संस्थानला दि.१९.१२.२०१७ व दि.२१.१२.२०१७ रोजी प्राप्त झालेल्या बॅच नं. AA (M-75)/Dec.2017,BB (M-75)/ Dec.2017 व CC (M-76)/ Dec.2017 चे तुपाचे नमूने तपासणीसाठी संस्थानच्या प्रयोगशाळेंसह अश्वमेध इंजिनीअर्स ॲण्ड कन्सलटंटस नासिक (NABL Lab) व जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा, औरंगाबाद, यांचेकडे पाठविणेत आलेले होते.

वरीलबॅचचे तीनही प्रयोगशाळांच्या तपासणी अहवालामध्ये खालीलप्रमाणे अभिप्राय नमुद आहेत.

1) Ashwamedh Engineers & Consultants, Nashik (NABL Lab):-

The analysed food sample complies with Food Safety and Standards (FoodProducts Standards and Food Additives) Regulations,2011(for hich limits have been mentioned) with respect to theparameters tested.

2) Regional Public Health Laboratory, Aurangabad:-

The Above Submitted Sample does not Conforms to the standards of Ghee as per Food Safety Standards (Food Products & Food Additives) Regulations 2011.

3) SaiPrasadalaya Quality Assurance Laboratory, Shirdi:-

The above sample of Pure Ghee **conforms** as per F.S. & S. Act 2006 & there Regulations 2011 with respect to the parameters tested.

उर्वरित सर्व बॅचचे तपासणी अहवालामध्ये गावरान तुप व खाद्यतेलाचे सर्व नमुने FSSA नुसार Conform असल्याचे नमुद आहे. या सर्व मालाचा संस्थानचे विविध विभागांना त्यांचे मागणीनुसार वेळोवेळी पुरवठा करणेत आलेला आहे, तसेच त्याचा संपूर्ण साठा विनातक्रार संपलेला आहे. उपरोक्त तपासणी अहवालांच्या झेरॉक्स प्रती तसेच तपासणी अहवालाचे दि.१७.०२.२०१८ रोजीचे तपशीलवार परिशिष्ठ (पा.नं. १ ते १२) यासोबत अवलोकनार्थ सादर केलेले आहे.

तरी गावरान तुपाचे व खाद्यतेलाचे तपासणी अहवाल सोबतचे परिशिष्ठ (पा.नं. १ ते १२) प्रमाणे मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढेसादर.

**निर्णय क्र.१६४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, माहे नोव्हेंबर, डिसेंबर- २०१७ मध्ये विविध प्रयोगशाळांमार्फत करण्यात आलेल्या तपासण्यांच्या प्राप्त अहवालांचे अवलोकन करणेत येऊन, त्याची नोंद घेण्यात आली.**

(कार्यवाही- अधिक्षक, भांडार विभाग)

---

**विषय नं.२७** **संस्थानचे टेंडर/ करारनामा मसुद्यात Arbitration क्लॉजचा समावेश करावा अथवा न करावा याबाबत निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील कलम १७.(२) (च)** विश्वस्त व्यवस्थेशी संबंधित असे कोणतेही दावे, खटले व इतर कायदेशीर कार्यवाही, न्यायालयात किंवा न्यायाधिकरणापुढे किंवा इतर प्राधिकरणापुढे दाखल करील व त्या संबंधात बचाव करील.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. – नविन प्रस्ताव.**

**प्रास्तविक** –दि.२/२/२०१८, रोजी ॲड. श्री नितीन भवर यांनी Arbitration क्लॉजचा मसुदा तयार करुन दिला आहे, तो खालील प्रमाणे.

The party shall attempt to resolve any dispute, claims and question whatsoever which shall arise under this supply agreement within 30 days of the receipt of notice from the concern party of any such dispute, claims or questions by the other party.

Any such disputes claims and question whatsoever which shall arise either during the continuance of this agreement or afterwards between the party and the Shirdi Sai Sansthan touching these presents or as to any other matter in any way relating to this present or the affairs thereof or mutual rights, duties or liabilities under the present and which cannot be resolved by an agreement acceptable to both the parties as above, may be referred to a single arbitrator to be appointed by both the parties and such arbitration shall

be in accordance with and subject to the provisions of the arbitration and conciliation act 1996 or any statutory modification or re-enactment there-of for the time being in force. The arbitration proceedings shall be conducted in English language and the venue for the same will be at Aurangabad only.

All matters referred to above shall be subject to Laws govern in India and exclusive jurisdiction of courts in Aurangabad only.

Arbitration क्लॉज बाबत या पुर्वी ॲड. श्री एस.डी. कुलकर्णी, यांनी दि.२/७/२०१३, रोजी खालील प्रमाणे लेखी मार्गदर्शन केले आहे.

संस्थानचे वतीने करण्यात येणा-या करारनाम्यात Arbitration क्लॉज असणे योग्य नाही, असे मत आहे, Arbitration क्लॉजचा प्रत्यक्षात उपयोग होत नाही,Arbitration क्लॉजचा खर्च मोठ्या प्रमाणात होतो,Arbitrator चे निर्णयानंतर पुन्हा सिव्हील कोर्टात रेफरन्स होवू शकतो व त्यामुळे केसचे कामकाज प्रलंबीत होते.

संस्थानच्या प्रत्येक करारात ज्युरिसडिक्शन राहाता कोर्ट किंवा सिनिअर डिव्हीजन कोपरगांव कोर्ट असे असणे संस्थानच्या हिताचे आहे. ज्या ठिकाणी संस्थानचे मुख्य कार्यालय आहे त्याच कोर्टास दावा चालविण्याचा अधिकार राहील त्या शिवाय इतर कोणत्याही कोर्टात केस चालणार नाही. असा क्लॉज करारनाम्यात स्पष्टपणे असावा.

Arbitration क्लॉज असू नये, समोरचे पार्टीने जरी Arbitration क्लॉजची मागणी केली तरी संस्थानने तो क्लॉज मान्य करु नये सिव्हील कोर्टात केस चालविणे चांगले. असे कळविले आहे.

**मागणी**– उपरोक्त दोन वकीलाचे वेगवेगळे ओपिनियन असल्यामुळे अशा परिस्थीतीत Arbitration क्लॉजचा संस्थानचे टेंडर/करारनामा मसुद्यात समावेश करावा अथवा न करावा याबाबत निर्णय होणेसाठी सादर.

निर्णय क्र.१६५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे टेंडर/ करारनामा मसुद्यात Arbitration क्लॉजचा समावेश करणेस मान्यता देण्यात आली व या Arbitration क्लॉजचा मसुदा जेष्ठ कायदेतज्ञ व समिती सदस्य ॲड मोहन जयकर यांनी तपासुन अंतीम करुन द्यावा, असे ठरले.** (कार्यवाही- विधी अधिकारी)

---

**विषय नं.२८ माहे नोव्हेंबर, डिसेंबर- २०१७ जमा-खर्च तक्त्याची नोंद घेणेबाबत.**

प्रस्ताव- लेखाशाखा विभागामार्फत दरमहा संस्थानला सर्व मार्गाने जमा होणा-या व संस्थानकडुन खर्च होणा-या रकमांचा एकत्रित जमा खर्च तक्ता तयार करण्यात येतो. सदर जमा व खर्चाच्या आकडेवारीचा तक्ता मा.व्यवस्थापन समितीच्या सभेसमोर नोंद घेण्यासाठी सादर करण्यात येत असतो.

त्या अनुषंगाने माहे नोव्हेंबर, डिसेंबर- २०१७ या कालावधीतील मासिक जमा-खर्चाचे तक्ते तयार करण्यात आले असून ते मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर नोंद घेणेसाठी सादर करणे आवश्यक आहे. जमा-खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे –

| महिना | जमा | खर्च |
|---|---|---|
| नोव्हेंबर २०१७ | ४६,२६,३२,७९५ | २१,२२,६९,२२८ |
| डिसेंबर २०१७ | ५२,९८,८२,२८६ | १८,६५,८२,३७१ |

तरी लेखापुस्तकाप्रमाणे माहे नोव्हेंबर, डिसेंबर- २०१७ या कालावधीतील जमा खर्चाची नोंद घेण्यासाठी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर.

निर्णय क्र.१६६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, माहे नोव्हेंबर, डिसेंबर- २०१७ जमा-खर्च तक्त्याचे अवलोकन करणेत येऊन, त्याची नोंद घेण्यात आली.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.२९ सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाचे मुळ अंदाजपत्रक व सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाचे सुधारित अंदाजपत्रक मान्यतेस्तव फेरसादर.**

प्रस्ताव- सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाचे मुळ अंदाजपत्रक व सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाचे सुधारित अंदाजपत्रक मान्यतेस्तव दि.०२.०२.२०१८ रोजीचे मा. व्यववस्थापन समितीचे सभेमध्ये सादर करण्यात आले होते. निर्णय क्रं.८४ अन्वये " यावर सतिवस्तरचर्चा होऊनअसे ठरले की, अंदाजपत्रकाचा सखोल अभ्यास करण्यासाठी समिती सदस्यांना आणखी कालावधी देण्यात यावा. त्यामुळे अंदाजपत्रकावर पुढील सभेमध्ये निर्णय घेण्यात यावा ", असे

ठरले. त्यास अनुसरुन सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाचे मुळ अंदाजपत्रक व सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाचे सुधारित अंदाजपत्रक मान्यतेस्तव खालीलप्रमाणे फेर सादर करण्यात येत आहे.

अ) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी चे कामकाज मा. व्यवस्थापन समिती पहात आहे. अधिनियमातील कलम १७ अन्वये समितीची कर्तव्ये व अधिकार मधील पोटकलम-(२) (क) नुसार वार्षिक अंदाजपत्रकाविषयीची पुढील प्रमाणे तरतुद आहेः "(समिती) विश्वस्तव्यवस्थेच्या जमा-खर्चाचा अंदाज देणारे वार्षिक अंदाजपत्रक तयार करील आणि त्याची एक प्रत राज्य शासनाकडे आणि धर्मादाय आयुक्तांकडे पाठवील."

सदर तरतुदीन्वये विषयांकित अंदाजपत्रक राज्य शासनाकडे आणि धर्मादाय आयुक्ताकडे पाठविणे आवश्यक आहे. सोबत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाचे सुधारित अंदाजपत्रक व सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाचे मुळ अंदाजपत्रक, रुग्णालय विभागासह तयार करण्यात आले असून, त्यातील जमा-खर्चाच्या ठळक तरतूदी पुढीलप्रमाणे आहेत :

**अ) संस्थान** (रुग्णालये वगळून) **जमेचे अंदाजपत्रक** *(आकडे रुपयांत)*

| अ.क्रं. | तपशिल | सुधारित अंदाजपत्रक २०१७-१८ | अंदाजपत्रक २०१८-१९ | | वाढ/ घट |
|---|---|---|---|---|---|
| | | | रक्कम | एकूणशी % | % (टक्के) |
| I | **प्रारंभीची शिल्लक** | **२२,०५,००,०००** | **२४,२५,५०,०००** | २ | १० |
| १ | देणगीव्दारे मिळणारी अपेक्षित जमा | ३७१,६७,५०,००० | ४१८,८६,८५,००० | २६ | १३ |
| २ | अपेक्षित महसुली जमा | २०८,४४,५७,००० | २२८,६१,८०,००० | १४ | १० |
| II | **एकूण जमा (१+२) :-** | **५८०,१२,०७,०००** | **६४७,४८,६५,०००** | ४१ | १२ |
| III | अपेक्षित निर्गंतवणूक | ४७३,३७,०२,५०० | ९२२,९५,८५,००० | ५८ | ९४ |
| | **एकूण अपेक्षित जमा (I+II+III) :-** | **१०७८,५४,०९,५००** | **१५९४,७०,००,०००** | १०० | ४८ |

II. **संस्थान** (रुग्णालये वगळून) **खर्चाचे अंदाजपत्रक** (आकडे रुपयांत)

| अ.क्रं. | तपशिल | सुधारित अंदाजपत्रक २०१७-१८ | अंदाजपत्रक २०१८-१९ | | वाढ/घट |
|---|---|---|---|---|---|
| | | | रक्कम | एकूणशी % | %(टक्के) |
| १ | अपेक्षित भांडवली खर्च | ५९६,३९,२०,००० | ७६६,६४,६९,००० | ४८ | २९ |
| २ | अपेक्षित महसुली खर्च | १३२,८४,५७,००० | १५८,०१,६६,००० | १० | १९ |
| ३ | अपेक्षित किरकोळ खर्च | ५,१९,६२,००० | ६,११,४७,००० | ०० | १८ |
| ४ | न्यासाच्या उदिष्टांवरील अपेक्षित खर्च | २४७,६५,६२,५०० | ५६१,२९,९१,००० | ३५ | १२७ |
| ५ | व्यवस्थापन निधीतील अपेक्षित खर्च | ८५,१५,५८,००० | ९०,१९,९२,००० | ०६ | ०६ |
| I | **एकूण खर्च (१ ते ५) :-** | **१०६७,२४,५९,५००** | **१५८२,२७,६५,०००** | ९९ | ४८ |
| II | अंतिम शिल्लक | ११,२९,५०,००० | १२,४२,३५,००० | ०१ | १० |
| | **एकूण अपेक्षित खर्च (I+II) :-** | **१०७८,५४,०९,५००** | **१५९४,७०,००,०००** | १०० | ४८ |

**ब) I. रुग्णालय विभाग जमेचे अंदाजपत्रक** *(आकडे रुपयांत)*

| अ.क्रं. | तपशिल | सुधारित अंदाजपत्रक २०१७-१८ | अंदाजपत्रक २०१८-१९ | | वाढ/घट |
|---|---|---|---|---|---|
| | | | रक्कम | एकूणशी % | %(टक्के) |
| I | **प्रारंभीची शिल्लक** | **२२,००,०००** | **२२,००,०००** | - | - |
| II | अपेक्षित महसुली जमा | १००,५९,०३,००० | १०१,०८,००,००० | ४१ | ०.५ |
| III | संस्थानकडून वर्ग (तुट) | १२३,४३,२३,५०० | १४६,२५,७०,००० | ५९ | १८ |
| | **एकूण अपेक्षित जमा (I+II+III) :-** | **२२४,२४,२६,५००** | **२४७,५५,७०,०००** | १०० | - |

II. रुग्णालय विभाग खर्चाचे अंदाजपत्रक *(आकडे रुपयांत)*

| अ.क्रं. | तपशिल | सुधारित अंदाजपत्रक २०१७-१८ | अंदाजपत्रक २०१८-१९ | | वाढ/घट |
|---|---|---|---|---|---|
| | | | रक्कम | एकूणशी % | %(टक्के) |
| १ | अपेक्षित भांडवली खर्च | ४०,६५,००,००० | ६८,२८,००,००० | २८ | ६८ |
| २ | अपेक्षित महसुली खर्च | ८५,७३,३१,५०० | ८७,५१,४०,००० | ३५ | २.०८ |
| ३ | अपेक्षित किरकोळ खर्च | १४,१५,००० | १४,१०,००० | ०.०६ | -०.४ |
| ४ | न्यासाच्या उदिष्टांवरील अपेक्षित खर्च | ९७,४९,८०,००० | ९१,४०,२०,००० | ३७ | -०.६ |
| I | **एकूण खर्च (१ ते ४) :-** | **२२४,०२,२६,५००** | **२४७,३३,७०,०००** | **१००** | |
| II | अंतिम शिल्लक | २२,००,००० | २२,००,००० | - | |
| | **एकूण अपेक्षित खर्च (I+II) :-** | **२२४,२४,२६,५००** | **२४७,५५,७०,०००** | - | |

**ब)** अधिनियम २००४ चे कलम २२(२) मधील तरतुदींनुसार "व्यवस्थापन निधीत रक्कम उपलब्ध असल्यास, ती विचारात घेऊन विश्वस्तव्यवस्थेच्या लगतपुर्व वर्षातील अंदाजे स्थूल वार्षिक उत्पन्नाच्या दहा टक्क्यापेक्षा अधिक नसेल इतकी, समितीकडून निश्चित करण्यात येईल एवढी रककम, राज्य शासनाच्या मान्यतेने, दरवर्षी या निधीमध्ये जमा करण्यात येईल. राज्य शासनास, आवश्यक वाटले तर, कोणत्याही वर्षात विश्वस्तव्यवस्थापन निधीतून कोणत्याही अतिरीक्त रक्कमा या निधीत जमा करण्याबद्दल कोणत्याही वेळी निर्देश देईल."

उपरोक्त तरतुदीप्रमाणे व्यवस्थापन निधीतून गतवर्षाच्या उत्पन्नाच्या १० टक्के खर्च अपेक्षित आहे. सन २०१८-१९ या अंदाजपत्रकामध्ये व्यवस्थापन निधितून होणारा संभाव्य खर्च या तरतुदीच्या अधिन राहून करता येईल.

सन २०१७-१८ व २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी व्यवस्थापन निधितून अपेक्षित वाढीव खर्च झाल्यास, शासनाकडे प्रस्ताव दाखल करावा लागेल.

**क)** संस्थानच्या विविध विभागामार्फत साईभक्तांना पुरविण्यात येणा-या पायाभुत सुविधेत वाढ करणे तसेच त्यांना दळणवळण्याच्या विविध सोयी उपलब्ध करुन देणे याकामी नगरपंचायती अंतर्गत कामास व इतर खर्चासाठी अनुदान या शीर्षाखाली खर्च प्रस्तावित केलेला आहे. श्री साईबाबा संस्थान अधिनियमातील कलम २१ अंतर्गत संबंधित विभागाकडून छाननी समितीच्या अभिप्रायानुसार शासनाकडून मंजुरी प्राप्त करुन घेण्याच्या अटीस अधीन राहून अंदाजपत्रकात अनुदान या शीर्षाखाली भरीव तरतुद दर्शविण्यात आली आहे.

**ड)** मा. व्यवस्थापन समितीच्या स्थापनेनंतर विविध मुलभूत व मोठया प्रमाणात भांडवली खर्च-तथा-योजना सुरु करणे प्रस्तावित आहे. आयकर कायदा १९६१ चे कलम १०(२३)(सी)(V) व ११ अन्वये संपुर्ण करमुक्त आहे. कलम ११(२) मधील तरतुदीनुसार प्रत्येक आर्थिक वर्षाच्या उत्पनापैकी ८५% उत्पन्न हे त्याच आर्थिक वर्षात खर्च करणे बंधनकारक आहे. तथापी, ते शक्य न झाल्यास शिल्लक राहीलेले अखर्चीत उत्पन्न पुढील पाच वर्षात खर्च करणे बंधनकारक आहे. मागील पाच वर्षातील अखर्चीत उत्पन्न रक्कम **रु.१,२५६ कोटी** इतकी आहे, त्याची आयकर कलम ११(५) अन्वये विहित पध्दतीने गुंतवणुक करण्यात आलेली आहे. शिल्लक अखर्चीत उत्पन्नाचे रुपांतर वेळोवेळी गुंतवणूकांमध्ये करण्यात आले आहे. हे अखर्चीत उत्पन्न चालू वर्षात वा अनुक्रमे पुढील पाच वर्षात खर्च होणे आवश्यक असल्याने भांडवली खर्चामध्ये मोठया प्रमाणात वाढ करणे क्रमप्राप्त झाले आहे.

तथापी, चालू वर्षाच्या उत्पन्नाच्या ८५% अखर्चीत उत्पन्नाचे खर्चाचे प्रमाण फारच कमी आहे. त्यामुळे सदरचे अखर्चीत उत्पन्न वेळेत खर्च न केल्यास त्यावर आयकर लागु होऊन तो भरणे क्रमप्राप्त होईल, अशा आयकराची रक्कमही मोठी असेल. तरी कृपया याबाबत निर्णय होणे गरजेचे आहे. अपेक्षित जमा व खर्चाच्या अंदाजपत्रकाची विवरणे, परिशिष्ट " अ " व " ब " म्हणून सोबत जोडण्यात आली आहेत.

आर्थिक वर्ष २०१७-१८ अखेर शिल्लक अखर्चीत उत्पन्न रुपये १५५ कोटी पैकी दि.३१.१२.२०१८ अखेर रु.६० कोटी इतके खर्च झाले असून, उर्वरित रुपये ९५ कोटी रकमेचा विनियोग संस्थान उदिष्ठ कामांकरीता होणे आवश्यक आहे. आजअखेर खालीलप्रमाणे प्रस्ताव दप्तरी दाखल झाले आहेत. त्यास विहित पध्दतीने मान्यता मिळाल्यास खर्च करता येतील.

१) इंदिरा गांधी वैद्यकिय महाविद्यालय, नागपूर रु.३५.२२ कोटी अनुदान मागणी प्रस्ताव.

२) वसंतराव नाईक शासकिय वैद्यकिय महाविद्यालय, यवतमाळ रु. १३ काटी अनुदान मागणी प्रस्ताव

३) शिर्डी नगरपंचायत स्वच्छतेसाठी रु. १.५० कोटी अनुदान मागणी प्रस्ताव.
४) संस्थान रुग्णालये विभाग वैद्यकिय बिलात सवलत व वैद्यकिय आर्थिक अनुदानाकरीता साधारणतः रु. ८.५० कोटी.
५) निळवंडे कालव्यांसाठी रु. १२५ कोटी.
६) नगरपंचायत स्वच्छता, रस्ते, बांधकाम, इ. प्रस्ताव.

आर्थिक वर्ष २०१८-१९ अखेर शिल्लक अखर्चीत उत्पन्न रु. ३४४ कोटी खर्च करणे आवश्यक आहे. आजअखेर खालीलप्रमाणे प्रस्ताव दप्तरी दाखल झाले आहेत. त्यास विहित पध्दतीने मान्यता मिळाल्यास खर्च करता येतील.

१) निळवंडे कालव्यांसाठी रु. १२५ कोटी अनुदान मागणी प्रस्ताव.
२) जमीन खरेदी रु. ५०० कोटी.
३) संस्थान पाणीपुरवठा योजना इ. रु.६० कोटी.
४) शिर्डी नगरपंचायल स्वच्छता अनुदान रु.४.२० कोटी अनुदान मागणी प्रस्ताव.
५) संस्थान रुग्णालये विभाग वैद्यकिय बिलात सवलत व वैद्यकिय आर्थिक अनुदानाकरीता साधारणतः रु.२९ कोटी.
६) संस्थान करीता चल व अचल मालमत्ता संभाव्य खरेदी.
७) नगरपंचायत स्वच्छता, रस्ते, बांधकाम, इ. प्रस्ताव.
८) इतर संस्थांकरीता अनुदाने इ.

तरी, सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाचे मुळ अंदाजपत्रक व सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाचे सुधारित अंदाजपत्रक प्रस्ताव मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे मान्यतेस्तव फेरसादर.

**निर्णय क्र.१६७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावित सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाचे मुळ अंदाजपत्रक व सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाचे सुधारित अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.३०** **आयकर कायदा, १९६१ च्या तरतुदीनुसार दिनांक ३१.०३.२०१८ अखेर एकूण शिल्लक असलेल्या अखर्चीत उत्पन्न विनियोगाबाबत फेरसादर.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांस सर्व माध्यमांद्वारे मिळणारे उन्पन्न हे आयकर कायदा, 1961 चे कलम 10(23)(सी)(v) व 11 अन्वये संपूर्ण करमुक्त आहे. कलम 11(2) मधील तरतूदीनुसार संबंधित आर्थिक वर्षात मिळालेल्या एकुण उत्पन्नापैकी एकूण 85 % उत्पन्न हे त्याच आर्थिक वर्षात् खर्च करणे बंधनकारक आहे. तथापि ते खर्च न झाल्यास या उत्पन्नापैकी अखर्चीत राहीलेली रक्कम पुढील 5 वर्षात खर्च करता येईल व दरम्यान या रकमेची आयकर कलम 11(5) अन्वये विहित पध्दतीने गुंतवणुक करावी लागेल. त्यास अनुसरून आयकर विविरण पत्रे दाखल करावी लागतात. अशा प्रकारे दि.31 मार्च 2017 अखेर अखर्चीत राहीलेल्या रकमेचा विनियोग संस्थानच्या उदिष्टांकरीता खर्च करण्यास अनुसरून आयकर विविरण पत्रे भरण्यात आली असुन सदर रक्कम व ती खर्च करण्याचे अंतिम आर्थिक वर्ष खालीलप्रमाणे आहे.

| आर्थिक वर्ष | शिल्लक अखर्चीत उत्पन्‍ रू. | खर्च करण्यासाठी अंतिम मुदत |
|---|---|---|
| 2012-13 | 1,55,00,53,929.00 | 31.3.2018 |
| 2013-14 | 3,43,91,42,425.00 | 31.3.2019 |
| 2014-15 | 2,30,84,26,843.00 | 31.3.2020 |
| 2015-16 | 2,24,55,89,377.00 | 31.3.2021 |
| 2016-17 | 3,02,32,76,602.00 | 31.3.2022 |
| **एकुण-** | **12,56,64,89,176.00** | |

अशाप्रकारे संबंधित आर्थिक वर्षात एकूण उत्पन्नाच्या 85 % रक्कम खर्च न झाल्यामुळे एकूण अखर्चित उत्पन्‍ वाढत गेले असून दि. 31.3.2012 अखेर रू.1256.64 कोटी अखर्चित उत्पन्‍ विहित पध्दतीने खर्च करण्यासाठी उपलब्ध आहे. पैकी रू.155 कोटी दि.31.3.2018 अखेर खर्च करणे आवश्यक आहे.

दि.1.4.2017 ते 31.10.2017 अखेर कालावधीत पैकी रू.40 कोटी खर्च झाल्याबाबत प्रस्ताव मा.व्य.स.चे सभेपुढे सादर करण्यात आला होता. यावर शिर्डी नगरपंचायतीच्या हद्दीतील रस्तांच्या कामांसाठी व

काही रक्कम संस्थानसाठी शेती महामंडळाची जमीन खरेदी करणेसाठी वापरण्यात यावी असा निर्णय संमत झाला होता. बाबत दि.31.12.2018 अखेर आढावा घेता अखर्चीत उत्पन्नापैकी रू.60 कोटी रकमेचा विनियोग झालेला असुन उर्वरित रू.95 कोटी शिल्ल्क आहेत. सदर रक्कम दि.31.3.2018 अखेर संस्थानच्या उद्दीष्ट कामांकरीता खर्च होण आवश्यक आहे अन्यथा शिल्ल्क राहीलेल्या अखर्चीत उत्पन्नावंर आयकर कायदयातील तरतुदीनुसार महत्तम दराने आयकर आकारणी होण्याची शक्यता टाळता येत नाही.

तरी बाबत धोरणात्मक निर्णय होऊन दि.31.3.2018 अखेर शिल्लक असलेल्या रू.1256.64 कोटी उपलब्ध असलेल्या अखर्चीत उत्पन्नाचा विनियोग दि.31.3.2022 अखेर व दि.31.3.2018 अखेरच्या अखर्चीत उत्पन्नापैकी संस्थान उदिष्ट कामांकरीता झालेल्या रू.60 कोटी व्यतिरिक्त शिल्लक रक्कम रू.95 कोटी रकमेचा प्रत्यक्ष विनियोग दि.31.3.2018 अखेर संस्थान उदिष्ट कामांकरिता होणबाबत धोरणात्मक निर्णय होणेकामी प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर प्रस्ताव करण्यात आला होता. निर्णय क्रमाक 105/ दि.2.2.2018 अन्वये अखर्चित उत्पन् विनीयोग करणेसाठी लेखापरिक्षक अथवा आयकर सल्लागार यांचा अभिप्राय मागविणेस यावा असे ठरले आहे. त्यानुसार संस्थानचे आयकर सल्लागार यांचेकडुन अभिप्राय मागविण्यात आला होता. त्यास अनुसरून त्यांनी संस्थानच्य उदिष्टावर खर्च करिता येईल् असे कळविले आहे. आर्थिक वर्ष 2017-18 च्या सुधारित अंदाजपत्रकात खर्च होणाऱ्या बाबी खालीलप्रमाणे आहेत.

1. इंदिरा गांधी वैद्यकिय महाविद्यालय, नागपुर रू.35.22 कोटी अनुदान मागणी प्रस्ताव.
2. वसंतराव नाईक शासकीय वैद्यकिय महाविद्यालय, यवतमाळ रू.13 कोटी अनुदान मागणी प्रस्ताव.
3. शिर्डी नगरपंचायत स्वच्छतेसाठी रू.1.50 कोटी अनुदान मागणी प्रस्ताव.
4. संस्थान रुग्णालये विभाग वैद्यकिय बिलात सवलत व वैद्यकिय आर्थिक् अनुदानाकरिता साधारणत: रू.8.50 कोटी.
5. निळवंडे कालव्यांसाठी रू.125 कोटी.
6. नगरपंचायत स्वच्छता, रस्ते बांधकाम इ.प्रस्ताव.

अशाप्रकारे आयकर कायदा, 1961 च्या तरतुदीनुसार 31.3.2018 अखेर एकूण शिल्लक असलेल्या अखर्चीत उत्पन्नाचा विनियोग विहीत पध्दतीने करणेबाबत मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे फेरप्रस्ताव सादर.

**निर्णय क्र.१६८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, आयकर कायदा, १९६१ च्या तरतुदीनुसार दिनांक ३१.०३.२०१८ अखेर एकूण शिल्लक असलेल्या अखर्चीत उत्पन्नाचा सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे विनियोग तसेच संस्थानच्या उद्दीष्टांवर खर्च करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.३१** **देणगी काऊंटरकडील स्वाईप मशिनला परदेशी भक्तांसाठी इंटरनॅशनल कार्ड स्वाईपींगची सुविधा घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.पंतप्रधान, भारत सरकार यांनी दि.८ नोव्हेंबर,२०१६ पासून रु.१००० व रु.५०० नोटा चलनातून बंद केलेल्या आहेत. याचा परिणाम आर्थिक व्यवहारावर होऊ नये, म्हणून कॅशलेस व्यवहार या संकल्पनेकडे शासनाचा कल असून, जास्तीत जास्त व्यवहार कॅशलेस करावेत म्हणून शासनाने नागरीकांना आवाहन केले आहे.

त्याअनुषंगाने, श्री साईबाबांच्या दर्शनासाठी येणा-या श्री साईभक्तांना चलनासंबंधी कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण होऊ नये आणि भक्तांना कॅशलेसची सुविधा उपलब्ध व्हावी, म्हणून संस्थानमध्ये देणगी काऊंटरसह इतर आवश्यक त्या ठिकाणी स्वाईप मशीन बसविण्यात आले आहेत. परंतु, सदर स्वाईप मशिनवर फक्त भारतीय चलनातील देणगी स्विकारली जाते.

तथापि, श्री साईंच्या दर्शनासाठी देश-परदेशातून भक्तगण येत असतात. परदेशातील भक्तांना जर स्वाईप मशिनव्दारे संस्थानला परकीय चलनामध्ये देणगी द्यावयाची असल्यास, सध्या ती सुविधा उपलब्ध नाही.

त्याअनुषंगाने, सध्या संस्थानमध्ये स्टेट बँक ऑफ इंडिया यांचे स्वाईपींग मिशन बसविलेले असल्याने, त्यांना जा.नं.एसएसएस/ वशी-लेखा/५५९०/२०१७ दि.२० जानेवारी, २०१८ रोजीच्या पत्रान्वये संस्थानच्या देणगी काऊंटरवरील दोन स्वाईप मशिनला अमेरिकन एकसप्रेस कार्डची सुविधा कार्यान्वीत करुन देणेबाबत कळविले होते.

त्यास अनुसरुन, देणगी काऊंटरकडील दोन स्वाईप मशिनला तशी सुविधा उपलब्ध करुन देण्यास ते तयार असल्याचे दि.२९ जाने.२०१८ रोजीचे पत्राव्दारे त्यांनी कळविलेले असून, त्यासाठी बँक प्रति व्यवहार (per transaction) २.५०% अधिक सर्व्हिस टॅक्स असे चार्जेस अकारणार असल्याचे बॅकैने कळविलेले आहे.

तसेच दि.०२ फेब्रुवारी, २०१८ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीच्या सभेत मा.विश्वस्त, श्री.प्रताप भोसले साहेब यांनी भक्तांना जर अमेरिकन एक्सप्रेस कार्डची सुविधा उपलब्ध झाल्यास साधारणपणे वार्षिक रक्कम रु.२० कोटी देणगीमध्ये वाढ होऊ शकते अशी सुचना केली होती.

भारतीय कार्ड व अमेरीकन एक्सप्रेस कार्डव्दारे देणगी रकमेसाठी बॅंकेने कळविलेले चार्जेस तसेच वार्षिक येणारी देणगी अंदाजे रक्कम रु.२० कोटी मात्र गृहीत धरुन चार्जेससाठी येणारा खर्च पुढीलप्रमाणे -

| अ.नं. | सुविधांचा तपशिल | आकारण्यात येणारे चार्जेस | महिन्याला भाडे | देणगी अंदाजे रु.२० कोटी मात्र गृहीत धरुन चार्जेसचा खर्च |
|---|---|---|---|---|
| ०१ | भारतीय चलनातील देगणीसाठी (डेबीट कार्ड) | ०.९०% (अधिक १८ % GST) | रक्कम रु.२२०/- (अधिक १८% GST) | २१,८६,३०४/- चार्जेस + मशिन भाडे+GST |
| ०२. | भारतीय चलनातील देगणीसाठी ( क्रेडीट कार्ड) | १.५०% (अधिक १८ % GST) | रक्कम रु.२२०/- (अधिक १८% GST) | ३६,०२,३०४/- चार्जेस + मशिन भाडे+GST |
| ०३. | परदेशी चलनातील देगणीसाठी (अमेरिकन एक्सप्रेस कार्डसाठी) | २.५०% (अधिक १८ % GST) | ------ | ५९,००,०००/- चार्जेस +GST |

वार्षिक देणगी रक्कम अंदाजे रु.२० कोटी जमा गृहीत धरल्यास, त्यासाठी उपरोक्तप्रमाणे कमीशन व मशिनच्या मासिक भाड्यापोटी रक्कम खर्च होणार आहे. यामध्ये अमेरीकन एक्सप्रेस कार्डसाठी खूपच जादा खर्च येणार आहे.

तरी परदेशातील श्री साईभक्तांना स्वाईप कार्डव्दारे संस्थानला देणगी देण्याची सुविधा उपलब्ध व्हावी म्हणून, संस्थानच्या देणगी काऊंटरवरील सध्या असलेल्या स्वाईप मशिनपैकी दोन स्वाईप मशिनला अमेरीकन एक्सप्रेस कार्डची सुविधा कार्यान्वीत करणेकामी तसेच बॅंकेने कळविलेल्या चार्जेसला मान्यता मिळणेकामी, सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर निर्णयार्थ सविनय सादर.

निर्णय क्र.१६९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानच्या देणगी काऊंटरवरील सध्या असलेल्या स्वाईप मशिनपैकी दोन स्वाईप मशिनला अमेरीकन एक्सप्रेस व डिस्कव्हर कार्डची सुविधा कार्यान्वीत करणेस व त्याकामी बॅंकैने कळविलेप्रमाणे चार्जेस आदा करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

विषय नं.३२ **संस्थानला देणगी स्वरुपात प्राप्त होणारे सोने-चांदी वस्तुंची कस लावून तपासणी करुन मुल्यांकन करणेकामी नेमणेत आलेल्या मुल्यांकनकारांना (Gold-Silver Valuer) मुदतवाढ देणेबाबत.**

प्रस्ताव- श्री क्षेत्र शिर्डी येथे श्री साईबाबांचे समाधी दर्शनासाठी देश-विदेशातून हजारो भक्त दररोज येत असतात, हीच भक्तांची संख्या सलग सुट्टयांचे कालावधीत लाखोंच्या घरात जाते. शिर्डी येथे येणा-या हजारो भक्तांपैकी बहुतांशी भक्त श्री साईचे चरणी रोख रक्कम, सोने-चांदी व इतर मौल्यवान वस्तू देणगी रुपाने अर्पण करीत असतात. या देणगी रुपाने प्राप्त होणा-या सोने-चांदी व मौल्यवान वस्तूंची कस लावून तपासणी करुन, त्याचे बाजारभावाने मुल्यांकन केलेनंतर विहित पध्दतीने नोंदी घेऊन, सदरच्या वस्तू लेखाशाखेकडे जमा करणेत येत असतात. सध्या अशा प्रकारच्या सोने-चांदी वस्तू कापडी पिशवीत सिलबंद करुन लेखाशाखेकडील स्ट्रॅांगरुममध्ये ठेवणेत येतात.

दानपेटीमध्ये व रोखपाल कार्यालयामध्ये देणगी रुपाने समक्ष प्राप्त होणा-या सोने-चांदीच्या वस्तूंचा कस लावून तपासणी करणे व त्याचे बाजारभावाने मुल्यांकन करणेकामी खालील प्रमाणे तीन मुल्यांकनकारांची मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार नियुक्ती करण्यात येऊन, वेळोवेळी मुदतवाढ देणेत आलेली आहे. त्यांची मुदत ३१ मार्च २०१८ अखेर संपत असून, पुढील कालावधीकरीता त्यांनी संमतीपत्रे दिली आहेत. त्याची थोडक्यात माहिती खालीलप्रमाणे.

(१) मा. व्य.स. निर्णय क्रं.९२३/दि.९/१०/२०१४ अन्वये वृत्तपत्रात जाहीरात देऊन नियुक्ती,

(२) मा. व्य.स. निर्णय क्रं.२४०/दि.२/०४/२०१६ अन्वये ०१/०४/२०१६ ते ३१/०३/२०१७ अखेर करीता मुदतवाढ.

(३) मा. व्य.स. निर्णय क्रं.२२८/दि.२७/०३/२०१७ अन्वये ०१/०४/२०१७ ते ३१/०३/२०१८ अखेर करीता मुदतवाढ.

| अ.नं. | मुल्यांकनकाराचे (सराफांचे) नाव व पत्ता | प्रति माह मानधन | दि.०१/०४/२०१८ पासून संमतीपत्र |
|---|---|---|---|
| ०१ | श्री गणेश दत्तात्रय नागरे, (व्दारकामाई ज्वेलर्स, शिर्डी) | रुपये ३०००/- | संमतीपत्र दि.२०/०२/२०१८ मानधन मागणी रु.३०००/- |
| ०२ | श्री. बाळासाहेब माधवराव नागरे, (लक्ष्मी अलंकार, शिर्डी) | रुपये १५१/- | संमतीपत्र दि.२०/०२/२०१८ मानधन मागणी रु.१०००/- |
| ०३ | श्री. सुधीर रमण वडनेरे, (श्री ज्वेलर्स, संगमनेर) | रुपये १५१/- | संमतीपत्र दि.२०/०२/२०१८ मानधन मागणी रु.१०००/- |

उपरोक्त मुल्यांकनकारांची (सराफांची) नेमणूक सन २०१४ मध्ये, विहित पध्दतीने वर्तमानपत्रात जाहिरात देऊन, करण्यात आली असून, मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने ३१.०३.२०१८ अखेर त्याच मानधन रकमेवर मुदतवाढ देणेत आली आहे. दि.०१/०४/२०१८ पासून अ.नं. ०२ व ०३ यांनी दरमाह रु.१५१/- वरुन रु.१०००/- अशी मागणी केली आहे. या तीनही मुल्यांकनकारांचे काम समाधानकारक आहे. स्थानिक असल्याने देणगीदार आल्यावर सोने चांदी कस लावून तपासणीकरीता सदर मुल्यांकनकार तात्काळ हजर राहून, तपासणी करुन चालू बाजारभावाप्रमाणे मुल्यांकन करुन देतात. मागील तीन वर्षात त्यांना कोणतीही वाढ देण्यात आलेली नव्हती.

तरी, उपरोक्त तीनही मुल्यांकनकारांना सोने चांदी कस लावून तपासणी करणे व बाजारभावाप्रमाणे मुल्यांकन करणे याकरीता दि.०१/०४/२०१८ पासून दोन वर्षाकरीता मुदतवाढ देण्यास व अ.नं.०१ यांना पुर्वीप्रमाणेच रु.३०००/- अ.नं.०२ व ०३ यांना दरमाह रु.१०००/- मानधनवाढ देणेबाबत निर्णय होणेकामी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१७० **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावित तीनही मुल्यांकनकारांना सोने चांदी कस लावून तपासणी करणे व बाजारभावाप्रमाणे मुल्यांकन करणे याकरीता दि.०१/०४/२०१८ पासून पुढे दोन वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ देण्यास व त्यांना प्रस्तावातील तक्त्यामध्ये नमुद केलेप्रमाणे मानधन आदा करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

विषय नं.३३ **साईनगर रेल्वे स्टेशन येथे रेल्वे प्लॅटफार्म व ट्रॅकची संख्या वाढविणेसाठी करावयाच्या कामासाठी रक्कम रु.१२.४९ कोटी रक्कम मागणीबाबत.**

प्रस्ताव- मा.डॉ.सुरेश हावरे, अध्यक्ष श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी तत्कालीन मा. रेल्वेमंत्री श्री सुरेशजी प्रभू यांना दि. २८.०६.२०१७ रोजी पत्र पाठवून खालीलप्रमाणे विनंती केलेली होती.

दि.०१ आक्टोंबर २०१७ पासून साईबाबा समाधी शताब्दी वर्ष शिर्डी व जगभरात साजरे होत आहे. साईभक्तांच्या सोयीसाठी शिर्डी येथे साईनगर रेल्वे स्टेशन बांधण्यात आलेले आहे. दिवसेंदिवस साईभक्तांची संख्या वाढत असून समाधी शताब्दी वर्षामध्ये ही संख्या आणखी वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे रेल्वे स्टेशनवर सद्यस्थितीत अस्तित्वात असलेल्या सुविधांमध्ये वाढ करण्याची आवश्यकता आहे. सद्यस्थितीत साईनगर रेल्वेस्टेशन येथे एकच रेल्वेट्रॅक व एकच प्लॅटफॉर्म उपलब्ध आहे. आणखी दोन रेल्वेट्रॅक व प्लॅटफॉर्म वाढविणेबाबत विनंती करण्यात आलेली आहे. त्यामूळे भविष्यात मनमाड ते नगर, नगर ते मनमाड दरम्यान तसेच इतरही ठिकाणाहून रेल्वे सेवा सुरू होऊ शकेल, संस्थान या कामासाठी काही प्रमाणात खर्च उचलण्यास तयार असल्याचे सदर पत्रात नमूद केले आहे.

त्या अनुषंगाने हितेंद्र मल्होत्रा विभागीय रेल्वे व्यवस्थापक, सोलापूर विभाग यांनी त्यांचे पत्र क्रं. Sur/T/ 205/ Cog. Complex/SNSI दि. ३०.१०.२०१७ संस्थानकडे प्राप्त दि. २६.०२.२०१८ नुसार खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर केलेला आहे.

It is to inform you that, General Manager, Central Railway has approved the following facilities at Shirdi Saingar Railway Station with the cost of rs. 12.49 Cr on Deposit Basis.

1. Construction of up & Down Line No.3 for length if 725 Metres with Carriage Watering facility.
2. Proposed Shunting Neck of length 600 metres towards Puntamba end.
3. Construction of Stabling Line ( Future platform no. 4 Line) of length 600 Metres.

It is requested to deposit the cost of work sanction i.e., Rs.12.49 Crs (Rupees Twelve crores forty nine lakhs) at the earliest to execute the work.

विभागाचा अभिप्राय:- मा.अध्यक्ष श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी त्यांचे दि.२८.०२.२०१७ च्या पत्रात साईनगर रेल्वेस्टेशनवरील प्लॅटफॉर्म व रेल्वे ट्रॅक ची संख्या वाढविणेसाठी येणा-या खर्चातील काही भाग संस्थान करण्यास तयार असलेबाबत नमूद केले आहे. मात्र विभागीय रेल्वे व्यवस्थापक सोलापूर यांनी संपूर्ण १२.४९ कोटीची मागणी संस्थानकडे केलेली आहे. त्यामुळे संस्थानने पूर्ण निधीचा बोजा सहन करणे संयुक्तीक वाटत नाही.

तरी साईनगर रेल्वेस्टेशन शिर्डी येथील रेल्वे ट्रॅक व प्लॅटफॉर्मची संख्या वाढविणेसाठी विभागीय रेल्वे व्यवस्थापक, सोलापूर यांचे मागणीनुसार रु. १२.४९ कोटी अनुदान देणेबाबतचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.१७१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला व शिर्डी येथील रेल्वे ट्रॅक व प्लॅटफॉर्मची संख्या वाढविणेसाठीचा खर्च रेल्वे विभागाने करावा, यासाठी मा.रेल्वेमंत्री महोदयांना पत्र देण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.३४** **आयकर विभागाच्या डिमांड नोटीसपोटी, अपिल दाखल करणे संबधीत अनुशंगिक प्रवास/ इतर तत्सम खर्चापोटी रु.२७,३४३/- प्रत्यक्ष खर्च प्रतिपुर्तीस मान्यता मिळून आदा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** आर्थिक वर्ष २०१४-१५ चे कर निर्धारणासंबधित मा.उपआयुक्त आयकर मुंबई यांनी दि.३१.१२.२०१७ रोजी रु.१८३,८६,१४,३३०/- ची डिमांड नोटिस संस्थानला दिली आहे. सदर बाबत दि.०८.०१.२०१८ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत बाबत चर्चा विचार विनिमय करण्यात येऊन, निर्णय क्र. १६/दि.०८.०१.२०१८ अन्वये आयकर विभागाच्या या निर्णयाविरुध्द मा.उच्च न्यायालय मुंबई येथे रिट याचिका दाखल करणेबाबत व या न्यायालयीन प्रक्रियेसाठी अनुशंगिक प्रवास/इतर तत्सम येणा-या खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे.

त्यास अनुसरुन मा.उच्च न्यायालय मुंबई येथे रिट याचिका दाखल करणे संबधीत मा.विश्वस्त अॅड.मोहन जयकर यांचे समन्वयाने कार्यवाही करण्यात येऊन, दि.३१.०१.२०१८ रोजी रिट याचिका दाखल करण्यात आली होती. दि.०९.०२.२०१८ रोजी मा.उच्च न्यायालय मुंबई येथे सदर केसची सुनावणी झाली त्यामध्ये दिल्ली उच्च न्यायालयाचे प्रख्यात वरिष्ठ वकिल श्री.जी.गणेश, यांनी संस्थानचे वतीने सादरीकरण केले व त्यासंबधीत मा.उच्च न्यायालयाचा आदेश संस्थानला दि.१३.०२.२०१८ प्राप्त झाला त्यामध्ये एकुण १८३ कोटी देय करा ऐवजी फेर दुरुस्ती करण्यात येऊन, रु.१२२ कोटी देय कर राहिला आहे. उच्च न्यायालयाचे आदेशानुसार आयकर आयुक्तांकडे अपिल करणे गरजेचे होते. त्यासंबधीत अपिल अर्जात दुरुस्ती करुन प्रत्यक्ष दस्ताऐवज पाहणी करणेकरिता वरिष्ठ वकिल श्री.एस.गणेश यांनी दि.१७.०२.२०१८ रोजी शिर्डी येथे प्रत्यक्ष भेट दिली. मा.विश्वस्त श्री मोहन जयकर व वकिल एस.गणेश यांनी बाबत चर्चा विचार विनिमय करुन श्री एस.गणेश यांनी सुचविल्याप्रमाणे अपिल अर्ज अंतिम केला व दि.१८.०२.२०१८ रोजी आयकर विभागाकडे ऑनलाईन पध्दतीने दाखल केला आहे. त्यानंतर देय करापोटी देय असलेली २० % रक्कमेला स्टे मिळणेसंबधीत श्री.गणेश यांनी स्टे अॅप्लिकेशन करुन दिले आहे. त्याप्रमाणे संस्थान कर सल्लागार श्री राहूल केळकर सीए , त्यांचे वरिष्ठ सहकारी श्री. दिपक टिकेकर, चार्टर्ड अकौटंटस, यांनी तसे प्रस्ताव तयार केलेले आहेत. वेळोवेळी ते आयकर विभागाकडे सादर करण्यात येतिल. अशाप्रकारे मा.विश्वस्त जयकर यांचे समन्वयाने अॅड. एस.गणेश यांनी आयकर कामकाजासंबधीत शिर्डी येथे प्रत्यक्ष भेट दिली आहे. त्याकरिता खालील प्रमाणे खर्च झाला आहे.

| अ.क्र. | खर्च तपशिल | प्रत्यक्ष खर्च रु. |
|---|---|---|
| १. | हॉटेल सिटी हार्ट, शिर्डी दि.१७ व १८.०२.२०१८ रुम भाडे ,<br>बिल नं. ४८३८/दि.१८.०२.२०१८ | ६,३४४/- |
| २. | हॉटेल सन अन सॅन्ड, शिर्डी.दि.१७ व १८.०२.२०१८ रुम भाडे<br>बिल नं. ४८३८/दि.१५२५/१९.०२.२०१८,बिल नं.२५२५/१८.०२.२०१८ | २०,९९९/- |
| | **एकुण खर्चः** | २७,३४३/- |

वकिल एस.गणेश हे प्रख्यात कायदेतज्ञ आहेत त्यांनी संस्थानचे वतीने मा.उच्च न्यायालय येथे सादरीकरण केले असुन, संस्थानचे हिताची ऑर्डर मा.उच्च न्यायालयाकडून झालेली आहे. त्यांनी अद्याप संस्थानकडे फी बाबत मागणी केलेली नाही. मा.विश्वस्त श्री मोहन जयकर यांचे समन्वयाने व त्यांनी सुचविलेप्रमाणे श्री एस गणेश यांचे करिता हॉटेल बुकिंग करण्यात आले होते. हॉटेल सन न सॅन्ड, शिर्डी फुल असल्याने हॉटेल सिटी हार्ट, शिर्डी येथे ऑनलाईल बुकिंग करण्यात आले होते (सिए केळकर यांचे क्रेडीट कार्ड व्दारे). सदर रुम एस.गणेश यांना व्यवस्थित वाटली नाही व सुदैवाने हॉटेल सन न सॅन्ड, येथे बुकिंग रद्द झाल्यामुळे शिल्लक रुम मिळाल्या त्यामुळे याठिकाणी बुकिंग केले होते. त्यामुळे सिटी हार्ट हॉटेलचे बिल लागले आहे. मा.व्य.स निर्णय क्र.१६/दि.०८.०१.२०१८ अन्वये आयकर विभागाच्या या निर्णयाविरुध्द मा.उच्च न्यायालय मुंबई येथे रिट याचिका दाखल करणेबाबत व या न्यायालयीन प्रक्रियेसाठी अनुशंगिक प्रवास/इतर तत्सम येणा-या खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे.

वरिष्ठ वकिल एस.गणेश यांनी मा.उच्च न्यायालय मुंबई येथे रिट याचिका दाखल करणेबाबत व या न्यायालयीन प्रक्रियेसाठी मा.विश्वस्त श्री.मोहन जयकर यांचे समन्वयाने शिर्डी येथे भेट दिली आहे. भेटी दरम्यान एस. गणेश व त्यांचे सहकारी यांचे करिता प्रत्यक्ष खर्च झालेला आहे. फी देण्याबाबत निर्णय झालेला नाही त्यामुळे वरिष्ठ वकिल श्री.एस.गणेश यांचेकरिता झालेला प्रत्यक्ष खर्च रु.२७,३४३/- आदा करण्याबाबत प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.१७२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, आयकर विभागाच्या डिमांड नोटीसपोटी, अपिल दाखल करणे संबधीत अनुशंगिक प्रवास/ इतर तत्सम खर्चापोटी रु.२७,३४३/- प्रत्यक्ष खर्च प्रतिपुर्तीस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.३५** **सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाचे अंतर्गत लेखापरिक्षण करणेसाठी अंतर्गत लेखापरिक्षकाची नेमणूक करणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानमध्ये दैनंदिन कामकाजाचा व्याप दिवसेंदिवस वाढत आहे, त्या अनुषंगाने आर्थिक व्यवहारात व कामकाजातही मोठया प्रमाणात वाढ झाली आहे. तसेच आर्थिक व्यवहारां संबंधीत केंद्र व राज्य शासनाकडुन विविध आर्थिक, आयकर, सेवाकर, व्हॅट जीएसटी इ. विषयक कायदे पारित होतात. या कायद्यातील नव-नविन तरतुदींचा प्रभाव दैनंदिन आर्थिक कामकाजात पडत असतो.वैधानिक लेखापरिक्षणामध्ये आक्षेपांचे प्रमाण कमी होण्याच्या दृष्टीने व आर्थिक व्यवहारांत पारदर्शकता येऊन वेळीच त्यांच्यात सुधारणा करुन तात्काळ कार्यवाही करण्यासाठी व अंतर्गत नियंत्रण सक्षम राहण्यासाठी पुर्व लेखापरीक्षक, अंतर्गत लेखापरिक्षक व करसल्लागार म्हणुन बाहेरील सक्षम संस्थेच्या नेमणुका करण्यात येतात. त्या अनुषंगाने सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरिता संस्थान, रुग्णालये विभाग, याकरिता अंतर्गत लेखापरिक्षक यांच्या नेमणुका करण्यात आल्या होत्या, त्यांची मुदत ३१ मार्च,२०१८ रोजी पुर्ण होत असल्याने पुढील आर्थिक वर्ष सन २०१८-१९ करीता अंतर्गत लेखापरिक्षकांची नेमणुक करणे आवश्यक आहे.

अंतर्गत लेखापरिक्षक नेमणुक करणेबाबत मा.विधी व न्याय विभागाचे जा.क्र. सासंवि-२०१७/ १२९४/ प्र.क्र.१३४/ का.१६/ दि.०८.११.२०१७ पत्रात नमुद केल्याप्रमाणे –

१. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) अधिनियम-२००४ मध्ये विश्वस्तव्यवस्थेच्या हिशेबाची, राज्य शासन निर्देश देईल. अशा व्यक्तीकडून पुढील लगत वर्षातील अशा तारखेपर्यंत वार्षिक लेखापरिक्षा करण्याची व्यवस्था करील, अशी तरतुद करण्यात आली आहे. सदर तरतुद विचारात घेता श्री साईबाबा संस्थानच्या वैधानिक लेखापरिक्षकांच्या नियुक्तीप्रमाणेच अंतर्गत लेखा परिक्षणासाठी लेखापरिक्षकांची नियुक्ती शासन मान्यतेनेच करणे आवश्यक आहे. सबब, याप्रमाणे भविष्यात कार्यवाही करण्यात यावी.

**विभागाचा अभिप्रायः-** उपरोक्त शासन निर्णयास अनुसरुन अंतर्गत लेखापरिक्षक कामकाजासाठी अधिक निकोप स्पर्धा होण्याच्या दृष्टीने अंतर्गत लेखापरिक्षण कामकाजासाठी नविन लेखापरिक्षण संस्थेची नेमणुक करणेकामी संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन, नामांकित संस्थांकडून (साधारणतः रु.५०० कोटींचे वर वार्षिक उलाढाल असलेल्या संस्था/ कंपन्यांचे लेखापरिक्षण करण्याचा अनूभव असलेल्या) अंतर्गत लेखापरिक्षणाच्या कामकाजासाठी बंद पाकिटामध्ये त्यांचे फिसह अर्ज मागविता येतील. मुदतीत आलेल्या अर्जांची खरेदी समिती सभेसमोर छानणी करणेत येऊन, त्यामधील पात्र संस्थाच्या फिचा तुलनात्मक तक्ता निर्णयार्थ मा.विधी व न्याय विभागाकडे सादर करता येईल. बाबत निर्णय होण्यासाठी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

निर्णय क्र.१७३ यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाचे अंतर्गत लेखापरिक्षण करणेसाठी अंतर्गत लेखापरिक्षकाची नेमणूक करणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली व अंतर्गत लेखापरिक्षक नेमणूकीसाठी अर्ज मागवितेवेळी, त्यामध्ये ०१ सनदी लेखापाल, ०२ कनिष्ठ सनदी लेखापाल, ३ ते ४ मदतनीस असावेत व त्यांनी शिर्डी येथे येऊन, प्रत्यक्ष काम करणे बंधनकारक राहील, या अटीचा समावेश करणेत यावा, असे ठरले.

यावेळी अशीही चर्चा झाली की, यापुर्वी दिनांक ०८.१२.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१०२९ मध्ये ठरलेनुसार सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षाचे विशेष लेखापरिक्षण केलेले सनदि लेखापाल मे.सुनिल अभ्यंकर अॅन्ड असो. चार्टर्ड अकौ., पुणे यांचे फीबाबत, सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षाचे वैधानिक लेखापरिक्षण केलेले सनदि लेखापाल श्री.एम.एम.चितळे यांचेकडून मागविण्यात आलेल्या अभिप्रायाचे व परिगणित केलेली सर्वसाधारण फि रु.६,८३,०००/- मात्रचा तपशील यांचे अवलोकन करण्यात येऊन, मे.सुनिल अभ्यंकर अॅन्ड असो. चार्टर्ड अकौ., पुणे यांचे फि मंजुरीचा प्रस्ताव शासनास फेरसादर करणेत यावा, असा निर्णय घेण्यात आला. (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.३६ मंदिर परिसर गेट नं.४ लगतचे संस्थान मालकीचे जागेत साईभक्तांचे सोयीसाठी पादत्राणेगृह व मोबाईल कॅमेरा क्लोकरुम सुविधा नियमित सुरु ठेवणेकामी जागा वापरास परवानगी मिळणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियमातील तरतूद-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्ट्याने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

**प्रस्ताव**– मंदिर परिसर गेट नं.४ लगतचे संस्थान मालकीचे जागेत साईभक्तांचे सोयीसाठी पादत्राणेगृह व मोबाईल कॅमेरा क्लोकरुम सुविधा नियमित सुरु ठेवणेकामी जागा वापरास परवानगी मिळणेबाबत..

**प्रस्तावना-** मा.चेअरमन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांनी त्यांचेकडील पत्र क्रं. श्रीसासंएक्रेकोसो/२९९/२०१८ दि.१६/०१/२०१८ अन्वये मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे सूचनेप्रमाणे संस्थेने साईभक्तांचे सेवेसाठी व सोईसाठी मंदिर परिसर गेट नं.४ लगत दि.१३/०१/२०१८ पासून मोफत चप्पल स्टॅण्ड सुविधा तसेच मोबाईल कॅमेरा क्लोकरुम सुविधा सुरु केलेली असून संस्थेमार्फत गेट नं.४ लगत सुरु केलेली मोफत पादत्राणेगृह तसेच मोबाईल कॅमेरा क्लोकरुम सुविधा साईभक्तांच्या सोईसाठी नियमित सुरु ठेवून संस्थेस साईभक्तांची सेवा करण्याची संधी द्यावी. संस्था संस्थानचे नियमाप्रमाणे मोबाईल कॅमेरा क्लोकरुमचे जागा भाडे व लाईट बील भरण्यास तयार आहे. तरी गेट नं.४ लगत सुरु केलेली मोफत पादत्राणेगृह विनामुल्य तसेच मोबाईल कॅमेरा क्लोकरुम सुविधा मासिक जागा भाडे व लाईट बील आकारुन जागा वापरास मिळणेस विनंती केलेली आहे.

**विभागाचा अभिप्राय**– श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी,शिर्डी यांनी साईभक्तांच्या सेवेसाठी व सोयीसाठी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे सूचनेनुसार मंदिर परिसरात संस्थान मालकीच्या सर्वे नं.१ पैकीच्या जागेत गेट नं.४ लगत चप्पल स्टॅण्डसाठी ६x३४ (२०४ चौ.फूट) व मोबाईल क्लोकरुमसाठी १०x१० फूट (१०० चौ.फूट) इतकी जागा दि.१३/०१/२०१८ पासून वापरास सुरुवात केलेली असून उक्त सोसायटी साईभक्तांना पादत्राणेगृहाची सुविधा मोफत पुरवित आहे. त्यामुळे पादत्राणेगृहासाठीची ६x३४ (२०४ चौ.फूट) इतकी जागा उक्त संस्थेस मोफत वापरास देता येईल व उक्त संस्था मोबाईल कॅमेरा क्लोकरुमची प्रति मोबाईल/ कॅमेरा रु.५/- प्रमाणे आकार घेवून मोबाईल क्लोकरुम सुविधा पुरवित आहे. त्यासाठी संस्थेमार्फत वापरात येणारी १०x१० (१०० चौ.फूट) या जागेचे सार्वजनिक बांधकाम विभाग निश्चित करील त्या भाडेदराने व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन दि.१३/०१/२०१८ ते दि.१२/१२/२०१८ या ११ महीन्यांच्या कालावधीसाठी लिव्ह अॅण्ड लायसन्स कराराने वापरास देता येईल व सदर कालावधीसाठी उक्त संस्थेकडून लिव्ह अॅण्ड लायसन्स करारनामा अटी व शर्तीवर करुन घेता येईल. त्यासाठी सदरचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१७४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास व त्यामध्ये नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**विषय नं.३७** **श्री साई संस्थान एम्पॉलाईज क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि.शिर्डी यांना साई प्रसाद निवासस्थान विभाग (इमारत नं.१ व २) निवासस्थान साईभक्तांना गरम पाणी पुरवठा करणेस मुदतवाढ देणेबाबत व दि.९.१२.२०१६ ते ३१.०७.२०१७ या कालावधीसाठी गरम पाणी पुरवठा बिलाची रक्कम अदा करणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियमातील तरतूद-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

**प्रस्ताव-** श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.,शिर्डी यांना साईप्रसाद निवासस्थान विभाग (इमारत नं.१ व २) निवासस्थानात साईभक्तांना गरम पाणी पुरवठा करणेचे व्यवसायास मुदतवाढ देणे व दि.०९/१२/२०१६ ते दि.३१/०७/२०१७ या कालावधीतील गरम पाणीपुरवठा बील अदा करणेबाबत..

**प्रस्तावना -** साईप्रसाद निवासस्थान विभाग (इमारत नं.१ व २) येथे श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.,शिर्डी यांचेमार्फत साईभक्तांना गरमपाणी रुमपर्यंत पुरविण्यात येत आहे. श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि.,शिर्डी यांना साईप्रसाद नं.१ व २ या इमारतीमध्ये दि.०९/१२/२०१५ ते दि.०८/१२/२०१६ या एक वर्षाचे कालावधीसाठी पूर्वीचेच अटी/शर्तीवर गरम पाणी पुरवठा करणेकामी खालील दरानुसार मा.त्रिसदस्य समितीचे दि.०८/१०/२०१५ रोजीच्या सभेतील निर्णय क्रं.३३३ अन्वये मुदतवाढ देणेत आलेली आहे.

| इमारतीचे नाव | भक्तांकडून आकारावयाचे प्रती बादली दर रु. | संस्थानला प्राप्त होणारी पाणी पट्टी प्रती बादली रु. | सोसायटीस प्राप्त होणारी प्रती बादली रु. |
|---|---|---|---|
| साईप्रसाद नं. १ व २ | रु.३/- | रु.१/- | रु.२/- |

उक्त कराराची मुदत दि.०८/१२/२०१६ रोजी संपुष्टात आलेली असल्याकारणाने मा.चेअरमन,श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी शिर्डी यांनी त्यांचेकडील जा.नं.श्रीसासंएक्रेकोसो/१०९/२०१६ दि.१०/०९/२०१६ रोजीच्या पत्रान्वये साईभक्तांच्या सेवेसाठी व सोयीसाठी संस्थानचे साईप्रसाद इमारत नं.१ व २ येथे चालवत असलेल्या गरम पाणी पुरवठा या व्यवसायास पुढील ५ वर्षाकरीता मुदतवाढ मिळणेकामी विनंती केलेली आहे.

सदर व्यवसाय संस्थानमार्फत करता येईल किंवा कसे याबाबतची पडताळणी करणेकामी साईप्रसाद निवासस्थान विभाग यांचेकडेस इकडील दि.१३/०३/२०१७ रोजीचे पत्रान्वये अभिप्राय मागविणेत आले. त्यास अनुसरुन त्यांनी त्यांचेकडील दि.१८/०३/२०१७ रोजीचे पत्रान्वये "साईप्रसाद नं.१ व २ या जून्या इमारती असून सदर इमारतींच्या जागेवर नवीन दर्शनलाईन इमारत बांधणेचे प्रस्तावित आहे. सदर इमारतींमधील रुमच्या बाथरुममध्येगरम पाण्यासाठी स्वतंत्र नळ कनेक्शन नाही. संस्थानला सदर इमारतींमध्ये गरम पाण्याची व्यवस्था करावयाची झाल्यास बॉयलर,कर्मचारी,सरपण इ.व्यवस्था किंवा सदर इमारतींच्या टेरेसवर सोलर सिस्टीम उभारुन संपूर्ण इमारतींच्या बाथरुममध्ये गरम पाण्याचे स्वतंत्र नळ कनेक्शन करावयाचे झाल्यास मोठया प्रमाणात खर्च येईल. त्यामुळे साईप्रसाद नं.१ व २ या इमारतींमध्येसाईभक्तांना श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि,शिर्डी यांचेमार्फत गरम पाणी पुरवठा करणेच्या व्यवसायास पुढील कालावधीसाठी मुदतवाढ देणे उचित होईल." असेबाबत अभिप्राय दिलेले आहेत.

तथापि सदर कार्यवाही चालू असतानाच दरम्यानचे कालावधीत उपरोक्त साईप्रसाद नं.१ व २ या इमारती प्रस्तावित दर्शनरांगेसाठी पाडण्यात येणार असलेने सदरचा व्यवसाय उक्त सोसायटीने दि.३१/०७/२०१७ रोजी अलाहीदा बंद केलेला आहे.

संस्थानचे साईप्रसाद निवासस्थान विभाग यांनी त्यांचेकडील जा.नं.एसएसएस/वशी-साप्रनि/ ४०२८/ २०१८ दि.१९/०१/२०१८ अन्वये मालमत्ता विभागामार्फत केलेल्या करारानुसार "श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि.शिर्डी यांनी दि.०९/१२/२०१५ ते दि.०८/१२/२०१६ अखेर एक वर्ष साईप्रसाद नं.१ व २ इमारतीत साईभक्तांना स्नानाकरीता गरम पाण्याचा पुरवठा केला आहे. त्यानंतरही सोसायटीने पुढील कालावधीत दि.३१/०७/२०१७ अखेर सदर इमारती बंद होईपर्यंत सदर ठिकाणी गरम पाण्याचा पुरवठा केलेला आहे. सदर कराराची मुदत दि.०८/१२/२०१६ रोजी संपलेली आहे. पुढील मुदतवाढीबाबत मालमत्ता विभागामार्फत कार्यवाही सुरु आहे. उक्त सोसायटीने त्यांचेकडील दि.२९/०७/२०१७ रोजीचे पत्रान्वये दि.०९/१२/२०१६ ते दि.३१/०७/२०१७ अखेर गरम पाणीपुरवठा व्यवस्थेचे बील मिळणेस विनंती केली आहे. सदर कालावधीचे बील सोसायटीला अदा करणेकामी संस्थान व सोसायटी सदर व्यवस्थेचा करारनामा होणे

आवश्यक असल्याने सदर करारनामा करणेकामी साईप्रसाद निवासस्थान विभागाने दि.१२/०८/२०१७ रोजीच्या पत्रान्वये मालमत्ता विभागास कळविलेले आहे. उक्त सोसायटीने उपरोक्त कालावधीचे गरम पाणीपुरवठा व्यवस्थेचे बील रक्कम रु.३,१८,२१९/- मात्र मिळणेकामी साईप्रसाद निवासस्थान विभागाकडे विनंती केलेली आहे. तरी श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना सदर कालावधीचे गरम पाणीपुरवठा व्यवस्थेचे बील अदा करणेकामी मालमत्ता विभागामार्फत तातडीने करारनामा करणेची कार्यवाही करावी" असेबाबत इकडेस कळविलेले आहे.

**विभागाचा अभिप्राय**–यापूर्वी उक्त सोसायटीस साईप्रसाद नं.१ व २ मधील साईभक्तांना गरम पाणी पुरवठा करणेकामीची मुदत मा.त्रिसदस्य समितीचे दि.०८/१०/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.३३३ अन्वये दि.०९/१२/२०१५ ते दि.०८/१२/२०१६ या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे दि.११/१२/२०१५ रोजी करारनामा अलाहीदा करणेत आलेला आहे.

सदरच्या व्यवसायाची मुदत दि.०८/१२/२०१६ रोजी संपुष्टात आलेने पुढील मुदतवाढ मिळणेकामी उक्त सोसायटीने विनंती केलेली आहे. सदर सोसायटीने दि.०९/१२/२०१६ ते दि.३१/०७/२०१७ अखेर उक्त इमारतीतील साईभक्तांना गरम पाणी पुरवठा केलेला आहे. सदरची मुदत अलाहीदा संपलेली असून उक्त ठिकाणी प्रस्तावित दर्शन रांगेचे बांधकाम सुरु करणेकामी साईप्रसाद नं.१ व २ या इमारती पाडणेत आल्याने सोसायटीने सदरचा व्यवसाय देखील दि.३१/०७/२०१७ पासून बंद केलेला आहे. त्यामुळे सदर मागील कालावधी दि.०९/१२/२०१६ ते दि.३१/०७/२०१७ (७ महीने २३ दिवस) या कालावधीचा करारनामा आज करणेचे प्रयोजन राहात नाही. तथापि उक्त सोसायटीने दि.०९/१२/२०१६ ते दि.३१/०७/२०१७ या कालावधीत उक्त इमारतीतील साईभक्तांना गरम पाणी पुरवठा केलेला असलेने सदर कालावधीचे मुदतीस मान्यता देणेकामी व नियमानुसार होणारे गरम पाणी पुरवठा बील रक्कम रु.३,१८,२१९/- (अक्षरी रु.तीन लाख अठरा हजार दोनशे एकोणवीस मात्र) इतकी उक्त सोसायटीस संस्थानचे साईप्रसाद निवासस्थान विभागामार्फत अदा करणेकामीचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१७५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई संस्थान एम्पॉलाईज क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि.शिर्डी यांना साई प्रसाद निवासस्थान (इमारत नं.१ व २) मधील साईभक्तांना गरम पाणी पुरवठा करणेकामी दि.३१/०७/२०१७ पर्यंत मुदतवाढ देणेस व त्यांची दि.९.१२.२०१६ ते ३१.०७.२०१७ या कालावधीमधील गरम पाणी पुरवठा बिलाची रु.३,१८,२१९/- मात्र रक्कम अदा करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

विषय नं.३८ **श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को.ऑप.सोसायटी लि.शिर्डी या संस्थेस श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाचे कर्मचारी, रुग्ण व त्यांचे नातेवाईक यांचे दुचाकी, चारचाकी वाहनांची सशुल्क पार्कींग व्यवस्था चालविण्यास परवानगी देणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियमातील तरतूद-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्ट्याने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

**प्रस्ताव**– संस्थान मालकीच्या शिर्डी येथील साईनगरच्या पाठीमागील सर्वे नं.१२५ पैकीच्या जागेत श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप सोसायटी लि, शिर्डी यांना सशुल्क पार्कींग चालविणेसाठी लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर जागा वापरास देणेबाबत..

**प्रस्तावना**– मा.चेअरमन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांनी त्यांचेकडील जा.नं. श्रीसासंएक्रेसो/२९५/२०१८ दि.१३/०१/२०१८ अन्वये श्री साईबाबा समाधी शताब्दी कालावधीमध्ये व श्री साईबाबांचे दर्शनासाठी येणा-या साईभक्तांचे सोयीसाठी तसेच श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ हॉस्पिटल येथे उपचारासाठी येणा-या रुग्णांच्या व त्यांच्या नातेवाईकांच्या दुचाकीव चारचाकी वाहनांचे सुरक्षिततेकरीता कायमस्वरुपी आपल्या संस्थानच्या मालकीच्या साईनगरचे पाठीमागील बस डेपोच्या जागेत संस्था सशुल्क कार पार्कींग व्यवस्था चालविण्यास तयार आहे. सदर व्यवस्थेसाठी पार्कींग बुकींग कॅबिन, लाईट व इतर व्यवस्था संस्थानमार्फत पुरविल्यास सदर पार्कींग व्यवस्था संस्था संस्थेच्या कर्मचा-यांमार्फत सशुल्क २४ तासासाठी बस रु.५०/-, टेम्पो रु.२५/-, कार रु.२०/- व मोटार सायकल रु.५/- याप्रमाणे पार्कींग सेवा आकार आकारुन तसेच संस्थानचे कर्मचारी यांचेकरीता मासिक नाममात्र शुल्क आकारुन चालविण्यास तयार आहे. तरी सदर पार्कींग व्यवस्था संस्थेमार्फत सशुल्क चालविणे परवानगी मिळावी,असेबाबतची विनंती केलेली आहे.

यापूर्वी संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटल विभागामार्फत साईनगर मैदानावरील डॉक्टर व स्टाफ पार्कींग भाडेतत्वावर चालविणेस देणेबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९/०३/२०१७ रोजीच्या सभेपूढे सादर करणेत आलेला होता. त्यात निर्णय क्रं.१८४ प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

"यावर सविस्तर चर्चा होऊन, साईनगर मैदानावरील डॉक्टर व स्टाफ पार्कींग भाडेतत्वावर चालविणेस देणेस मान्यता देणेत आली. परंतु संस्थानमार्फत विविध उत्सवांमध्ये साईनगर मैदानावर धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करणेत येत असते. त्यामुळे तेथे पार्कींगसाठी शेड तयार न करता आहे ते शेडही काढून घेणेत यावे."

सदर निर्णयाप्रमाणे कार्यवाही सुरु असताना दरम्यानचे कालावधीत मा.चेअरमन,श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांनी त्यांचेकडील दि.१३/०१/२०१८ रोजीच्या पत्रान्वये उपरोक्तप्रमाणे संस्थानच्या मालकीच्या साईनगरचे पाठीमागील बस डेपोच्या जागेत सशुल्क कार पार्कींग व्यवसाय चालविणेस परवानगी मिळणेकामी विनंती केलेली आहे.

**विभागाचा अभिप्राय**– उपरोक्त दि.०९/०३/२०१७ रोजीच्या मा.व्यवस्थापन समितीच्या सभेतील निर्णय क्रं.१८४ मधील साईनगर मैदानावरील डॉक्टर व स्टाफ पार्कींग सोसायटीस भाडेतत्वावर चालविणेस देणेच्या जागेऐवजी मा.चेअरमन,श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांचे उपरोक्त दि.१३/०१/२०१८ रोजीचे पत्रातील विनंतीप्रमाणे संस्थान मालकीचे सर्वे नं.१२५ पैकी सुमारे १ एकर क्षेत्रात सशुल्क पार्कींग व्यवसाय करण्यास उक्त सोसायटीस ११ महीन्यांचे लिव्ह अॅण्ड लायसन्स करारावर सार्वजनिक बांधकाम विभाग निश्चित करील या भाडेदराने व विद्युत बील आकार वेगळा आकारुन वापरास देणे,तसेच सदर व्यवस्थेसाठी पार्कींग बुकींग कॅबिन,लाईट व इतर व्यवस्था संस्थानमार्फत पुरविणे,सदर पार्कींग व्यवस्था उक्त संस्थेच्या कर्मचा-यांमार्फत सशुल्क २४ तासांसाठी बस रु.५०/-, टेम्पो रु.२५/, कार रु.२०/- व मोटार सायकल रु.५/- याप्रमाणे पार्कींग सेवा आकारणे तसेच संस्थानचे कर्मचारी यांना मासिक नाममात्र शुल्क आकारणे व त्याप्रमाणे लिव्ह अॅण्ड लायसन्स करारनामा करुन घेणेबाबतचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१७६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला व सदरहू ठिकाणी पार्किंग व्यवस्था संस्थानमार्फत मोफत करणेत यावी. तसेच वाहन पार्किंगचे ठिकाणी सुरक्षिततेच्या दृष्टीने सीसीटीव्ही कॅमेरे व सुरक्षा रक्षक ठेवणेत यावेत, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग/ संरक्षण अधिकारी)

---

विषय नं.३९ **साईप्रसाद निवासस्थान विभागाकडील चप्पल स्टॅंडसाठी बनविलेल्या ५१ स्टील रॅक श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे.को.ऑ.सोसायटी लि.शिर्डी यांचेकडे साईभक्तांच्या सेवेसाठी वापरात देणेबाबत.**

प्रस्ताव- ०१. <u>अधिनियम २००४ मधील तरतूद</u>- २१(ग) भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे. या अधिनियम व तरतुदी नुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्थे मार्फत भक्तांसाठी निवासव्यवस्था व अनुषंगीक सुविधा पुरविण्यात येते.

**०२. <u>प्रस्तावीक</u>**– दि.१६/०१/२०१८ रोजीचे आ.नं.०२१३४९ चे पत्रान्वये श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे.को. ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांनी त्यांचे संस्थेमार्फत मंदिर परिसरात साईभक्तांच्या सेवेसाठी व सोईसाठी चालवित असलेल्या चप्पल स्टॅंड सुविधेसाठी संस्थानचे साईप्रसाद निवासस्थान विभागाकडील ५१ स्टील रॅक वापरासाठी मिळणेस विनंती केलेली आहे. तसेच सदर स्टील रॅकसाठी संस्था डिपॉझीट ठेवण्यास तयार असले बाबत पत्रात नमुद केले आहे.

दि.२१/१०/२०१६ रोजीच्या मालमत्ता विभागाच्या मंजुर टिपणी अन्वये संस्थानचे मा.अध्यक्ष महोदय यांनी मंदिर परिसरात घेतलेल्या राऊंड मध्ये साईभक्तांना दर्शनाला जातांना गेटवर चप्पल, बुट ठेवणेसाठी विनामुल्य चप्पल स्टॅंड सुरु करणेच्या सुचना दिल्या होत्या. त्याअनुषंगाने साईप्रसाद निवासस्थान विभागामार्फत गेट नं.०१ व १६ गुंठे परिसरात दि.१७/११/२०१६ पासून साईभक्तांकरीता मोफत चप्पल स्टॅंडची सुविधा सुरु करणेत आली होती. सदर चप्पल स्टॅंड करीता मेकॅनिकल विभागामार्फत ५१ स्टील रॅक खरेदी करुन साईप्रसाद निवासस्थान विभागास दिल्या आहेत. त्यासाठी प्रति रॅक १४,७०५.८८ प्रमाणे एकूण ५१ रॅक साठी ७,५०,०००/- मात्र (अक्षरी – सात लाख, पन्नास हजार रुपये मात्र) खर्च आलेला आहे.

दि.२८/०४/२०१७ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समिती सभेत निर्णय क्र. ३५५ अन्वये मंदिर परिसरातील पादत्राणेगृह, बॅग क्लोकरुम, मोबाईल व कॅमेरा लॉकर या सुविधा सोसायटीस पुढील अटीवर चालविणेस देण्यात याव्या. पादत्राणेगृह व बॅग क्लोक रुम या सुविधा सोसायटीने विनामुल्य चालवाव्या व मोबाईल कॅमेरा यासाठी प्रति नग रु.०५/- मात्र आकार आकारणेत यावा असा निर्णय झालेला आहे.

सदर निर्णयास अनुसरुन गेट नं.०१ व १६ गुंठे (साईउद्यान परिसर) येथे साईप्रसाद निवासस्थान विभागामार्फत चालविणेत येत असलेले मोफत चप्पल स्टॅंड सोसायटीकडे वर्ग करणेत आले आहे. सदर चप्पल स्टॅंड मध्ये वापरासाठी असलेल्या स्टील रॅक साईप्रसाद निवासस्थान विभागाकडे उपलब्ध आहेत.

**०३. विभागाचा स्पष्ट अभिप्राय/ स्पष्ट मत–** श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे.को.ऑप.सोसायटी लि.शिर्डी ही संस्थान कर्मचा-यांचीच संस्था असून सदर संस्थेमार्फत मंदिर परिसरात साईभक्तांच्या सेवेसाठी व सोईसाठी मोफत चप्पल स्टॅंड चालविणेत येत असल्याने त्यांना मागणी प्रमाणे साईप्रसाद निवासस्थान विभागाकडे उपलब्ध असलेल्या ५१ स्टील रॅक डिपॉझीट ठेवून घेऊन वापरासाठी दिल्यास मंदिर परिसरातील चप्पल स्टॅंड आकर्षक दिसतील व साईभक्तांची सेवा-सुविधा सुलभ होईल असे मत आहे तसेच त्यांनी पत्रात चप्पल स्टॅंड रॅकसाठी डिपॉझीट ठेवण्यास तयार असले बाबत नमुद केले असलेने डिपॉझीट म्हणून रु.७,५०,०००/- मात्र सोसायटीकडून घेता येतील.

१. तरी श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे.को.ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना त्यांचे मागणीप्रमाणे चप्पल स्टॅंड रॅक वापरास देणे बाबत "अधिनियम १४(१) (२) मधील 'घ' नुसार भक्तांच्या सुरक्षिततेसाठी किंवा सोयीसाठी आवश्यक ते तातडीने उपाययोजना घेण्याचा अधिकार तसेच अधिनियम तरतुद १७ (६) नुसार आपली कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक ते सर्व अधिकार या तरतूदीस अधिन राहून" निर्णय उचित राहिल असे मत आहे.

२. तसेच अधिनियम तरतुद विश्वस्त समितीचे कर्तव्ये व अधिकार १७ (४) नुसार रु.५०,०००/- हजारा पेक्षा अधिक किमतीचे इतर जंगम मालमत्ता राज्य शासनाच्या पुर्व मंजुरी खेरीज अन्यत्र संक्रमित करण्यात येणार नाही. यास अधिन राहुन सोसायटीस चप्पल स्टॅंड रॅक वापरास देणे बाबत न्याय व विधी विभाग, मंत्रालय, मुंबई यांची मंजूरी घ्यावी लागेल.

तरी उपरोक्त अ.नं. ०१ व अ.नं.०२ नुसार श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे.को.ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना त्यांचे मागणीप्रमाणे चप्पल स्टॅंड करीता साईप्रसाद निवासस्थान विभागाकडील ५१ स्टील रॅक रु.७,५०,०००/- मात्र डिपॉझीट ठेवून घेऊन वापरासाठी देणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेत चर्चा होऊन निर्णय होणेस्तव सादर.

**निर्णय क्र.१७७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे.को.ऑ.सोसायटी लि., शिर्डी हे साईभक्तांच्या सुविधेसाठी विनामुल्य चप्पल स्टॅण्ड सेवा चालवित असल्यामुळे साईप्रसाद निवासस्थान विभागाकडील चप्पल स्टॅंडसाठी बनविलेले ५१ नग स्टील रॅक रु.७,५०,०००/- मात्र डिपॉझीट रक्कम घेऊन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे.को.ऑ.सोसायटी लि.शिर्डी यांना वापरासाठी देण्यात यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईप्रसाद निवासस्थान)

---

**विषय नं.४०** **संस्थानच्या माजी विश्वस्तांना त्यांचेसह, त्यांचे कुटूंबातील ४ व्यक्तींसाठी दर्शन व आरतीकरीता ओळखपत्र देणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतूद -** महाराष्ट्र शासनाने पुनर्घटीत केलेल्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) चे अधिनियमात "समितीची कर्तव्य व अधिकारी" या शिर्षकाखाली अधिनियम नंबर १७ (२) मधील (ठ) मध्ये "श्री साईबाबांचे जिवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लिला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील, तसेच (ड) मध्ये श्री साईबाबांच्या भक्तांमध्ये बंधुभाव, एकता, श्रध्दा आणि समता या भावना वाढीस लावणारे उपक्रम अथवा कार्यक्रम आयोजित करील किंवा हाती घेईल" अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांक-** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०२.०२.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक १३६.

**प्रस्ताविक–** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०२.०२.२०१८ रोजीच्या सभेत, "संस्थानच्या माजी विश्वस्तांना त्यांचेसह, त्यांचे कुटूंबातील ४ व्यक्तींसाठी दर्शन व आरतीकरीता ओळखपत्र देण्यात यावे. यासाठीच्या नियमावलीचा सविस्तर प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा." असा निर्णय झालेला आहे. सदरचे निर्णयान्वये मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविस्तर प्रस्ताव सादर करणेसाठी संस्थानचे माजी विश्वस्तांची माहिती घेतली असता खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झालेली आहे.

**सन १९८४-१९८९ चे व्यवस्थापन मंडळ**

| अ.नं | नांव | अ.नं. | नांव |
|---|---|---|---|
| ०१ | मा.डॉ.पी.के.सावंत, अध्यक्ष | ०२ | मा.श्री.तुकाराम आर.बोरावके |
| ०३ | मा.श्री.श्रीपाद बी.दर्प | ०४ | मा.श्री.सिताराम एस.धानू |
| ०५ | मा.श्री.श्रीपतराव एम.जाधव | ०६ | मा.श्री.एम.नेमीचंद जैन |
| ०७ | मा.श्री.के.एच.काकरे | ०८ | मा.श्री.प्रकाश व्ही.कारखानीस |
| ०९ | मा.श्री.मधुकर डी.जोशी | १० | मा.श्री.के.आर.कोळी |
| ११ | मा.श्री.वसंत एम.को-हाळकर | १२ | मा.श्री.गोपीनाथ बी.कोते |
| १३ | मा.श्री.भिमाशंकर व्ही.खांबेकर | १४ | मा.श्री.व्ही.बी.खेर |
| १५ | मा.श्री.नटवरलाल सी.मोदी | १६ | मा.श्री.जे.पी.सावे |
| १७ | मा.श्री.संभाजी व्ही.सावंत | १८ | मा.श्री.जे.आर.शहा |
| १९ | मा.श्री.शिवराम आर.शिंदे | २० | मा.श्री.गणपतराव टी.शेळके |
| २१ | मा.श्री. रामराव आर.शेळके | २२ | मा.मिस.रेखा जी. दिघे |

**सन १९८९-१९९४ चे व्यवस्थापन मंडळ**

| अ.नं | नांव | अ.नं. | नांव |
|---|---|---|---|
| ०१ | मा.डॉ.लेखा पाठक, अध्यक्षा | ०२ | मा.श्री.हेमराज शहा |
| ०३ | मा.श्री.मनोहर एन.गोगटे | ०४ | मा.श्री.ब्रिजमोहन भामशा |
| ०५ | मा.श्री.पृथ्वीराज आर.आदिक | ०६ | मा.श्री.शिवराम आर.शिन्दे |
| ०७ | मा.श्री.राजीव पी.कुलकर्णी | ०८ | मा.डॉ.एकनाथ बी.गोंदकर |
| ०९ | मा.श्री.प्रभाकर टी.बोरावके | १० | मा.श्री.शिमाशंकर व्ही.खांबेकर |
| ११ | मा.श्री.बाबुराव ए.नरोडे पाटील | १२ | मा.श्री.दादासाहेब एस.रोहमारे |
| १३ | मा.श्री.प्रभाकर बी.बोरावके | १४ | मा.श्री.उत्तम आर.शेळके |
| १५ | मा.श्री.सोपान एम.धोर्डे | १६ | मा.श्री.कारभारी बी.देवकर |
| १७ | मा.श्री.अनंतकुमार के.पाटील | १८ | मा.श्री.मोतीराम एस पवार |
| १९ | मा.श्री.प्रशांत व्ही.हिरे | २० | मा.प्रो.एन.एस.फरांदे |
| २१ | मा.श्री.आण्णासाहेब एस.म्हस्के | २२ | मा.श्री.दिलीप ए.शिन्दे |
| २३ | मा.श्री.मोहन मो.जयकर | २४ | मा.श्री.गोपीनाथ बी.कोते |

**सन १९९४-१९९९ चे व्यवस्थापन मंडळ**

| अ.नं | नांव | अ.नं. | नांव |
|---|---|---|---|
| ०१ | मा.श्री.दत्तात्रय म.सुकथनकर, अध्यक्ष | ०२ | मा.श्री.मोहन मो.जयकर |
| ०३ | मा.श्री.रमेश दा.सोनी | ०४ | मा.मिस.रेखा ग.दिघे |
| ०५ | मा.श्री.प्रकाश व.कारखानीस | ०६ | मा.श्री.मुकेश र.पटेल |
| ०७ | मा.श्री.मधुकर द.जोशी | ०८ | मा.श्री.प्रकाश प्र.वैशंपायन |
| ०९ | मा.श्री.मधुकर ज.गर्दे पाटील | १० | मा.श्री.देवकीनंदन शं.सारस्वत |
| ११ | मा.श्री.आप्पासाहेब खं.कोते | १२ | मा.श्री.रायभान ग.चिने |
| १३ | मा.श्री.भास्कर शं.बोरावके | १४ | मा.श्री.आण्णासाहेब एस.म्हस्के |
| १५ | मा.श्री.राजीव पुं.रोहम | १६ | मा.श्री.संभाजी कि.काळे |
| १७ | मा.श्री.अशोक भि.खांबेकर | १८ | मा.श्रीमती प्रेमाबाई सो.बज |
| १९ | मा.श्री.रामचंद्र नि.गोसावी | २० | मा.श्री.प्रभाकर तु.बोरावके |
| २१ | मा.श्री.सोपान मा.धोर्डे | | |

## सन १९९९-२००४ चे व्यवस्थापन मंडळ

| अ.नं | नांव | अ.नं. | नांव |
|---|---|---|---|
| ०१ | मा.श्री.दत्तात्रय म.सुकथनकर, अध्यक्ष | ०२ | मा.श्री.मोहन मो.जयकर |
| ०३ | मा.श्री.रमेश दा.सोनी | ०४ | मा.श्री.प्रकाश प्र.वैशंपायन |
| ०५ | मा.श्री.भास्करराव शंकराराव बोरावके | ०६ | मा.श्री.राजीव पुंडलिकराव रोहम |
| ०७ | मा.श्री.शामसुंदर लक्ष्मण शहाणे | ०८ | मा.श्री.चांगदेव नामदेव डुबेपाटील |
| ०९ | मा.डॉ.अजेय चंद्रकान्त गर्जे | १० | मा.श्री.कैलास गोविंदराव कोते पाटील |
| ११ | मा.श्री.देवराम बंडू पवार | १२ | मा.श्री.शांताराम रंगनाथ मिराणे |
| १३ | मा.श्री.प्रदिप रतीलाल पटेल | १४ | मा.श्री.प्रकाश दशरथराव वागस्कर |
| १५ | मा.श्री.दास हणमंत इनामदार | १६ | मा.डॉ.अरुण दिगंबर रासने |
| १७ | मा.श्री.रमेश महादेव केंगे | १८ | मा.डॉ.विलास दत्तात्रय पोतनीस |
| १९ | मा.डॉ.तुकाराम सी.राठोड | २० | मा.सौ.सुनीता विजय क्षिरसागर |
| २१ | मा.श्री.मधुकर सोपानराव दंडवते | | |

## सन २००४-२०१२ व्यवस्थापन समिती

| अ.नं | नांव | अ.नं. | नांव |
|---|---|---|---|
| ०१ | मा.श्री.जयंत मुरलीधर ससाणे, अध्यक्ष | ०२ | मा.श्री.शंकरराव गेणूजी कोल्हे |
| ०३ | मा.श्री.राधाकृष्ण एकनाथराव विखे पाटील | ०४ | मा.श्री.पांडुरंग गमाजी अभंग |
| ०५ | मा.श्री.सुरेश गोरक्षनाथ वाबळे | ०६ | मा.श्रीमती.उर्मिला प्रदीप जाधव |
| ०७ | मा.श्री.शैलेश श्रीहरी कुटे | ०८ | मा.श्री.समि खतिब |
| ०९ | मा.श्रीमती.रिम्पल लोहिया | १० | मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर |
| ११ | मा.श्री.रमाकांत गणेश कर्णिक | १२ | मा.कॅप्टन सुरेश वासुदेवा |
| १३ | मा.श्री.अशोक भिमाशंकर खांबेकर | १४ | मा.श्री.कृष्णचंन्द्र श्यामसुन्दर पाण्डेय |
| १५ | मा.डॉ.पी.एल.तिवारी | १६ | मा.सौ.सुमित्रा कैलास कोते |

## २७.०३.२०१२ ते २९.०३.२०१२ व्यवस्थापन समिती

| अ.नं | नांव | अ.नं. | नांव |
|---|---|---|---|
| ०१ | मा.श्री.जयंत मुरलीधर ससाणे, अध्यक्ष | ०२ | मा.श्री.घनःश्याम प्रतापराव शेलार |
| ०३ | मा.श्री.राधाकृष्ण एकनाथराव विखे पाटील | ०४ | मा.श्री.विलास यादवराव कोते |
| ०५ | मा.डॉ.प्रकाश भास्करराव नांदूरकर | ०६ | मा.डॉ.नामदेव तुषार गुंजाळ |
| ०७ | मा.श्री.शैलेश श्रीहरी कुटे | ०८ | मा.श्री.सुरेश जी.वाधवा |
| ०९ | मा.श्री.राजेंद्र मदनलाल पिपाडा | १० | मा.ॲड.सुरेंद्र माधवराव खर्डे |
| ११ | मा.सौ.स्नेहलता बिपीन कोल्हे | १२ | मा.श्री.अजित सर्जेराव कदम |
| १३ | मा.श्री.मिनानाथ सखाराम पांडे | १४ | मा.श्री.पतिंगराव रंगनाथ शेळके |
| १५ | मा.सौ.सुमित्रा कैलास कोते | | |

## सन २०१२ ते २०१६ त्रिसदस्य समिती

| अ.नं | नांव | कालावधी |
|---|---|---|
| मा.प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधिश तथा त्रिसदस्य समिती अध्यक्ष | | |
| ०१ | मा.श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी | ३१.०३.२०१२ ते २०.०३.२०१४ |
| ०२ | मा.श्री.बी.यु.देबडवार | २१.०३.२०१४ ते २०.०४.२०१४ |
| ०३ | मा.श्री.शशिकांत कुलकर्णी | २०.०४.२०१४ ते ०३.०१.२०१५ |
| ०४ | मा.श्री.विनय जोशी | १७.०१.२०१५ ते १९.०९.२०१५ |
| ०५ | मा.श्री.श्रीकांत कुलकर्णी | २२.०९.२०१५ ते २७.०७.२०१६ |
| मा.जिल्हाधिकारी तथा त्रिसदस्य समिती सदस्य | | |

| | | |
|---|---|---|
| ०१ | मा.डॉ.सजीवकुमार दयाल | ३१.०३.२०१२ ते ०७.०२.२०१४ |
| ०२ | मा.श्रीमती रुबल अग्रवाल | ०८.०२.२०१४ ते १५.०२.२०१४ |
| ०३ | मा.श्री.अनिल कवडे | १६.०२.२०१४ ते २७.०७.२०१६ |
| **मा.कार्यकारी अधिकारी तथा त्रिसदस्य समिती सदस्य** | | |
| ०१ | मा.श्री.किशोर रामराव मोरे | ३१.०३.२०१२ ते ३१.०७.२०१३ |
| ०२ | मा.श्री.अजय मोरे (उपविभागीय अधिकारी) | २९.०९.२०१३ ते ०९.०६.२०१४ |
| ०३ | मा.श्री.कुंदनकुमार सोनवणे (उपविभागीय अधिकारी) | ०९.०६.२०१४ ते २९.०९.२०१४ |
| ०४ | मा.श्री.राजेंद्र मारुती जाधव | २९.०९.२०१४ ते ३१.०८.२०१५ |
| ०५ | मा.श्री.बाजीराव वाल्मीक शिंदे | ०३.०९.२०१५ ते २७.०७.२०१६ |

**नगराध्यक्ष शिर्डी, नगरपंचायत पदसिध्द सदस्य**

| अ.नं | नांव | कालावधी |
|---|---|---|
| ०१ | मा.श्री.कैलास गोविंदराव कोते | ०१.०९.२००४ ते १४.१०.२००६ |
| ०२ | मा.सौ.सुमित्रा कैलास कोते | ०६.०१.२००७ ते १७.०५.२००९ |
| ०३ | मा.सौ.जयश्री विष्णु थोरात | २१.०६.२००९ ते १०.१०.२०१० |
| ०४ | मा.सौ.अलका बाळू शेज्वळ | २१.११.२०१० ते १९.११.२०११ |
| ०५ | मा.सौ.सुमित्रा कैलास कोते | १३.०१.२०१२ ते २५.०३.२०१२ |
| ०६ | मा.सौ.अनिता विजय जगताप | ०७.०८.२०१६ ते २२.१२.२०१६ |

**माहे जुलै २०१६ ते आज अखेर पर्यंत**

| अ.नं | नांव |
|---|---|
| ०१ | मा.श्री.सचिन भागवत तांबे |

**यासंदर्भात मा.व्यवस्थापन समितीचे सभेत खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.**

**अ)** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १४.११.२०१३ चे सभेतीलल निर्णय क्रमांक ९०७ व दिनांक २२.१२.२०१६ चे सभेतील निर्णय क्रमांक ९०५ मधील नं.(१) “शिर्डीतील ग्रामस्थांची आरती व्यवस्था मोफत केली जाते, ती यापुढेही सुरु ठेवावी. ग्रामस्थांची ओळख पटण्यासाठी त्यांचे आधारकार्ड/निवडणूक ओळखपत्र गृहीत धरण्यात यावे.” असा आहे.

**आ)** मा.व्यवस्थापन समितीचे ०९.१२.२०१४ चे सभेतील निर्णय क्रमांक १०४१ (१),“मा.उच्च न्यायालयाने नेमणूक केलेल्या तदर्थ त्रीसदस्यीय समितीचे अध्यक्ष, सदस्य व उपकार्यकारी अधिकारी यांचा कार्यभार संपुष्ठात आल्यानंतरही त्यांना वैयक्तिक + ४ व्यक्ती याप्रमाणे जनसंपर्क कार्यालयामार्फत प्राधान्याने संस्थानच्या प्रचलित पध्दतीने दर्शन/आरतीची व्यवस्था करणेत यावी. तसेच या निर्णयामध्ये बदल करावयाचा असल्यास मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेण्यात यावी.” असा आहे.

**इ)** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १६.०२.२०१६ चे सभेतील निर्णय क्रमांक ५७०, “प्रस्तावात नमुद केलेल्या अडचणी, जनरल दर्शनरांगेतील साईभक्तांच्या भावना, तसेच गर्दीचे नियोजन या बाबींचा विचार करता, शिर्डी ग्रामस्थांना श्रींचे दर्शनासाठी पुर्ववत गावकरी गेट चालू करणेस मान्यता देण्यात आली.” असा आहे.

सभाकामकाज विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार सदरचे यादीमध्ये १३९ माजी विश्वस्तांची नांवे नमुद आहेत. त्यापैकी काही विश्वस्त हयात नाहीत, काही विश्वस्तांची एका पेक्षा जास्त वेळा विश्वस्त म्हणून नेमणूक झालेली आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०२.०२.२०१८ रोजीचे सभेत झालेल्या निर्णयान्वये संस्थानच्या माजी विश्वस्तांना त्यांचेसह, त्यांचे कुटूंबातील ४ व्यक्तींसाठी दर्शन व आरतीकरीता ओळखपत्र देणेबाबतचा प्रस्ताव सादर करणेबाबत कळविले आहे. त्यानुसार साधारणपणे खालील मुद्दयांवर मार्गदर्शन होणे आवश्यक आहे.

१) माजी विश्वस्तांचे कुटूंबातील त्यांचेसह (१+३ = ४) व्यक्तींची मोफत दर्शन/आरती व्यवस्था करावी, तथापि माजी विश्वस्तांचे कुटूंबातील त्यांचेसह इतर कोणत्या ०३ व्यक्तींची मोफत दर्शन/आरतीची व्यवस्था करावी?

२) ०४ पेक्षा जास्त व्यक्ती आल्यास त्यांची प्रचलित पध्दतीने नियमाप्रमाणे शुल्क आकारुन दर्शन/ आरतीची व्यवस्था करावी किंवा कसे?

३) माजी विश्वस्तांची महिन्यातून, वर्षातून किती वेळा मोफत दर्शन/आरतीची व्यवस्था करावी?

४) माजी विश्वस्त हयात असे पर्यंत सदरचे ओळखपत्र ग्राह्य राहील.

५) ओळखपत्रावर माजी विश्वस्तांचा फोटो व नांव तसेच त्यांचे कुटूंबातील इतर ०३ व्यक्तींची फक्त नांवे नमुद करण्यात येतील. श्री साईबाबांच्या दर्शन/आरतीसाठी येतांना ओळखपत्रावर नमुद इतर ०३ व्यक्तींनी आपले आधार कार्ड बरोबर आणणे आवश्यक राहील.

६) माजी विश्वस्तांची दर्शन/आरतीची व्यवस्था कोणत्या गेटने करावी?

७) मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १४.११.२०१३, २२.१२.२०१६ व १६.०२.२०१६ चे सभेतील निर्णयानुसार शिर्डीतील ग्रामस्थांची दर्शन/आरतीची व्यवस्था गांवकरी गेटने मोफत करण्यात येते. तरी शिर्डीतील माजी विश्वस्तांना मोफत दर्शन/आरतीकरीता ओळखपत्र देण्याची आवश्यकता नाही असे मत आहे.

सदरच्या विषयास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता मिळाल्यानंतर माजी विश्वस्तांना दर्शन/ आरतीसाठी द्यावयाचे ओळखपत्र बनविण्यासाठीचा मसुदा मान्यकरुन ओळखपत्र तयार करुन देण्याची कार्यवाही सामान्य प्रशासन विभागामार्फत करता येईल. याकामी सामान्य प्रशासन विभागास सी.सी.टी.व्ही.विभाग व ई.डी.पी.विभाग श्री साईबाबा हॉस्पिटल यांनी आवश्यक ते सहकार्य करावे. माजी विश्वस्त ज्यावेळी दर्शन/आरतीस येतील त्यावेळी ओळखपत्र पाहून त्यांची मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार दर्शन/आरतीची व्यवस्था जनसंपर्क विभाग/संरक्षण विभागाने करावी. याप्रमाणे कार्यवाही करणेस व सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीपुढे सादर करणेस मान्यता असावी.

**मागणी**– संस्थानचे माजी विश्वस्त व त्यांचे कुटूंबातील ०३ व्यक्तींची मोफत दर्शन/ आरतीची व्यवस्था करणेसाठी ओळखपत्र तयार करणेबाबत.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत** – मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०२.०२.२०१८ रोजीचे सभेतील निर्णयान्वये संस्थानच्या माजी विश्वस्तांना त्यांचेसह, त्यांचे कुटूंबातील ४ व्यक्तींसाठी दर्शन व आरतीकरीता ओळखपत्र देणेबाबत खालील मुद्दयांवर मार्गदर्शन होणे आवश्यक आहे.

१) माजी विश्वस्तांचे कुटूंबातील त्यांचेसह (१+३ = ४) व्यक्तींची मोफत दर्शन/आरती व्यवस्था करावी, तथापि माजी विश्वस्तांचे कुटूंबातील त्यांचेसह इतर कोणत्या ०३ व्यक्तींची मोफत दर्शन/आरतीची व्यवस्था करावी? याबाबत निर्णय होणे आवश्यक आहे.

२) ०४ पेक्षा जास्त व्यक्ती आल्यास त्यांची प्रचलित पध्दतीने नियमाप्रमाणे शुल्क आकारुन दर्शन/ आरतीची व्यवस्था करावी किंवा कसे?

३) माजी विश्वस्तांची महिन्यातून, वर्षातून किती वेळा मोफत दर्शन/आरतीची व्यवस्था करावी?

४) माजी विश्वस्त हयात असे पर्यंत सदरचे ओळखपत्र ग्राह्य राहील.

५) ओळखपत्रावर माजी विश्वस्तांचा फोटो व नांव तसेच त्यांचे कुटूंबातील इतर ०३ व्यक्तींची फक्त नांवे नमुद करण्यात येतील. श्री साईबाबांच्या दर्शन/आरतीसाठी येतांना ओळखपत्रावर नमुद इतर ०३ व्यक्तींनी आपले आधार कार्ड बरोबर आणणे आवश्यक राहील.

६) माजी विश्वस्तांची दर्शन/आरतीची व्यवस्था कोणत्या गेटने करावी?

७) मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १४.११.२०१३, २२.१२.२०१६ व १६.०२.२०१६ चे सभेतील निर्णयानुसार शिर्डीतील ग्रामस्थांची दर्शन/आरतीची व्यवस्था गांवकरी गेटने मोफत करण्यात येते. तरी शिर्डीतील माजी विश्वस्तांना मोफत दर्शन/आरतीकरीता ओळखपत्र देण्याची आवश्यकता नाही असे मत आहे.

तसेच सदरच्या विषयास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता मिळाल्यानंतर माजी विश्वस्तांना दर्शन/ आरतीसाठी द्यावयाचे ओळखपत्र बनविण्यासाठीचा मसुदा मान्यकरुन ओळखपत्र तयार करुन देण्याची कार्यवाही सामान्य प्रशासन विभागामार्फत करता येईल. याकामी सामान्य प्रशासन विभागास सी.सी.टी.व्ही.विभाग व ई.डी.पी. विभाग श्री साईबाबा हॉस्पिटल यांनी आवश्यक ते सहकार्य करावे. माजी विश्वस्त ज्यावेळी दर्शन/

आरतीस येतील त्यावेळी ओळखपत्र पाहून त्यांची मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार दर्शन/आरतीची व्यवस्था जनसंपर्क विभाग/ संरक्षण विभागाने करावी.

तरी उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करणेस व याकामी येणा-या सर्वसमावेशक खर्चास मान्यता मिळणेसाठी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१७८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानच्या हयात असलेल्या सर्व माजी विश्वस्तांना (त्रीसदस्य समिती सदस्य व स्थानिक विश्वस्तांसह) त्यांचेसह, त्यांचे कुटूंबातील ४ व्यक्तींसाठी दर्शन/ आरतीकरीता ओळखपत्र देणेस व त्यासाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- जनसंपर्क अधिकारी)

---

विषय नं.४१ **साईआश्रम भक्तनिवास येथील A,B व C इमारतीतील एसी यंत्रणेचे सन २०१८-२०१९ या एक वर्ष कालावधी करीता मे.डायिकन एअर कंडीशनींग इंडीया प्रा.लि.यांना वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (AMC) देणेसाठी मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियमामधील तरतूद २०१४** : (1) कलम २(१४)(घ) – भक्तांचे सुरक्षिततेसाठी किंवा सोयीसाठी आवश्यक ते तातडीचे दुरुस्तीचे काम किंवा उपाययोजना हाती घेणे (२) कलम २१(१)(क) मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन

**प्रस्तावना** : शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचेमार्फत देणगीदाखल साईआश्रम भक्तनिवास येथे A,B,C या तीन इमारतीमध्ये प्रत्येकी १२८ रुम नुसार एकूण ३८४ रुममध्ये डायकीन कंपनीचे VRV (Variable Refrigerant Volume) टाईप ए.सी. यंत्रणा बसवून दिलेली आहे. सदरची यंत्रणा दिनांक ११/०१/२०१३ रोजीपासून कार्यान्वित झालेली आहे. शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई व डायकीन एअर कंडीशनिंग इंडिया प्रा. लि. यांचेत सदर यंत्रणा बसविणेकामी दिलेल्या कार्यादेशाच्यावेळी करण्यात आलेल्या करारनाम्यात खालीलप्रमाणे तरतूद करण्यात आलेली आहे.

"Cost of Annual Maintenance Charges (AMC) after the warranty period, will be Rs. 6,10,500/- per year. The AMC will be comprehensive and will include cost of labour and parts. Other Taxes on the AMC Charges will be paid at actuals. The AMC Price will remain fixed and confirmed as valid for 8 years after warranty, by Dalkin (i.e.) 10 years from the date of acceptance of the installation."

सदर यंत्रणेचा वारंटी कालावधी दिनांक १०/०१/२०१५ रोजी संपुष्टात आलेला असल्याने उपरोक्त नमूद करारनाम्यातील अटी व शर्थीनुसार तसेच मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक-२५/०२/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र. १५१ अन्वये साईआश्रम भक्तनिवास येथील A, B व C इमारतीतील VRV ए.सी. यंत्रणेचे एक वर्षे (दिनांक ०१/०४/२०१७ ते ३१/०३/२०१८) कालावधीसाठी मे. डायकीन एअर कंडीशनिंग इंडिया प्रा. लि. यांना इकडील जा.नं.एसएसएस/वशी/मेकॅनिकल/६५८०/२०१७ दि. ३१/०३/२०१७ अन्वये वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (AMC) करीता कार्यादेश देण्यात आलेला आहे.

**मागणी**: मे.डायकीन एअर कडीशनिंग इंडिया प्रा. लि., पुणे यांना देण्यात आलेल्या AMC कार्यादेशाची मुदत दिनांक ३१/०३/२०१८ रोजी संपुष्टात येत असून, त्यापुढील एक वर्ष कालावधीकरीता त्यांना AMC देणे आवश्यक आहे. त्याकरीता शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई व मे. डायकीन एअर कंडीशनिंग इंडिया प्रा. लि. यांच्यात झालेल्या करारनाम्यातील अटी व शर्थीनुसार वारंटी कालावधी संपलेपासून पुढील 8 वर्षाचे कालावधीसाठी वार्षिक ए.एम.सी. करीता प्रत्येक वर्षी रक्कम रुपये ६,१०,५००/- + टॅक्सेस याप्रमाणे दर निश्चिती करण्यात आली आहे. या ८ वर्ष कालावधीपैकी ३ वर्षाचा कालावधी पूर्ण झालेला असून, पुढील ५ वर्षाचा कालावधी बाकी आहे. प्रत्येक वर्षी ए.एम.सी. कामी अदा करावयाची रक्कम निश्चित करण्यात आलेली असल्याने, AMC करीता पुढील एक वर्ष कालावधीसाठी (दिनांक ०१/०४/२०१८ ते ३१/०३/२०१९ पर्यत) कार्यादेश देणे आवश्यक आहे.

मे. डायकीन एअर कंडीशनिंग इंडिया प्रा. लि. यांना AMC करीता कार्यादेश देणेकामी तसेच AMC कामी वार्षिक रक्कम रुपये ६,१०,५००/- + टॅक्सेस याप्रमाणे अदा करणेसाठी मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी लागणार आहे.

**विभागाचे स्पष्ट मत**:- साईआश्रम भक्तनिवास येथील A, B व C इमारतीतील ए.सी. यंत्रणेचे पुढील एक वर्षाचे कालावधीसाठी (दिनांक ०१/०४/२०१८ ते ३१/०३/२०१९ पर्यत) उत्पादक कंपनी मे. डायकीन एअर कंडीशनिंग इंडिया प्रा. लि., पुणे यांना वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (AMC) देणेकामी येणा-या रुपये ६,१०,५००/- + टॅक्सेस खर्चास मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.१७९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम भक्तनिवास येथील A, B व C इमारतीतील ए.सी. यंत्रणेचे पुढील एक वर्षाचे कालावधीसाठी (दिनांक ०१/०४/२०१८ ते ३१/०३/२०१९ पर्यत) उत्पादक कंपनी मे.डायकीन एअर कंडीशनिंग इंडिया प्रा. लि., पुणे यांना वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (AMC) देणेस व त्याकामी येणाऱ्या रु.६,१०,५००/- + टॅक्स मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

**विषय नं.४२** **श्री साईबाबा हॉस्पिटल तसेच श्री साईनाथ हॉस्पिटल येथील एसी यंत्रणेचे दि.१.६.२०१८ ते दि.३१.५.२०१९ या एक वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेकरीता ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये सर्व ऑपरेशन शिएटर्स व आय.सी.सी.यु. मध्ये सेंट्रल ए.सी. प्लांटच्या एकूण 13 यंत्रणा तसेच स्पिलट टाईप ए.सी. एकूण 71 नग, मॉरच्युरी 2 नग, मेडीसीन कोल्ड स्टोअर 1 नग आणि डोमेस्टिक फ्रिज एकूण 26 नग कार्यान्वित आहे. त्याचप्रमाणे श्री साईनाथ हॉस्पीटलमध्ये स्प्लिट टाईप ए.सी. एकूण 38 नग आणि डोमेस्टिक फ्रिज एकूण 24 नग कार्यान्वित आहे. ऑपरेशन शिएटरमध्ये ऑपरेशन करतेवेळी व नंतर आय.सी.यु. वॉर्डमध्ये ठेवण्यात येते. काही वेळा या यंत्रणेमधील काही स्पेअरपार्ट खराब झाल्यास ते तातडीने बदलणे गरजेचे असते. त्याकरीता सदरचे स्पेअरपार्टची खरेदी करावी लागते. प्रत्येक कंपनीचे स्पेअरपार्ट हे दुस-या कंपनीच्या स्पेअरपार्ट पेक्षा वेगळे असल्याने तसेच सदरचे स्पेअरपार्ट हे जवळपास उपलब्ध होत नसल्याने ते थेट मुंबई, पुणे येथून खरेदी करावे लागतात. त्यामुळे हे स्पेअरपार्ट मिळवून फिटींग करुन यंत्रणा कार्यान्वित होईपर्यत पर्यायाने ए.सी. यंत्रणा काही वेळा बंद ठेवावी लागते अथवा कमी क्षमतेवर कार्यान्वित ठेवावी लागते. सदरचा स्पेअरपार्ट उपलब्ध झाल्यानंतर तो बसवून ए.सी. यंत्रणा पूर्ण क्षमतेने कार्यान्वित केली जाते किंवा एखाद्या वेळी संबंधीत कंपनीचे प्रतिनिधी यांना बोलावून दुरुस्ती करुन घ्यावी लागते. यासाठी प्रत्येक वर्षी सदर यंत्रणेची देखभाल व दुरुस्ती करणेकामी वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देण्यात येते.

मागील वर्षी मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक- २३/०५/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४१९(०८) अन्वये श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ हॉस्पीटल येथील ए.सी. यंत्रणेचे सन २०१७-२०१८ या एक वर्षाचे वार्षिक कॉम्प्रेसिव्ह् सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट् (CAMC) देणेकामी मे. कैलास रेफ्रिजरेशन वर्क्स, मुंबई यांना दिनांक ०१/०६/२०१७ ते ३१/०५/२०१८ या कालावधीकरीता रुपये १०,७६,५००/- मात्रचे रकमेस कार्यादेश देण्यात आला आहे. या सर्व्हीस कॉन्ट्रॅक्टचा कालावधी दिनांक ३१/०५/२०१८ रोजी संपत आहे. ए.सी. यंत्रणा व्यवस्थित कार्यरत राहणेकरीता पुढील एक वर्षाकरीता CAMC देणे आवश्यक आहे.

श्री साईबाबा संस्थानमधील श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ हॉस्पीटल येथील ए.सी यंत्रणेचे पुढील एक वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह् सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट् (CAMC) देणेकामी मागील वर्षीचे प्राप्त दरानुसार अंदाजे अपेक्षित खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे:

| अ.नं. | तपशील | २०१७-२०१८ या वर्षातील कार्यादेशातील रक्कम रुपये | सन २०१८-२०१९ वर्षाकरीता अपेक्षित खर्च रुपये (मागिल एकूण खर्चात ५% रक्कम वाढ गृहीत धरुन) |
|---|---|---|---|
| ०१ | CAMC of Central AHU with condensing units & other air conditioning units insatalled Installed in Shri Saibaba Hospital & Shri Sainath Hospital as per attached list. | १०,७६,५००/- | ११,३०,३२५/- |

उपरोक्तप्रमाणे श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ हॉस्पीटल येथील ए.सी यंत्रणेचे सन २०१८-२०१९ या वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट् (CAMC) देणेकामी अंदाजे रक्कम रुपये - ११,३०,३२५/- (अक्षरी रक्कम रुपये - अकरा लाख, तीस हजार,तीनशे, पंचवीस) मात्रचा खर्च अपेक्षित आहे. सदरील खर्च इकडील विभागाचे मंजूर अंदाजपत्रका- मध्ये तरतूद केलेल्या '*मशीनरी दुरुस्ती व देखाभाल खर्च*' या शिर्षाखालील रक्कमेतून करता येईल. याकामी महाराष्ट्र शासनाचे www//mahatenders.gov.in या संकेतस्थळावर जाहीरात नोटीस अपलोड करुन कंत्राटदारांकडून ई-निविदा मागवाव्या लागतील. या कार्यवाहीस मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी लागेल.

तरी उपरोक्तप्रमाणे श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ हॉस्पीटल येथील ए.सी यंत्रणेचे एक वर्षाचे करीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह् सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट् (CAMC) देणेकामी ई-निविदा मागविणेस व याकामी येणा-या अपेक्षित खर्चास मान्यता घेणेकामी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.१८०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ हॉस्पीटल येथील ए.सी. यंत्रणेचे एक वर्ष कालावधीसाठी वार्षिक कॉम्प्रेसिव्ह् सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट् (CAMC) देणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व याकामी येणाऱ्या अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

**विषय नं.४३** **श्री साईप्रसादालयातील वायुवीजन यंत्रणेचे दि.१.६.२०१८ ते दि.३१.५.२०१९ या एक वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रक्ट (CAMC) देणेकरीता ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साई प्रसादालय येथील मुख्य् किचन, बुंदी किचन, लाडू किचन, पुरी किचन तसेच चपाती किचन येथील कर्मचाऱ्यांना उन्हाळ्यात त्याठिकाणी काम करणे सुसह्य व्हावे म्हणून तापमान सुस्थितीत ठेवणेसाठी बाहेरुन गार हवेचा झोत सोडून तापमान नियंत्रणात ठेवणे तसेच हवेतील आर्द्रता नियंत्रणात ठेवणे जेणेकरुन त्या-त्या किचनमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना श्वास घेण्यास त्रास होऊ नये. शिवाय किचनमधील जळालेले तेलाचे बाष्प् आणि इतर घाण एक्झॉस्टव्दारे बाहेर जावी याकरीता ८ नग डक्टेबल वायुविजन यंत्रणा व १० नग सेंट्रीफ्युगल डक्टेबल एक्झॉस्ट यंत्रणा डिसेंबर, २००८ पासून कार्यान्वित करण्यात आलेली आहे.

सदरची वायुविजन यंत्रणा सतत कार्यान्वित असते. सततच्या वापरामुळे वायुविजन यंत्रणेत बिघाड झाल्यास तेथील किचनमध्ये तापमान वाढून आर्द्रता कमी होऊन काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना श्वसनाचा त्रास होऊ शकतो. प्रसंगी सदरचा कर्मचारी बेशुध्दसुध्दा पडू शकतो. त्याकरीता वायुविजन यंत्रणा तातडीने दुरुस्त् करुन चालू करणे गरजेचे असते. अशावेळेस वायुविजन यंत्रणा दुरुस्तीकरीता लागणारे स्पेअरपार्ट त्वरीत उपलब्ध् असणे गरजेचे आहे. जर स्पेअर्स उपलब्ध् नसतील तर वायुविजन यंत्रणेचे दुरुस्ती कामामध्ये अडचण निर्माण होते व कर्मचाऱ्यांच्या प्रकृतीला त्रास होऊन कामकाजात खंड पडू शकतो.

मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक- २३/०५/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ४१९(९) अन्वये श्री साई प्रसादालयातील वायुविजन यंत्रणेचे सन २०१७-२०१८ या एक वर्षाचे वार्षिक कॉम्प्रेसिव्ह् सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट् (CAMC) देणेकामी मे. कैलास फेब्रीकेशन वर्क, मुंबई यांना दिनांक ०१/०६/२०१७ ते ३१/०५/२०१८ या कालावधीकरीता रुपये- ४,८९,५००/- मात्रचे रकमेस कार्यादेश देण्यात आला आहे. या सर्व्हीस कॉन्ट्रॅक्टचा कालावधी दिनांक ३१/०५/२०१८ रोजी संपत आहे. वायुवीजन यंत्रणा व्यवस्थित कार्यरत राहणेकरीता पुढील एक वर्षाकरीता CAMC देणे आवश्यक आहे.

श्री साईबाबा संस्थानमधील श्री साईप्रसादालयातील वायुवीजन यंत्रणेचे पुढील एक वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह् सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट् (CAMC) देणेकामी मागील वर्षीचे प्राप्त दरानुसार अंदाजे अपेक्षित खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे :

| अ.नं. | तपशील | २०१७-२०१८ या वर्षातील कार्यादेशातील दर रुपये | २०१८-२०१९ या वर्षातील अपेक्षित खर्च रुपये ( मागिल वर्षाचा खर्च + ५% ) |
|---|---|---|---|
| ०१ | AMC of Air Ventilation System & Exhaust System Installed in Shri Sai Prasadalaya for year 2017-2018 | ४,८९,५००/- | ५,१३,९७५/- |

उपरोक्तप्रमाणे श्री साईप्रसादालयातील वायुवीजन यंत्रणेचे सन २०१८-२०१९ या वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट् (CAMC) देणेकामी अंदाजे रक्कम रुपये ५,३२,३०४/- (अक्षरी रुपये पाच लाख, बत्तीस हजार, तीनशे चार) मात्र खर्च अपेक्षित आहे. सदरील खर्च इकडील विभागाचे अंदाजपत्रक २०१८-२०१९ मध्ये तरतूद केलेल्या '*मशीनरी दुरुस्ती व देखाभाल खर्च*' या शिर्षाखालील रकमेतून करता येईल व महाराष्ट्र शासनाचे www//mahatenders.gov.in या संकेतस्थळावर जाहीरात नोटीस अपलोड करुन कंत्राटदारांकडून ई निविदा मागवून-CAMC देता येईल. या कार्यवाहीस मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी लागेल.

तरी उपरोक्तप्रमाणे श्री साई प्रसादालयातील वायुविजन यंत्रणेचे दि. ०१/०६/२०१८ ते दि. ३१/०५/२०१९ पर्यंत एक वर्षाचे कालावधी करीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह् सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट् (CAMC) देणेकामी

ई-निविदा मागविणेस व याकामी येणा-या अपेक्षित खर्चास मान्यता घेणेकामी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१८१ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयातील वायुविजन यंत्रणेचे दि.०१/०६/२०१८ ते दि.३१/०५/२०१९ पर्यंत एक वर्षाचे कालावधी करीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह् सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट् (CAMC) देणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

विषय नं.४४ **मंदिर व परिसर, व्दारावती आणि साईबाबा भक्तनिवासस्थान येथील संपुर्ण एसी यंत्रणेचे दि.१.६.२०१८ ते दि.३१.५.२०१९ या एक वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह कॉन्ट्रक्ट (CAMC) देणेकरीता ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** मंदिर व परिसर, व्दारावती तसेच साईबाबा भक्तनिवासस्थान येथे श्री साईभक्तांच्या सोयीकरीता ए.सी. व फ्रिज बसवून कार्यरत आहेत. सदर यत्रणा सतत कार्यरत असणे आवश्यक आहे. यदा कदाचित यंत्रणा बंद पडल्यास, ती तातडीने दुरुस्ती करणे आवश्यक आहे. यासाठी या यंत्रणेमधील काही स्पेअरपार्ट खराब झाल्यास ते तातडीने बदलणे गरजेचे असते. त्याकरीता सदरचे स्पेअरपार्टची खरेदी करावे लागतात. प्रत्येक कंपनीचे स्पेअरपार्ट हे दुस-या कंपनीच्या स्पेअरपार्ट पेक्षा वेगळे असल्याने तसेच सदरचे स्पेअरपार्ट हे जवळपास उपलब्ध होत नसल्याने ते थेट मुंबई, पुणे येथून खरेदी करावे लागतात. त्यामुळे हे स्पेअरपार्ट मिळवून फिटींग करुन यंत्रणा कार्यान्वित होईपर्यत पर्यायाने ए.सी. यंत्रणा काही वेळा बंद ठेवावी लागते अथवा कमी क्षमतेवर कार्यान्वित ठेवावी लागते. सदरचा स्पेअरपार्ट उपलब्ध झाल्यानंतर तो बसवून ए.सी. यंत्रणा पूर्ण क्षमतेने कार्यान्वित केली जाते किंवा एखाद्या वेळी संबंधीत कंपनीचे प्रतिनिधी यांना बोलावून दुरुस्ती करुन घ्यावी लागते. या दुरुस्ती कार्यवाहीसाठी बराच अवधी लागेल व पर्यायाने साईभक्तांना देण्यात येणा-या सेवा सुविधांमध्ये व्यत्यय निर्माण होतो. याकरीता प्रत्येक वर्षी तातडीने जागेवरच दुरुस्ती करणेकामी सदर ठिकाणातील संपूर्ण ए.सी. यंत्रणेचे CAMC देण्यात येते. सध्या संस्थानकडे पुढील प्रकारच्या ए.सी. यंत्रणा कार्यरत आहेत :

| अ.नं. | ठिकाण | यंत्रणेचा तशील | संख्या |
|---|---|---|---|
| १. | मंदिर व परिसर | ए.सी. – १ टन | २५ |
| | | ए.सी. – १.५ टन | ४३ |
| | | ए.सी. – २ टन | ६९ |
| | | ए.सी. – ५ टन | ३ |
| | | कुलर आणि फ्रिज | १६ |
| २. | व्दारावती इमारत | ए.सी. – १ टन | ४१ |
| | | ए.सी. – १.५ टन | १४ |
| | | ए.सी. – २ टन | २५ |
| ३. | साईबाबा भक्तनिवास व परिसर | ए.सी. – १ व १.५ टन | २६ |
| | | ए.सी. – २ टन | ९ |
| | | कुलर आणि फ्रिज | ७ |
| ४. | साई प्रसादालय व्ही.आय.पी. भोजन हॉल | ए.सी. – १, १.५ टन व २ टन | १५ |
| | | डिप फ्रिज | १० |
| | | कोल्ड स्टोरेज – ५ टन | १ |
| | | कोल्ड स्टोरेज – ३ टन | १ |
| | | **एकूण :** | ३०५ |

उपरोक्तप्रमाणे श्री साई भक्तांकरीता ए.सी. यंत्रणा संस्थानमध्ये कार्यरत आहे. मागील वर्षी मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २३/०५/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ४१९ ( ०७ ) अन्वये मंदिर व परिसर, व्दारावती आणि साईबाबा भक्तनिवासस्थान येथील संपूर्ण ए.सी. यंत्रणेचे सन २०१७-२०१८ या एक वर्षाचे वार्षिक कॉम्प्रेसिव्ह् सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट् (CAMC) देणेकामी मे. कैलास रेफ्रिजरेशन वर्क्स, मुंबई यांना दिनांक ०१/०६/२०१७ ते ३१/०५/२०१८ या एक वर्षाचे कालावधीकरीता रुपये – ६,५०,०००/- मात्रचे रकमेस

कार्यादेश देण्यात आला आहे. या सर्व्हीस कॉन्ट्रॅक्टचा कालावधी दिनांक ३१/०५/२०१८ रोजी संपत आहे. ए.सी. यंत्रणा व्यवस्थित कार्यरत राहणेकरीता पुढील एक वर्षाकरीता CAMC देणे आवश्यक आहे.

श्री साईबाबा संस्थानमधील मदिर व परिसर, व्दारावती आणि साईबाबा भक्तनिवासस्थान येथील संपूर्ण ए.सी. यंत्रणेचे पुढील एक वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह् सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट् (CAMC) देणेकामी मागील वर्षीचे प्राप्त दरानुसार अंदाजे अपेक्षित खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे :

| अ.नं. | तपशील | २०१७-२०१८ या वर्षातील कार्यादेशातील दर रुपये | २०१८-२०१९ या वर्षातील अपेक्षित खर्च रुपये (मागिल वर्षाचा खर्च + ५%) |
|---|---|---|---|
| ०१ | CAMC of Air Conditioning Units Installed Temple & Campus, Dwaravati, Saibaba Bhaktaniwassthan for year 2018-2019 | ६,५०,०००/- | ६,८२,५००/- |

उपरोक्तप्रमाणे मदिर व परिसर, व्दारावती आणि साईबाबा भक्तनिवासस्थान येथील संपूर्ण ए.सी. यंत्रणेचे सन २०१८-२०१९ या वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेकामी अंदाजे रक्कम रुपये ६,८२,५००/- (अक्षरी रुपये- सहा लाख, ब्याऐशी हजार, पाचशे ) मात्र खर्च अपेक्षित आहे. सदरील खर्च इकडील विभागाचे अंदाजपत्रका- मध्ये तरतूद केलेल्या '*मशीनरी दुरुस्ती व देखाभाल खर्च*' या शिर्षाखालील रकमेतून करता येईल व महाराष्ट्र शासनाचे www//mahatenders.gov.in या संकेतस्थळावर जाहीरात नोटीस अपलोड करुन कंत्राटदारांकडून ई-निविदा मागवून CAMC देता येईल. या कार्यवाहीस मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी लागेल.

तरी उपरोक्तप्रमाणे मदिर व परिसर, व्दारावती आणि साईबाबा भक्तनिवासस्थान येथील संपूर्ण ए.सी. यंत्रणेचे दिनांक ०१/०६/२०१८ ते दिनांक ३१/०५/२०१९ पर्यंत एक वर्षाचे कालावधी करीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह् सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट् (CAMC) देणेकामी ई-निविदा मागविणेस व याकामी येणा-या अपेक्षित खर्चास मान्यता घेणेकामी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.१८२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिर व परिसर, व्दारावती आणि साईबाबा भक्तनिवासस्थान येथील संपुर्ण ए.सी. यंत्रणेचे दि.१.६.२०१८ ते दि.३१.५.२०१९ या एक वर्ष कालावधीसाठी वार्षिक कॉम्प्रेसिव्ह कॉन्ट्रक्ट (CAMC) देणेकरीता विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

**विषय नं.४५** **संस्थानचे www.sai.org.in या वेबसाईटसाठी क्लाऊड सर्व्हर भाडेतत्वावर घेणेकामी ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम २००४ मधील तरतुद:-** कलम २१ (१) ग नुसार भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी-सुविधा पुरविणे

**मा. व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. :-**

०१. मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०.११.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.८६५

०२.मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५.०७.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५२३ (१०)

**प्रास्ताविक:-** साईबाबांचे जीवनकार्य व शिकवणूक यांचा प्रचार व प्रसार तसेच संस्थान विषयक माहिती साईभक्तांना उपलब्ध करुन देणेकामी संस्थानची अधिकृत वेबसाईट (website) url:- www.shrisaibabasansthan.org या नावाने दि.२१ नोव्हेंबर, १९९८ पासून कार्यान्वीत करणेत आलेली आहे. सदर वेबसाईटवर श्री साईबाबांविषयी सर्व माहिती, श्री साईबाबा संस्थानमार्फत राबविणेत येत असलेले उपक्रमांविषयी सर्व माहिती तसेच Live Darshan, Donation, Saileela, विविध बँकेमार्फत पेमेंट गेटवेद्वारे देणगी स्विकारण्याची सुविधा इत्यादी सुविधा साईभक्तांसाठी उपलब्ध करुन देणेत आलेल्या आहेत.

सद्यस्थितीत सदर वेबसाईटसाठी आवश्यक असणा-या वेबसर्व्हर होस्टींगचे कामकाज Institute of Advanced Studies, Nagpur यांचेमार्फत पाहिले जाते. आजमितीस दि.३१.०३.२०१८ अखेर वेबहोस्टींगचे भाडे संस्थानमार्फत Institute of Advanced Studies, Nagpur यांना अदा करणेत आलेले आहे.

आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन संस्थानची वेबसाईट अद्यायावत करणे तसेच मोबाईल ॲप्लीकेशन विकसीत करणेकामी संस्थानचे प्रचलित पद्धतीनुसार ई-निविदा प्रक्रिया राबवून,मा.व्यवस्थापन समितीचे

दि.२५.०७.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५२३ (१०) अन्वये,M/S WebWerks, Mumbai यांना जा.नं.एसएसएसटी/ वशी-आयटी/१९८७/२०१७ दि.१३.०७.२०१७ रोजी कार्यादेश देणेत आलेला आहे. राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत प्रसिद्ध करणेत आलेल्या दि.०९.०३.२०१७ रोजीचे शुद्धीपत्रकानुसार वेबसाईट होस्टींगसाठी येणारा खर्च श्री साईबाबा संस्थानने करणे अपेक्षित आहे.

M/S WebWerks, Mumbai यांना देणेत आलेल्या कार्यादेशाप्रमाणे त्यांनी वेबसाईट अद्यावतीकरण करुन मा.व्यवसथापन समितीसमोर त्यांचे सादरीकरण केलेले होते. सदरवेळी वेबसाईटमध्ये काही बदल तथा सुधारणा सुचविणेत आलेल्या होत्या. सदरचे बदल तथा सुधारणा करुन नुतनीकृत वेबसाईटचे उद्घाटन दि.०८.०१.२०१८ रोजी करणेत आलेले आहे. सध्या वेबसाईट होस्टींगसाठी वापरात असलेल्या सर्व्हरची मुदत दि.३१.०३.२०१८ अखेर संपुष्टात येत असल्याने, वेबसाईट होस्टींगसाठी नविन सर्व्हर (भाडेतत्वावर) घेणे आवश्यक आहे. याबाबत M/S WebWerks, Mumbai यांचेकडून नुतनीकृत वेबसाईट होस्ट करणेकामी आवश्यक सर्व्हरचा तांत्रिक तपशिल घेणेत आलेला असून तो पुढीलप्रमाणे आहे.

Application Server:

- Dual Hexa core processor
- Intel Xeon (2CPU * 6 cores)
- 1000 GB * 4 SATA Hard Disks on Raid 10
- 240GB SSD
- 32GB DDR II RAM
- 10/100 NIC
- 6 IPs
- Linux OS

Other Services

- Cloud backup - 500GB
- Dedicated Firewall: Cisco ASA 5506
- IPS / IDS subscription

Pre-qualification criteria

- Uptime Institute Certified - Tier III Data Center
- ISO 9001: 2015

Points System on below:

- ISO 27001:2013, 20000 – 1, 22301 – 2012
- MEITY empaneled

उपरोक्त नमुद केलेप्रमाणे श्री साईबाबा संस्थानची अधिकृत वेबसाईट होस्टींग साठी आवश्यक सर्व्हर या क्षेत्रातील नामांकीत कंपनीकडून भाडे तत्वावर उपलब्ध करणेकामी, संस्थानचे प्रचलित पद्धतीने ई-निविदाप्रक्रिया राबविता येईल. तसेच, याकामी नविन कंपनीची नेमणूक दि.३१ मार्च, २०१८ पुर्वी न झाल्यास सदरची नेमणूक होईपर्यंत संस्थानची वेबसाईटचे होस्टींग Institute of Advanced Studies, Nagpur यांचेमार्फत प्रतिमाह रक्कम रुपये ८,०००/- + कर याप्रमाणे चालू ठेवता येईल. श्री साईबाबा संस्थानची अधिकृत वेबसाईट होस्टींग साठी आवश्यक सर्व्हर या क्षेत्रातील नामांकीत कंपनीकडून भाडे तत्वावर उपलब्ध करणेकामी, प्रचलित पद्धतीने ई-निविदाप्रक्रिया राबविणेस व याकामी येणा-या सर्वसमावेशक खर्चास तसेच नविन कंपनीची नेमणूक होईपर्यंत वेबहोस्टींग Institute of Advanced Studies, Nagpur यांचेमार्फत प्रतिमाह रक्कम रुपये ८,०००/- + कर याप्रमाणे चालू ठेवणेस मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

**मागणी**:- प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे संस्थानची अधिकृत वेबसाईट www.sai.org.inहोस्टींग साठी M/S WebWerks, Mumbai यांनी कळविलेल्या तांत्रिक क्षमतेचा सर्व्हर या क्षेत्रातील नामांकीत कंपनीकडून भाडे तत्वावर उपलब्ध करणेकामी, प्रचलित पद्धतीने ई-निविदाप्रक्रिया राबविणेस व याकामी येणा-या सर्वसमावेशक खर्चास तसेच नविन कंपनीची नेमणूक होईपर्यंत वेबहोस्टींग Institute of Advanced Studies,

Nagpur यांचेमार्फत प्रतिमाह रक्कम रुपये ८,०००/- + कर याप्रमाणे चालू ठेवणेस मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेस मान्यता असावी, हि नम्र विनंती.

**संस्थान अधिनियम / ठराव या नुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान :-** तांत्रिक,आर्थिक व प्रशासकीय

**विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत :-** संस्थानची अधिकृत वेबसाईट www.sai.org.inहोस्टींग साठी M/S WebWerks, Mumbai यांनी कळविलेल्या तांत्रिक क्षमतेचा सर्व्हर या क्षेत्रातील नामांकीत कंपनीकडून भाडे तत्वावर उपलब्ध करणेकामी, प्रचलित पद्धतीने ई-निविदाप्रक्रिया राबविणेस व याकामी येणा-या सर्वसमावेशक खर्चास तसेच नविन कंपनीची नेमणूक होईपर्यंत वेबहोस्टींग Institute of Advanced Studies, Nagpur यांचेमार्फत प्रतिमाह रक्कम रुपये ८,०००/- + कर याप्रमाणे चालू ठेवणेस मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सविनय सादर.

**निर्णय क्र.१८३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**विषय नं.४६** **वाढीव शिर्डी संस्थान, कोपरगाव नगरपालीका व शिर्डी नगरपंचायत संयुक्त पाणी पुरवठा योजना (निळवंडे धरण उध्दव धरुन) ता.राहाता,जि.अहमदनगर योजना तयार करणे व त्यास तांत्रिक मंजुरी देणेबाबतचे शुल्काची रक्कम महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, संगमनेर यांना आदा करणेबाबत व शासनाची मान्यता घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** मुख्य अभियंता, (प्रभारी) महाराष्ट्र जीवन प्रधिकरण, प्रादेशिक विभाग, नाशिक यांचेकडुन जा.क्रं.मुअ/ना/ मजीप्रा/ चिशा/ १५९/२०१८, दि.२५/०१/२०१८ अन्वये तांत्रिक मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/०१/२०१८ रोजीचे सभेतील निणर्यास अनुसरुन व मुख्य अभियंता, (प्रभारी) महाराष्ट्र जीवन प्रधिकरण, प्रादेशिक विभाग, नाशिक यांचेकडुन प्राप्त दि.२५/०१/२०१८ रोजीचे तांत्रिक मान्यतेस अनुसरुन प्रशासकिय मान्यता मिळणेसाठी जा.नं.एसएसएसटी/वशी/पाणी पुरवठा/५८०८२०१८, दि.२९/०१/२०१८ अन्वये मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांना प्रस्ताव सादर करणेत आलेला होता.

त्यास अनुसरुन वाढीव श्री साईबाबा संस्थान, शिर्डी, नगरपंचायत शिर्डी आणि कोपरगांव नगरपालिका संयुक्त पाणी पुरवठा योजना, ता.राहाता, जि.अहमदनगर (निळवंडे धरण उद्धव घेऊन) योजनेस महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्रं.सासंवि-२०१५/१००७/प्र.क्र.१७७(भाग-१)/का.१६, दि.०७ फेब्रुवारी, २०१८ अन्वये श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव, २०१७-१८ करीता सदर योजनेची निकड विचारात घेऊन ही योजना टप्पा क्रं.१ (शिर्डी परिसरातील करावयाची WTP, ESR, Distribution Network व पाईपलाईनचे काम करणे)– अंदाजे मुल्य रु.२७,१३,०३,९८०/- आणि टप्पा क्रं.२ (निळवंडे धरण ते मौजे कनकरी संस्थान जलशुध्दीकरण केंद्र, शिर्डी नगरपंचायत ते कोपरगांव नगरपरिषद जलशुध्दीकरण केंद्र पर्यंत पाईपलाईन टाकणे) अंदाजे मुल्य रु.२०५,५९,८९,८०४/- या दोन स्वतंत्र टप्प्यात राबविण्यात येईल. सदर अंदाजित रकमेवर escalation charge व त्यावरील एकुण ५% P.M.C. charge यांची गणना करुन अटी व शर्तीच्या अधिन राहून सदर योजनेसाठी एकुण रु.२६०.३९ कोटी इतक्या खर्चास सुधारित प्रशासकिय मान्यता देण्यात आलेली आहे.

**प्रस्ताव:-** संस्थानकरीता वाढीव पाणी पुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मार्फत राबविणेबाबत संस्थानचे मा.व्यवस्थापन समितीचे दि.१३/०२/२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ०४ अन्वये ठरलेले आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे दि. २४/०९/२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ७४५ नुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेमार्फत निळवंडे धरण उद्धव घेवून पुन्हा नव्याने सर्वेक्षण, अंदाजपत्रक व आराखडे तयार करणेसाठी २% Preparation Charges भरावे लागणार असल्याने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना तुर्त १० लाख रक्कम आदा करणेस मान्यता देण्यात आली. त्यानुसार कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बांधकाम विभाग संगमनेर यांना जा.नं.एसएसएस/वशी/पा.पु./४२११/ २०११, दि.२३/११/२०११ अन्वये रु.१० लाख मात्र रक्कम आदा करणेत आली.

वाढीव शिर्डी संस्थान, कोपरगांव नगरपालिका व शिर्डी नगरपंचायत संयुक्त पाणी पुरवठा योजना (निळवंडे धरण उद्धव धरुन) ता.राहाता, जि.अहमदनगर योजना तयार करणे व त्यास तांत्रिक मंजुरी देणे बाबतचे शुल्काची रक्कम महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, विभाग, संगमनेर यांना आदा करणेबाबत मुख्य अभियंता (प्रभारी),

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नाशिक यांचे दि.२५/०१/२०१८ व दि.१६/०२/२०१८ रोजीचे पत्र प्राप्त झालेले आहे.

सदरहू पत्रात नमुद केलेनुसार वाढीव शिर्डी संस्थान, कोपरगांव नगरपालिका व शिर्डी नगरपंचायत संयुक्त पाणीपुरवठा योजना ता.राहाता, जि.अहमदनगर (निळवंडे धरण उद्भव) योजनेच्या रु.२४७,९८,६३,२६९/- निव्वळ व रु.२६०,३८,५६,५००/- ढोबळ किमतीच्या अंदाजपत्रक व आराखडयास शासनाच्या विधी व न्याय विभागाकडुन सुधारित प्रशासकिय मान्यता प्रदान केली आहे.

विधी व न्याय विभागाच्या दि.०७/०२/२०१८ रोजीचे शासन निर्णयाव्दारे योजनेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नाशिक यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नियुक्ती करुन मोजमाप नोंदणी शुल्क २% व प्रकल्प व्यवस्थापन शुल्क ३% अशी एकुण ५% इतकी फी देखील आदा करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. सदरच्या शुल्कामध्ये योजना तयार करणे तसेच त्यास तांत्रिक मंजूरी देणे या बाबींचा समावेश नाही अशी कार्यालयाची धारण आहे.

सबब, योजना तयार करणे व त्यास तांत्रिक मंजूरी देणे बाबतचे शुल्क रु.३९० लक्ष चा भरणा तात्काळ कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, विभाग संगमनेर यांचेकडे करण्यात यावा असे कळविलेले आहे.

**विभागाचा अभिप्रायः-** महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्रं.सासंवि-२०१५/ १००७/ प्र.क्र.१७७(भाग-१)/का.१६, दि.०७ फेब्रुवारी, २०१८ अन्वये मुख्य अभियंता (प्रभारी), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नाशिक यांनी दि.२५/०१/२०१८ रोजी दिलेल्या तांत्रिक मान्यतेनुसार वाढीव शिर्डी संस्थान, कोपरगांव नगरपालिका व शिर्डी नगरपंचायत संयुक्त पाणीपुरवठा योजना ता.राहाता, जि.अहमदनगर (निळवंडे धरण उद्भव) योजनेच्या रु.२४७,९८,६३,२६९/- निव्वळ व रु.२६०,३८,५६,५००/- ढोबळ किमतीच्या अंदाजपत्रक व आराखडयास सुधारित प्रशासकिय मान्यता प्रदान केली असून योजनेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नाशिक यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नियुक्ती करुन मोजमाप नोंदणी शुल्क २% व प्रकल्प व्यवस्थापन शुल्क ३% अशी एकुण ५% इतकी फी देखील आदा करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नाशिक यांनी दि.१६/०२/२०१८ रोजीचे पत्रान्वये सदरच्या शुल्कामध्ये योजना तयार करणे तसेच त्यास तांत्रिक मंजूरी देणे या बाबींचा समावेश नाही असे कळविलेले आहे.

तरी योजना तयार करणे व त्यास तांत्रिक मंजूरी देणे बाबतचे शुल्क रु.३९० लक्ष चा भरणा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, विभाग संगमनेर यांचेकडे करावयाचा झाल्यास यासाठी शासनाची मान्यता घेणे आवश्यक आहे असे मत आहे.

तरी याबाबत योग्य तो निर्णय होणेसाठी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.१८४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, वाढीव शिर्डी संस्थान, कोपरगाव नगरपालीका व शिर्डी नगरपंचायत संयुक्त पाणी पुरवठा योजना (निळवंडे धरण उध्दव धरुन) तयार करणे व त्यास तांत्रिक मंजुरी देणेबाबतचे शुल्काची रक्कम महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, संगमनेर यांना आदा करणेस व त्याकामी शासन मान्यता घेणेसाठी प्रस्ताव सादर करणेस तत्वत: मान्यता देण्यात आली. तसेच शासन मान्यता मिळेपावेतो दरम्यानच्या कालावधीमध्ये सदर शुल्क कमी करणेसाठी समिती सदस्यांनी शासनाकडे प्रयत्न करावेत, असे ठरले.**

(कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

---

**विषय नं.४७** **साठा संपत आलेली संस्थान प्रकाशित प्रकाशने पुनर्मुद्रण विहित पध्दतीने ई-निविदा मागवून करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ नुसार मा.व्यवस्थापन समितीची कर्तव्ये व अधिकाराबाबत कलम नं.१७ (२) ठ मध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे.

'श्रीसाईबाबांचे जीवन त्यांचे कार्य,त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार- प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील'

उपरोक्त तरतुदीनुसार प.पू.श्री साईबाबांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबत प्रचार-प्रसार होणेसाठी श्री साईबाबा सस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी मार्फत संस्थान प्रकाशित साईचरित्र,पुस्तके, फोटो व ऑडीओ/ व्हीडीओ सीडीचे पुनरमुद्रणकरुन साईभक्तांना माफक किंमतीने विक्री केली जाते.

**प्रसतावः-** साठा संपत आलेली पुस्तकांचे पुर्नमुद्रण सर्व साधारण एक वर्ष पुरेल एवढया प्रतींची छपाई केली जाते. वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करणे, ई-निविदा मागिवणे, प्राप्त सिलबंद निविदा मा.खरेदी समितीचे

सभेत उघडणे, छाननी करणे व कार्यादेश देणे अशा कामासाठी ३ ते ४ कालावधी लागतो त्यामुळे ३ ते ६ महिने पुरेल एवढा साठा शिल्लक राहिल्यानंतर छपाईची कार्यवाही चालू करण्यात येते. अनेक साईमंदिरात साईभक्त संमेलने आयोजित केली जातात,त्यामुळे ठराविक प्रकाशनांची अचानक मागणी वाढते.

सन २०१८ या कालावधीमध्ये शिर्डी येथे होणा-या श्री साई समाधी शताब्दी महोत्सावात श्री साईभक्तांचे संख्येत लक्षणीय वाढ होणार आहे. मुंबई येथे होणा-या साई पादूका दर्शन सोहळा येथेही विविध भाषेतील पुस्तकांचे स्टॅाल लावण्यात येणार आहे. त्याठिकाणी मोठया प्रमाणात पुस्तकांची मागणी विचारात घेता, साईभक्तांची प्रकाशने खरेदी करण्यासाठी मोठया संख्येने वाढ होणार असल्याने, सदर बाबींचा विचार करुन प्रकाशने छपाई संख्येत वाढ करण्यात आलेली आहेत व प्रकाशने विभागामार्फत संस्थान परिसरात ०७ पुस्तकालये साईभक्तांच्या सेवेसाठी उपलब्ध करण्यात आलेली आहे.

श्री साई समाधी शताब्दी महोत्सावात शताब्दी महोत्सवा श्री साई सच्चरित-मराठी ग्रंथाचे महापाराण सोहळा संस्थान व शिर्डी ग्रामस्थ यांचे संयुक्त विद्यमाने माहे ऑगस्ट २०१८ मध्ये होणार आहे. त्यात ५१ हजार पारायणार्थी बसविण्याचे संकल्प आहे, त्यामुळे श्री साई सच्चरित- मराठी ग्रंथाची मागणी साईभक्त करणार आहे.

**मागणी:-** पुर्नमुद्रण करावयाची पुस्तके शिल्लक साठा,अंदाजेकिती महिने साठा पुरेल व प्रस्तावित छपाई खर्चाबाबत अंदाजे किंमत (Estimated Cost) मुंबईतील ०३ मुद्रणालयाकडील मे. टॅको व्हिजन प्रा.लि. मुंबई, साईग्रेस फोंडेशन, मुंबई व इमेज क्रीयेएशन, मुंबई यांच्याकडून घेऊन त्यांची सरासरी करुन अंदाजे किंमत घेण्यात आलेली आहे. सदरचा परिशिष्ट खालील प्रमाणे.

| अं. नं. | छपाई तपशिल | वार्षिक विक्री | शिल्लक स्टॉक | दरमहा सरासरी विक्री | किती महिने पुरेल | नवीन छपाई संख्या | मागिल छपाई दर | अंदाजे छपाई दर | अंदाजे छपाई एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साई सच्चरित पोथी मराठी - आवत्ती ३५ वी | २५,००० | ३५,००० | ५००० | ०७ | **५१,०००** | ८४.०० | ९०/- | ४५,९०,०००/- |
| ०२ | श्री साई सतचरित्र- इंग्रजीआवत्ती २६ वी | ३५,००० | २१००० | ४००० | ०६ | **१,००,०००** | ३५/- | ४५/- | ४५,००,०००/- |
| | | | | | | | | एकूण रु. | ९०,९०,०००/- |

(अक्षरी रुपये. नव्वद लाख नव्वद हजार मात्र.)

प्रस्तावित छपाईकामी विहित पध्दतीनुसार वर्तमानपत्रात शासकीय दराने जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागवून, निम्नतम दराने निविदाकारांना छपाई कार्यादेश देणेत येतील याकामी अंदाजे रु. ९०,९०,०००/- (अक्षरी रु.नव्वद लाख नव्वद हजार मात्र.) खर्च अपेक्षित आहे. सदर खर्च पुस्तके/फोटो व दैनंदिनी/दिनदर्शिका वार्षिक छपाईच्या अंदाजपत्रीय खर्च रु.०९ कोटीमधून तरतूद करता येईल.

**संस्थानचा अधिनियम/ठराव यानुसार छाननी करुन शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमानः-** आर्थिक/ धोरणात्मक

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-**श्री साई सच्चरित-मराठी ग्रंथाचे महापाराण सोहळा श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व शिर्डी ग्रामस्थ यांचे संयुक्त विद्यमाने माहे ऑगस्ट २०१८ मध्ये साजरा होणार आहे. त्यासाठी इकडील विभागाकडे श्री साईचरित्र मराठी पोथीची शिल्लक साठा असणे गरजेचे आहे.

सदर संस्थान कामासाठी प्रस्तावित छपाईकामी खालील बाबींवर निर्णय होणेकामी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे ठेवणेस मान्यतेसाठी सादर.

१) छपाईकामी येणा-या अंदाजे रक्कम रुपये. ९०,९०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता असावी.

२) जनसंपर्क कार्यालयाव्दारा वर्तमानपत्रात ई-निविदा सूचना जाहिरात प्रसिध्द करणेकामी येणा-या योग्य त्या खर्चास मान्यता असावी.

३) संस्थान संकेतस्थळावर ई-निविदा सूचना जाहिरात प्रसिध्द करणेस मान्यता असावी.

४) विहित पध्दतीने ई-निविदा मागवून मा. खरेदी समिती सभेपुढे तांत्रिक बीड उघडून, अटी/शर्तीनुसार छाननी करणे, प्राप्त स्पर्धक निविदाकारांचा तक्ता तयार करणे, पुन्हच मा. खरेदी समिती सभेपुढे पात्र निविदाकारांचे व्यवसायिक बीड उघडणे, ई- निविदेतील दरपत्रकांचा तुलनात्मक तक्ता तयार करणे त्यानंतर मा. उपसमिती सभेपुढे तुलनात्मक तक्त्यातील निम्नत्तम दर देऊ केलेल्या निविदाकारांना

चर्चेसाठी बोलवणे, मा. व्यवस्थापन समितीच्या पुढील निर्णयानुसार निम्नत्तम दरधारक (L-1) निविदाकारांना कार्यादेश पारित करणे इ. कामकाज पध्दतीस मान्यता असावी.

उपरोक्त पुस्तकेछपाईकामी मागणी तक्त्यात दर्शविलेप्रमाणे उक्त संस्थान कामासाठी पुस्तके पुर्नमुद्रण करणेस मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१८५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेली, साठा संपत आलेली संस्थान प्रकाशित प्रकाशने पुनर्मुद्रण करणेकामी विहित पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.९०,९०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

विषय नं.४८ **'श्री साई अर्पण सेवा' या नवीन व्दैमासिकाचे रजिस्ट्रेशनचे नुतनीकरण करणे व कामकाज पध्दतीबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम तरतुद**– श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ कलम क्र.१७ (२) ठ मध्ये खालील प्रमाणे तरतूद आहे. श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार –प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील"

**प्रस्ताव**:- मा. व्यवस्थापन समिती दि.२५.०७.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६२८ श्री साई अर्पण सेवा व्दैमासिक नव्याने सुरु करणेबाबत मान्यता मिळालेली होती. त्यानुसार दि.१३.०४.२०१७ रोजी अतिरीक्त मुख्य महानगर न्याय दंडाधिकारी, मुंबई यांचेकडे प्रस्ताव दाखल करण्यात आला होता. त्यास अनुसरुन भारत सरकारचे समाचार पत्र व पंजीकृत कार्यालय, नवी दिल्ली यांचेकडून दि.११.०५.२०१७ रोजी साई अर्पण सेवा व्दैमासिक सुरु करणेबाबत मान्यता प्राप्त झाली होती. सदर पत्रात नव्याने सुरु करावयाचे प्रकाशन ९० दिवसाच्या आत सुरु न झालेस संबंधीत मान्यता अधिनियम धारा ५ (५) अन्वये रदद् होईल अशी तरतूद आहे.

वरील संदर्भांकीत निर्णयानुसार साप्रशा-अस्थापना विभागाकडे नव्याने सुरु करावयाच्या व्दैमासिकासाठी संपादकीय पदावर कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करणेबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यास अनुसरुन जा.क्र.एसएसएस/ साप्रशा-आस्था/ ५६४१/ २०१८ दि.२२.०१.२०१८ ने श्री. भगवान रामचंद्र दातार, पुणे यांना साई अर्पण सेवा व्दैमासिकाचे कामकाजसाठी विशेष कार्य अधिकारी या पदावर कंत्राटी पध्दतीने नेमणूकीबाबत पत्र देण्यात आले आहे.

दि.१७.०२.२०१८ रोजी संस्थानच्या सभागृहात श्री. दातार सो. तसेच वरीष्ठ अधिकारी व मा. अध्यक्ष महोदय यांचे समवेत साई अर्पण सेवा कामकाजाबाबत चर्चा करण्यात आली, साई अर्पण सेवा कामकाजाबाबत श्री. दातार यांनी प्रकल्प अहवाल सादर करावा असे निर्देश मा. अध्यक्ष महोदय यांनी दिले होते, त्यानुसार श्री. दातार यांनी साई अर्पण सेवा मासिकाबाबत कामकाजाबाबत एकूण ०६ मुद्दे प्रकल्प अहवाल खालील प्रमाणे कळविला आहे.

१) साई अर्पण सेवा या अंकाचा भर संस्थानतर्फे चालणा-या सेवा कार्यावर असेल.

२) साई अर्पण सेवा मधून संस्थान विविध २० विभागांतर्फे चालणा-या सेवा कार्याचा व समाजिक उपक्रमांचा आणि विशेषत: रुग्णसेवेचा परिचय प्रत्येक अंकात छायाचित्रांसह करुन देण्यात यावा.

३) साई अर्पण सेवा चे रजिस्ट्रेशन कदाचित लॅप्स झाले असेल. त्याबाबत चौकशी करुन ते त्याचे नुतनीकरण करावे किंवा ते पुन्हा मिळवावे. ही जबाबदारी प्रकाशन विभागावर असेल.

४) साई अर्पण सेवा चे टायटल डिझाईन तातडीने तयार करुन घ्यावे लागेल ही जबाबदारी कार्यकारी संपादकांची असेल. आऊट सोर्सच्या विषयाला मंजूरी मिळताच त्यांनी आर्टिस्टकडून ते तातडीने तयार करुन घ्यावे व मा. अध्यक्षांच्या संमतीने ते निश्चित करावे. हे टायटल किमान वर्षभर कायम राहील.

५) तर साई अर्पण सेवा पहिला अंक दि.०१ मे रोजी प्रसिध्द व्हावा. या अंकाचे प्रकाशन मा. मुख्यमंत्रींच्या हस्ते मुंबईत करावे.

६) साई अर्पण सेवा पहिला अंक ३२+०४ पानी असावा.

उपरोक्त विषयांकित साई अर्पण सेवा व्दैमासिकाचे रजिस्ट्रेशन त्याची कामकाज पध्दती व त्यासाठी येणारा वर्षभरातील सर्व बाबींवरील अनुषांगिक खर्च विभागाच्या मागणी सदरात खालील अ, ब व क नुसार दर्शविलेला आहे.

**विभागाची मागणी- (अ)** श्री. दातार यांच्या वरील ०६ मुद्दे प्रकल्प अहवालनूसार खालील प्रमाणे श्री साई अर्पण सेवा व्दैमासिकाचे कामकाज पध्दती करुन घेता येईल.

१) साई अर्पण सेवा या अंकात संस्थानतर्फे चालणा-या सेवा कार्य व उपक्रम यांचा अंर्तभाव असेल.

२) साई अर्पण सेवा व्दैमासिकामधून संस्थानच्या सर्व विभागांतर्फे चालणारी सेवा-कार्य, समाजिक उपक्रम व संस्थानच्या दोन्ही रुग्णालयाकडील रुग्णसेवेचा परिचय प्रत्येक अंकात छायाचित्रांसह प्रकाशित करता येईल.

३) साई अर्पण सेवा चे रजिस्ट्रेशन मिळालेनंतर नव्याने सुरु करावयाचे प्रकाशन ९० दिवसाच्या आत सुरु न झालेस संबंधीत मान्यता अधिनियम धारा ५ (५) अन्वये रदद् होईल अशी तरतूद आहे, त्यामुळे सदर रजिस्ट्रेशन कदाचित लॅप्स झाले असेल. आता त्याबाबत चौकशी करुन त्याचे नुतनीकरण करावे लागेल याबाबतचे कामकाज विशेष कार्य अधिकारी यांनी श्री. राणे, सहा. संपादक, श्री साईलीला, मुंबई कार्यालय यांचेशी संपर्क साधून तातडीने करुन घ्यावयाचे आहे.

४) साई अर्पण सेवा चे टायटल डिझाईन तातडीने तयार करुन घेण्याची पुर्णत: जबाबदारीविशेष कार्य अधिकारी यांची राहील.

५) साई अर्पण सेवा पहिला अंक दि.०१ मे रोजी प्रसिध्द करणेकामी रजिस्ट्रेशन नुतनीकरण नवीन क्रमांक प्राप्त झालेनंतर अंकाचे प्रकाशन मा. मुख्यमंत्री महोदय यांचे शुभहस्ते लवकर कसे करता येईल याबाबत सर्वस्वी कार्यपध्दती विशेष कार्य अधिकारी यांनी पार पाडावयाची आहे.

६) साई अर्पण सेवा पहिला अंक ३२+०४ पानात सुरु करता येईल.

**विभागाची मागणी- (ब)** साई अर्पण सेवा मासिक तयार करणेची कार्यपध्दती खालीलप्रमाणे असेल.

१) अंकात प्रसिध्द करावयाचे विषयांबाबत विशेष कार्य अधिकारी यांनी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी व मा. अध्यक्ष महोदय यांची छपाई पुर्वी मान्यता घ्यावी.

२) अंकाचे मुखपृष्ठ व लेआऊट संस्थान हिताशी निगडीत असावा याबाबतचा निर्णय विशेष कार्य अधिकारी यांचा राहील.

३) अंकाची छपाई झालेनंतर, वेळेत वितरण व्यवस्थेचे कामकाज मुंबई कार्यालयामार्फत पार पाडण्याची जबाबदारी विशेष कार्य अधिकारी यांची राहील.

४) अंकाच्या नियोजनासाठी विशेष कार्य अधिकारी यांनी आवश्यकतेनुसार मुंबई आणि शिर्डी प्रवास व आवश्यकतेनुसार अन्यत्र प्रवास करावयाचे असल्यास मा. मुख्य कार्य अधिकारी यांची लेखी संमती घेणे आवश्यक राहील.

५) नव्याने प्रकाशित होणा-या साई अर्पण सेवा मासिकासाठी सभासद होणेबाबतचे आवाहन श्री साईलीला व्दैमासिकातून तसेच संस्थानचे वेबसाईटवरुन प्रसिध्दीस देता येईल व संस्थान परिसरात याबाबतचे बोर्ड तयार करुन लावता येतील.

६) पीआरबी कायद्यानुसार अंकाचा मजकूर व छायाचित्रांची जबाबदारी विशेष कार्य अधिकारी यांची राहील. भविष्यात अंकातील मजकूराविषयी काही वाद उपस्थितीत झाल्यास, कोर्ट कारवाई करणे भाग पडल्यास, सदर वाद राहाता, कोपरगांव मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद न्यायालयाच्या अधिकार कक्षेत व क्षेत्रातच करता येईल.

**विभागाची मागणी- (क)** उपरोक्त अ व ब कार्यपध्दती मान्यतेनंतर साई अर्पण सेवा व्दैमासिक प्रत्यक्ष तयार करणेकामी तसेच साईभक्तांचे हातात पोहचणेसाठी त्यावर खालीलप्रमाणे खर्चाच्या आर्थिक बाबींवर निर्णय होणे आवश्यक आहे.

१) साई अर्पण सेवा व्दैमासिकासाठी सभासद संख्या नसल्याने, प्रथम तयार होणारा अंक साईलीला मराठी व्दैमासिकासाठी असलेल्या एकूण ७००० सभासदांना सुरुवातीचे नव्याने प्रकाशित होणारे ०६ अंक स्वागत मूल्य म्हणून मोफत वितरण करता येतील त्यात साई अर्पण सेवा व्दैमासिकासाठी सभासद होणेकामी आवाहन करता येईल.

२) उपरोक्त ७००० सभासदांसाठीचे साई अर्पण सेवा व्दैमासिक छपाईसाठी अनुषांगिक बाबींकरीता ०६ अंकांसाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अं.नं. | सभासद संख्या ७००० प्रमाणे | अंदाजे खर्च रुपये. |
|---|---|---|
| ०१ | अंक छपाईसाठी खर्च ७००० x ०६ अंक = ४२,००० अंक<br>एका अंकासाठी अंदाजे किंमत रु.२०/- मात्र धरुन...... | ८,४०,०००/- |
| ०२ | अंक सभासदांना वितरण करणेकामी पाकीटे (Envelope) ७००० x ०६ अंक = ४२,००० अंक | ६३,०००/- |

| | | |
|---|---|---|
| | एका पाकीटासाठी अंदाजे किंमत रु.१.५०/- मात्र धरुन...... | |
| ०३ | अंक पोस्टाने वितरणसाठीचा खर्च.<br>एका अंकासाठी अंदाजे पोस्टेज रु.१०/- मात्र धरुन...... | ४,२०,०००/- |
| ०४ | अंकाचे डिटीपी, प्रुफ रिडींग, पेज लेआऊट, अंकाचे डिझाईन (मुखपृष्ठ व आतील पाने)<br>आऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेकामी अंदाजे एकूण खर्च एका मासिकासाठी रु.२५,००० धरुन ०६ व्दैमासिकासाठी एकूण खर्च..... | १,५०,०००/- |
| | एकूण अंदाजे अपेक्षीत खर्च | १४,७३,०००/- |

(अक्षरी रुपये. चौदा लाख त्र्याहत्तर हजार मात्र.)

वरील तक्त्यात दर्शविलेप्रमाणे साई अर्पण सेवा व्दैमासिकासाठी होणारा अपेक्षीत अंदाजे खर्च हा सन-२०१८-१९ प्रकाशने विभागाकडील सुधारित अंदाजपत्रकात तरतूद करुन घेता येईल.

सबब उपरोक्त विभागाची मागणी 'अ' मध्ये साई अर्पण सेवा व्दैमासिकाचे कामकाजाबाबत मांडणी केले आहे, विभागाची मागणी 'ब' मध्ये साई अर्पण सेवा मासिक तयार करण्याची कार्यपध्दती विस्तृत केली आहे व विभागाची मागणी 'क' मध्ये साई अर्पण सेवा व्दैमासिक छपाई कामासाठी अनुषांगिक बाबींवर होणा-या अपेक्षीत अंदाजे खर्चाचा तपशिल सादर केलेला आहे त्यावर मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे चर्चा होऊन निर्णय होणेकामी,सदरचा विषय मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सविनय सादर.

निर्णय क्र.१८६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच साई अर्पण सेवा व्दैमासिकाचा प्रथम तयार होणारा अंक, साईलीला मराठी व्दैमासिकाच्या एकूण ७००० सभासदांना स्वागत मूल्य म्हणून मोफत वितरण करणेत यावा व साईअर्पण व्दैमासिकासाठी सभासद होणाऱ्या साईभक्तांना, सभासद झाल्यानंतरचा पहिला अंक मोफत वितरीत करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

विषय नं.४९ **श्री साई समाधी शताब्दी वर्षात श्री रामनवमी उत्सव-२०१८ उत्सवाचे औचित्य साधून श्री साईलीला विशेषांक प्रसिध्दीबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम तरतुद**– श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ कलम क्र.१७ (२) ठ मध्ये खालील प्रमाणे तरतूद आहे. श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार –प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील"

**प्रस्तावः**- उपरोक्त विषयानुसार मा. व्यवस्थापन समिती दि.२५.०७.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६२८ नुसार साप्रशा-अस्थापना विभागाकडून नव्याने सुरु करावयाच्या श्री साईलीला व्दैमासिकासाठी संपादकीय पदावर कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करणेबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यास अनुसरुन जा.क्र.एसएसएस/ साप्रशा-आस्था/५६४०/२०१८ दि.२२.०१.२०१८ ने श्री. विद्याधर ताठे, पुणे यांना कार्यकारी संपादक या पदावर कंत्राटी पध्दतीने नेमणूकीबाबत पत्र देण्यात आले आहे.

त्यास अनुसरुन मा.विश्वस्त श्री.जयकर साहेब व श्री.विद्याधर ताठे, पुणे यांचे समवेत दि.०३.०२.२०१८ रोजी शिर्डी व दि.०९.०२.२०१८ रोजी मुंबई येथील दादर कार्यालयात श्री साईलीला व्दैमासिक श्री रामनवमी-२०१८ उत्सवाचे औचित्य साधून श्री साई समाधी शताब्दी वर्षात श्री साईलीला विशेषांक चांगल्या प्रकारात प्रकाशित करणेबाबत खालील मुद्यांवर चर्चा करण्यात आली.

१) श्री साईलीला अंकांसाठी लेख देणा-या लेखकांच्या संख्येत वाढ करणे.

२) श्री रामनवमी-२०१८ चा अंक शताब्दी वर्षाचे औचित्य साधून श्री रामनवमी विशेषांक २०१८ म्हणून प्रकाशित करणे व त्यातील पानांची संख्या ३६ ऐवजी ६८ करणे.

३) सदर विशेषाकांत माहे नोव्हें,डिसेंबर-१७ व जानेवारी व फेब्रुवारी १८ मध्ये ज्या महत्वाच्या व अति महत्वाच्या व्यक्तींनी साई समाधीचे दर्शन घेऊन शिर्डीस भेटी दिलेल्या आहेत अशा साईभक्तांचा विशेषांकात नामोल्लेख व फोटो प्रकाशित करावा. सदर माहिती जनसंपर्क विभागाकडून उपलब्ध करुन घेण्यात यावी.

४) विशेषांकासाठी लागणारे साहित्य दि.०५.३.१८ पर्यंत तयार करुन दि.१५.०३.१८ पर्यंत डिटीपी तयार करुन प्रेसधारकाकडे छपाईकामी पाठविणे.

५) श्री रामनवमी विशेषांकासाठी जनसंपर्क विभागाने शिर्डी वृतांत तयार करणे,मा. विश्वस्त जयकर साहेब यांचा लेख प्रसिध्द करणे, सदर अंकांत संस्थानच्या माजी अध्यक्षांचे लेख प्रसिध्द करणे व साईंच्या जीवनावरील लेख प्रसिध्दीसाठी अभ्यासक लेखकांसाठी पाने राखीव ठेवणे.

६) विशेषांकासाठी संपादकीय लेख तयार करणे, जुने ते सोने याउक्तीनुसार जुन्या साईलीला अंकातील काही लेख प्रकाशित करणे, श्री साईंचे सत्यचरित्रातील अध्याय क्र.०६ मधील रामनवमी उत्सवाचा मजकूर प्रकाशित करणे.

७) श्री. विद्याधर ताठे यांचा ' जोडुनिया कर चरणी ठेविला माथा ' काकड आरतीचा भावार्थ लेख प्रसिध्द करणे.

**विभागाची मागणी**:- उपरोक्त दि.०३.०२ व ०९.०२.२०१८ च्या चर्चा सत्रात श्री साई समाधी शताब्दी वर्षात श्री रामनवमी उत्सव २०१८ साठी प्रकाशित होणारा श्री साईलीला विशेषांक सुंदर व व्यापक बांधणीचा, भक्ताभिमुख होणेकामी वरील मुद्दयांचा आधार घेऊन व त्यासाठी आवश्यक ती सर्व तयारी करुन विशेषांकरुपात प्रकाशित करत असल्याने त्यासाठीचा खालीलप्रमाणे जास्तीचा छपाई खर्च होणार आहे. सन २०१८ साठी खालील तक्त्यात दर्शविलेप्रमाणे ई-निविदेनुसार दर मान्य झालेले आहेत.

| अं.नं. | छपाई तपशिल | प्रस्तावित छपाई संख्या | टॅको व्हिजन प्रा. लि., मुंबई यांचे ६४+०४ पानांसाठीचा मंजूर दर रु. पै. | टॅको व्हिजन प्रा. लि., मुंबई श्री साईलीला ३२+०४ पानांसाठीचा मंजूर दर रु.पै. |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साईलीला अंक मराठी (०१ अंक) ६४ + ०४ पाने= ६८ पाने श्री रामनवमी विशेषांक-२०१८ | ७००० | २१.७७ | १३.०४ |
| ०२ | श्री साईलीला अंक हिंदी-इंग्रजी (०१ अंक) ६४ + ०४ पाने=६८ पाने श्री रामनवमी विशेषांक-२०१८ विशेषांक | १५००० | २०.१५ | ११.६४ |

१) वरील तक्त्यातील ३२+०४ पानांसाठीचा मराठी मासिकासाठीचा दर रु.१३.०४ /- असून मराठी ६४+०४ पानांसाठी रु. २१.७७/- दर आहे. दोन्ही दरातील फरक रु.८.७३/- प्रमाणे ७००० मराठी विशेषांकांसाठी एकूण जास्तीचा रु. ६१,११०/- खर्च अपेक्षित आहे.

२) वरील तक्त्यातील ३२+०४ पानांसाठीचा हिदी-इंग्रजी मासिकासाठीचा दर रु.११.६४ /- असून हिंदी-इंग्रजी ६४+०४ पानांसाठी रु.२०.१५/- दर आहे. दोन्ही दरातील फरक रु.८.५१/- प्रमाणे १५,००० हिदी-इंग्रजी विशेषांकांसाठी एकूण जास्तीचा रु.१,२७,६५०/- खर्च अपेक्षित आहे.

वरील दोन्ही विशेषांकांसाठी छपाईमधील जास्तीचा अपेक्षित खर्च रु.६१,११०/- + १,२७,६५०/- = रु. १,८८,७६०/- जास्तीचा खर्च होणार आहे. तरी रक्कम रु. १,८८,७६०/- मात्रच्या खर्चास व श्री रामनवमी साईलीला विशेषांक प्रसिध्दी कामकाजास मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.१८७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई समाधी शताब्दी वर्षात श्री रामनवमी उत्सव-२०१८ चे औचित्य साधून श्री साईलीला विशेषांक मराठी व हिंदी-इंग्रजी छपाई करुन घेणेस व त्याकामी येणाऱ्या रु.१,८८,७६०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.५०** **कंत्राटी पध्दतीने घेण्यात आलेले श्री.विद्याधर ताठे, कार्य.संपादक व भगवान रामचंद्र दातार, विशेष कार्य अधिकारी यांना व्दैमासिकांच्या कामासाठी प्रवास भत्ता व इतर सोई सुविधा देणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समिती दि.२५.०७.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६२८ नुसार साप्रशा-अस्थापना विभागाकडून नव्याने सुरु करावयाच्या श्री साईलीला व्दैमासिकासाठी संपादकीय पदावर कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करणेबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यास अनुसरुन जा.क्र.एसएसएस/साप्रशा-आस्था/ ५६४०/ २०१८ दि.२२.०१.२०१८ ने श्री. विद्याधर ताठे, पुणे यांना कार्यकारी संपादक कंत्राटी पध्दतीने तात्पुरती पदावर व जा.क्र. एसएसएस/साप्रशा-आस्था/५६४१/२०१८ दि.२२.०१.२०१८ ने श्री. भगवान रामचंद्र दातार, पुणे यांना

साई अर्पण सेवा व्दैमासिकाचे कामकाजसाठी विशेष कार्य अधिकारी या पदावर कंत्राटी पध्दतीने तात्पुरती नेमणूकीबाबत पत्र देण्यात आले आहे. कंत्राटी पध्दतीने नेमणूकीबाबत पत्र देण्यात आले आहे.

दि.१७.०२.२०१८ रोजी संस्थानच्या सभागृहात श्री. ताठे सो, श्री. दातार सो. तसेच वरीष्ठ अधिकारी व मा. अध्यक्ष महोदय यांचे समवेत श्री साईलीला व साई अर्पण सेवा कामकाजाबाबत चर्चा करण्यात आली, श्री साईलीला व साई अर्पण सेवा कामकाजाबाबत श्री. ताठे व श्री. दातार यांनी प्रकल्प अहवाल सादर करावा असे निर्देश मा. अध्यक्ष महोदय यांनी दिले होते, त्यानुसार श्री. ताठे व श्री. दातार यांनी श्री साईलीला व साई अर्पण सेवा व्दैमासिक कामकाजाबाबत प्रकल्प अहवाल मुद्यांमध्ये प्रवास व सोई-सुविधा मिळणेबाबत खालील प्रमाणे कळविले आहे.

"अंकाच्या नियोजनसाठी संपादकांनी आवश्यकतेप्रमाणे मुंबई आणि शिर्डीस प्रवास करावा. आवश्यक वाटेल तेव्हा मा. अध्यक्ष किंवा त्यांनी नेमलेल्या अधिका-याच्या संमतीने त्यांना अन्यत्रही प्रवास करता येईल. संपादकांचा प्रवास खर्च विनाविलंब मंजूर करण्यात यावा."

संपादकांच्या शिर्डी व मुंबईतील दौ-याच्या वेळी त्यांच्या निवासाची सोय करण्याची कायमस्वरुपी सूचना संबंधीतांना देण्यात यावी.

यापुर्वी सन-२००५ साली श्री साईलीला व्दैमासिकाच्या कामकाजासाठी श्री. विद्याधर ताठे यांची रेल्वेच्या प्रथम वर्गाच्या पास खर्चासह आठवडयात किमान ०२ दिवस मुंबई कार्यालयात काम करणेबाबत व शिर्डी ते पुणे जाणे-येणेचे लक्झरी बसचे (व्हाल्वो) प्रवास भाडे खर्चासह व आठवडयातील शिर्डी येथील कार्यालयात काम करण्याच्या अटीवर दरमहा रु.८०००/- (अक्षरी रु. आठ हजार) या वित्तलब्धीवर नेमणूक करण्यात आली होती.

दि.०८.१२.२०१७ च्या सभेतील निर्णय क्र.१०२३ अन्वये श्री. विद्याधर ताठे यांची श्री साईलीला व्दैमासिकासाठी कार्यकारी संपादक या पदावर कंत्राटी पध्दतीने तात्पुरती नेमणूक व श्री. भगवान रामचंद्र दातार, पुणे यांची साई अर्पण सेवा या व्दैमासिकासाठी कंत्राटी पध्दतीने विशेष कार्य अधिकारी या पदावर तात्पुरती नेमणूक एकत्रित दरमाहा रु.२५,०००/- मानधनावर करण्यात आलेली आहे.

**विभागाचा अभिप्रायः**- वरील अधोरेखीत केलेल्या समासाचा आशय पहाता, श्री. ताठे व श्री. दातार यांच्या पत्रातील मागणीचा विचार करता येणार नाही. तसेच मा. व्यवस्थापन समितीचे निर्णय क्र.१०२३ मध्ये कंत्राटी पध्दतीने एकत्रित दरमहा रु.२५,०००/- मानधनावर नेमणूकीबाबत निर्णय झालेला आहे. संस्थानच्या इतरही विभागात एकत्रित मानधनावर काम करत असलेल्या कंत्राटी पदावरील पदाधिकारी यांना एकत्रित मानधना व्यतिरिक्त कोणतेही लाभ दिले जात नाहीत, असे इकडील विभागाचे मत आहे.

सबब श्री. ताठे व श्री. दातार यांनी मागणी केलेप्रमाणे शिर्डी, मुंबई व अन्यत्र व्दैमासिकासाठी प्रवास केल्यास त्यांनी मागणी केलेप्रमाणे देय होत नाही तसेच निवासस्थान व्यवस्था सुविधा अनुज्ञेय नाही परंतू त्यांच्या मागणीचा विचार करता प्रवास खर्च व निवास व्यवस्थेबाबत मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे विषयावर चर्चा होऊन निर्णय होणेकामी निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१८८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.विद्याधर ताठे, कार्य.संपादक व भगवान रामचंद्र दातार, विशेष कार्य अधिकारी यांनी प्रस्तावात मागणीकेल्याप्रमाणे प्रवास व निवासाची व्यवस्था न करता (खर्च मंजुर न करता), त्याऐवजी त्यांना मानधनाव्यतिरिक्त प्रवास व निवास खर्चासाठी प्रत्येकी रु.१०,०००/- मात्र प्रतिमहा भत्ता देण्यात यावा. मात्र त्यासाठी श्री.ताठे व श्री.दातार यानी दरमहा किमान एक आठवडा शिर्डीमध्ये येऊन, काम करणे बंधनकारक राहील, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

विषय नं.५१ **सन २०१८-१९ शैक्षणिक वर्षात शालेय व स्कुलबस शुल्कातील वाढीबाबत.**

प्रस्ताव- **सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ मधील तरतूद** –सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ (भाग ४) दि. १७ ऑगस्ट २००४ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा प्रसिध्द केलेला अधिनियमा मधील १७ (२ ढ) नुसार सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास साहाय्य करील, तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी, शैक्षणिक संस्था स्थापन करील.

**मा. व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांकः- दिनांक १५/०३/२०१४ रोजीची सभा, निर्णय क्र. २५०.**

**प्रास्ताविक-** मा.त्रिसदस्य समिती दि. १५/०३/२०१४ रोजीचे सभेत सादर केलेल्या प्रस्तावावर सविस्तर चर्चा होवुन श्री साईबाबा इंग्लिश मिडियम करीता सन २०१४-१५ शैक्षणिक वर्षासाठी शालेय शुल्कात १०% व स्कुल बस शुल्कात १०% वाढ करणेस मान्यता देण्यात आली. तसेच सन २०१४-१५ नंतर पुढील

शैक्षणिक वर्षाकरिता प्रती वर्षी शालेय शुल्कात १०% व स्कुल बस शुल्कात १०%ने वाढ करण्यात यावी असे ठरले.

**मागणी-** १) मा. त्रिसदस्य समिती सभा दि.१५.०३.२०१४ निर्णय क्र.२५० नुसार शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये घेण्यात आलेल्या शालेय शुल्क रक्कमेवर १०% वाढ करावयाची झाल्यास शैक्षणिक वर्ष २०१८-१९ साठी खालीलप्रमाणे शालेय शुल्कात वाढ करावी लागणार आहे.

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करीता १०% प्रस्तावित वाढ करुन घेण्यात येणारे शालेय शुल्क खालीलप्रमाणे.

| अ.नं | वर्ग | श्री साईबाबा इं.मि.स्कुल शैक्षणिक वर्ष २०१७-१८ शालेय शुल्क | सदयस्थितीमध्ये शालेय शुल्कात १०% प्रस्तावित वाढ | मागील शुल्क + १०% प्रस्तावित वाढ करुन होणारी रक्कम | दोन सत्रांची पुर्णाकीत करुन येणारे (१०चे पटीत)एकुण शालेय शुल्क |
|---|---|---|---|---|---|
| | | २०१७-१८ | | | २०१८-१९ |
| १ | ज्यु के.जी | ३६७० | ३६७ | ४०३७ | ४०४० |
| २ | सि.के.जी | ३६७० | ३६७ | ४०३७ | ४०४० |
| ३ | इ.१ली | ३९६० | ३९६ | ४३५६ | ४३६० |
| ४ | इ.२ री | ३९६० | ३९६ | ४३५६ | ४३६० |
| ५ | इ.३री | ४१०० | ४१० | ४५१० | ४५१० |
| ६ | इ.४थी | ४१०० | ४१० | ४५१० | ४५१० |
| ७ | इ.५वी | ४४०० | ४४० | ४८४० | ४८४० |
| ८ | इ.६वी | ४४०० | ४४० | ४८४० | ४८४० |
| ९ | इ.७वी | ४४०० | ४४० | ४८४० | ४८४० |
| १० | इ.८ वी | ५१३० | ५१३ | ५६४३ | ५६४० |
| ११ | इ.९ वी | ५१३० | ५१३ | ५६४३ | ५६४० |
| १२ | इ.१०वी | ५२८० | ५२८ | ५८०८ | ५८१० |

२. मा. त्रिसदस्य समिती सभा दि.१५.०३.२०१४ निर्णय क्र.२५० नुसार शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये घेण्यात येत असलेल्या स्कुलबस शुल्क रक्कमेवर १०% वाढ करावयाची झाल्यास शुल्कात वाढ करता येईल.

तथापि यापुर्वी असलेले स्कुलबस थांब्यांचे किलोमीटरचे अंतर व विद्यार्थ्यांकडून घेण्यात येणारे शुल्क यामध्ये मोठी त्रुटी आढळून आल्याचे निदर्शनास आले आहे. मागील स्कुलबस थांबे, किलोमीटर, घेण्यात आलेले शुल्क व आढळून आलेली त्रुटीबाबतचा खुलासा खालीप्रमाणे देत आहोत.

| अ.नं | स्कुल बस स्टॉपचे नाव | शाळेपासुन जाणे व येणे कि.मी अंतर | सध्याचे स्कुल बस एकुण शुल्क रुपये सन | किलोमीटर नुसार १०% प्रस्तावित वाढ स्कुल बस फी | पुर्णाकींत रक्कम करुन एकुण (१०चे पटीत ) आकारण्यात येणारी स्कुल बस फी |
|---|---|---|---|---|---|
| | | अंतर | २०१७-१८ | १०% | २०१८-१९ |
| १ | रुई | १९कि.मी | ४१०० | ४१० | ४५१० |
| २ | निमगांव /सावळीविहिर | १०कि.मी | २८२० | २८२ | ३१०० |
| ३ | राहाता | १०कि.मी | २८२० | २८२ | ३१०० |
| ४ | पिंपळवाडी | १३कि.मी | २८२० | २८२ | ३१०० |
| ५ | बन (बिरेंगांव ) | ११ कि.मी | २३५० | २३५ | २५९० |
| ६ | नांदुर्खी बुद्रक | ११कि.मी | २३५० | २३५ | २५९० |
| ७ | नांदुर्खी खुर्द | १२ कि.मी | २८२० | २८२ | ३१०० |
| ८ | को-हाळे | १९ कि.मी | ४१०० | ४१० | ४५१० |
| ९ | कनकुरी | ११कि.मी | २३५० | २३५ | २५९० |
| १० | डो-हाळे | १५ कि.मी | ३२७० | ३२७ | ३६०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ११ | चारी ११/पोलिस स्टेशन | ०५ कि.मी | २३५० | २३५ | २५९० |
| १२ | श्रीखंडे वस्ती/गोदावरी वसाहत | ०४ कि.मी | २३५० | २३५ | २५९० |
| १३ | लुटे वस्ती | ०८ कि.मी | २३५० | २३५ | २५९० |
| १४ | शिरडी /परिसर | ०६ कि.मी | २१२० | २१२ | २३३० |
| १५ | चांदेकसारे -पानमळा वस्ती | २३ कि.मी | ४४७० | ४४७ | ४९२० |
| १६ | नवनाथनगर | १३ कि.मी | ३३२० | ३३२ | ३६५० |
| १७ | साकुरी | १३ कि.मी | ३३२० | ३३२ | ३६५० |

उपरोक्त तक्त्यात किलोमीटर अंतर व शुल्काबाबत खालील त्रुटी आढळून आलेल्या आहेत.

| अ.नं. | स्कुल बस स्टॉपचे नाव | अंतर | २०१७-१८ फी | १०% वाढ | २०१८-१९ शुल्क |
|---|---|---|---|---|---|
| २ | निमगांव /सावळीविहिर | १०कि.मी | २८२० | २८२ | ३१०० |
| ३ | राहाता | १०कि.मी | २८२० | २८२ | ३१०० |
| ५ | बन (बिरेंगांव ) | ११ कि.मी | २३५० | २३५ | २५९० |
| ६ | नांदुर्खी बुद्रक | ११कि.मी | २३५० | २३५ | २५९० |
| ४ | पिंपळवाडी | १३कि.मी | २८२० | २८२ | ३१०० |
| १६ | नवनाथनगर | १३ कि.मी | ३३२० | ३३२ | ३६५० |
| १७ | साकुरी | १३ कि.मी | ३३२० | ३३२ | ३६५० |

स्कूलबसचे समान अंतराचे समान शुल्क असावे मात्र काही किलोमीटर अंतर व घेण्यात येणारे शुल्क यात तफावत जाणवते, यामुळे पालकांची तक्रार येऊ शकते तरी शुल्काबाबत समानता करणे गरजेचे आहे. असे मत आहे जेणेकरुन भविष्यात पालकांची प्रशासनाकडे तक्रार येणार नाही.

उपरोक्त आढळून येत असलेल्या त्रुटीमुळे प्रशासन अडचणीत येऊ नये यासाठी दि.२५ व २७ जानेवारी रोजी शाळेकडील स्कुलबसवरील कायम मदतनिस, यांचेकडून स्कुलबसचे प्रत्येक थांब्याचे शाळेपासून जाणे व येणे अंतर किलोमीटर मध्ये लिखीत स्वरुपात घेण्यात आलेले आहे. शालेय स्कुलबसचे शाळेपासूनचे अंतरावरील सर्व स्टॉप, सदरचे किलोमीटर व घेण्यात येणारे शुल्क यामध्ये सुसुत्रता यावी यासाठी स्कुलबसच्या किलोमीटरचे विशिष्ट अंतराचा स्लॅब तयार करुन नव्याने स्कुलबस फी आकारणी केली तर शालेय प्रशासनाचे दृष्टीने उपयोगी होईल असे नम्र मत आहे.

करीता शाळेच्या स्कुलबस शुल्कासाठी खालीलप्रमाणे किलोमीटरचे विशिष्ट अंतराचा स्लॅब तयार करण्यात आलेला आहे. मा.त्रिसदस्य समिती सभा दि.१५.०३.२०१४ निर्णय क्र.२५० नुसार मागील वर्षात घेण्यात येत असलेल्या शुल्कावर १०% वाढ करुन खालीलप्रमाणे स्कुलबस शुल्क घेता येईल तसेच स्कुलबस शुल्काबाबतचा नव्याने स्लॅब खालीलप्रमाणे ठरविता येईल.

| अ.नं | शाळेपासून संबधित स्टॉप पर्यंत स्लॅब नुसार ठरविलेले किलोमीटरचे अंतर | सध्या घेण्यात येत असलेले स्कुलबस एकूण शुल्क सन२०१७-१८ | मा. व्यवस्थापन समिती निर्णय नुसार १०% प्रस्तावित वाढ | मागील शुल्क + १०% प्रस्तावित वाढ करुन होणारी रक्कम | पुर्णाकींत रक्कम करुन (१०चे पटीत) आकारण्यात येणारी स्कुल बस शुल्क सन २०१८-१९ |
|---|---|---|---|---|---|
| १ | ०१ ते ०६ किलोमीटर | २३३० | २३३ | २५६३ | २५६० |
| २ | ०७ ते ११ किलोमीटर | २५९० | २५९ | २८४९ | २८५० |
| ३ | १२ ते १५ किलोमीटर | ३६०० | ३६० | ३९६० | ३९६० |
| ४ | १६ ते २० किलोमीटर | ४५१० | ४५१ | ४९६१ | ४९६० |
| ५ | २१ ते २५ किलोमीटर | ४९२० | ४९२ | ५४१२ | ५४१० |

**शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये स्कुलबस करीता घेण्यात येणारे शुल्क किलोमीटर व अंतरानुसार खालीप्रमाणे .**

| अ.नं | स्कुल बस स्टॉपचे नाव | शाळेपासुन जाणे व येणे कि.मी अंतर | सध्या असलेले स्कुलबस एकूण शुल्क सन २०१७-१८ | मा. व्यवस्थापन समिती निर्णय नुसार १०% प्रस्तावित वाढ | मागील शुल्क + १०% प्रस्तावित वाढ करुन होणारी रक्कम | पुर्णाकींत रक्कम करुन (१०चे पटीत) आकारलेली स्कुल बस फी सन २०१८-१९ |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | (४+५) ६ | ७ |
| १ | शिरडी /परिसर | ०६ कि.मी | २३३० | २३३ | २५६३ | २५६० |
| २ | लुटे वस्ती | ०८ कि.मी | २५९० | २५९ | २८४९ | २८५० |
| ३ | नांदुर्खी बुद्रक | ९ कि.मी | २५९० | २५९ | २८४९ | २८५० |
| ४ | राहाता | १०कि.मी | २५९० | २५९ | २८४९ | २८५० |
| ५ | नांदुर्खी खुर्द | १० कि.मी | २५९० | २५९ | २८४९ | २८५० |
| ६ | सावळीविहिर | ११ कि.मी | २५९० | २५९ | २८४९ | २८५० |
| ७ | बन (बिरेंगांव ) | १२ कि.मी | ३६०० | ३६० | ३९६० | ३९६० |
| ८ | कनकुरी | १२ कि.मी | ३६०० | ३६० | ३९६० | ३९६० |
| ९ | नवनाथनगर | १२ कि.मी | ३६०० | ३६० | ३९६० | ३९६० |
| १० | साकुरी | १२ कि.मी | ३६०० | ३६० | ३९६० | ३९६० |
| ११ | पिंपळवाडी | १३ कि.मी | ३६०० | ३६० | ३९६० | ३९६० |
| १२ | डो-हाळे | १५ कि.मी | ३६०० | ३६० | ३९६० | ३९६० |
| १३ | को-हाळे | १८ कि.मी | ४५१० | ४५१ | ४९६१ | ४९६० |
| १४ | रुई | १८कि.मी | ४५१० | ४५१ | ४९६१ | ४९६० |
| १५ | चांदेकसारे -पानमळा | २१ कि.मी | ४९२० | ४९२ | ५४१२ | ५४१० |

**संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी करुन अनुमानः-** वार्षिक उत्पन्न व खर्चाबाबत आर्थिक विषय आहे.

**विभागाचा अभिप्राय-** तरी शैक्षणिक वर्ष २०१७ -१८ शुल्कामध्ये **नवीन स्लॅब नुसार** शालेय शुल्कात १०% व स्कुलबस शुल्कात १०% वाढ करुन शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये सदरचे शुल्क पालकांकडुन घेणेकामी निर्णयार्थ सादर,

**निर्णय क्र.१८९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे, शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील शालेय शुल्कात नवीन स्लॅब नुसार १०% व स्कुलबस शुल्कात १०% वाढ करुन, सुधारित शुल्क शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये आकारणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.प्राचार्य, इंग्लिश मिडीयम स्कुल)

---

**विषय नं.५२** **शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करीता इयत्ता १ ली वर्गातील प्रवेशासाठी शासनाचे बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम-२००९ (RTE Act-2009) अन्वये अधिन राहून प्रवेश देणेबाबत**

**प्रस्ताव-** **सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ मधील तरतूद** –सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ (भाग ४) दि. १७ ऑगस्ट २००४ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा प्रसिध्द केलेल्या अधिनियमामधील १७ (२ ढ) नुसार सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास साहाय्य करील, तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी, शैक्षणिक संस्था स्थापन करील.

**मा. व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांक – मा. व्य. समिती दि.२५.०२.२०१७ ची सभा निर्णय क्र. १२४ .**

**प्रास्ताविक–** शासनाचे आर.टी.ई. कायदा २००९ (बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षण अधिनियम कायदा) अन्वये २५ % प्रवेश देणे, यामध्ये वंचित गटातील व दुर्बल घटकातील बालकांना प्राथमिक शिक्षणासाठी मोफत प्रवेश दिला जातो. वंचित गटातील बालक याचा अर्थ अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती बालके व दुर्बल घटकांतील बालके याचा अर्थ ज्या बालकांच्या माता पित्यांचे वार्षिक उत्पन्न एक लाख रुपयांपेक्षा कमी असे विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय, विशेष मागास प्रवर्ग, राज्य शासनाने विनिर्दिष्ट केलेल्या धार्मीक अल्पसंख्याकसह इतर बालके असा होय. अशा इयत्ता १ ली ते ८ वी प्राथमिक विभागातील बालकांना

प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत मोफत व सक्तीचे शिक्षण देणे चालू ठेवणेत यावे असे अधिनियमात नमूद केलेले आहे.

संदर्भ क्रं. ०३ अध्यादेश मुद्दा क्रं. ०२ नुसार बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील कलम १२ (१) (सी) नुसार दुर्बल व वंचीत घटकातील बालकांना खाजगी विना अनुदानीत व खाजगी कायम विना अनुदानीत शाळांमध्ये (Private unaided Non-minority schools, Private Permanent Unaided non- minority schools) किमान २५ % ठेवण्याची तरतुद आहे. तसेच अशा प्रवेशित बालकांचे प्राथमिक शिक्षणाच्या खर्चाची प्रतिपुर्ती करण्याची तरतुद आहे.

उपरोक्त शासन नियामानुसार सन २०१८ -१९ या शैक्षणिक वर्षामध्ये इयत्ता १ ली या वर्गासाठी २५ % प्रवेश ऑनलाईन पध्दतीने करावे लागणार आहे. सद्यस्थितीत शाळेमध्ये इयता १ ली च्या ३ मान्यता प्राप्त तुकडी आहेत. प्रती तुकडी ५२ विद्यार्थी प्रमाणे एकुण १५६ विद्यार्थी पैकी ३९ विद्यार्थ्यांना ऑनलाईन सोडतीव्दारे प्रवेश द्यावा लागणार आहे. त्यानुसार संदर्भ क्रं. ३ अन्वये सोबत जोडलेल्या वेळापत्रकानुसार महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावरुन प्रवेश प्रक्रिया राबवावी लागणार आहे.

सन २०१५ -१६ व २०१६ -१७ पासून आर.टी. ई. नियमानुसार शाळेत मोफत प्रवेशाबाबतची प्रक्रीया राबविण्यात आली आहे. याबाबतचा तपशिलवार तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| शैक्षणिक वर्ष | इयत्ता | ३ तुकडी मान्यते नुसार झालेले एकूण झालेले मोफत प्रवेश | २५ % प्रमाणे पात्र ठरलेले एकूण मोफत झालेले प्रवेश | मा. व्य. समिती ठरवून दिलेले प्रशासकीय मंजूरी नुसार शालेय शुल्क | शालेय फी भरलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | पालकांकडून शाळेकडे घेण्यात आलेले शालेय शुल्क | शासनाकडून शाळेला येणे असलेले शालेय शुल्क |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **२०१५-१६** | **१ ली** | १५६ | ३९ | रु. ३२७०/- | **३९** | १२७५३० | **१,२७,५३०** |
| **२०१६-१७** | **१ ली** | १५६ | ३९ | रु. ३६००/- | **०५** | १८००० | १,४०,४०० |
| **२०१६-१७** | **२ री** | १५६ | ३९ | रु. ३६००/- | **१२** | ४३२०० | १,४०,४०० |
| **एकूण रुपये** | ------ | ------ | **११७** | ------ | | ------ | ४,०८,३३० |

मा. व्यवस्थापन समिती सभा दि. २५.०२.२०१७ रोजीचे सभेतील विषय नं. १२४ निर्णय क्र. १२४ अन्वये **शैक्षणिक वर्ष सन २०१७-१८ मध्ये** आर.टी. ई. नियमानुसार शाळेत मोफत प्रवेशाबाबतची प्रक्रीया राबविण्यात आली आहे. याबाबतचा तपशिलवार तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| शैक्षणिक वर्ष | इयत्ता | ३ तुकडी मान्यते नुसार झालेले एकूण झालेले मोफत प्रवेश | २५ % प्रमाणे पात्र ठरलेले एकूण मोफत झालेले प्रवेश | मा. व्य. समिती ठरवून दिलेले प्रशासकीय मंजूरी नुसार शालेय शुल्क | शालेय फी भरलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | नजरचुकीने पालकांकडून शाळेकडे घेण्यात आलेले शालेय शुल्क | शासनाकडून शाळेला येणे असलेले शालेय शुल्क |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |
| **२०१७-१८** | १ ली | १५६ | ३९ | रु. ३९६० /- | --- | ---- | **१,५४,४४०** |
| **२०१७-१८** | २ री | १५६ | ३९ | रु. ३९६० /- | --- | ---- | **१,५४,४४०** |
| **२०१७-१८** | ३ री | १५६ | ३९ | रु. ४१००/- | ०१ | ४१०० | **१,५९,९००** |
| **एकूण रु.** | ------ | ------ | **११७** | ------ | | ------ | ४,६८,७८० |

उपरोक्त तक्त्यात नमूद केले प्रमाणे शासनाची आर.टी.ई. २००९ अधिनियमानुसार शासनाकडून प्राप्त झालेली रक्कम व येणेबाकी असलेली एकूण रक्कम तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| शैक्षणिक वर्ष २५ %मोफत दिलेले प्रवेश | इयत्ता वर्ग | शासनाकडून येणे असलेले एकूण शुल्क | शासनाकडून प्राप्त झालेले शुल्क दि.०७ सप्टेंबर२०१७ | शासनाकडून येणे बाकी असलेले एकूण शुल्क |
|---|---|---|---|---|
| २०१५-१६ | १ ली | **१,२७,५३०** | **५६,१६०/-** | **७१,३७०/-** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २०१६-१७ | १ली, २री | २,८०,८०० | ----- | २,८०,८०० |
| २०१७-१८ | १ली, २री, ३री | ४,६८,७८० | ---- | ४,६८,७८० |
| **एकूण** | | ८,७७,११० | ५६,१६०/- | ८,२०,९५० |

दि.०७ सप्टेंबर २०१७ रोजी शासनाकडून एकूण रुपये ५६,१६०/- परत मिळालेली असून सदरची रक्कम पालकांना परत करण्यात येत आहे. याकामी दि. २७.११.२०१७ रोजीचे टिपणीने मंजूरी घेण्यात आली असून याबाबतची कार्यवाही चालू आहे.

**अ]** संदर्भ क्रं. १ महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार –अ, मे २५, २०१२/ जेष्ठ 4 शके १९३४ अधिनियम पत्रामधील पान नं. ४ (छ) मुद्यानुसार मोफत जागेवर प्रवेश दिल्यावर, माहिती पत्रकाचे मुल्य, कोणतीही नोंदणी फी, शिकवणी फी किंवा कोणतेही इतर आकार किंवा निधी , पालक किंवा बालक यांचेकडून घेता येणार नाही असे नमूद करण्यात आलेले असल्याने सदर पालकांकडून शालेय फी घेता येणार नाही.

**ब]** संदर्भ क्रं. ०२ मधील पान नं. ६ मुद्दा क्रं. १८ नुसार २५ % प्रवेश प्रक्रियेमध्ये प्रवेशीत होणा-या विद्यार्थ्याची शैक्षणीक शुल्काची प्रतिपुर्ती शासनातर्फे निश्चित केलेल्या दरानुसार शाळांना करण्यात येईल.

**क]** संदर्भ क्रं. ०३ मधील पान नं. ३ **आ** (५) नुसार, ऑनलाईन प्रक्रियेत शाळेने केलेल्या नोंदणीची पडताळणी संबधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी करावी. ज्या शाळा २५ % प्रवेशाकरीता पात्र आहेत परंतु नोदंणी करत नाहीत किंवा Entry Level स्तरावरील एकुण प्रवेश क्षमतेच्या २५ % जागा उपलब्ध करुन देणार नाहीत अशा शाळांना शिक्षणाधिकारी (प्राथ) यांनी तात्काळ नियमाप्रमाणे कायदेशीर कारवाई करण्याबाबत/ शाळेची मान्यता काढण्याबाबत नोटीसा द्याव्यात. ऑनलाईन प्रवेश प्रक्रीयेत लॉटरीद्वारे प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्याला शाळा प्रशासनाने नाकारल्या प्रकरणी शिक्षणाधिकारी ( प्राथमिक) यांनी तपासणी करावी व शाळा प्रशासन हेतू पुरस्पर प्रवेश नाकारल्याचे आढळल्यास नियमाप्रमाणे शाळा मान्यता काढण्याची कारवाई करावी.

**मागणी**– प्रास्ताविकेमध्ये 'अ','ब', व 'क' नुसार नमुद केलेप्रमाणे व शासनाची आर.टी.ई. २००९ अधिनियमा नुसार सालाबाद प्रमाणे शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करीता इयत्ता १ ली या वर्गासाठी २५% प्रवेश शासनाच्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राबवावी लागणार असून सदर प्रक्रीया मोफत करावी लागणार आहे.

शैक्षणिक वर्ष सन २०१८ -१९ मध्ये आर.टी. ई. नियमानुसार शाळेत २५ %मोफत प्रवेशाबाबतची प्रक्रीया खालीलप्रमाणे राबवावी लागणार असून त्यासाठी खालीलप्रमाणे विद्यार्थ्यांना मोफत प्रवेश द्यावे लागणार आहेत. तरी सदरचे २५ %प्रवेश मोफत देणेस व मोफत प्रवेश प्रक्रीया करणेस मान्यता मिळावी ही विनंती.

| शैक्षणिक वर्ष | इयत्ता | ३ तुकडी मान्यते नुसार झालेले एकूण झालेले मोफत प्रवेश | २५ % प्रमाणे पात्र ठरलेले एकूण मोफत झालेले प्रवेश | मा. व्य. समिती ठरवून दिलेली वाढी नुसार सन २०१७-१८ चे स्कुल फी मध्ये १० % वाढ करुन १० चे पटीत शालेय शुल्क | शालेय फी भरलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | पालकांकडून शाळेकडे घेण्यात आलेले शालेय शुल्क | शासनाकडून शाळेला येणे असलेले शालेय शुल्क |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **२०१८-१९** | १ ली | १५६ | ३९ | रु. ४३६० /- | --- | --- | १,७०,०४० |
| **२०१८-१९** | २ री | १५६ | ३९ | रु. ४३६० /- | --- | --- | १,७०,०४० |
| **२०१८-१९** | ३ री | १५६ | ३९ | रु. ४५१०/- | --- | --- | १,७५,८९० |
| **२०१८-१९** | ४ थी | १५६ | ३९ | रु. ४५१०/- | --- | --- | १,७५,८९० |
| **एकूण रु.** | ------ | **६२४** | **१५६** | ------ | | ------ | **६,९१,८६०** |

**संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी /शासन निर्देश तांत्रिक कायदेशिर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान** – आर्थिक व प्रशासकीय बाब म्हणून करणे गरजेचे आहे.

**विभागाची मागणी** -प्रास्ताविकेमध्ये 'अ','ब', व 'क' नुसार नमुद केलेप्रमाणे बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियमा नुसार

१. शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये करीता इयत्ता १ ली या वर्गासाठी २५% आर.टी.ई. अंतर्गत प्रवेश शासनाच्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेव्दारे (मोफत) करणेस मान्यता मिळणेकामी,

२. यापुर्वी २५% आर.टी.ई. अंतर्गत मोफत देण्यात आलेले प्रवेश पुढील वर्गात नियमीत करणेकामी, २५% आर.टी.ई. अंतर्गत प्रवेश प्रक्रियेमध्ये प्रवेशीत झालेल्या विद्यार्थ्यांची शैक्षणीक शुल्काची प्रतिपुर्ती शासनातर्फे निश्चित केलेल्या दरानुसार विद्यार्थ्यांना वाटप करणेच्या मान्यतेकामी निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.१९०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करीता इयत्ता १ ली वर्गातील प्रवेशासाठी शासनाचे बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम-२००९ (RTE Act-2009) अन्वये अधिन राहून प्रवेश देणेस व त्यासाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.प्राचार्य, इंग्लिश मिडीयम स्कुल)

---

**विषय नं.५३** **रक्तपेढी विभागातील अतिरिक्त प्लाझमा National Plasma Fractionation Center, Mumbai या शासकीय संस्थेस विक्री करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद**– कलम १७ (१) व १७ (२)(ण) मानव जातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.

**व्यवस्थापन समिती ठराव क्र.– नवीन प्रस्ताव.**

**प्रास्ताविक**– श्री साईबाबा संस्थानमार्फत सन २००० साली श्री साईनाथ रक्तपेढीची स्थापना झाली. सदर रक्तपेढीमार्फत रक्तसंकलन,रक्तविघटन व रक्तवितरण प्रक्रिया अविरत चालु आहे. रक्तपेढीमध्ये संपुर्ण रक्ताबरोबरच रक्तघटकही तयार केले जातात. एका रक्ताच्या बाटलीपासुन दोन ते तीन रक्तघटक तयार केले जातात. यामध्ये Packed Cell Volume(PCV) Fresh Frozen Plasma(FFP)व Platelet Concentreate (Plat.Conc.)/ Cryoprecipitate असे विविध घटक तयार करुन ते वेगवेगळया आजार असणा-या रुग्णांना वापरले जातात.त्यामुळे एका रक्ताच्या बाटलीपासुन कमीतकमी तीन रुग्णांना याचा फायदा होतो.

श्री साईनाथ रक्तपेढीचा रक्तसंकलन, रक्तविघटन व रक्तवितरण याचा सन २००० ते सन २०१७ पर्यत चा अहवाल खालीलप्रमाणे.

| Year | Blood | | Blood Issued | | | Collection (Rs) | Free/ Concession (Rs) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | WHB & PCV | SDP | WHB | COMP | TOTAL | | |
| २००० | १८९ | ० | ११० | २५ | १३५ | ६२,२७५ | १,४५० |
| २००१ | १५८५ | ० | ५७२ | १०५७ | १६३० | ७,३९,८०० | ७०,१०० |
| २००२ | १९५५ | ० | ८१२ | १६६७ | २४७९ | ११,२४,३०० | १,०५,७०० |
| २००३ | २११५ | ० | १४४५ | १०७९ | २५२४ | १०,९३,६०० | १,१६,००० |
| २००४ | २९११ | ० | २१०६ | ८६५ | २९७१ | १२,४७,७५० | १,४८,१०० |
| २००५ | ३०१४ | ० | २०९६ | १२०१ | ३२९६ | १३,७९,९०० | १,८६,५०० |
| २००६ | ४१८५ | ० | ३१३२ | १५८२ | ४७१४ | २०,०९,४६६ | २,११,०५० |
| २००७ | ७२९३ | ० | ५५५२ | ३०२६ | ८५७८ | ३४,७३,१५० | ५,६३,९०० |
| २००८ | ७८६० | ० | ५५१० | ४५१४ | १००२४ | ४१,०१,६५८ | ६,७६,७५० |
| २००९ | ७९५९ | ० | ५१०९ | ६०७१ | १११८० | ४७,२९,११० | ७,१२,१५० |
| २०१० | ८११८ | ० | ५८७९ | ४४५४ | १०३३३ | ४२,२९,०७६ | ६,३५,२०० |
| २०११ | ९९३६ | ० | ७३६६ | ४७४९ | १२११५ | ४९,५२,७६० | ६,४६,५३० |
| २०१२ | १०९४७ | ० | ७४२८ | ६८९३ | १४३२१ | ५९,०४,१९० | ७,५४,६०० |
| २०१३ | ११४१५ | २५ | ७८८६ | ७६७६ | १५५६२ | ६२,२०,८६० | ९,०६,४०० |
| २०१४ | १११८० | २० | ८०२४ | ७६०८ | १५६३२ | ४४,२९,९७० | २३,४०,२९० |
| २०१५ | ९७५१ | १ | ६६३७ | ७६०७ | १४२४४ | ३८,६८,६७० | ३३,२१,९५० |
| २०१६ | ९७५६ | ४ | ६६०३ | ७५१६ | १४११९ | ४३,५२,९२० | ३३,२७,३५० |
| २०१७ | १०९७३ | २ | ७१०७ | ८९६९ | १६०७६ | २६,७७,९३० | ५३,२०,४३० |

श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये जे वेगवेगळया प्रकारचे रक्तघटक तयार केले जातात. त्यातील एक रक्तघटक प्लाझमा नावाचा पातळ पांढरा पदार्थ होय. हा प्लाझमा इतर रक्तघटक तयार करताना Byproduct म्हणुन तयार होतो.त्याचे आयुष्य (storage life) साधारण एक वर्ष असते. तो तयार झालेनंतर साधारण एक वर्ष -२००c ते -४००c तापमानात ठेवला जातो. हा रक्तघटक जळीत रुग्ण, लिव्हरचे आजार, ऑपरेशन नंतर होणा-या रक्तस्त्रावावर उपाय म्हणुन वापरता येतो. हळुहळु पुर्ण रक्त वापरण्याची संकल्पना देखील बंद होऊन रक्तघटकांचा वापर जास्तीत जास्त व्हावा अशी पध्दत सध्या सुरु आहे.

श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये जे वेगवेगळया प्रकारचे रक्तघटक तयार केले जातात. त्यातील एक रक्तघटक **प्लाझमा** नावाचा पातळ पांढरा पदार्थ होय. हा प्लाझमा इतर रक्तघटक तयार करताना Byproduct म्हणुन तयार होतो.त्याचे आयुष्य (storage life) साधारण एक वर्ष असते. तो तयार झालेनंतर साधारण एक वर्ष -२०°c ते -४०°c तापमानात ठेवला जातो. हा रक्तघटक जळीत रुग्ण, लिव्हरचे आजार, ऑपरेशन नंतर होणा-या रक्तस्त्रावावर उपाय म्हणुन वापरता येतो. हळुहळु पुर्ण रक्त वापरण्याची संकल्पना देखील बंद होऊन रक्तघटकांचा वापर जास्तीत जास्त व्हावा अशी पध्दत सध्या सुरु आहे.

सद्यस्थितीला श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये देखील साधारण ३००-५०० बॅग इतका अतिरिक्त प्लाझमा प्रति महिना तयार होत असुन वेळोवेळी त्यात वाढ सुदधा होवु शकते.

श्री साईनाथ व साईबाबा रुग्णालय तसेच बाहेरील रुग्णालयांत होणा-या शस्त्रक्रिया व उपचार पाहता अशा प्रकारचा प्लाझमा म्हणावा तितका या दोन्ही रुग्णालयामध्ये व बाहेरील रुग्णालयामध्ये वापराला जात नाही. हया प्लाझमाची मागणीच आपल्याकडे कमी प्रमाणात आहे. तसेच याचे storage life जास्त असल्यामुळे तो साठवताही येतो.

हा प्लाझमा ज्या जळीत रुग्णासाठी वापरला जातो तशा प्रकारच्या भाजलेल्या रुग्णांची संपूर्ण उपचाराची सोय सद्यस्थितीला आपले श्री साईनाथ व श्री साईबाबा रुग्णालयांत उपलब्ध नाही.त्यामुळे रक्तपेढी विभागात तयार होणारा जास्तीचा (अतिरिक्त) प्लाझमा (दोन्ही रुग्णालय वापर सोडून) आपण अशा संस्थांना देऊ शकतो कि, ज्यांचेकडे या प्लाझमाचे घटक (Fractionation) तयार होतात. Fractionation म्हणजे Albumin & Immunoglobulin सारखे घटक (जे भारताला सध्या कमतरतेमुळे, आयात करावे लागतात) तयार करणे व वेगवेगळया आजारांवर इंजेक्शनच्या स्वरुपात वापरणे. अशा स्वरुपाचा प्लाझमा आपण या संस्थेला दिला तर त्या बदल्यात आपणास त्यांच्या ठरलेल्या रकमेप्रमाणे मोबदला मिळतो.किंवा आपण त्यांचेकडुन असे Albumin & Immunoglobulin इंजेक्शनच्या स्वरुपात घेऊ शकतो.

सदर प्लाझमा अशा संस्थेकडुन संबधित रक्तपेढी मार्फत संकलित केला जातो. याबाबत आरोग्य व कुंटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार, राष्ट्रीय एडस नियंत्रण संस्था यांनी अतिरिक्त प्लाझमा विक्रीबाबत संहिता घोषित केलेली आहे.त्यास अनुसरुन श्री साईनाथ रक्तपेढीकडे जमा होणा-या अतिरिक्त प्लाझमा बाबत कार्यवाही करता येईल.

या संदर्भात माहिती घेतली असता काही शासकीय संस्था व खाजगी संस्था अशा प्रकारचा अतिरिक्त प्लाझमा गोळा करुन त्यांचे Fractionation करणेचे काम करतात. National Plasma Fractionation center Mumbai, ही अशा प्रकारची शासकीय संस्था असुन ही प्लाझमा विकत घेण्याचे काम करते. याकरिता सदर संस्थेशी संपर्क साधला असता त्यांनी ई-मेल व्दारे प्लाझमाचे दर (प्रतिलिटर) व त्यास अनुसरुन देण्यात येणा-या अनुषंगीक बाबींचा त्यात उल्लेख केलेला आहे तो पुढीलप्रमाणे:

| अ.नं | संस्थेचे नांव | दर (प्रति लिटर) |
|---|---|---|
| १) | **नॅशनल प्लाझमा फॉर Fractionation सेंटर,मुंबई - ( शासकीय संस्था)** | **२००/- रु.प्रति लिटर** |

National Plasma Fractionation center, Mumbai (शासकीय संस्था) या संस्थेचे दर (प्रतिलिटर) २००/- रु आहेत. तसेच आपण संदर्भीय संस्थेस प्लाझमा दिल्यानंतर ते आपणांस रोख रक्कम किंवा त्याबदल्यात Inj.Albumin 20% 100ml I.P., व Inj.Immunoglobulin 5% 100mlI.P. देणार आहे, असे ई-मेल व्दारे त्यांनी कळविलेले आहे.

याबाबतीत काही जवळच्या रक्तपेढयांशी संपर्क केला असता,अनेक रक्तपेढया हा प्लाझमा अशा Fractionation center ला पाठवितात. यामध्ये नगर जिल्हयातील जनकल्याण रक्तपेढी, आनंदत्रषीजी रक्तपेढी ,अष्टविनायक रक्तपेढी,यासारख्या खाजगी रक्तपेढयांचा समावेश आहे. आपले रक्तपेढी विभागातील अतिरिक्त प्लाझमाही National Plasma Fractionation center Mumbai , यांना देता येईल,असे मत आहे.

National Plasma Fractionation center , Mumbai ही शासकीय संस्था आहे. सदरची संस्था स्वत: रक्तपेढीमध्ये येऊन प्लाझमा घेऊन जाण्याचा खर्च (Logistics & Packing Material) करणार आहेत.सदर संस्थेबरोबर योग्य ते Aggrement करुन श्री साईनाथ रक्तपेढी मध्ये तयार होणारा अतिरिक्त प्लाझमा या संस्थेस कायमस्वरुपी वेळोवेळी होणा-या दरबदलाप्रमाणे विक्री करता येईल.

सोबत National Plasma Fractionation center, Mumbai यांचे प्लाझमा पाठविण्याबाबतचे सुचना पत्रक व SOP for collection of Frozen Plasma for Fractionation From Blood Banks ची प्रत माहितीस्तव सादर केले आहे.

**संस्थान अधिनियम / ठराव यानुसार अनुमान- नवीन प्रस्ताव.**

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय-** १) श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये वेळोवेळी तयार होणारा "अतिरिक्त प्लाझमा" हा National Plasma Fractionation center, Mumbai या शासकीय संस्थेस सध्याचे दराप्रमाणे रु.२००/- प्रतिलिटर व यापुढे होणा-या दरबदलाप्रमाणे विक्री करणेस,

२) श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये वेळोवेळी तयार होणारा अतिरिक्त प्लाझमा National Plasma Fractionation center, Mumbai या शासकीय संस्थेस शासन नियमावलीप्रमाणे विक्री करणेस, किंवा त्या बदल्यात Inj.Albumin किंवा Inj. Immunoglobulin इंजेक्शन आवश्यकतेनुसार घेणेस, व

३) National Plasma Fractionation center, Mumbai या शासकीय संस्थेबरोबर करार करणेस मान्यता असावी.

तरी उपरोक्त प्रस्तावास मान्यता असावी.

सदर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ व मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.१९१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये वेळोवेळी तयार होणारा अतिरिक्त प्लाझमा National Plasma Fractionation center, Mumbai या शासकीय संस्थेस शासन नियमावलीप्रमाणे विक्री करणेस, व त्या बदल्यात त्यांचेकडून Inj.Albumin किंवा Inj. Immunoglobulin इंजेक्शन आवश्यकतेनुसार घेणेस तसेच यासाठी National Plasma Fractionation center, Mumbai या शासकीय संस्थेबरोबर करार करणेस मान्यता देण्यता आली.** (कार्यवाही- प्र.वैद्यकिय अधिक्षिका, साईनाथ रुग्णालय)

---

**विषय नं.५४** **डॉ.रामप्रसन्न नाईक, वैद्यकिय अधिकारी, (जनरल सर्जन) यांचे प्रोत्साहन पर ६ वेतन वाढीबाबत.**

**प्रस्ताव-** तत्कालीन मा.व्यवस्थापन समितीची दि.१७ मे, २००९ रोजीचे सभेतील निर्णयानुसार, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीच्या आस्थापनेवरील कायम कर्मचा-यांना महाराष्ट्र शासनाच्या सहाव्या वेतन आयोगानुसार वेतन देण्यात येत आहे.

महाराष्ट्र शासनाने केंद्र शासनाच्या ६ व्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशीच्या आधारे राज्य वेतन सुधारणा समिती २००८ चे अहवालानुसार, राज्य शासकीय अधिकारी/ कर्मचा-यांना अतिउत्कृष्ट कामासाठी उच्च दराने वार्षिक वेतनवाढ मंजुर करावी. त्यामुळे सध्याची एक किंवा दोन आगाऊ वेतनवाढी मंजुर करण्याची पध्दत बंद करण्यात यावी, अशी शिफारस केलेली होती. या शिफारशीचे संदर्भात सामान्य प्रशासन विभागामार्फत स्वतंत्रपणे कार्यवाही करण्यात येईल, असे शासनाने निर्णय घेतलेला होता.

तथापी शिफारशीचे संदर्भात शासनाचा अंतिम निर्णय होण्यास कालावधी लागण्याची शक्यता विचारात घेऊन दि.०१/१०/२००६, दि.०१/१०/२००७, दि.०१/१०/२००८ रोजी ज्या राज्य शासकीय अधिकारी/ कर्मचा-यांना ५ व्या वेतन आयोगातील वेतनश्रेणी मध्ये प्रचलित योजनेनुसार आगाऊ वेतनवाढ मंजुर करण्यात आल्या असतील अशा कर्मचा-यांची ६ व्या वेतन आयोगानुसार सुधारीत वेतनश्रेणीतील वेतननिश्चती तात्पुरत्या स्वरुपात आगाऊ वेतनवाढी शिवाय करण्यात यावी व आगाऊ वेतनवाढी संदर्भातील शासनाचा अंतिम आदेश प्राप्त झाल्यानंतर अशा कर्मचा-यांची फेर वेतननिश्चिती करण्यात याव्यात, असे शासन परिपत्रकान्वये कळविण्यात आलेले होते.

आता वरील नमुद राज्य वेतन सुधारणा समिती,२००८ यांचे शिफारशी व शासनाचे परिपत्रकातील तरतुदीच्या अनुषंगाने, सहाव्या वेतन आयोगानुसार सुधारीत वेतनश्रेणी अनुज्ञेय झाल्याचे कालावधीत (दि.०१/१०/२००६ ते ०१/१०/२०१५) आगाऊ वेतनवाढीचा लाभ देण्यात येऊ नये, असा शासनाचा निर्णय पारित झालेला आहे.

श्री साईबाबा संस्थान संचलित श्री साईनाथ रुग्णालयात वैदयकीय अधिकारी (जनरल सर्जन) या संवर्गाचे मंजुर तीन पदापैकी ०२ पदे रिक्त असुन एकमेव पदावर डॉ. रामप्रसन्न नाईक हे जनरल सर्जन कार्यरत

आहेत. डॉ नाईक यांची दररोज २५० पर्यत् ओपीडी व २० पर्यत ऑपरेशन असतात त्याचा कामाचा व्याप मोठा असल्याने संदर्भ क्र.०८ नुसार तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीचे दि.१९/०८/ २००६ रोजीचे सभेतील निर्णयान्वये, डॉ राम नाईक यांना श्री साईबाबा हॉस्पिटल कडील समकक्ष वैदयकीय अधिका-याना देण्यात येणा-या वेतनाप्रमाणे वेतन देण्यात यावे, असा निर्णय घेतलेला आहे. सदरचे निर्णयानुसार, डॉ रामप्रसन्न नाईक, वैदयकीय अधिकारी (जनरल सर्जन) यांना रु.१००००-३२५-१५२००+ एन.पी.ए. या वेतनश्रेणीत दि.०१/०९/२००६ पासुन मुळवेतन रु. ११६२५ वरुन रु.१३५७५ करण्यात आलेले आहे.

तदनंतर, श्री साईबाबा संस्थान विश्वस्थ व्यवस्था,शिर्डी च्या आस्थापनेवरील कायम कर्मचा-यांना दि.०१/०१/२००६ पासुन ६ वा वेतन आयोग लागु करणेत आलेला आहे. ऊक्त निर्णयानुसार स्थायी कर्मचा-याची सुधारित वेतनश्रेणीत वेतन निश्चिती करण्यात येऊन फरक आदा करण्यात आलेला आहे.

तथापी, सुधारित वेतननिश्चिती करताना डॉ नाईक यांचे मुळवेतन दि.०१/०१/२००६ रोजीचे असुधारीत वेतनश्रेणीतील (१००००-३२५-१५२००) मुळ वेतन रु.१०,९७५ वर सहावा वेतन आयोगातील (१५६००-३९१०० ग्रेड पे ६६००) मुळ वेतन रुपये २०,४२० वेतन निश्चित करण्यात आलेले होते. त्यांना श्री साईबाबा हॉस्पिटल कडील समकक्ष वैदयकीय अधिका-या प्रमाणे दि.०१/०९/२००६ पासुन असुधारीत वेतनश्रेणीत मुळ वेतन रु १३,५७५ देण्यात आलेले होते. परंतु सहाव्या वेतन आयोगात वेतनवाढ देताना फायदा देण्यात आलेला नाही. त्यामुळे डॉ नाईक यांना फरकाची रक्कम कमी मिळाली याबाबत त्यांनी लेखी तक्रार केलेली होती.

शासन परिपत्रक क्रमांक वेपूर १२०९/प्रक्र.६९/सेवा-९ वित्त विभाग मुंबई दि.२९ एप्रिल,२००९ मधिल तरतुदीनुसार, दि.०१ जानेवारी २००६ च्या नंतर सुधारित वेतन संरचनेत वेतन निश्चिती नुसार शासकीय कर्मचारी वार्षिक वेतनवाढ घेतो आणि जो दि.०१ जानेवारी,२००६ रोजी धारण केलेल्या पदाच्या बाबतीत दि.०१ जानेवारी, २००६ नंतर त्याच्या पुढील वेतनवाढीच्या दिनांका पासुन सुधारित वेतन संरचनेत निवड करतो त्याची त्या दिनांकास सुधारित वेतन संरचनेत वेतन निश्चितीबाबत पुढील प्रमाणे तरतुद आहे, वेतन निश्चितीच्या दिनांकास विदयमान वेतनश्रेणीत अनुज्ञेय मुळ वेतनात महागाई वेतन व दिनांक ०१जानेवारी २००६ रोजी विदयमान वेतनश्रेणीस लागु असलेला महागाई भत्ता मिळवून परीगणित करण्यात यावे ही रक्कम पुढील १० च्या पटीत घेऊन येणारी रक्कम सुधारित वेतन संरचनेतील अनुज्ञेय वेतनबॅन्ड मधील मुळवेतन होईल. याव्यतिरीक्त,विदयमान वेतनश्रेणीस अनुज्ञेय समुचित ग्रेड वेतन देय होईल. विशेष वेतन घेणा-या कर्मचा-याच्या बाबतीत यथास्थिती नियम ७ (१) ब किंवा (क) मधील पध्दत अनुसरण्यात येईल. मात्र वेतन निश्चितीसाठी विचारात घेण्यात येणारे मुळ वेतन व महागाई वेतन हे वेतन निश्चितीच्या दिनांकास अनुज्ञेय असलेले मुळवेतन व महागाई वेतन असेल आणि महागाई भत्ता दि.०१ जानेवारी २००६ रोजी अनुज्ञेय असलेल्या दरानुसार परिगणित करण्यात येईल, असे नमुद आहे.

डॉ नाईक यांचा तक्रार अर्ज व वरील नमुद तरतुद विचारात घेऊन त्यांचे कडून दि.०१/०९/२००६ पासुन वेतनवाढीच्या दिनांकापासुन सुधारित वेतन संरचनेची निवड (वेतन बॅन्ड १५,६००-३९,१००ग्रेड पे ६,६००) करीत असलेबाबतचा विकल्प भरुन घेऊन फेर वेतननिश्चिती केली. त्यानुसार डॉ नाईक याना दि.०१/०९/२००६ ते दि. ३१/०८/२०११ या कालावधीचा फरक आदा करण्यात आलेला आहे.

तदनंतर महाराष्ट्र शासनाने पदव्युत्तर पदविका व पदव्युत्तर पदवी अर्हताधारकास वैदयकीय अधिका-यांना ०३ व ०६ प्रोत्साहनपर वेतनवाढी मंजुर करण्याचा निर्णय घेतलेला आहे. ऊक्त निर्णयास अनुरुन तत्कालीन मा.त्रिसदस्य समितीचे दि.१८/०२/२०१५ रोजीचे सभेत निर्णय होऊन त्यास मा. मुंबई उच्च न्यायालयाचे, औरंगाबाद खंडपीठाचे मान्यतेनुसार श्री साईनाथ रुग्णांलयातील पदव्युत्तर पदविका व पदव्युत्तर पदविधारकास अनुक्रमे ०३ व ०६ अतिरिक्त प्रोत्साहनपर वेतनवाढी मंजुर करण्यात आलेल्या आहेत. वरील निर्णयास अनुसरुन ११ पदव्युत्तर पदविकाधारकाना ०३ व ०८ पदव्युत्तर पदवीधारकाना ०६ अतिरिक्त प्रोत्साहनात्मक वेतनवाढी मंजुर करण्यात आलेल्या आहेत. सदरचे आदेशान्वये डॉ राम नाईक, जनरल सर्जन यांना ही ०६ वेतनवाढी मंजुर करण्यात आलेल्या आहेत. तथापी त्यांना या वेतनवाढीचा लाभ देताना विदयमान वेतनबॅन्ड (१५६००-३९१०० ग्रेड पे ६६००) बार होत असल्याने वेतनवाढीचा प्रत्यक्ष लाभ देण्यात आलेला नाही.

तरी डॉ रामप्रसन्न नाईक, वैदयकीय अधिकारी (जनरल सर्जन) यांना तत्कालीन मा व्यवस्थापन मंडळाने श्री साईबाबा हॉस्पिटल कडील समकक्ष वैदयकीय अधिका-यांना देण्यात येणा-या वेतनाप्रमाणे वेतन देणेकामी दि. ०१/०९/२००६ पासुन पाचव्या वेतन आयोगातील विदयमान वेतनश्रेणी रु.१००००-३२५-१५२०० मध्ये मुळवेतन (रु.११,६२५/-) मध्ये सहा वेतनवाढीचे टप्पे देऊन मुळवेतन (रु.१३,५७५/-) निश्चित करण्यात आले

आहे. त्यास अनुसरुन दि.०१/०९/२००६ रोजी सहाव्या वेतन आयोगात वेतननिश्चिती करुन वेतन देण्यात येत आहे.

आता शासन निर्णयानुसार (फक्त) श्री साईनाथ रुग्णांलयातील पदव्युत्तर पदविधारकास ०६ अतिरीक्त प्रोत्साहनपर वेतनवाढी मंजुर करण्यात आलेल्या आहेत. तथापी डॉ नाईक यांचे या (०६) वेतनवाढीने विदयमान वेतनबॅन्ड बार होत असल्याने प्रत्यक्ष लाभ देण्यात आलेला नाही.

तरी डॉ रामप्रसन्न नाईक, वैदयकीय अधिकारी (जनरल सर्जरी) श्री साईनाथ रुग्णालय यांना तत्कालीन मा.व्यवस्थापन समितीचे दि.१९ ऑगस्ट,२००६ रोजीचे सभेतील निर्णयान्वये, ०६ वेतनवाढी देण्यात आलेल्या असल्याने पुन्हा अतिरीक्त प्रोत्साहनपर ०६ वेतनवाढी देणेबाबत पारित झालेल्या आदेशातुन श्री नाईक यांचे नांव वगळण्यास मान्यता मिळावी ही विनंती.

**निर्णय क्र.१९२** **सदरहू प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवणेत आला.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.५५** **श्री साईनाथ रुग्णालयाकडील डॉक्टरांना श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये केलेल्या शस्त्रक्रिया/ उपचारांवर प्रोत्साहन भत्ता देणेबाबत.**

**प्रस्ताव-** **संस्थान अधिनियम २००४ मधिल तरतूद**:-पृ.क्रं.३५७ समितीची कर्तव्ये व अधिकार १७(२) ण

**प्रस्तावीकः**- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी संचलित श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालय चालविली जात आहेत. सदर रुग्णालयांमध्ये वेगवेगळया आजारांवर विविध तपासण्या/ उपचार/ शस्त्रक्रिया केल्या जातात. त्यापैकी श्री साईबाबा रुग्णालयामध्ये आवश्यक असलेले तज्ञ डॉक्टर्स उपलब्ध होवुन ते टिकुन राहणेसाठी डॉक्टरांना त्यांचे मासिक वेतनाव्यतिरीक्त रुग्णांकडुन आकारण्यात येणा-या बिलातील काही विशिष्ट रक्कम दि.०३/०६/२००६रोजीच्यामा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्रं.३२८. अन्वये प्रोत्साहन भत्ता म्हणुन दिली जाते. तसेच त्यामध्ये सुधारणा करुन दि.०८.०३.२००९ रोजीच्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.१९६ अन्वये सुधारीत दराने प्रोत्साहन भत्ता संबंधीत डॉक्टरांना अदा केला जातो.

त्या अनुषंगाने, श्री साईनाथ रुग्णालयाकडील कामकाजाच्या दृष्टीने काही शस्त्रक्रिया श्री साईनाथ रुग्णालयाचे ओटीमध्ये आवश्यक सुविधा नसल्याने करणे शक्य होत नाहीत, अशा शस्त्रक्रिया मा. वैद्यकिय संचालक यांचे परवानगीने श्री साईनाथ रुग्णालयाकडील वैद्यकिय अधिकारी हे श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये भरती करुन शस्त्रक्रिया करतात अशा रुग्णांकडुन श्री साईबाबा हॉस्पिटलचे दराप्रमाणे प्रोत्साहन भत्यांच्या रक्कमेसह बिल आकारणी करणेत येते. तसेच आपतकालीन परिस्थीतीमध्ये श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये भरती केलेल्या रुग्णास ENT Surgeon, Ophthalmologist, Gynecologist तसेच आवश्यकतेप्रमाणे श्री साईनाथ रुग्णालयाकडील इतर डॉक्टरांची गरज भासल्यास श्री साईनाथ रुग्णालयातील डॉक्टरांसोबत सदर रुग्णांवर उपचार किंवा शस्त्रक्रीया केल्या जातात, अशा रुग्णास श्री साईनाथ रुग्णालयातील डॉक्टरांनी केलेल्या उपचार व शस्त्रक्रीया यांचे प्रोत्साहन भत्तयासह बिलही श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये आकारले जाते.

**मागणीः**- श्री साईनाथ रुग्णालयाचे डॉक्टरांनी गरज भासल्यास श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये रुग्णांना भरती करुन किंवा श्री साईबाबा हॉस्पिटलचे डॉक्टरां सोबत शस्त्रक्रिया किंवा उपचार करतात. त्याबद्दल संबंधित रुग्णांकडुन डॉक्टरांचे प्रोत्साहन भत्तयासह बिल आकारणी केले जातात, आकारणी केलेला प्रोत्साहन भत्ता संबंधीत श्री साईनाथ रुग्णालयाचे डॉक्टर मागणी करतात. जर प्रोत्साहन भत्ता मिळाला नाही तर श्री साईनाथ रुग्णांलयाचे डॉक्टर गरज भासल्यावर रुग्णांना श्री साईबाबा हॉस्पिटल डॉक्टर सोबत किंवा तातडीचे वेळी उपचार/ शस्त्रक्रिंया करणेसाठी तयार नाही.

**विभागाचा अभिप्राय व स्पष्ट मतः**- मानवकल्याणाच्या दृष्टीने श्री साईबाबा रुग्णालयामध्ये केलेल्या तपासण्या, उपचार व शस्त्रक्रीयावरील प्रोत्साहन भत्ता पुर्वीप्रमाणेच मा. वैद्यकिय संचालक यांचे आदेशान्वये अदा करणेत येत होता.परंतू माहे ऑगस्ट २०१७पासून प्रोत्साहन भत्ता अदा करतांना पुर्व लेखापरीक्षकांचे प्रतीनिधींनी यावर आक्षेप घेतले आहे की,

१) डॉक्टरांचे नियुक्ती आदेशावर प्रोत्साहन भत्ता देण्याची नोंद नाही.

२) मा.वैद्यकिय संचालक यांचे स्वाक्षरीने डॉक्टरांना प्रोत्साहन भत्ता देण्यात येतील का ?

त्यामुळे संबंधित डॉक्टरांना प्रोत्साहन भत्याची रक्कम अदा केलेली नाही.

तरी श्री साईनाथ रुग्णालयाकडील डॉक्टरांना मा. वैद्यकीय संचालक, श्री साईबाबा हॉस्पिटल यांचे आदेशान्वये श्रीसाईबाबा रुग्णालयामध्ये श्री साईनाथ रुग्णालयाकडील डॉक्टरांना भरती रुग्णाचे/ आपतकालीन

परिस्थीतीमध्ये तपासण्या, उपचार व शस्त्रक्रीया केल्यावर रुग्णाकडुन बिलामध्ये आकारणी केलेल्या प्रोत्साहन भत्याची रक्कम पुर्वीप्रमाणेच मा. वैद्यकिय संचालक यांचे आदेशान्वये अदा करणेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१९३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे वैद्यकिय संचालक यांचे आदेशानुसार श्री साईनाथ रुग्णालयामधील डॉक्टरांनी आपतकालीन परिस्थीतीमध्ये श्री साईबाबा हॉस्पिटलमधील रुग्णांवर केलेल्या शस्त्रक्रिया/ उपचार यावर त्यांना प्रोत्साहन भत्ता देण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.५६ श्री साईनाथ रुग्णालयातील G.O,T. या विभागाकरीता ETO Machine खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयातील General O.T या विभागाने मागणीपत्रकान्वये नविन ०१ नग ETO Machine ची मागणी केलेली आहे.

सदर विभागात 9kw चे ०२ नग (M/s. M.Shah) कंपनीचे Autoclave मशीन असून 18 kw चे ०१ नग मशीन आहे परंतु Laproscopic Instrument हे अत्यंत लहान असल्यामुळे त्यांना Sterilization करण्यासाठी त्यांनी नवीन मागणी केली आहे.

दि.०८/०१/२०१८ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेत श्री साईबाबा रूग्णालयातील एकुण १२४ नग मशिन्स बदलणेसाठी मान्यता मिळालेली असून त्यानुसार खरेदीची कार्यवाही सुरू करण्यात आलेली आहे. त्यामध्ये ETO Machine ची देखील खरेदी करण्यात येत असून त्यासाठी अंदाजे खर्च रू.९,००,०००/- इतका प्रस्तावीत करण्यात आलेला आहे. तेंव्हा General O.T या विभागाकरीता ETO Machine खरेदीकामी अंदाजे रक्कम रू.९,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

**मागणी**– श्री साईबाबा रुग्णालयातील General O.T या विभागाने ETO Machine ची मागणी पत्रकान्वये मागणी केलेली आहे.

**संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-**

१) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण)अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

२) शासकीय विभागानी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी कार्यपध्दतीची नियमावली नुसार शासन निर्णय क्र. भांखस– २०१४/ प्र.क्र. ८२/ भाग– ३/ उद्योग– ४, दि. ३० ऑक्टोबर २०१५ अन्वये परिच्छेद ३.२. – नियमपुस्तिकेनुसार खुली स्पर्धात्मक निविदा प्रक्रिया पार पाडण्यासाठी ज्या निविदांचे अंदाजित मुल्य रु.३,००,०००/- पेक्षा जास्त आहे अशा सर्व निविदा ई-निविदा पध्दतीने काढण्यात याव्यात. संबंधित विभागांना रु.५ हजार पर्यंतच्या किंमतीच्या वस्तु निविदा/ दरपत्रके न मागविता थेट जागेवरखरेदी करण्याची मुभा देण्यात आली आहे. अशा वस्तुंची एकुण खरेदी त्या त्या अर्थिक वर्षात रुपये ५०,०००/- पेक्षा जास्त नसावी.

**विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत:-** श्री साईनाथ रुग्णालयातील General O.T या विभागात दैनंदिन शस्त्रक्रिया करण्यात येतात. सदर शस्त्रक्रिया झाल्यावर Laproscopic Instrument Sterilization करावे लागतात. पेशंटला कुठल्याच प्रकारचा प्रादुर्भाव होऊ नये म्हणून Sterilization करावे लागतात. दि.०८/०१/२०१८ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेत श्री साईबाबा रूग्णालयातील एकुण १२४ नग मशिन्स बदलणेसाठी मान्यता मिळालेली असून त्यानुसार खरेदीची कार्यवाही सुरू करण्यात आलेली आहे. त्यामध्ये ETO Machine ची देखील खरेदी करण्यात येत असून त्यासाठी अंदाजे खर्च रू.९,००,०००/- इतका प्रस्तावीत करण्यात आलेला आहे. तरी त्यांच्या मागणीनुसार ०१ नग ETO Machine विहीत पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदी करून देण्यास हरकत नाही असे नम्र मत आहे.

तरी श्री साईनाथ रुग्णालयातील General O.T या विभागासाठी ०१ नग ETO Machine विहित पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदीस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.९,००,०००/- (अक्षरीरू.नऊ लाख मात्र) चे खर्चाच्या प्रस्तावास मान्यता असावी.

निर्णय क्र.१९४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील General O.T. या विभागासाठी ०१ नग ETO Machine खरेदी करणेकामी विहित पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.९,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.५७** **श्री साईनाथ रुग्णालयातील Orthopedic Surgery या विभागाकरीता ACL/PCL Instrument set खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयातील Orthopedic Surgery या विभागाने मागणी पत्रकान्वये नविन ACL/PCL Instrument set ची मागणी केलेली आहे. सदर Instrument चा वापर हा गुडघ्याच्या सांध्याच्या Ligaments (अस्थिबंधन) च्या पुर्नबांधणीसाठी केला जातो. सदर विभागामध्ये ACL/PCL Instrument set उपलब्ध नसल्यामुळे त्यांनी नवीन ACL/PCL Instrument set ची मागणी केली आहे.

नविन ACL/PCL Instrument set खरेदीकामी अंदाजे खर्चाकरीता M/s. Stryker India Pvt. Ltd., Mumbai यांचेकडून ई-मेल व्दारे अंदाजे खर्चाकरीता दरपत्रक मागविण्यात आलेले होते. त्यानुसार त्यांनी ई-मेल अन्वये खालीलप्रमाणे दरपत्रक दिलेले आहे-

| S.No. | Name of Item | Qty. | Rate Per in Rs. | Total Amt.in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | M/s.Stryker India Pvt.Ltd., Mumbai | 1 | 9,89,560/- | 9,89,560/- |
| | Total Amt. in Rs. | | | 9,89,560/- |

वरीलप्रमाणे दरानुसार उपरोक्त ACL/PCL Instrument set खरेदीकामी रु.९,८९,५६०/- (अक्षरी रक्कम रु.नऊ लाख एकोणनव्वद  हजार पाचशे साठ मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे.

**मागणी**– श्री साईबाबा रुग्णालयातील Orthopedic Surgery या विभागाने ACL/PCL Instrument set ची मागणीपत्रकान्वये मागणी केलेली आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-**

१) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण)अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

२) शासकीय विभागानी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी कार्यपध्दतीची नियमावली नुसार शासन निर्णय क्र. भांखस– २०१४/ प्र.क्र.८२/ भाग– ३/ उद्योग– ४, दि. ३० ऑक्टोबर २०१५ अन्वये परिच्छेद ३.२. – नियमपुस्तिकेनुसार खुली स्पर्धात्मक निविदा प्रक्रिया पार पाडण्यासाठी ज्या निविदांचे अंदाजित मुल्य रु.३,००,०००/- पेक्षा जास्त आहे अशा सर्व निविदा ई-निविदा पध्दतीने काढण्यात याव्यात. संबंधित विभागांना रु.५ हजार पर्यंतच्या किंमतीच्या वस्तु निविदा/ दरपत्रके न मागविता थेट जागेवरखरेदी करण्याची मुभा देण्यात आली आहे. अशा वस्तुंची एकुण खरेदी त्या त्या अर्थिक वर्षात रुपये ५०,०००/- पेक्षा जास्त नसावी.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** श्री साईनाथ रुग्णालयातील Orthopedic Surgery या विभागाने मागणीपत्रकान्वये नविन ACL/PCL Instrument set ची मागणी केलेली आहे. सदर Instrument चा वापर हा गुडघ्याच्या सांध्याच्या Ligaments (अस्थिबंधन) च्या पुर्नबांधणीसाठी केला जातो. सदर विभागामध्ये ACL/PCL Instrument set उपलब्ध नसल्यामुळे त्यांनी नवीन ACL/PCL Instrument set ची मागणी केली आहे.

तरी श्री साईनाथ रुग्णालयातील Orthopedic Surgery या विभागासाठी ACL/PCL Instrument set विहित पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.९,८९,५६०/- (अक्षरी रक्कम रु.नऊ लाख एकोणनव्वद  हजार पाचशे साठ मात्र) चे खर्चाच्या प्रस्तावास मान्यता असावी.

**निर्णय क्र.१९५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील Orthopedic Surgery या विभागासाठी ACL/PCL Instrument Set खरेदी करणेकामी विहित पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.९,८९,५६०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.५८** **श्री साईनाथ रुग्णालयातील Ophthal O.P.D. या विभागाकरीता नवीन a-Scan Biometry खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रूग्णालयातीलOphthal O.P.D. या विभागाने मागणीपत्रकान्वये नवीन A-Scan Biometry चीमागणी केलेली आहे.

श्री साईनाथ रूग्णालयातीलOphthal O.P.D. याविभागात सध्या सन २००३ मध्ये रक्कम रू. १,४४,५००/- इतक्या रक्कमेत खरेदी केलेले आहे. सदर मशिनचा वापर १४ वर्षापासून झाल्यामुळे ते वारंवार

नादुरूस्त होत आहे तसेच त्यांना अद्यावत तंत्रज्ञान असलेले A-Scan Biometry चीआवश्यकताआहे त्यामुळे त्यांनी नवीन ०१ नगA-Scan Biometry ची मागणी केली आहे.

नविन A-Scan Biometry खरेदीकामी अंदाजे खर्चाकरीता M/s.KLB Instruments Co.Pvt.Ltd., New Delhi यांचेकडून ई-मेल व्दारे अंदाजे खर्चाकरीता दरपत्रक मागविण्यात आलेले होते. त्यानुसार त्यांनी ई-मेल अन्वये खालीलप्रमाणे दरपत्रक दिलेले आहे-

| S.No. | Name of Item | Qty. | Rate Per in Rs. | Total Amt.in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | KLB Instruments Co. Pvt. Ltd., New Delhi | 1 | 25,76,000/- | 25,76,000/- |
| | Total Amt. in Rs. | | | 25,76,000/- |

वरीलप्रमाणे दरानुसार उपरोक्त A-Scan Biometry खरेदीकामीरु.२५,७६,०००/- (अक्षरी रक्कम रु.पंचवीस लाख श्याहत्तर हजारमात्र) इतका खर्च अपेक्षित आहे.

**मागणी**– श्री साईनाथ रूग्णालयातीलOphthal O.P.D. या विभागाने मागणीपत्रकान्वये ०१ नग A-Scan Biometryचीमागणी केलेली आहे.

**संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान :-**

१) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण)अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

२) शासकीय विभागानी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी कार्यपध्दतीची नियमावली नुसार शासन निर्णय क्र. भांखस– २०१४/ प्र.क्र.८२/ भाग– ३/ उद्योग– ४, दि. ३० ऑक्टोबर २०१५ अन्वये परिच्छेद ३.२. – नियमपुस्तिकेनुसार खुली स्पर्धात्मक निविदा प्रक्रिया पार पाडण्यासाठी ज्या निविदांचे अंदाजित मुल्य रु.३,००,०००/- पेक्षा जास्त आहे अशा सर्व निविदा ई-निविदा पध्दतीने काढण्यात याव्यात. संबंधित विभागांना रु.५ हजार पर्यंतच्या किंमतीच्या वस्तु निविदा/ दरपत्रके न मागविता थेट जागेवर खरेदी करण्याची मुभा देण्यात आली आहे. अशा वस्तुंची एकुण खरेदी त्या त्या अर्थिक वर्षात रुपये ५०,०००/- पेक्षा जास्त नसावी.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** श्री साईनाथ रूग्णालयातीलOphthal O.P.D. या विभागाने मागणी पत्रकान्वये नवीन A-Scan Biometry चीमागणी केलेली आहे. श्री साईनाथ रूग्णालयातीलOphthal O.P.D. याविभागात सध्या सन २००३ मध्ये रक्कम रू. १,४४,५००/- इतक्या रक्कमेत खरेदी केलेले आहे. सदर मशिनचा वापर १४ वर्षापासून झाल्यामुळे ते वारंवार नादुरूस्त होत आहे. तसेच त्यांना अद्यावत तंत्रज्ञान असलेले A-Scan Biometry ची आवश्यकता आहे. त्यामुळे त्यांनी नवीन ०१ नग A-Scan Biometry ची मागणी केली आहे.त्यामुळे त्यांच्या मागणीनुसार ०१ नग नवीनA-Scan Biometry विहीतपध्दतीने ई-निविदा मागवून खरेदी करणेस हरकत नाही असे नम्र मत आहे.

तरी श्री साईनाथ रूग्णालयातील Ophthal O.P.D. या विभागाकरीता ०१ नग नवीन A-Scan Biometry विहित पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदीस व याकामी येणा-या रक्कम रू.२५,७६,०००/- (अक्षरी रक्कम रु.पंचवीस लाख श्याहत्तर हजारमात्र)चे खर्चाच्या प्रस्तावासमान्यता असावी.

निर्णय क्र.१९६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील Ophthal O.P.D. या विभागाकरीता ०१ नग नवीन A-Scan Biometry खरेदी करणेकामी विहित पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.२५,७६,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

विषय नं.५९ **सी.टी.स्कॅन मशिनचे 160 KVA यु.पी.एस. च्या बॅटरीज खरेदी करणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा हॉस्पिटलमधील सी.टी.स्कॅन मशिन करीता सोकोमॅक कंपनीचे 01 नग 160 KVA यु.पी.एस. दि.14/07/2010 रोजी बसविण्यात आले होते. सदर सी.टी.स्कॅन मशिन तातडीच्या वेळी वापरले जात असताना विदयुत प्रवाह खंडीत झाल्यास बंद पडु शकतात. त्यावेळी अत्यावश्यक सेवा आवश्यक असलेल्या अपघातग्रस्त रूग्णांचे पुढील उपचार करणे शक्य होत नाही. त्यामुळे अशा महत्वाच्या मशिन्स करीता सदर यु.पी.एस.सिस्टीम एकुण रू. 13,40,000/- इतक्या रकमेत खरेदी करुन बसविण्यात आली आहे.सदर160 KVA यु.पी.एस. ची

मार्च 2017 अखेर घसारा वजा जाता किंमत रू.1,78,868.41/- इतकी आहे.कंपनीचे ई- मेल नुसार सदर मशिन कार्यान्वीत केलेपासुन 10 ते 12 वर्षापर्यंत म्हणजेच अंदाजे सन 2022 पर्यत वापरता येउ शकते व कंपनी त्याकरीता स्पेअर पार्टसह सर्व्हीस देणार आहे. त्यामूळे सदर यु.पी.एस. तातडीने बदलणेची आवश्यकता नाही.

मे.सोकोमॅक इनोव्हेटिव पॉवर सोल्युशन प्रा.लि. मुंबई यांचेकडे दि.01/04/2017 ते दि.31/03/2018 या कालावधीसाठी कॉम्प्रेहेन्सीव्ह वार्षीक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (CMC) करणेत आलेले आहे. सदर कॉन्ट्रॅक्ट कालावधीत दुरुस्ती व देखभालीकरीता आवश्यक असणाऱ्या स्पेअर पार्ट कंपनी स्वखर्चाने बदलणार आहे. परंतु कन्झ्युमेबल स्पेअर पार्ट (उदा.Wound Component, Batteries) ची किंमत संस्थानला वेगळी अदा करावयाची आहे.

सध्या सी.टी.स्कॅन मशिनचा यु.पी.एस. व्यवस्थीत काम देत नसल्याचे सदर विभागांनी कळविले आहे. त्यासाठी मे.सोकोमॅक इनोव्हेटिव पॉवर सोल्युशन प्रा.लि. मुंबई, यांचे इंजिनीअर तातडीच्या भेटी करीता आले असता त्यांनी यु.पी.एस. ची तपासणी करून सर्व्हिस रिपोर्ट क्र.7177,दि. 22/11/2017अन्वये यु.पी.एस. च्या 12V/120Ah या प्रकारच्या बॅटरीज खराब झाल्यामुळे बदलण्याची आवश्यकता असल्याचे कळविले आहे. सदर बॅटरीज यु. पी. एस. कार्यान्वीत केलेपासुन आजपावेतो बदलणेत आलेल्या नाहीत. तसेच वॉरंटी कालावधी संपलेला आहे.

**मागणी:-** त्यासाठी यु.पी.एस.चे मुळ उत्पादक मे. सोकोमॅक इनोव्हेटिव पॉवर सोल्युशन प्रा. लि. मुंबई यांचेकडुन यु.पी.एस. बॅटरीजचे कोटेशन मागणी करण्यात आलेली आहे. कंपनीने त्यांचे पत्र क्र.SIPSPL/ MUM/CIM/ GEN/SSST/ 05/01/18,Dt. 16/01/2018 अन्वये खालीलप्रमाणे कोटेशन पाठविले आहे.

| Sr. No. | Description | Qty | Rate Per | Total Amount |
|---|---|---|---|---|
| 01 | 12V/120Ah SMF Battery | 64 | 9,300.00 | 5,95,200.00 |
| + GST Extra @ 28 % | | | | 1,66,656.00 |
| (A) Sub Total | | | | 7,61,856.00 |
| Labour Cost during Transportation & site Work | | | | 30,000.00 |
| + GSTExtra @ 18 % | | | | 5,400.00 |
| (S) Sub Total | | | | 35,400.00 |
| Total Amount (A+B) R/O (Incl. all Taxes) in Rs. | | | | 7,97,256.00 |

वरील प्रमाणे सी.टी.स्कॅन मशिनचे यु.पी.एस.च्या बॅटरीज बदलणेस सर्व करांसहीत एकुण रू. 7,97,256/- (अक्षरी रू. सात लाख सत्यान्नव हजारदोनशे छपन्न मात्र) इतका खर्च येणार आहे. सदर बॅटरीज करीता कंपनी दोन वर्षाची वॉरंटी देत आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:** वरील संस्थान अधिनियमानुसार दुरूस्ती व देखभाल करता येईल. सदर दुरूस्ती करीता रु.3 लाखापेक्षा अधिक खर्च येणार असल्यामुळे मा.व्यवस्थापनसमिती सभेची मान्यता घेणेची आवश्यकता आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-**सदरबॅटरीजचा दोनवर्षाचा वॉरंटी कालावधी संपलेला आहे परंतु सदर बॅटरीज आजपावेतो ७ वर्षापर्यंत व्यवस्थीत काम दिले होते. सध्या खराब झाल्यामुळे बदलणे आवश्यक आहे.कंपनीचे ई- मेल नुसार सदर मशिन कार्यान्वीत केलेपासुन १० ते १२ वर्षापर्यंत म्हणजेच अंदाजे सन २०२२ पर्यत वापरता येउ शकते,त्यामुळेसदरयु.पी.एस.बदलण्याचीआवश्यकतानाही. तसेच सदर यु.पी.एस. नविन सी.टी.स्कॅन मशिनसाठी देखील वापरता येईल. सदर सी.टी.स्कॅन मशिनच्या यु.पी.एस.च्या बॅटरीज खराब झाल्यास यु.पी.एस. बॅकअप देणार नाही व तातडीच्या वेळी रुग्णाची तपासणी करताना विदयुत प्रवाह खंडीत झाल्यास सी.टी.स्कॅन मशिन बंद पडु शकते. त्यावेळी अत्यावश्यक सेवा आवश्यक असलेल्या अपघातग्रस्त रूग्णांचे पुढील उपचार करणे शक्य होत नाही. तसेच वारंवार खंडीत होणाऱ्या विदयुत प्रवाहामुळे सी.टी.स्कॅन मशिनचे महागडे पार्ट खराब होतात व ते बदलण्यासाठी कंपनी त्यांचे जर्मनी येथील फॅक्टरीतुन पार्टस मागवुन बदलते. अशावेळी मशिन 4-5 दिवस बंद राहू शकते.तसेच जुन्या खराब झालेल्या बॅटरीज रेकॉर्ड विभागाकडे जमा करून त्यांची विहीत पद्धतीने विक्री करता येईल.

तरी सी.टी.स्कॅन मशिनचे यु.पी.एस.च्या बॅटरीज विहीत पद्धतीने ई-निवीदा मागवून खरेदी करणेसाठी व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे एकुण रु.7,97,256/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.१९७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सी.टी.स्कॅन मशिनचे यु.पी.एस.च्या बॅटरीज खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.७,९७,२५६/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.६०** **राजीव गांधी जिवनदायी आरोग्य योजना व महात्मा फुले जन आरोग्य योजने अंतर्गत रुग्णाच्या प्रत्यक्ष उपचारापोटी प्राथमिक मंजुर आदेशापोटी कमी आलेल्या रकमेस वैद्यकीय सवलत म्हणून मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना दि.१४/०२/२०१३ रोजी ०८ जिल्हयासाठी व दि.२६/११/२०१३ पासुन महाराष्ट्रातील सर्व जिल्हयासांठी चालु करण्यात आलेली आहे. रुग्ण डिस्चार्ज झाल्यानंतर १२ दिवसानंतर ऑनलाईन पदधतीने विमा कंपनीकडे प्राथमिक मंजुर पॅकेजनुसार बीले सादर करण्यात येतात. विमा कंपनीकडुन पाठविलेल्या प्राथमिक मंजुर पॅकेज बीलांची शहनिशा करुन योजनेच्या एमओयु व गाईडलाईन्सनुसार प्राथमिक मंजुर रकमेत कपात करुन उर्वरीत रक्कम रुग्णालयाच्या वित्त विभागाकडे आरटीजीएस पदधतीने अदा करण्यात येते.

प्राथमिक मंजुर रकमेपेक्षा कमी रक्कम येण्याची कारणे ( ही कारणे संस्थान रुग्णालय व राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना यांच्यात झालेल्या एमओयु व गाईडलाईन नुसार आहेत)

१. ॲन्जिओप्लास्टी या केसेसबाबत असणारी प्राथमिक मंजुरी ही. रु ६०,०००/- इतकी दिली जाते. परंतु प्रत्यक्षात प्रोसिजर करताना Balloon वापरला गेलेला नसेल तर अशा केसेसमध्ये Balloon ची किंमत वजा करु रु.४०,०००/- इतकीच रक्कम विमा कंपनीकडुन प्राप्त होते.म्हणजे प्रतिकेस रु २०,०००/- इतकी रक्कम कपात करण्यात येते. याबाबत Hospital Billing त्या पॅकेजप्रमाणे करणे गरजेचे आहे.

२. मेडिसीन पॅकेज अंतर्गत दाखल होणा-या रुग्णांवर योजने अंतर्गत उपचार करताना मंजुरीपासुन पेशंटच्या डिस्चार्ज पर्यंतचा कालावधी ग्राहय धरला जातो, म्हणुन पॅकेजच्या नियमानुसार प्रतिदिवसाप्रमाणे लागु होणारी रक्कम अदा केली जाते.उदा.एखादा रुग्णांच्या आजाराचे पॅकेज १५ दिवसाचे असते व तो ०५ दिवसात डिस्चार्ज होतो त्यामुळे ०५ दिवसाचेच पैसे विमा कंपनीकडुन येतात.

३. आपल्या हॉस्पिटलमध्ये DSA ही तपासणी केली जात नाही पंरतु Ischemic Strokes-Management with all necessary Investigations Including 4 Vessels Cerebral Angio(DSA) & Surgery if necessary(M9T3.3) या पॅकेजसाठी DSA हा रिपोर्ट देणे बंधनकारक आहे. म्हणुन या रिपोर्टअभावी मंजुर पॅकेज रकमेतुन विशिष्ट रक्कम कपात केली जाते.सदर DSA तपासणी ही प्रत्येक तालुका व जिल्हयाच्या ठिकाणी होत नाहीत तर ही तपासणी आपल्या परिसरात नाशिक व मुंबई येथेच होते. रुग्ण आपल्या रुग्णालयात भरती असल्याने तो इतरत्र पाठविण्यासाठी अडचण येते.

४. उपचारानंतर/ शस्त्रक्रियेनंतर रुग्णांची प्रकृती समाधानकारक नसल्यास नातेवाईक रुग्णास इतरत्र हलवितात अशा परिस्थीतीत रुग्णास डॉक्टरांच्या सल्ल्याविरुदध (DAMA) डिस्चार्ज द्यावा लागतो अशा वेळी मंजुर पॅकेजच्या ७५ % इतकीच रक्कम विमा कंपनीकडुन अदा केली जाते.उर्वरीत २५ % रक्कम रुग्णांकडुन आपण वसुल करु शकत नाही.

५. रुग्णांचे शस्त्रक्रियेनंतर २४ तासाचे आत पेशंटचे निधन (Death) झाल्यास मंजुर पॅकेजच्या ७५ % इतकीच रक्कम विमा कंपनीकडुन अदा केली जाते.

६. आर्थो प्रोसिजर्समध्ये जितके फ्रॅक्चर्स ऑपरेट केलेले असतील, त्याप्रमाणे लागु असणा-या प्रतिफ्रॅक्चर पॅकेजनुसार रक्कम विमा कंपनीकडुन अदा केली जाते.

७. एकाच वेळी दोन शस्त्रक्रिया /उपचार केलेले असल्यास पहिल्या शस्त्रक्रियेस १०० % व दुस-या शस्त्रक्रियेस ५० % इतकीच रक्कम विमा कंपनीकडुन अदा केली जाते.

राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेकडे (महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना) ऑनलाईन पदधतीने सादर केलेल्या फाइल्सच्या प्राथमिक मंजुरी आदेशापेक्षा कमी आलेल्या रकमेस मा.व्यवस्थापन समितीची मंजुरी घेतलेली नसल्याचे संदर्भ क्र.०१ नुसार प्राप्त झालेल्या विशेष लेखापरिक्षण अहवालात नमुद केलेले आहे त्यामुळे सदर रक्कम वैद्यकीय सवलत म्हणुन नावे टाकणे करीता. मा.व्यवस्थापन समितीची मान्यता आवश्यक आहे.

**सद्यस्थिती-**

| वर्ष | कमी रक्कम प्राप्त झालेल्या लाभार्थिंची संख्या | प्राथमिक मंजुरी आदेशाप्रमाणे येणे असलेली रक्कम | प्रत्यक्ष प्राप्त झालेली रक्कम | एकुण कमी आलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| २०१२-१३ | १ | ८०,०००/- | ७५,०००/- | ५,०००/- |

सन २०१२-१३ मध्ये उपचार करण्यात आलेल्या एकुण ३४ रुग्णांपैकी एका रुग्णांची रु ५,०००/- इतकी रक्कम कमी आलेली आहे.रक्कम कमी आल्याचे कारण सोबत जोडलेल्या Annex -1 प्रमाणे आहे.

| वर्ष | कमी रक्कम प्राप्त झालेल्या लाभार्थिंची संख्या | प्राथमिक मंजुरी आदेशाप्रमाणे येणे असलेली रक्कम | प्रत्यक्ष प्राप्त झालेली रक्कम | एकुण कमी आलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| २०१३-१४ | ७६ | ७९,४८,३२०/- | ६४,६०,३११/- | १४,८८,००९/- |

सन २०१३-१४ मध्ये उपचार करण्यातआलेल्या एकुण २१०६ रुग्णापैकी ७६ रुग्णांची रु १४,८८,००९ इतकी रक्कम कमी आलेली आहे.रक्कम कमी आल्याचे कारणे सोबत जोडलेल्या Annex -२ प्रमाणे आहे.

| वर्ष | कमी रक्कम प्राप्त झालेल्या लाभार्थिंची संख्या | प्राथमिक मंजुरी आदेशाप्रमाणे येणे असलेली रक्कम | प्रत्यक्ष प्राप्त झालेली रक्कम | एकुण कमी आलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| २०१४-१५ | २७० | १,९६,०३,७५८/- | ०१,५६,५२,२५०/- | ३९,५१,५०८/- |

सन २०१४-१५ मध्ये उपचार करण्यात आलेल्या एकुण ४२४५ रुग्णांपैकी २७० रुग्णांची रु ३९,५१,५०८/- इतकी रक्कम कमी आलेली आहे. रक्कम कमी आल्याचे कारणे सोबतजोडलेल्या Annex -३ प्रमाणे आहे.

| वर्ष | कमी रक्कम प्राप्त झालेल्या लाभार्थिंची संख्या | प्राथमिक मंजुरी आदेशाप्रमाणे येणे असलेली रक्कम | प्रत्यक्ष प्राप्त झालेली रक्कम | एकुण कमी आलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| २०१५-१६ | १७६ | ९९,९६,११८/- | ८०,६७,६८९/- | १९,२८,४३१/- |

सन २०१५-१६ मध्ये उपचार करण्यात आलेल्या एकुण ४०७६ रुग्णांपैकी १७६ रुग्णांची रु १९,२८,४३१/- इतकी रक्कम कमी आल्याचे कारणे सोबत जोडलेल्या Annex -४ प्रमाणे आहे.

| वर्ष | कमी रक्कम प्राप्त झालेल्या लाभार्थिंची संख्या | प्राथमिक मंजुरी आदेशाप्रमाणे येणे असलेली रक्कम | प्रत्यक्ष प्राप्त झालेली रक्कम | एकुण कमी आलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| २०१६-१७ | २३९ | १,००,३२,८८२/- | ७९,५८,६२७/- | २०,७७,९९५/- |

सन २०१६-१७ मध्ये उपचार करण्यात आलेल्या एकुण ४४४९ रुग्णांपैकी २३९ रुग्णांची रु २०,७७,९९५/-इतकी रक्कम कमी आलेली आहे.रक्कम कमी आल्याचे कारणे सोबत जोडलेल्या Annex -५ प्रमाणे आहे.

| वर्ष | कमी रक्कम प्राप्त झालेल्या लाभार्थिंची संख्या | प्राथमिक मंजुरी आदेशाप्रमाणे येणे असलेली रक्कम | प्रत्यक्ष प्राप्त झालेली रक्कम | एकुण कमी आलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| २०१७-१८ | ५६ | ३२,२२,०१२/- | २३,८७,७००/- | ०८,३४,३१२/- |

सन २०१७-१८ मध्ये दि.३०/११/२०१७ पर्यंत उपचार करण्यात आलेल्या एकुण ३०७४ रुग्णांपैकी ५६ रुग्णांची रु०८,३४,३१२/- इतकी रक्कम कमी आलेली आहे रक्कम कमी आल्याचे कारणे सोबत जोडलेल्या Annex-०६ प्रमाणे आहे.

**विभागाचा अभिप्राय**– राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेकडुन (महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना) त्यांचे सोबत संस्थान

रुग्णालयाने केलेल्या एमओयु व गाईडलाइन्सनुसार कमी आलेली रक्कम प्राप्त होणार नसल्याने सदर रक्कम वैद्यकीय सवलत म्हणुन नावे टाकण्यास मा. व्यवस्थापन समितीची मंजुरी द्यावी लागणार आहे असे नम्र मत आहे.

**परिशिष्ट- अ**

| अ नं | वर्ष | एकुण कमी आलेली रक्कम |
|---|---|---|
| ०१ | २०१२-१३ | ५,०००/- |
| ०२ | २०१३-१४ | १४,८८,००९/- |
| ०३ | २०१४-१५ | ३९,५१,५०८/- |
| ०४ | २०१५-१६ | १९,२८,४३१/- |
| ०५ | २०१६-१७ | २०,७७,९९५/- |
| ०६ | २०१७-१८ (३०/११/२०१७) | ०८,३४,३१२/- |
| | एकुण | **१,०२,८५,२५५/-** |

तरी राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना व महात्मा फुले जन आरोग्य योजने अंतर्गत रुग्णांच्या सन २०१२ ते २०१७ अखेर प्रत्यक्ष उपचारापोटी प्राथमिक मंजुर आदेशापोटी कमी आलेल्या रकमेस परिशिष्ट – अ वित्त विभागामार्फत वैद्यकीय सवलत म्हणुन नावे टाकणेस मंजुरी मिळणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.१९८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, राजीव गांधी जिवनदायी आरोग्य योजना व महात्मा फुले जन आरोग्य योजने अंतर्गत सन २०१२ ते २०१७ अखेर रुग्णाच्या प्रत्यक्ष उपचारापोटी प्राथमिक मंजुर आदेशापोटी कमी आलेल्या रकमेस वैद्यकीय सवलत म्हणून नावे टाकणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.६१** **जादा वैद्यकीय बिलाचा परतावा अदा करणेस मंजूरी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.**– १) जा. नं. एसएसएस-वशी रुग्णालय ५८२-९७ दि. १६/०१/१९९९. २) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०९/१२/२०१६ निर्णय क्र. ६९० (६) अन्वये रु. २०,०००/- पर्यंत मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात तर त्यावरील खर्चाची बिले ही मा. व्यवस्थापन समितीचे सभेच्या मान्यतेने अदा करावी.

**प्रास्ताविक**– खालील संस्थान कर्मचा-यांची रु.२०,०००/- पर्यंतची खर्चाची मर्यादा संपल्यामुळे रु. २०,०००/- पेक्षा जास्त खर्चाचे बिले परतावा मिळणेकामी सादर केलेले आहेत.

**मागणी**– पुढील तक्त्यात नमुद केलेल्या कर्मचा-यांचे बिले परतावा मिळणेबाबत विनंती अर्ज.

| अ. नं. | कर्मचा-याचे नाव | कर्मचा-याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयाचे नाव | एकूण मागणी रक्कम | एकूण देय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | अ. संस्थान रुग्णालयात उपचार घेतलेले | | | | | | | |
| १ | श्री. कैलास तात्याबा डांगे<br>विभाग- प्रशासन<br>हुद्दा- मदतनीस | आई | Arthritis | डॉ. काळे | श्री साईबाबा हॉस्पिटल | १६८३.०० | १३२७.०० | |
| २ | श्री. दिपक सुर्यकांत लोखंडे<br>विभाग- लेखाशाखा<br>हुद्दा- लिपिक | आई | Diabetes | डॉ. जाधवर | श्री साईबाबा हॉस्पिटल | ३०५२.०० | ३०५२.०० | |
| ३ | वर्पे सविता चांगदेव<br>विभाग- श्री साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा- परीचारीका | आई | Diabetes | डॉ. इंगळे | श्री साईबाबा हॉस्पिटल | ७७०९.०० | ७६९५.००० | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | श्री.सचिन अंबादास डावरे<br>विभाग-<br>सी.सी.टि.व्ही.<br>हुद्दा – मदतनीस | वडील | Ca | डॉ. वाघूळदे<br>डॉ. थोरात | श्री साईबाबा हॉस्पिटल | ४७७०.०० | ४७७०.०० | |
| ५ | श्री. रविंद्र बापू गावडे<br>विभाग- पाणी पुरवठा<br>हुद्दा- तारतंत्री | वडिल | UTI | डॉ. मुंदडा | श्री साईबाबा हॉस्पिटल | ३११४७.०० | ३११४७.०० | |
| ६ | ज्योतीलाल भिका जाधव<br>विभाग- आय टी आय<br>हुद्दा- स भांडारपाल | स्वतः | Diabetes | डॉ. प्रफूल्ल पोरवाल | श्री साईनाथ हॉस्पिटल | ९४८५.०० | ९४८५.०० | |
| ७ | संगिता संजय थोरात<br>विभाग- श्री साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा- परीचारीका | पती<br>सासू<br>मुलगी | Diabetes | डॉ. इंगळे | श्री साईबाबा हॉस्पिटल | ७५३९.०० | ५७१५.०० | |
| ८ | श्री. शेषराव राधाकृष्ण कुलभैया<br>विभाग-साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा-कॅथलॅब टेक्नीशियन | स्वतः | | डॉ. काळे | श्री साईबाबा हॉस्पिटल | ४११८.०० | ४११८.०० | |
| | | | | | **अ - एकूण रक्कम** | ६९५०३.00 | ६७३०९.00 | |
| | **ब. संस्थान मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये रेफर केले होते.** | | | | | | | |
| **अ. नं.** | **कर्मचा-याचे नाव** | **कर्मचा-याशी नाते** | **आजाराचे नाव** | **डॉक्टरांचे नाव** | **रुग्णालयाचे नाव** | **एकूण मागणी रक्कम** | **एकूण देय रक्कम** | **शेरा** |
| ९ | श्री.परसराम सोमाजी भालेराव<br>विभाग-सरंक्षण<br>हुद्दा –पहारेकरी | पत्नी | Dengue NS 1 Reactive | डॉ.काटे | रुबी हॉल क्लीनीक,पुणे | १३९४५.०० | १३९४५.०० | |
| १० | बंदावणे सुभाष मल्हारी विभाग - ध्वनीक्षेपण हुद्दा - विद्युत पर्यवेक्षक | मुला करीता | Renal Failure | डॉ. जाधवर | रुबी हॉल क्लिनिक, पुणे | ५१६२५.०० | ५१६२५.०० | |
| ११ | शकुंतला शंकर माहिते<br>विभाग- श्री साईनाथ हॉस्पिटल<br>हुद्दा- परीचारीका | आई | Ca | डॉ. बो-हाडे | टाटा मेमोरिअल हॉस्पिटल, मुंबई | ५८८४४.०० | ५८८४४.०० | |
| १२ | रुकसाना साजिद खान<br>विभाग- श्री साईनाथ हॉस्पिटल<br>हुद्दा- परीचारीका | स्वतः | Haemor rhides | डॉ. बो-हाडे | बॉम्बे हॉस्पिटल, मुंबई | १८२४८.०० | १८२४८.०० | |
| १३ | लुसिया शाम अमोलिक<br>विभाग- श्री साईनाथ हॉस्पिटल<br>हुद्दा- परीचारीका | पती | Commen bile duct stricture underwent, ERCP Clearence ss stening | डॉ. राम नाईक | दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटल, पुणे | ३५९५४.०० | ३५०९४.०० | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | hypertension | | | | | |
| १४ | श्री. राजेंद्र दत्तात्रय जोर्वेकर<br>विभाग-साईबाबा रूग्णालय<br>हुद्दा-फार्मासिस्ट | मुलगा | Left Leg DVT With Pulmonary Embolism | डॉ. मनोहर शिंदे | रुबी हॉल क्लिनिक, पुणे | २५९१०.०० | २५४५१.०० | |
| १५ | श्री. अशोक आण्णासाहेब सोनवणे<br>विभाग- द्वारावती<br>हुद्दा- लिपिक | वडील | Multiple descending colon polyps | डॉ. आदित्य मुंदडा | दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटल, पुणे | ३३९११०.०० | २८०६९२.०० | |
| १६ | श्री. सुराळे चंद्रकांत भाऊसाहेब<br>विभाग- पहारेकरी<br>हुद्दा- संरक्षण | स्वतः | Varicose vein , grade iv | डॉ. महेश मिस्तरी | रुबी हॉल क्लिनिक, पुणे | १०३८०७.०० | ९८१६७.०० | |
| | | | | | **ब - एकूण रक्कम** | **६४७४४३.००** | **५८२०६६.००** | |
| | **क. संस्थान मान्य यादीतील नसलेले व रेफर नसलेले हॉस्पिटल** | | | | | | | |
| १७ | श्री. अशोक रंभाजी औटी<br>विभाग- प्रशासन<br>हुद्दा- प्र. अधिकारी | आई | fracture | डॉ. पाटील | साकार हॉस्पिटल, अहनदनगर | २७६५०.०० | २०३४४.०० | रुग्णाचे वास्तव्य बाहेरगावी असल्यामुळे ८०% रक्कम द्यावी असे मत आहे. |
| | | | | **क - एकूण रक्कम** | | **२७६५०.००** | **२०३४४.००** | |
| | | | **अ+ब +क - एकूण रक्कम** | | | **७४४५९६.००** | **६६९७१९.००** | |

सदर बिलांची संस्थान वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये छाननी केली असून देय होणारी एकूण रक्कम रु.६६९७१९/- इतकी आहे.

**विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत–** नियमावली प्रमाणे छाननी केली असुन तसेच रुग्णांना संस्थान मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये पुढील उपचाराकरीता पाठविण्यात आले व उपचार घेतले आहे. त्यामुळे संबंधीतांना देय होणारी रक्कम अदा करणेस हरकत नाही,असे मत आहे.

**निर्णय क्र.१९९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, वरील प्रस्तावामध्ये नमुद केलेल्या कर्मचाऱ्यांनी सादर केलेल्या बीलांची वैद्यकीय देखभाल नियमावली सन- १९९९ अन्वये छाननी केली असून, त्यांची सत्यता पडताळून पाहीलेली असल्यामुळे, उपरोक्त तक्त्यामधील कर्मचाऱ्यांना देय असलेली रक्कम, त्यांना अदा करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा सुरु करण्यात आली.**

**आयत्या वेळेचा विषय नं.०१** **शिवकृपानंद स्वामीजी यांचे समर्पण महाशिबिराचे कार्यक्रमाचा माहितीफलक अंतिम करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा यांच्या समाधीस ऑक्टोबर-२०१८ मध्ये १०० वर्ष पूर्ण होत असल्याने श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्यातर्फे दि.०१ऑक्टोबर,२०१७ ते दि.१८ऑक्टोबर,२०१८ या कालावधीमध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे केले जात आहे. शताब्दीचे संपूर्ण वर्षभर वेगवेगळया धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करणेत येतआहे, जेणे करुन संपूर्ण वर्षभरात शिर्डीमध्ये भक्तीमय वातावरण राहून श्रीसाईबाबा महासमाधी शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल, या दृष्टीने कामकाज चालू आहे.

यास अनुसरुन मा.व्यवस्थापन समितीचे दि.१४/११/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.१०२३ अन्वये “श्री साईबाबा शताब्दी कालावधीत दि. २३ ते ३० एप्रिल २०१८ या कालावधीमध्ये श्री शिवकृपानंद महाराज यांचा सत्संग कार्यक्रम आयोजित करण्यास मान्यता देण्यात आली. मात्र सदरचे कार्यक्रमाचे आयोजन श्रीमती शर्मिला पाटील, व्यवस्थापकीय विश्वस्त, योग प्रभा भारती (सेवा संस्था) ट्रस्ट यांनी स्वत: करावे. संस्थानने त्यासाठी येणा-या खर्चापोटी फक्त रु. १५,००,०००/- मात्र अर्थसहाय्य दयावे” असे ठरले आहे.

आता शर्मिला पाटील, व्यवस्थापकिय विश्वस्त, योग प्रभा भारती (सेवा संस्था) ट्रस्ट यांनी दि. ०५/०१/२०१८ रोजीचे ईमेल पत्रान्वये"श्री साईबाबांच्या कृपेने शिर्डीमध्ये समर्पण महाशिबिराचे आयोजन होत असून महाशिबिराच्या प्रचारासाठी खालीलप्रमाणे माहितीफलक तयार केला असून सदर माहितीफलक संस्थानकडून अंतिम करुन मिळावा, जेणेकरुन प्रचार प्रसाराची पुढील कार्यवाही लवकरात लवकर सुरु करता येईल, असे कळविलेले आहे.




तथापि उपरोक्त फलकाऐवजी खालीलप्रमाणे फलक असावातसेच त्यांचे फलकात तळटिपेमध्ये नमूद केलेल्या पहिल्या ओळीतील मजकूर टाकणेस हरकत नसावी. तथापी दुसरी ओळ टाकू नये, असे नम्र मत आहे.

तरी खालीलप्रमाणे ध्यानयोग शिबिर कार्यक्रमाचा माहितीफलकाचा मजकूर आपले मान्यतेस्तव तथा मान्यतेनंतर सदरचा मजकूर योग प्रभा भारती (सेवा संस्था) ट्रस्ट यांना पाठविणेकामी सदर माहिती फलकाचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.




श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष के उपलक्ष में

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)
व्दारा आयोजित




सदगुरु श्री शिवकृपानंद स्वामी के पावन सान्निध्य में
<u>समर्पण ध्यानयोग महाशिबिर</u> –
सौजन्य –योग प्रभा भारती (सेवा संस्था) ट्रस्ट, मुंबई

देनांकः २३ अप्रेल, २०१८ से ३० अप्रेल २०१८ वेळः शाम. ०७ ते०९

स्थानः महाराष्ट्र राज्य शेती महामंडल ग्राऊंड (शिर्डी)
श्री साईप्रसादालय के पास

इस महाशिविर के ऑनलाईन वेबकास्ट (प्रक्षेपण) के लिए www.samarpanmeditation.org पर लॉगिन करें

निर्णय क्र.२०० **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावित केलेला शिवकृपानंद स्वामीजी यांचे समर्पण महाशिबिराचे कार्यक्रमाचा माहितीफलक अंतिम करणेत येऊन, सदरचा मजकूर योग प्रभा भारती (सेवा संस्था) ट्रस्ट यांना पाठविणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०२ **शिलधी प्रतिष्ठाण, शिर्डी यांचे " साईरत्न पुरस्कार " सोहळयासाठी, साईनगर मैदान उपलब्ध करुन देणेबाबत**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद :-**

१.अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये,राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पुजा-अर्चा,समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे.भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्ट्ये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

2. अधिनियामाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.०९.१०.२०१६ चे सभेतील निर्णय क्र.६९७ नुसार "रुग्णालयामधील रुग्ण व साईनगर येथील रहिवाशी यांना कार्यक्रमाच्या आवाजाचा त्रास होणार नाही, या अटीवर राजकीय कार्यक्रम वगळता वैद्यकिय शिबीरे व धार्मिक कार्यक्रमासाठी साईनगर मैदान वापरासाठी उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

प्रस्तावना:- उपरोक्त विषयांकित संदर्भीय पत्रान्वये श्री. तुषार सुदामराव शेळके, अध्यक्ष शिलधी प्रतिष्ठाण, शिर्डी यांनी दि.२८.०२.२०१८ रोजीचे पत्रान्वये मा. मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया यांना अग्रेषीत केलेल्या पत्रात शिलधी प्रतिष्ठान या युवा कार्यकर्त्यांच्या संघटनेच्या माध्यमातुन मागील ११ वर्षापासुन शिर्डी येथे नेहमीच अनेक धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक स्वरुपाचे कार्यक्रम आयोजित करत असतो. त्याची सुरवात चैत्र शु. II१II गुडीपाडवा म्हणजेच मराठी नववर्षाच्या स्वागताने करतो. गुढीपाडव्याच्या पुर्वसंध्येच्या कार्यक्रमात आम्ही महाराष्ट्रातील विविध क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कामगिरी करणा-या व्यक्तींचा "साईरत्न पुरस्कार" देऊन सन्मान करत असतो. आजपर्यत प्रतिष्ठानच्या माध्यमातून ज्येष्ठ समाजसेवक बाबा आमटे यांची आनंदवन संस्था, ज्येष्ठ विधिज्ञ श्री. उज्वलजी निकम, ज्येष्ठ अभिनेते श्री. अशोक सराफ, आदर्श गावचे प्रणेते श्री. पोपटराव पवार, जलसंवर्धनाचे काम करणारे श्री. अविनाशजी पोळ, ज्येष्ठ सिने दिग्दर्शक व अभिनेते श्री. महेशजी मांजरेकर, बाबांची मुर्ती साकारणारे तालीम यांचे नातू, बाबांचे समाधी मंदिर उभारणारे गोपाळ बुट्टी यांचे वशंज, देणगीदार श्री. के.व्ही. रमणी, यांचे बरोबरच महाराष्ट्रातील विविध मान्यवरांचा " साईरत्न पुरस्कार " देऊन सन्मान केलेला आहे.

यावर्षी शिर्डी येथे गुढीपाडव्याच्या पुर्वसंध्येला दि.१७.०३.२०१८ रोजी सायंकाळी ०७.०० वा. प्रतिष्ठानच्या माध्यमातुन महाराष्ट्रातील विविध क्षेत्रातील गुणीजनांचा "साईरत्न पुरस्कार" देऊन सन्मान करण्यात येणार आहे. त्या बरोबरच सांस्कृतीक कार्यक्रम व मराठी नाट्यप्रयोगाचे आयोजन करण्यात येणार आहे. सदर कार्यक्रम हा महाराष्ट्र राज्याचे विरोधी पक्षनेते मा. ना. श्री राधाकृष्णजी विखे पाटील, यांचे अध्यक्षतेखाली व श्री साईबाबा संस्थानचे अध्यक्ष मा. सुरेशजी हावरे, उपाध्यक्ष मा. श्री चंद्रशेखरजी कदम, मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती रुबलजी अग्रवाल, युवानेते डॉ. सुजयदादा विखे पाटील यांच्या बरोबर इतर मान्यवरांच्या व शिर्डी ग्रामस्थांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडणार आहे.

**तरी दि. १७.०३.२०१८, रोजी सदरचा कार्यक्रम संस्थानचे साईनगर मैदान, शिर्डी येथे करण्यास परवानगी मिळावी ही विनंती.** असे कळविले आहे.

**विभागाचा अभिप्राय:-** सदर कालावधीत संस्थानमार्फत अथवा इतर कोणत्याही संस्थेच्या, मंडाळाच्या वतीने साईनगर मैदानावर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले नाही. त्यामुळे उपरोक्त बाबींचा विचार करता श्री. तुषार सुदामराव शेळके, अध्यक्ष शिलधी प्रतिष्ठाण, शिर्डी यांना साईनगर मैदान दि.१७ मार्च २०१८ रोजी सांय.०७.०० वा. "साईरत्न पुरस्कार" सांस्कृतीक कार्यक्रम व मराठी नाट्यप्रयोगाचे कार्यक्रमासाठी परवानगी देता येईल.

तरी श्री.तुषार सुदामराव शेळके, अध्यक्ष शिलधी प्रतिष्ठाण, शिर्डी यांना **"साईरत्न पुरस्कार"** सोहळ्यासाठी, साईनगर मैदान उपलब्ध करावयाचे विनंतीबाबत निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.२०१ **यावर सविस्तर चर्चा होऊन, गुढीपाडव्याच्या पुर्वसंध्येला दि.१७.०३.२०१८ रोजी शिलधी प्रतिष्ठाण, शिर्डी यांना "साईरत्न पुरस्कार" सोहळ्यासाठी, साईनगर मैदान उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०३ **दि.०८ मार्च २०१८ रोजी जागतिक महिला दिनानिमीत्त मोफत सर्वरोग निदान व उपचार शिबीराकरीता तसेच इतर कार्यक्रमाकरीता, साईनगर मैदान उपलब्ध करुन देणेबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद :-**

१.अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये,राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पुजा-अर्चा,समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे.भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्ट्ये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

2. अधिनियामाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.०९.१०.२०१६ चे सभेतील निर्णय क्र.६९७ नुसार "रुग्णालयामधील रुग्ण व साईनगर येथील रहिवाशी यांना कार्यक्रमाच्या आवाजाचा त्रास होणार नाही, या अटीवर राजकीय कार्यक्रम वगळता वैद्यकिय शिबीरे व धार्मिक कार्यक्रमासाठी साईनगर मैदान वापरासाठी उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

**प्रस्तावना:-** उपरोक्त विषयांकित संदर्भीय पत्रान्वये मुख्याधिकारी शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी दि. ०५.०३.२०१८ रोजीच्या पत्रान्वये "दि. ०८ मार्च २०१८ रोजी जागतिक महिला दिनाचे औचित्य साधुन श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात जनसेवा फाऊंडेशन–लोणी, शिर्डी नगरपंचायत व प्रवरा मेडीकल ट्रस्ट-लोणी यांचे संयुक्त विद्यमाने साईनगर येथील ग्राऊंडवर सकाळी १०.०० ते सायंकाळी ०५.०० या कालावधीत भव्य मोफत सर्वरोगनिदान व उपचार शिबीर आयोजित करण्यात आलेले आहे. तसेच सदर शिबीर संपलेनंतर त्याच ठिकाणी सायंकाळी ०५.३० ते ०७.०० या कालावधीत शिर्डी शहरातील सर्व महिलांचा हळदी-कुंकवाचा कार्यक्रम, स्वच्छता प्रबोधन, संसार उपयोगी लकी ड्रॉ व महिलांना वाण वाटपाचा कार्यक्रम होणार आहे.

तरी, दि.०८ मार्च २०१८ रोजी साईनगर येथील ग्राऊंड उपलब्ध करुन देणेबाबत तसेच सदर कार्यक्रमासाठी आवश्यक सुविधा (विद्युत व्यवस्था) उपलब्ध करुन देणेबाबत श्री साईबाबा संस्थानचे संबधीत विभागांना आदेश करणेत यावे ही विनंती." असे कळविले आहे.

**विभागाचा अभिप्राय:-** सदर कालावधीत संस्थानमार्फत अथवा इतर कोणत्याही संस्थेच्या, मंडळाच्या वतीने साईनगर मैदानावर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले नाही. त्यामुळे उपरोक्त बाबींचा विचार करता मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना साईनगर मैदान दि.०८ मार्च २०१८ रोजी सकाळी १०.०० ते सांय.०७.०० या कालावधीत मोफत सर्वरोग निदान व उपचार शिबीराकरीता तसेच इतर कार्यक्रमाकरीता परवानगी देता येईल.

तरी मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचे मोफत सर्वरोग निदान व उपचार शिबीराकरीता तसेच इतर कार्यक्रमाकरीता साईनगर मैदान उपलब्ध करावयाचे विनंतीबाबत निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.२०२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.०८ मार्च २०१८ रोजी जागतिक महिला दिनानिमीत्त मोफत सर्वरोग निदान व उपचार शिबीराकरीता तसेच इतर कार्यक्रमाकरीता शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना साईनगर मैदान उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

आयत्या वेळेचा

**विषय नं.०४ संस्थानला आलेल्या उप आयकर आयुक्त यांचे रु.१८३.८६ कोटी देय कर नोटिस बाबतची सद्यस्थिती अवलोकनार्थ सादर.**

**प्रस्ताव-** दि. ३१.१२.२०१७ रोजी उप आयुक्त(आयकर), मुंबई यांनी आर्थिक वर्ष २०१४-१५ चे कर निर्धारण करुन रु.१८३,८६,१४,३३०/- देय कर असलेबाबत नोटिस पाठविली आहे. दि.०८/०१/२०१८ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये सर्व सदस्यांना सदर नोटिसच्या प्रती वाटण्यात आल्या होत्या. निर्णय क्रं.१६/०८.०१.२०१८ अन्वये, सदरबाबत मा.उच्च न्यायालय मुंबई येथे रिट याचिका दाखल करावी. त्याकरिता ॲड. हरीष साळवे यांना अथवा त्यांचेसारखे जेष्ठ व नामांकित विधिज्ञांना संस्थानतर्फे नियुक्त करावे. आवश्यक वाटल्यास आयकर लवादाकडे अपिल दाखल करावे. सदर न्यायालयीन प्रक्रीयेसाठी अनुषंगिक प्रवास/इतर तत्सम खर्चास मान्यता देण्यात आली होती. त्यास अनुसरुन,

१) प्रख्यात वरिष्ठ वकील एस.गणेश, दिल्ली यांचे मार्गदर्शनाने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे मा. उच्च न्यायालय ॲड. जुन्नरकर यांचेमार्फत दि.३१.०१.२०१८ रोजी रिट अपिल दाखल करण्यात आले.

२) मा.विश्वस्त, श्री मोहन जयकर यांचे समन्वयाने, मा. उच्च न्यायालय प्रख्यात वरीष्ठ वकील ॲड. एस.गणेश, दिल्ली यांचे माध्यमे दि.९.०२.२०१८ रोजी सुनावणी होऊन, देय रु.१८३.८६ कोटी कर भरण्यास स्थगिती मिळून आयकर विभागाकडून फेर कर निर्धारण करुन, आयकर आयुक्त यांचेकडे अपिल करण्याबाबत आदेश झाला.

३) दि.२०.०२.२०१८ रोजी उप आयुक्त आयकर यांचेकडून फेर कर निर्धारण करण्यात येऊन, देय कर रक्कम रु.१८३.८६ कोटी रुपयाहून रु.१२२.०४ कोटी इतकी झाली.

४) मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार आयकर विभागाकडे दि.१८.०२.२०१८ रोजी ऑनलाईन अपिल अर्ज दाखल केला.

५) दि.२७.०२.२०१८ रोजी आयकर विभागाकडे Stay off Demand and Early Hearing करिता अर्ज दाखल करण्यात आले.

६) दि. २८.०२.२०१८ रोजी उप आयकर आयुक्त यांनी दि.०५.०३.२०१८ रोजी त्यावर सुनावणी करीता तारीख दिली होती. त्यास अनुसरुन, संस्थान कर सल्लागार सी.ए. राहूल केळकर, यांचे वरीष्ठ सहकारी सी.ए. श्री दिपक टिकेकर व लेखाधिकारी श्री लंके सुनावणी करीता हजर राहीले होते.

उपआयुक्त आयकर यांचेकडे दि.०५/०३/२०१८ रोजी डिमांड नोटीस रु.१२२.०४ कोटी बाबत स्टे ऑफ डिमांड संदर्भात सुनावणी झाली. रु.१२२.०४ कोटीचे २०% कर भरुन अपिल कार्यवाही सुरु करावी. अन्यथा संस्थानच्या बँकांना अटॅचमेंट करण्याची सुध्दा तरतूद आहे. आपण त्याप्रमाणे योग्य ती कार्यवाही करावी असे त्यांनी सुचविले आहे. मा. उच्च न्यायालयाचे दि.०९.०२.२०१८ रोजीचे रिट अर्जावर झालेल्या आदेशानुसार, सदर स्टे करीता आयकर आयुक्त अपिल, उप आयकर आयुक्त व मुख्य आयकर आयुक्त यांचेकडे स्टे मिळणेबाबत पत्रव्यवहार करण्यात आला असुन अद्याप स्पष्टता आलेली नाही. वेळप्रसंगी त्याकरीता फेर रिट प्रिटिशन दाखल करण्याची वेळ सुध्दा येऊ शकते.

**विभागाचा अभिप्रायः**

१. उपरोक्तप्रमाणे सद्यस्थितीचे अवलोकन होणेस,

२. प्रसंगी आयकर कार्यालय, मा.उच्च न्यायालय यांचेकडे परिस्थितीनुरुप अपिल दाखल करणे, रिट पिटीशन करणे व त्यासाठी मानधन/ फि वर मा.ॲड. श्री जयकर यांचे सल्ल्याने प्रख्यात वकील, सनदि लेखापरिक्षक, सल्लागार यांची नेमणुक करण्यास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.२०३ यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानला आलेल्या उप आयकर आयुक्त यांचे रु.१८३.८६ कोटी देय कर नोटिस बाबतच्या सद्यस्थितीचे अवलोकन करणेत येऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व त्यासाठी येणाऱ्या अनुषंगीक प्रवास भाडे, कॉन्फरंसिंग चार्जेस, निवासव्यवस्था, स्टेशनरी, झेरॉक्स व इतर तत्सम खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच यासाठी येणारा खर्च वेळोवेळी समितीसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०५ **साई रुग्णवाहिका प्रकल्प संबंधी महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग यांचेकडील पत्र व मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल केलेल्या जनहित याचिकेबाबत.**

प्रस्ताव- **महाराष्ट्र शासन अधिनियम २००४ मधीलः-**

१) कलम १७ (१) मध्ये राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून, संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्यती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यकत त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२) कलम १७ (२-ण) मध्ये,मानवजातीचे कल्याण करणा-या किंवा मानवाला अपत्ती मध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.

३) कलम २१ (१) मध्ये, विश्वस्तव्यवस्थेचा निधी, आयकर अधिनियम, १९६१ च्या तरतुदींना अधिन राहून, समितीकडून पुढील पैकी सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी वापरण्यात अथवा खर्च करण्यात येईल,--

(ख) - रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

(ग) - भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी

सोयी व सुविधा पुरविणे.

(ड) - श्रीसाईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे.

**प्रस्तावनाः**- दि.३१/०८/२०१६ रोजीचेमा. व्यवस्थापन समितीने सभेतील विषय क्र.२३ निर्णय नं.६३७ (१८) अन्वये, महाराष्ट्र राज्यातील ग्रामीण व दुर्गम भागातील अधिकाधिक रुग्णांपर्यंत तातडीने वैद्यकीय सेवा पोहचविणेसाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व दानशुर साईभक्त यांचे संयुक्त विद्यामाने राज्यातील विविध भागातील स्वयंसेवी संस्थाना रुग्णवाहीका उपलब्ध करुन देण्याचा उपक्रम सुरु करण्याचा व्यवस्थापन समितीचा मानस आहे. सदरचा उपक्रम सुरु करण्यासाठी ५०० रुग्णवाहीका (Ambulance) खरेदी कराव्या लागतील. या रुग्णवाहीकांच्या खरेदीसाठी रुग्णवाहीका प्रकल्प राबविणा-या स्वयंसेवी संस्थानी त्यासाठीची २५ टक्के रक्कम भरावी व उर्वरित ७५ टक्के रक्कम दानशुर देणगीदार साईभक्ताच्या देणगीमधुन उपलब्ध करावयाची आहे. याकरीता या उपक्रमासाठी देणगीदार साईभक्त आपल्या आई-वडीलांच्या स्मृतीपित्यर्थ अथवा इतर कार्यानिमित्त देणगी देऊ शकतात. अशा प्रकारे देणगीदारांना आवाहान करण्यात यावे. या सर्व रुग्णवाहीका साई ॲम्बुलन्स या नावाने महाराष्ट्रभर चालतील व त्यांचे संचालन स्वयंसेवी संस्थामार्फत होईल अशा प्रकारे कार्यवाही करण्यात यावी" असा निर्णय झालेला आहे.

त्यानुसार इकडील जा.नं.एसएसएस-वशी-वाहन-४४५५-२०१६ दि.२३/११/२०१६ अन्वये मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग महाराष्ट्र शासन यांना सदर साई-रुग्णवाहिका प्रकल्पास शासन मान्यता मिळणे कामीपत्र देण्यात आलेले होते.

यानंतर दि.२५/०९/२०१७ चे मा.व्यवस्थापन समितीचे विषय नं.१४ व निर्णय क्र.१४ नुसार व छाननी समितीचे दि.२७/०२/२०१७ रोजीचे सभेत मान्यता दिलेले सुधारीत नियमावलीस व सदर प्रकल्पास इकडील जा.नं.एसएसएस/ वाहन /२५३/२०१७ दि.१५/०४/२०१७ अन्वये शासन मान्यता मिळणेस बाबतचा प्रस्ताव मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे सादर करण्यात आला होता.

यावर महाराष्ट्र शासन, विधि व न्याय विभाग यांनी पत्र क्र. सासंवि-१०१७/६७४/प्र.क्र.२०/का.१६ दि.०८/०५/२०१७ अन्वये, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम-२००४ मधील उपरोक्त तरतूदी विचारात घेता, "भक्तांना जाहिर आवाहन करुन या प्रयोजनासाठी भक्तांकडून थेट प्राप्त होणारा निधी कोणत्याही स्वयंसेवी संस्थेला उपलब्ध करुन देता येणार नाही. सबब, संदर्भाधीन पत्रान्वये आपण सादर केलेला प्रस्ताव अधिनियमातील तरतुदींशी विसंगत असल्याने सदर प्रस्तावावी फेर तपासणी करण्यात यावी", असे कळविलेले आहे.

यानुसार सदर विषय मा.व्यवस्थापन समितीचे दि.२३/०५/२०१७ चे सभेत सादर केला असता. यावर सविस्तर चर्चा होऊन,"राज्यातील गोर-गरीब, दुर्बल, आदिवाशी रुग्णांच्या सेवेसाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थामार्फत साई रुग्णवाहिका प्रकल्प सुरु करण्याचा समितीचा माणस आहे. सदरहू प्रकल्प राबविणेसाठी, अधिनियमातील तरतूदींचा सखोल अभ्यास करुन, तसेच संस्थान कायदे सल्लागाराचा सल्ला घेण्यात येऊन व मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांचेबरोबर चर्चा करुन सविस्तर फेरप्रस्ताव व्यवस्थापन समितीसमोर सादर करण्यात यावा", असे ठरले.

या निर्णयानुसार जा.क्र.एसएसएस/वशी-विधी/९०९/२०१७ दि.२३/०५/२०१७ चे पत्रान्वये संस्थानचे कायदे विषयक सल्लागार ॲड. नितीन आर. भवर, औरंगाबाद यांना शासनाचे पत्र संस्थान अधिनियम याचा अभ्यास करुन साई रुग्णवाहिका प्रकल्पाबाबत उचीत मार्गदर्शन करणे बाबत कळविलेले आहे. त्यांचेकडून अद्याप अभिप्राय अप्राप्त आहे.

कार्यासन अधिकारी,विधि व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र.सासवि-१०१७/सं.क्र. ११९५/का.१६, दि.१९.०७.२०१७ चे पत्र इकडील कार्यालयास दि.२८/०७/२०१७ रोजी प्राप्त झालेले आहे. सदर पत्रामध्ये, "श्री संजय भास्करराव काळे, कोपरगांव, जि.अहमदनगर यांच्या दिनांक २१/०६/२०१७ रोजीच्या पत्राचे अवलोकन करावे. सदर पत्रातील मुद्यांच्या अनुषंगाने आपले स्वयंस्पष्ट अभिप्राय शासनास त्वरीत सादर करण्यात यावेत", असे कळविलेले आहे. श्री काळे यांचे दि.२१/०६/२०१७ चे पत्रातील मुद्दयांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

१) "श्री साईबाबा संस्थानचे साईभक्तांना ५०० रुग्णवाहीका खरेदी करण्यासाठी देणगी दयावी अशा प्रकारे संस्थानच्या संकेत स्थळावर जाहीरात प्रसिध्दीस दिलेली आहे. त्या अनुषंगाने संस्थान व्यवस्थापनाने दि. १५/०४/२०१७ रोजी शासनाकडे नियमाप्रमाणे प्रस्ताव मान्यतेसाठी पाठवला होता. मा. उच्च न्यायालयाच्या निवृत न्यायाधिशाच्या अध्यक्षतेखाली असलेल्या छाननी समीतीपुढे सदरचा प्रस्ताव दि.२७/०३/२०१७ रोजी सादर करण्यात आला होता.

२) दि. सासंवि२०१७ /६७४/ प्र.क्र. २० /का.१६ दि.०८/०५/२०१७ रोजीच्या महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, मंत्रालय मुंबई यांनी सदर प्रस्ताव संस्थानला फेर तपासणीसाठी पाठवला. हा पाठवतांना खालील शेरा महत्वपुर्ण आहे.

"कोणत्याही स्वयंसेवी संस्थेला आर्थिक अनुदान देण्याची अथवा अर्थसहाय्य करण्याची तरतुद श्री. साईबाबा संस्थानच्या अधिनियमात नाही." त्यामुळे श्री. साईबाबा संस्थान विश्वस्थव्यवस्था शिर्डी अधिनियम-२००४ मधिल उपरोक्त तरतुदी विचारात घेता, भक्तांना जाहीर आवाहन करून या प्रयोजनासाठी भक्तांकडुन थेट प्राप्त होणारा निधी कोणत्याही स्वयंसेवी संस्थेला उपलब्ध करून देता येणार नाही. सबब, संदर्भाधिन पत्रन्वये आपण (म्हणजे संस्थानने) सादर केलेला प्रकल्प प्रस्ताव अधिनियमातील तरतुदीशी विसंगत असल्याने सदर प्रस्तावाची फेर तपासणी करण्यात यावी." असे आपल्या कार्यालयाने स्पष्ट नमुद केलेले आहे.

३) जर संस्थान अधिनियमात तरतुद नाही, तर संस्थान व्यवस्थापन बेकायदा हया प्रकल्पासाठी भक्तांकडून पैसे गोळा करून भक्तांच्या भावनांशी खेळत आहे.देणगी काउंटरला व्यवस्थापनाने भक्तांचे मन वळवुन हया रूग्णवाहीका खात्यावर देणगी देण्यासाठी भक्तांना आवाहन करण्यासाठी यंत्रणा कार्यान्वीत केलेली आहे.

४) श्रीसाईबाबांचा समाधी शताब्दी वर्षाचा सोहळा संस्थान व्यवस्थापनाने ०१ आक्टोबर २०१७ ते १८ आक्टोबर २०१८ पर्यंत साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी शासनाने ३०२७ कोटी रूपये खर्चास मान्यता दिली आहे. शासनाने संस्थानला हया उत्सवासाठी पैसा देण्याचे मान्य केलेले नाही. आणि संस्थान अशा प्रकारे बेकायदा देणग्या गोळा करून खैरात वाटण्याचे प्रस्ताव करू लागले तर अनर्थ होईल. देणगीदार संस्थानकडून पाठ फिरवतील. संस्थान व्यवस्थापनाने हया प्रकल्पासाठी सर्व देणगीदारांना आवाहन केले त्यांना मेल, फोन, पत्र पाठविलेत. अनेकांनी हया संदर्भात नकारात्मक खरमरीत उत्तरे पाठविलीत ती व्यवस्थापन समीतीने शासनाला दाखविली नाहीत. ही एक प्रकारे संस्थानची व पर्यायाने शासनाची नाचक्की आहे.

५) संस्थानने प्रथम भक्तांसाठी शिर्डी शहरात उच्च प्रतिच्या सुविधा निर्माण कराव्यात आणि त्यानंतर जर निधी उरलाच तर बाहेर खर्च करण्याचा विचार करावा.

६) आज देखिल शासनाच्या विरोधानंतर हा प्रकल्प पुर्ण करण्यासाठी भक्तांकडून रूग्णवाहीका प्रकल्पाच्या खात्यात देणग्या घेउन भक्ताला फसवले जात आहे. ते त्वरीत थांबवा.

७) संस्थान व्यवस्थापनाला त्यांचे मुलभुत कर्तव्य व श्री. साईबाबा शिकवावे. श्री. साईबाबानी समाधी विजयादशमी म्हणजे दस-याला घेतली आहे. साधारण दरवर्षिचा उत्सव विजयादशमीच्या आदल्या दिवशी सुरू होतो. व दुस-या दिवशी संपतो. म्हणजे दरवर्षी उत्सव तीन दिवस असतो. सन २०१७ मध्ये दसरा, विजयादशमी ३०/०९/२०१७ रोजी आहे. म्हणजे दसरा उत्सव २९/०९/२०१७ पासुन ते ०१/१०/२०१७ असा आहे. परंतु श्री. साईबाबांचा समाधी शताब्दीचा उत्सव ०१/१०/२०१७ रोजी सुरू होणार व १८/१०/२०१८ रोजी दस-याच्या दिवशी संपणार आहे. ज्या व्यवस्थापनाला, समीतीला विजयादशमी दसरा कधी आहे हे साधे पाहून उत्सव ठरवता येत नाही. ते "घोषणा व्यवस्थापन" संस्थानचे काय भले कसे करणार.

८) तरी ५०० रूग्णवाहीका प्रकल्प हा संस्थानने त्वरीत स्थगित करावा व ते पैसे संस्थानच्या दैनंदिन खात्यावर वर्ग करावेत असा आदेश शासनाने पारीत करावा. तसेच व्यवस्थापनाला शिस्तभंगाची समज अथवा कारवाई करावी. हया प्रकरणात उच्च न्यायालयात जाण्याची वेळ आणु नये.

मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे श्री संजय भास्कर काळे यांनी १) महाराष्ट्र शासन, २) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे विरुध्द दाखल केलेल्या जनहित याचीकेत मा.व्यवस्थापन समितीचे दि.३१/०८/२०१६ व दि.२७/०३/२०१७ रोजीचे सभेतील निर्णयाची मा.कोर्टाचा पुढील आदेश होईपावेतो स्थगीत ठेवणेची मागणी केलेली आहे. या करीता संस्थानचे विधी विभागामार्फत दि.०९/०९/२०१७ चे टिपणीनुसार अॅड. नितीन भवर यांना वकीलपत्र दिलेले आहे.

दि.०८/०१/२०१८ पर्यंत साई रुग्णवाहिका प्रकल्पांतर्गत रुपये ६,०९,३२,३५१/- मात्र देणगी स्वरुपात संस्थान खाती जमा झालेली असुन रुग्णवाहिका मागणीकरीता एकुण १४७ अर्ज प्राप्त झालेले आहेत.

साई रुग्णवाहिका प्रकल्प संबंधी महाराष्ट्र शासन, विधि व न्याय विभाग यांचेकडील पत्र व मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल केलेल्या जनहित याचीकेबाबत खालील मुद्दे विचारार्थ व धोरणात्मक निर्णयाचे आहेत.

१) विधी व न्याय विभाग महाराष्ट्र शासन यांचे दि.१९/०७/२०१७ चे पत्रातील मुद्यांबाबत संस्थानचा स्पष्ट अभिप्राय मागणी केलेली असुन सदर अभिप्राय देणे आवश्यक आहे.

२) मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे जनहित याचीका दाखल झालेली असलेने साई रुग्णवाहिका प्रकल्पाकरीता संस्थान खाती घेणेत येणारी देणगी यापुढे चालू ठेवावी किंवा कसे ?

३) साई रुग्णवाहिका प्रकल्पाकरीता देणगी स्वरुपात जमा झालेली रक्कम संस्थानचे इतर खाती वर्ग करावी किंवा कसे? --- साई रुग्णवाहिका प्रकल्पाखाती संस्थानमध्ये जमा असलेली रक्कम इतर खाती वर्ग करावयाची झालेस यानुसार देणगीदारास याबाबत लेखाशाखेमार्फत विचारणाकरुन तसेच कायदेशिर बाबींचा विचारकरुन त्यानुसार पुढील कार्यवाही लेखाशाखा विभागामार्फत करता येईल, असे मत आहे.

**मागणीः-** तरी साई रुग्णवाहिका प्रकल्प सध्या न्यायप्रविष्ट असलेने तसेच या प्रकल्पासंबंधीत शासनपत्रातील मुद्दे मा.व्यवस्थापन समितीचे अवलोकनार्थ माहितीस्तव सदर.

निर्णय क्र.२०४ **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, साई रुग्णवाहिका प्रकल्पामध्ये संस्थानने Agreegator ची भूमिका पार पाडावी. महिंद्रा अॅण्ड महिंद्रा कंपनीशी चर्चा करुन एका रुग्णवाहिकेची किंमत निश्चित करावी. सदर किमतीच्या २५% रक्कम रुग्णवाहिका मागणी करणाऱ्या संस्थेने व उर्वरीत ७५% रक्कम साईभक्तांनी महिंद्रा अॅण्ड महिंद्रा कंपनीकडे भरावेत. यासाठी संस्थानने सर्व साईभक्तांना आवाहन करावे.**

**प्रथम महिंद्रा अॅण्ड महिंद्रा कंपनीच्या प्रतिनिधींशी चर्चा करुन या प्रकल्पासाठी रुग्णवाहिकेची किंमत निश्चित करावी. सदर रुग्णवाहिकेवर "साई रुग्णवाहिका" असे कंपनीमार्फत प्रिंट करुन घ्यावे. यासाठी प्रथम कार्यवाही करावी.**

**सध्या सदर प्रकल्पासाठी ज्या साईभक्तांनी देणगी दिलेली आहे, त्यांना त्यांची रक्कम परत करता येईल का? याबाबत अभ्यास करुन प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

आयत्या वेळेचा

**विषय नं.०६** **संस्थानला कंत्राटी पध्दतीने अकुशल, कुशल व सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी नविन लेबर व सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्सची नेमणूक करण्यासाठी निवीदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना दि.१०.०६.२०१७ ते दि.०९.०६.२०१८ अखेर १ वर्ष कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने अकुशल, कुशल कर्मचारी व सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी ०४ एजन्सींची नेमणूक करण्यात आलेली असून, त्यात मे.बी.व्ही.जी. इंडिया लि. पुणे व मे.एम.पी. एंटरप्रायझेस, पुणे यांना संस्थानचे विविध विभागांना लेबर व मे.रक्षक सिक्युरिटी ॲण्ड सर्व्हिसेस, मुंबई व मे.सेंट्रल इनव्हेस्टीगेशन सिस्टिम ॲण्ड सर्व्हिसेस, मुंबई यांना सुरक्षा व माजी सैनिक सुरक्षा कंत्राटी कर्मचारी पुरविण्याचे कार्यादेश देण्यात आलेले आहे.

संबंधित लेबर व सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर यांचेमार्फत संस्थानला प्रतिदिनी व मंजूर संख्येनुसार कंत्राटी पध्दतीने खालीलप्रमाणे अकुशल, कुशल कामगार, सुरक्षा कर्मचारी व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुरविणेत येत आहेत.

| अ. नं. | एजन्सीचे नांव | विभागांना दिलेल्या मंजूरी प्रमाणे कंत्राटी कर्मचारी संख्या | | | पुरविणेत येणारी प्रतिदिनी कंत्राटी कर्मचारी संख्या | | | प्रति महिना वेतन बिल खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अकुशल | कुशल | एकूण | अकुशल | कुशल | एकूण | एकूण |
| १ | मे.एम.पी.एंटरप्रायझेस, पुणे. | ४९२ | २७२ | ७६४ | ५०५ | २४३ | ७४८ | १,०२,३६,९९७.०० |
| २ | मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.पुणे. | ६६० | ३६७ | १०२७ | ६६७ | ३१४ | ९८१ | १,३८,८४,९८१.०० |
| ३ | मे.रक्षक सिक्युरिटी ॲण्ड सर्व्हिसेस, पुणे. | ३७६ | ५३ | ४२९ | ३९८ | ४० | ४३८ | ५९,४३,६२५.०० |
| ४ | मे.सेंट्रल इन्व्हेस्टिगेशन सिस्टीम ॲण्ड सर्व्हिसेस, मुंबई. | ३९० | १९ | ४०८ | ४१२ | १८ | ४३० | ६२,२१,७९८.०० |
| | **एकूण -** | | | | | | | ३,६२,८७,४०१.०० |

उपरोक्तप्रमाणे पुरविणेत येणा-या कंत्राटी अकुशल, कुशल कामगारांना व सिव्हीलियन सुरक्षारक्षक कर्मचा-यांना किमान वेतन कायद्यानुसार महाराष्ट्र शासनाचे शॉप ॲण्ड कमर्शियल इस्टॅब्लीशमेंट झोन नं.- ०३ (मुंबई, सिकंदराबाद कार्यालयासाठी झोन नं. ०१) प्रमाणे अनुज्ञेय असणारे किमान वेतनदर, तसेच माजी सैनिक सुरक्षा कर्मचा-यांना मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील चर्चा/ वाटाघाटीत ठरलेप्रमाणे वेतनदर, अधिक प्रॉव्हीडंड फंड प्रशासकीय चार्जेसह (मालकाचा हिस्सा- १३.१५ %) अधिक कंत्राटी कर्मचा-यांचे वेतनदराचे रक्कमेवर ०.००००१ % सर्व्हिस चार्ज अधिक संपूर्ण बिलाचे रक्कमेवर CGST ९ %, SGST ९ %, एकूण GST १८ %, अधिक सानुग्रह अनुदान ८.३३ %, अधिक कामगार नुकसान भरपाई अधिनियम अंतर्गत ग्रृप इन्शुरन्स प्रिमियम (अंशदान), तसेच मा.व्यवस्थापन समिती सभा निर्णय क्र.१४२ नुसार सदर कंत्राटी कर्मचा-यांचे किमान वेतनावर ४० % वेतनवाढ यांप्रमाणे रक्कम संस्थानकडून देण्यात येते.

सदर लेबर व सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्स यांचे कामाची (कॉन्ट्रॅक्टची मुदत अनुक्रमे दि.०९.०६.२०१८ अखेर संपुष्टात येणार आहे. तथापि मे.सेंट्रल इनव्हेस्टीगेशन ॲण्ड सिक्युरिटी सर्व्हिसेस, लि.मुंबई यांचे दि.०७.११.२०१७ रोजीचे पत्र इकडिल कार्यालयास प्राप्त झाले असुन त्यात त्यांनी, We are grateful of Sai Sansthan Trust- shirdi for giving us an opportunity to serve Sai Sansthan and we do appreciate the Sansthan Management for extending all co-operation to us. We have no complaint or any grievances against the Sai Sansthan and we grateful of the Sansthan Management.

The Security Service Contract was awarded to us for one year which will be expiring on dt.9th June 2018. Therefore we will not be interest to continue in providing our services beyond this contract period at existing service charges @ 0% service Charges.

You are hereby requested to kindly initiate the process of floating fresh tender for awarding the contract of providing Security Services to new vendor, as whole process takes long time to complete.

We also urge to continue to extend you kind co-operation by releasing our payment on time so that we can also pay salary to security personnel on time, प्राप्त झाल्याने, त्यावर दि.१०.०१.२०१८ रोजी टिपणी सादर करणेत आली होती. त्यावर मा.व्यवस्थापन समिती सभेच्या

मान्यतेने पुढील वर्षासाठी नवीन निविदा प्रक्रिया त्वरीत सुरु करुन, व्यवस्थापन समितीसभेसमोर प्रस्ताव सादर करणेचे निर्देश देण्यात आलेले आहे.

**विभागाचा अभिप्रायः-** सध्याचे लेबर व सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्सची मुदत दि.०९.०६.२०१८ अखेर संपूष्टात येत असल्याने, पुढील कालावधीसाठी संस्थानला दि.१०.०६.२०१८ पासून पूढील ०१ वर्ष कालावधीसाठी अकुशल, कुशल कामगार व सुरक्षा कर्मचारी/ माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेसाठी प्रचलित पध्दती प्रमाणे स्वतंत्र ठेकेदारांची/ कॉन्ट्रॅक्टर्सची नेमणूक करता येईल, त्याकरीता लायसेन्सधारक व अनुभवी ठेकेदाराकडून (यांचे ठेकेदारी कर्मचारी पुरविण्याची क्षमता किमान १३०० पेक्षा जास्त आहे. ज्यांना किमान ०३ वर्षेपेक्षा जास्त पुर्वानुभव आहे व ज्यांची वार्षिक उलाढाल किमान १३.५० कोटी पेक्षा जास्त आहे.) अशा पात्र ठेकेदारांकडून निविदा मागविणेकामी वर्तमानपत्र व संस्थानच्या संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन, ई- निविदेव्दारे निविदा मागविण्यात येतील. असे मत असून त्यास मान्यता असावी. तरी सदरचे प्रस्तावावर मा.व्यवस्थापन समिती सभेसमोर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.२०५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानला दि.१०.०६.२०१८ पासून पुढे एक वर्ष कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने अकुशल, कुशल व सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी नविन लेबर व सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्सची नेमणूक करण्यासाठी विहीत पध्दतीने ई-निवीदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- कामगार अधिकारी)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०७ **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांचेमार्फत शिर्डी विमानतळावर पुरविण्यात येणारे रुग्णवाहिकेची सेवा सेवेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबाचे समाधीस १०० वर्ष पुर्ण होत असल्याने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचेमार्फत श्री साई शताब्दी महोत्सव दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते दि.३१ ऑक्टोबर २०१८ या कालावधीत साजरा करणेत येत आहे. श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव सोहळयासाठी देश विदेशातुन येणा-या साईभक्तांचे सोई साठी दि.०१ ऑक्टोबर २०१७ पासुन शिर्डीमध्ये विमान सेवा चालु करणेत आली.

सदर विमानसेवा सुरु करणेसाठी रुग्णवाहिका सेवा आवश्यक असल्याने महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कंपनी व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचेमध्ये रुग्णवाहिकीची सेवा देणेबाबत एमओयु (करार) करणेत आलेला आहे. सुरुवातीस सदर सेवा फक्त ०३ महिनेकरीता देणेबाबत संस्थानने सहमती दर्शवली होती. परंतु एअरपोर्ट प्राधिकरणाने ०६ महिनेचा अवधी मागीतला होता व ०६ महिनेपुर्ण होईपर्यंत प्राधिकरणच रुग्णवाहिकांची सेवेबाबत सुविधा उपलब्ध करेल असे तोंडी कळविलेले होते. सदर एमओयु प्रमाणे दि.२८/०२/२०१८ अखेर ठरलेला कालावधी संपुष्टात येत आहे.

दि.२२ फेब्रुवारी २०१८ रोजीच्या पत्रान्वये श्री सुरेश काकानी, विमानतळ संचालक, यांनी रुग्णवाहिकेची व अग्निशमन सेवा पुढे आणखी तीन महिनेसाठी पुरवावी अशी विनंती केलेली आहे.

शिर्डी येथे येणा-या साईभक्तांचे सोईसाठी सुरत ते शिर्डी विमानसेवा चालु करणेचे प्रस्तावित आहे त्यामुळे रुग्णवाहिनीसाठीची मागणी वाढणार आहे. एमओयुमध्ये ठरलेप्रमाणे रुग्णवाहिका व त्यासोबत असणारे कर्मचारी यांना एअरपोर्टवर पाठवावे लागते श्री साईबाबा संस्थान रूग्णालयांमध्ये आरएमओ डॉक्टर व इतर कर्मचारी यांवी कमतरता भासत आहे. त्यामुळे हॉस्पिटलमधील दैनंदीन कामकाजावर ताण पडतो आहे तसेच उत्सव काळात शिर्डी परिसरात गर्दी असते त्यावेळी ५०० रुम, १००० रुम, दर्शनलाईन, हेलिपॅड व्यवस्था येथे प्रथमोपचार केंद्र सुरु करावे लागते आपत्कालीन व्यवस्था ही करावे लागते त्यासाठी डॉक्टरांची तसेच इतर कर्मचारी यांची गरज असते.श्री साईबाबा संस्थानकडे रुग्णवाहिका आहे परंतु वाहन चालकाची कमतरता असल्याने रुग्णवाहिकेची सेवा देणेसाठी अडचणी निर्माण होतात.त्यामुळे एअरपोर्टसाठी श्री साईबाबा संस्थानमार्फत देत असलेली रुग्णवाहिकेची सेवा देणे शक्य होणार नाही असे मत आहे.

तरी श्री साईबाबा संस्थानमार्फत एअरपोर्ट प्राधिकरण यांना आणखी तीन महिने मागील एमओयु मध्ये नमुद केलेल्या अटीप्रमाणे दुसरी एमओयु करार करुन रुग्णवाहिका सेवा आणखी पुढे तीन महिने चालु ठेवावी का बंद करावी याबाबत निर्णय होणेस व तसेच या तीन महिन्यानंतर सदरची सेवा मनुष्यबळ व वाहनचालक यांचे कमतरतेमुळे देणे शक्य होणार नाही यावर सुदधा निर्णय होणेस सदरचा विषय निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.२०६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, मनुष्यबळ व वाहनचालक यांचे कमतरतेमुळे एअरपोर्ट प्राधिकरण यांना शिर्डी विमानतळावर पुरविण्यात येणाऱ्या रुग्णवाहिकेची सेवा बंद करण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०८ **Cath Lab, CT Scan व MRI मशिनचे पुढील ६ महिन्यांचे कालावधीसाठी कॉम्प्रेहेन्सीव्ह वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (CMC) करणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा हॉस्पिटलचे कार्डीओलॉजी विभागाकरीता पुरवठा आदेश 8473/2005, दि.11/08/2005 अन्वये मे. सिमेन्स लि. मुंबई, यांचेकडून AXIOM ARTIS dfcCathlab System एकुण रू. 2,95,00,000/- इतक्या रकमेत खरेदी करणेत आली आहे. सदर मशिन श्री साईबाबा हॉस्पिटल मध्ये दि. 18/02/06 रोजी कार्यान्वित करण्यात आलेले असुन कंपनीने मशीनकरीता दिलेला तीन वर्षाचा वॉरंटी कालावधी संपलेनंतर मशीनकरीता कंपनीस दिलेल्या दि.११/०८/२००५ च्या पुरवठा आदेशातील अट क्र.12 अन्वये- वार्षिक CMC (Comprehensive Maintenance Contract) करणेबाबत खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे-

Comprehensive Maintenance Contract (CMC) price for the fourth year is Rs.27, 22,500/- For subsequent years the escalation of 10% will be applicable. The service tax will be extra. त्यानुसार सदर कॅथलॅब मशिनचे कॉम्प्रेहेन्सीव्ह वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणेत येत आहे. सदर मशिनचा आजपावेतो १२ वर्षे वापर झालेला आहे.

श्री साईबाबा हॉस्पिटल करीता नवीन कॅथलॅब मशिन खरेदी करणेसाठी दि. २१/०८/२०१७ रोजीचे पत्रान्वये M/s. Shimadzu Medical (I) Pvt. Ltd. Mumbai यांना पुरवठा आदेश देण्यात आला आहे. परंतु आजपावेतो सदर मशिन प्राप्त झालेले नाही. सध्या वापरात असलेले जुने कॅथलॅब मशिनचे (CMC) कॉम्प्रेहेन्सीव्ह वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट दि. १७/०२/२०१८ रोजी संपत आहे. दि. ०९/०२/२०१८ चे खरेदी समितीचे सभेमध्ये कंपनी प्रतिनिधीने सांगितले प्रमाणे नवीन मशिन प्राप्त होउन कार्यान्वीत करणेकरीता चार ते सहा महिन्यांचा कालावधी लागु शकतो. त्यावेळी खरेदी समितीत झालेली चर्चा व प्राप्त आदेशानुसार मे. सिमेन्स हेल्थकेअर प्रा.ली. मुंबई यांचेकडे पुढील कालावधीत सदर मशिनचे मागील वर्षाचे दराने CMC करणे करीता विचारणा केली असता त्यांचे दि. 12/02/2018 रोजीचे ई- मेल द्वारे तयार असल्याचे कळविले आहे.

तसेच श्री साईबाबा हॉस्पिटलचे रेडीओलॉजी विभागातपुरवठा आदेश क्र. 2833/2005, दि.15/03/2005 अन्वये मे. सिमेन्स लि. मुंबई या कंपनीचे Somatom Sensation 64 CT Scanner हे मशीन एकुण रू. 3,98,37,835/- इतक्या रकमेत खरेदी करण्यात आले असुन सदर मशिन करीता कंपनीने दिलेला एक वर्षाचा वॉरंटी कालावधी संपलेनंतरकंपनीस देण्यात आलेल्या दि. 15/03/05 च्या पुरवठा आदेशातील अ.क्र.15 अन्वये-

Comprehensive Maintenance Contract (CMC) price for the second year is Rs.30 Lacs. For subsequent years the escalation of 5% will be applicable. The service tax will be extra. त्यानुसार सदर सी. टी. स्कॅन मशिनचे कॉम्प्रेहेन्सीव्ह वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणेत येत आहे. सदर मशिनचा आजपावेतो १२ वर्षे वापर झालेला आहे.

आणि त्याचप्रमाणे श्री साईबाबा हॉस्पिटलचे रेडीओलॉजी विभागाकरीता पुरवठा आदेश क्र. 15895/ 2006, दि.13/11/06 अन्वये मे.सिमेन्स लि. मुंबई, यांचेकडून Magnetom Avanto मशीन एकुण रू. 5,05,00,000/- इतक्यारकमेत खरेदी करण्यात आलेआहे. सदरचे मशिन दि. 1/06/2007 रोजी कार्यान्वित करण्यात आलेले आहे. कंपनीने मशीनकरीता दिलेला दोन वर्षाचा वॉरंटी कालावधी संपलेनंतरकंपनीस दिलेल्या पुरवठा आदेशातील अटीनुसार पुढील कालावधीतील दुरुस्ती व देखभालीकरीता वार्षिक CMC (Comprehensive Maintenance Contract) करणेबाबत खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

'मशिनचा वॉरंटी कालावधी दोन वर्षाचा असून तो संपुष्टात आल्यानंतर कंपनीकडे CMC कॉम्प्रेहेन्सीव मेंटेनन्स सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करण्यात यावे. तसेच याकामी कंपनीस पहिल्या वर्षी 20 लाख रूपये व त्यानंतर पुढील प्रत्येक वर्षास 20 लाख अधिक 5 टक्के याप्रमाणे दरवर्षी 5 टक्के वाढ करून सदर CMC साठी आगाऊ रक्कम देण्यात यावी आणि सर्व्हीस टॅक्स वेगळा देण्यात यावा असे ठरले आहे. त्यानुसार सदर एम. आर. आय मशिनचे कॉम्प्रेहेन्सीव्ह वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणेत येत आहे. सदर मशिनचा आजपावेतो १० वर्षे वापर झालेला आहे.

सध्या उपरोक्त विभागाकरीता नवीन CT Scan व MRI मशिन खरेदीसाठी ई- निविदा प्रकाशित करणेत आल्या आहेत. सदर नवीन मशिन प्राप्त होणे करीता अंदाजे सहा महिन्यांचा कालावधी लागु शकतो. सदर CT Scan मशिनचे दि.१६/०७/२०१८ रोजी कॉम्प्रेहेन्सीव्ह वार्षिक सर्व्हीसकॉन्ट्रॅक्टचा कालावधी संपत आहे. MRI मशिनचे दि.३१/०५/२०१८ रोजी कॉम्प्रेहेन्सीव्ह वार्षिक सर्व्हीसकॉन्ट्रॅक्टचा कालावधी संपत आहे. त्यामुळे या दोन्ही मशिनचे CMC कालावधी पुढे सहा महिन्याकरीता वाढविणे आवश्यक आहे या मशिन करीता देखील कंपनी जुन्या दराने CMC करीत असल्याचे कंपनी ई मेल दि. 12/02/2018 अन्वये कळविले आहे.

त्यानुसार उपरोक्त तीनही मशिनचे CMC करीता खालीलप्रमाणे मागील वर्षानुसार दर आहेत.

| अ.नं. | मशिनचे नाव | सध्याचा CMC कालावधी | CMC कालावधी संपत असलेली दिनांक | एक वर्षाच्या कालावधीची रक्कम | पुढील सहा महिनेचा CMC कालावधी | सहा महिन्यांकरीता CMC रक्कम रू. |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | कॅथलॅब मशिन (Model- Axiom ArtisDfc) | दि. 17/02/2017 ते दि.16/02/2018 | 16/02/2018 | 50,00,000/- | दि. 17/02/2018 ते दि. 16/08/2018 | 25,00,000/- |
| ०२ | एम.आर.आय. मशिन (Model- Magnetom Avanto 1.5T) | दि. 01/06/2017 ते दि. 31/05/2018 | 31/05/2018 | 33,00,000/- | दि. 01/06/2018 ते दि. 30/11/2018 | 16,50,000/- |
| ०३ | सी.टी. स्कॅन मशिन (Model- Somatom Sensation 64 Slice) | दि. 17/07/2017 ते दि.16/07/2018 | 16/07/2018 | 58,00,000/- | दि. 17/07/2018 ते दि. 16/01/2019 | 29,00,000/- |
| | | | | | एकुण रु. सर्व करांसहीत | 70,50,000/- |

वरीलप्रमाणे मे. सिमेन्स हेल्थकेअर प्रा.ली. मुंबई यांचेकडे वरील तीनही मशिनचे पुढील ६ महिन्यांचे वाढीव कालावधी करीता कॉम्प्रेहेन्सीव्ह वार्षिक सर्व्हीसकॉन्ट्रॅक्ट करणेस एकुण रू. 70,50,000/- (पुर्णांकित एकुण अक्षरी रु. सत्तर लाख पन्नास हजार मात्र) इतका खर्च येणार आहे.

कंपनीने सी.टी. स्कॅन मशिनचे IRS, ICS Towers तसेच एम.आर.आय. मशिनचे Host, Imager Computer System ची वापरायोग्य आर्युमर्यादा संपल्याचे दि. 12/02/2018 चे ई- मेल अन्वये कळविले आहे. तसेच सदर IRS, ICS Towers व Host, Imager Computer System साठी कंपनी Best Effort Basis वर CMC कालावधीत सेवा देणार असल्याचे कळविले आहे. तसेच कॅथलॅब व सी.टी. स्कॅन मशिन करीता नवीन मशिन कार्यान्वीत होई पर्यत जुन्या मशिनची टयुब खराब झालेमुळे बदलणेची आवश्यकता भासल्यास कंपनीस CMC ची पुर्ण रक्कम अदा करावी लागणार आहे असे कळविले आहे.

तरी मे. सिमेन्स हेल्थकेअर प्रा.ली. मुंबई यांचेकडे Cath Lab, CT Scan व MRI मशिनचे CMC कालावधी संपलेनंतर पुढील सहा महिन्याकरीता प्रतिमहा दराने कॉम्प्रेहेन्सीव्ह वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणेस व त्यासाठी येणा-या खर्चास तसेच कंपनीने उपरोक्त दिलेल्या दरांबाबत कंपनी प्रतिनिधीशी मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे प्रत्यक्ष चर्चा करुन दर निश्चित करणेस मान्यता असावी.

निर्णय क्र.२०७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील Cath Lab, CT Scan व MRI मशिनच्या कॉम्प्रेहेन्सीव्ह वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (CMC) ची मुदत संपुष्टात आलेली असल्यामुळे, सदरहू मशिन्सच्या पुढील ६ महिन्यांचे कालावधीसाठी मे.सिमेन्स हेल्थकेअर प्रा.ली., मुंबई यांचेबरोबर पुर्वीच्याच अटी/ शर्तीवर कॉम्प्रेहेन्सीव्ह वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (CMC) करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

**या चर्चेच्या अनुशंगाने वैद्यकिय संचालक यांनी माहिती दिली की, नवीन खरेदी करण्यात आलेले Cath Lab मशिनची कस्टम डयुटी माफ करणेसाठी रुग्णालय विभागामार्फत प्रयत्न करणेत येत होते. परंतु कस्टम्स विभागाचे नियम पहाता, १००% मोफत असणाऱ्या रुग्णालयांसाठीच कस्टम डयुटी माफ करण्यात येते.**

**यावर चर्चा होऊन, नवीन कॅथलॅब मशिनची कस्टम डयुटी भरणेत येऊन, सदरहू मशिन्स संस्थानचे ताब्यात घेण्यात यावे, असे ठरले व याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच यापुढे नवीन साहित्य खरेदी करतेवेळी कस्टम डयुटी भरणेत येऊन, साहित्य ताब्यात घेण्यात यावे व त्यानंतर कस्टम डयुटी माफ होणेकरीता प्रयत्न करणेत यावे, अशा सुचना दिल्या.**

यावेळी संस्थान रुग्णालयांसाठी नवीन सी.टी.स्कॅन व एम.आर.आय. मशिन खरेदी करणेकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमध्ये प्री-बीडच्या वेळेस पुरवठाधारकांनी उपस्थित केलेल्या मुद्दयांवर अभिप्राय घेणेसाठी आजचे सभेसमोर श्री साईबाबा हॉस्पिटलमधील रेडीओलॉजीस्ट यांना बोलविणेत आले होते. त्यांनी याबाबत सविस्तर माहिती दिली.

यावर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलमधील रेडीओलॉजीस्ट यांच्या अभिप्रायानुसार उपरोक्त मशिनरी खरेदीकामीच्या ई-निविदेमध्ये दुरुस्ती (Amendment) करणेत यावी, असे ठरले.

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

आयत्या वेळेचा

**विषय नं.०९** **श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुक्तपेढीमध्ये जानेवारी- २०१८ महिन्यात वैद्यकिय बीलात देण्यात आलेल्या सवलतीस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये गरीब व गरजु रुग्णांना वैद्यकिय बिलात सवलत देण्या संबंधित मा.व्य.स.निर्णय क्र.५१९/ दि.२४.०७.२०११ संमत झाला आहे. वैद्यकिय बिलात सवलत देण्याचे अधिकार उप.वै.संचालक/ वै.संचालक यांना देण्यात आलेले आहेत त्यांचे गैर हजेरीत वै.प्रशासक/जनसंपर्क अधिकारी यांना अधिकार सुपुर्त् करण्यात येऊन रुग्णांना मासिक वैद्यकिय बिलात सवलत देण्यात येते.

जनसंपर्क अधिकारी/ सोशल वर्कर हे रुग्णांची आर्थिक परिस्थीती जाणून घेतात व आवश्यक कागदपत्रांसह सवलत मंजुरी करीता प्रस्तावीत करतात. अशा प्रकारे हॉस्पिटलमध्ये वैद्यकिय बिलात सवलत देण्याकरीता स्वतंत्र विभाग कार्यरत आहे. निर्णय क्र.५६४/२६.०६.२०१४ अन्वये प्रत्येक महिन्यात देण्यात आलेल्या वैद्यकिय सवलतीस मा.कार्यकारी अधिकारी यांची मान्यता घेण्यात येऊन आर्थिक वर्षाच्या शेवटी एकत्रित अहवाल मा.व्य.स.चे सभे समोर नोंद घेण्यासाठी सादर करण्यात यावा असे ठरले आहे. माहे सप्टेंबर २०१७ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकिय सवलतीस मान्यतेचे प्रस्तावावर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दर महा मा.व्य.समिती सभेसमोर सादर करण्यास शेरा दिला आहे. त्याप्रमाणे माहे **जानेवारी २०१८** मध्ये श्री साईबाबा हॉस्पिटलला ओपीडी रुग्ण **१४,४४६** व **३,७०९** आयपीडी रुग्णांपैकी **११,१२** ओपीडी व **५५५** आयपीडी रुग्णांना वैद्यकिय बिलात एकुण **रु.७१,२७,४२९/-** इतकी सवलत देण्यात आली व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये गरीब व गरजु रुग्णांना वैद्यकीय बिलात सवलत देण्या संबंधीत मा.व्य.स.निर्णय क्रं.३४६/दि.१८-१९.०८.२००१ संमत झाला आहे, जा.नं.एसएसएस/एसएसएच/३३१/२०१७ दि.३०.०३.२०१७ आदेश. दि.०६.०३.२०१० ची सिकल सेल आजाराच्या रुग्णांना मोफत रक्त देणेबाबत टिपणी प्रमाणे एकुण **२५०** रुग्णाना रक्कम **रु.४,६५,६००/-** इतकी मोफत/सवलत देण्यात आली आहे. सवलत/मोफतचे विवरण खालील प्रमाणे–

(अ) **श्री साईबाबा हॉस्पिटल**

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | लाभार्थी संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | गरीब/दारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ११० | ८,५०,२४५/- | - | ८,५०,२४५/- |
| २ | आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | २०३ | २३,२३,०२३/- | १०,०६,८२१/- | १३,१६,२०२/- |
| ३ | सकृत दर्शनी गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ११ | ३५,६५३/- | - | ३५,६५३/- |
| ४ | कुत्रा, साप, माकड चावलेले रुग्ण, साई भक्त, साध्वी कन्या कुमारी, आश्रम, डायलेसिस, हिमोफिलीया, शालेय पोशन आरोग्ययोजना इ. | ७८६ | ३७,२५,६५३/- | २४,४८,७१८/- | १२,७६,९३५/- |
| ५ | राजीवगांधी आरोग्य योजना आयपीडी रुग्णांना दिलेली सवलत | ३११ | १,६२,५४,८९९/- | १,४१,०९,४४०/- | २१,४५,४५९/- |
| ६ | राजीवगांधी आरोग्य योजना ओपीडी रुग्णांना दिलेली सवलत | २,८४३ | १५,०२,९३५/- | - | १५,०२,९३५/- |
| | **एकुण** | **४,२६४** | **२,४६,९२,४०८/-** | **१,७५,६४,९७९/-** | **७१,२७,४२९/-** |

(ब) श्री साईनाथ रक्तपेढी

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | लाभार्थी संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | थॅलॅसिमिया | ३७ | ४४,६००/- | - | ४४,६००/- |
| २ | हिमोफिलीया | १ | ६००/- | - | ६००/- |
| ३ | सिकल सेल ॲनेमीया फ्रि | ० | - | - | - |
| ४ | फ्रि डन बाय एमएडी/एमएस | ९ | ११,४००/- | - | ११,४००/- |
| ५ | व्हॉलंटरीब्लड डोनेशन फ्रि | ९ | ९००/- | - | ९००/- |
| ६ | राजीव गांधी आरोग्य योजना | १२७ | २,९०,१००/- | - | २,९०,१००/- |
| ७ | संस्थान एम्प्लॉयी फ्रि | ४ | ४,६००/- | - | ४,६००/- |
| ८ | कॉन्ट्रक्ट एम्प्लॉयी फ्रि | २ | ३,०००/- | - | ३,०००/- |
| ९ | श्री साईनाथ हॉस्पिटल फ्रि | ६१ | १,१०,४००/- | - | १,१०,४००/- |
| | **एकुण** | २५० | ४,६५,६००/- | - | ४,६५,६००/- |
| | **एकुण अ+ब** | **४,५१४** | **२,५१,५८,००८/-** | **१,७५,६४,९७९/-** | **७५,९३,०२९/-** |

उपरोक्त प्रमाणे श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये **जानेवारी २०१८** मध्ये वैद्यकिय बिलात विहित पध्दतीने देण्यात आलेल्या **रु.७५,९३,०२९/-** सवलतीस मान्यतेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.२०८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुक्तपेढीमध्ये जानेवारी- २०१८ महिन्यात वैद्यकिय बीलात देण्यात आलेल्या सवलतीची नोंद घेण्यात येऊन, त्यास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**आजचे व्यवस्थापन समिती सभेमध्ये मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळी खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.**

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१०** इंटरनॅशनल साई फाऊडेशन, नोएडा याचे प्रतिनिधी आजचे सभेसमोर उपस्थित होते, सभेसमोर त्यांनी, शताब्दी वर्षात चार दिवसाकरीता साईआश्रम येथील फॅब्रीक शेड येथे सायंकाळी ७.३० ते ९.३० या वेळेमध्ये हिंदी भाषेमध्ये श्री साई दिव्य कथेचे आयोजनासाठी परवानगी मिळणेची व संस्थानकडून खालीलप्रमाणे आवश्यक बाबींची पूर्तता करणेबाबत विनंती केली.

| अ.नं. | तपशील |
|---|---|
| १. | स्टेज व्यवस्था (भजन गायक, संगीतकार व इतर) |
| २. | स्टेज परिसरात फुलांची सजावट |
| ३. | स्टेजचे मागील बाजूस बॅकड्रॉप बॅनर |
| ४. | साऊंड सिस्टीम (८ माईक, २ स्प्रिंग स्टॅन्डसह माईक व इतर) |
| ५. | फोटोग्रॉफी |
| ६. | व्हिडीओ शुटींग |
| ७. | कथा समाप्तीचे वेळेस श्रोंतेकरीता प्रसादाची व्यवस्था (बुंदी किंवा शिरा) |
| ८. | इंटरनॅशनल साई फाऊंडेशन यांचे साहित्य / पुस्तके यांचे प्रदर्शनाकरीता स्टॉलची व्यवस्था |
| ९. | कथेची तारीख, ठिकाण व वेळ यांची माहिती होणेकरीता बॅनर्स, होल्डींग इत्यादींची व्यवस्था करण्यात यावी. |
| १०. | प्रवास खर्च ७ व्यक्तींकरीता (द्वितीय श्रेणीतील वातानुकूलीत रेल्वे भाडे)- दिल्ली ते कोपरगांव, कोपरगांव ते दिल्ली (प्रती व्यक्ती २२२५/- प्रमाणे) |
| ११. | निवास व्यवस्था – साई आश्रम भक्तनिवास येथील वातानुकूलीत ८ खोल्या x ७ दिवसाकरीता |

**निर्णय क्र.२०९** यावर चर्चा होऊन, इंटरनॅशनल साई फाऊंडेशन, नोएडा यांना दि. १७ ते २० मे २०१८ या अधिक मासाचे कालावधीत साईआश्रम येथील शताब्दी मंडपामध्ये श्री साई दिव्य कथा करणेस परवानगी देण्यात यावी. याचबरोबर त्यांच्या मागणीनुसार उपरोक्त बाबींची पुर्तता संस्थानमार्फत करणेत यावी, असे ठरले व याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.११** शिर्डी नगर पंचायत यांनी आजचे सभेत दि.०७/०३/२०१८ रोजीचे पत्रान्वये श्री साईनाथ रुग्णालय तिसऱ्या मजल्याच्या बांधकामास, बांधकाम परवानगी प्राप्त करुन घेणेसाठी खालीलप्रमाणे शुल्क भरणेस कळविले आहे.

| अ.नं. | तपशिल | भरावयाचे शुल्क |
|---|---|---|
| १ | विकास शुल्क | ११,१४,३८२.०० |
| २ | उप कर | ४,६८,३५६.०० |
| ३ | सुरक्षा ठेव रक्कम. | १,०५,१३०.०० |
| | **एकूण रु.** | १६,८७,८६८.०० |

**निर्णय क्र.२१०** सदरहू पत्रावर चर्चा होऊन, नियोजीत श्री साईनाथ रुग्णालय तिसऱ्या मजल्याचे बांधकामास शिर्डी नगर पंचायत, शिर्डी यांची अंतीम परवानगी घेणेकरीता वरीलप्रमाणे एकूण रु.१६,८७,८६८/- मात्र विकास शुल्क, उपकर व सुरक्षा ठेव यांची रक्कम शिर्डी नगरपंचायत यांचेकडे जमा करणेस मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१२** निळवंडे धरणाच्या डाव्या कालव्याच्या कामासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडून रु.५०० कोटी इतका निधी उसनवार तत्वावर उपलब्ध करुन देण्याबाबत विधी व न्याय विभागाकडील सासंवि-२०१४/ ६११/प्र.क्र.८८/ का.१६, दि.१२ फेब्रुवारी २०१८ रोजीचे पत्रान्वये (१) सदरील निधी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी विनाअट जलसंपदा विभागास उपलब्ध करुन द्यावा. (२) सदर निधीचा विनियोग उर्ध्व प्रवरा (निळवंडे-२) प्रकल्पावर सिंचन निर्मिती करण्यासाठी प्रस्तावित आहे. सदरचा निधी शेवटचा हप्ता वितरीत केल्यानंतर त्या पुढील दहा वर्षात परतफेड करावयाचे असल्याने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी त्यांच्या ठरावातील नमूद विविध अटीस हा विभाग सहमत नाही. (३) उर्ध्व प्रवरा (निळवंडे-२) प्रकल्पावर निधी खर्च करण्याचा प्राधान्यक्रम ठरविण्याचा अधिकार मा.राज्यपाल यांच्या पुर्वसहमतीने जनसंपदा विभागास राहील, असे जनसंपदा विभागाचे अभिप्राय व्यवस्थापन समितीच्या निदर्शनास आणून देण्यात यावेत आणि व्यवस्थापन समितीचे अभिप्राय या विभागास उपलब्ध करुन देण्यात यावेत, असे कळविले आहे.

**निर्णय क्र.२११** उपरोक्त पत्रावर सविस्तर चर्चा होऊन, दि.०१.०२.२०१८ रोजी मा.मुख्यमंत्री महोदयांबरोबर झालेल्या बैठकीमध्ये मा.मुख्यमंत्री महोदयांनी निळवंडे प्रकल्पास निधी देणेबाबत दिलेल्या निर्देशाप्रमाणे पुढील कार्यवाही करावी व व्यवस्थापन समितीच्या वतीने तसा अभिप्राय शासनास सादर करावा, असे ठरले.

(कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय व निर्णय क्र.२१२** संस्थान आरक्षित असलेल्या शिर्डी व परिसरातील जमिनी खरेदी करणेबाबतचा प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा. (कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय व निर्णय क्र.२१३** मा.व्यवस्थापन समिती सभेसाठी सादर करावयाचे विषय ऐनवेळी समोर आल्यामुळे संस्थान अधिकारी तसेच व्यवस्थापन समिती सदस्य यांना सदरहू विषयाचा अभ्यास करता येत नाही. व्यवस्थापन समितीची सभा प्रत्येक ३० दिवसांमध्ये होत असते. याकरीता यापुढे व्यवस्थापन समितीची सभा झाल्यानंतर पुढील १५ दिवस कालावधीमध्ये संबंधीत विभागांनी आपलेकडील विषय विहीत कार्यपध्दतीने सभाकामकाज विभागाकडे सादर करावेत, असे ठरले. (कार्यवाही- सर्व विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय व निर्णय क्र.२१४** संस्थान रुग्णालयांमध्ये डॉक्टर्स व इतर कर्मचारी आवश्यकतेपेक्षा कमी आहेत, याकरीता आकृतीबंधामधील रिक्त पदे भरती करणेबाबतचा सविस्तर प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा.

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय व निर्णय क्र.२१५** मौजे रुई, ता.राहाता येथील राधा कालियनदास दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई यांचेकडून दानपत्राद्वारे प्राप्त झालेल्या गट नं.२९३ मधील क्षेत्र ७ हेक्टर ३२ आर या जागेमध्ये श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालये तसेच प्रस्तावित कॅन्सर हॉस्पिटलसाठी एकत्रित 'वैद्यकिय संकुल' उभारण्यासाठी आर्किटेक्टची नियुक्ती करण्याबाबतची प्रक्रिया सुरु करणेत यावी. (कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय व निर्णय क्र.२१६** श्री रामनवमी उत्सवानिमित्ताने शिर्डी येथे मोठया प्रमाणात पदयात्री/ पालख्या येत असतात. या पदयात्री/ पालख्यांचे यथोचित स्वागत करण्यात यावे व त्यांच्या दर्शनासाठी पालखी निवारा येथे १ व जुने प्रसादालय परिसरामध्ये २ स्वतंत्र टाईम बेस काऊंटर आरक्षीत ठेवणेत यावेत. तसेच उत्सवामधील गर्दीच्या अनुषंगाने शिर्डी नगरपंचायतीच्या सहकार्याने ठिक-ठिकाणी साईभक्तांच्या सोयीसाठी फिरते शौचालयाची व्यवस्था करणेत यावी.

(कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख/ माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख/ प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय व निर्णय क्र.२१७** समिती सदस्य मा.श्री.बिपीनदादा कोल्हे यांनी, साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा इमारतीचे देणगीदार साईभक्त श्री.के.व्ही. रमणी हे साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा या इमारतींच्या देणगीबाबतचा पितळी अक्षरातील फलक स्वखर्चाने तयार करुन देणार आहेत, अशी माहिती दिली.

यावर चर्चा होऊन, साईभक्त श्री.के.व्ही. रमणी यांचेकडून साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा या इमारतींच्या देणगीबाबतचा पितळी अक्षरातील फलक स्विकारणेत येऊन, सदरहू इमारतींच्या परिसरामध्ये दर्शनी भागात लावणेत यावा, असे ठरले.

तसेच यावेळी, सध्या कार्यरत असलेल्या व्यवस्थापन समितीच्या नावाचे फलकही संस्थान परिसरामध्ये विविध ठिकाणी लावणेत यावे, असे निर्देश दिले व याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय व निर्णय क्र.२१८** संस्थानचे वरीष्ठ महाविद्यालय सुरु करणेस शासन मान्यता प्राप्त झालेली असून सदरहू महाविद्यालयासाठी आवश्यक ते साहित्य खरेदी करण्यासाठी निविदा प्रक्रिया सुरु करण्यात यावी. तसेच तेथे कर्मचारी वर्ग भरती करणेकामीची कार्यवाही करणेत यावी. (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय व निर्णय क्र.२१९** समाधी मंदिरामधील निर्माल्यांपासून जनसेवा फाऊंडेशन बचत गटामार्फत तयार करणेत येणाऱ्या अगरबत्तयांची विक्री करणेसाठी जनसेवा फाऊंडेशन बचत गट यांना प्रायोगिक तत्वावर मंदिर परिसर व नवीन साई प्रसादालय परिसरामध्ये जागा उपलब्ध करुन देण्यात यावी. (कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय निर्णय क्र.२२०** समाधी शताब्दी निमित्ताने साईआश्रम भक्तनिवास येथे उभारणेत आलेल्या मंडपामध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करणेसाठी, त्या मंडपामध्ये कायमस्वरुपी स्टेज व्यवस्था करण्यास मान्यता देण्यात आली व त्यासाठी सविस्तर प्रस्ताव पुढील सभेसमोर सादर करणेत यावा. (कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम)

---

आयत्या वेळेचा

**विषय व निर्णय क्र.२२१** मौजे निमगाव कोऱ्हाळे येथील गट नं.१८३ मध्ये नियोजित शैक्षणिक संकुल उभारणे कामासाठी आर्किटेक्ट डी.ओ. निकम, पुणे यांनी सादरीकरण केले. त्यानुसार सविस्तर अंदाजपत्रक तयार करणेत यावे व सदरहू प्रकल्पाचे आराखडे उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांचेकडे सादर करण्यात यावे. तसेच विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.

(कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम)

---

आयत्या वेळेचा

**विषय व निर्णय क्र.२२२** साईसृष्टी, प्लॅनेटोरियम व वॅक्स म्युझीयम (Sai Knowledge Park) प्रकल्पासाठी सल्लागार संदिप शिक्रे ॲण्ड असोशिएटस, मुंबई यांचे प्रतिनिधींनी आजचे सभेत सदरहू प्रकल्पाचे सादरीकरण केले.

यावर चर्चा होऊन असे ठरले की, सल्लागार संदिप शिक्रे ॲण्ड असोशिएटस, मुंबई यांनी शिर्डी येथे येऊन, मुख्यकार्यकारी अधिकारी यांचेसमोर सदर प्रकल्पाचे सविस्तर सादरीकरण सादर करावे व त्यानंतर या प्रकल्पासाठी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेबाबतची पुढील कार्यवाही करणेत यावी.

(कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम)

---

आयत्या वेळेचा

**विषय व निर्णय क्र.२२३** नियोजित दर्शनरांग इमारत बांधकाम प्रकल्पाची निविदा प्रक्रिया सुरु करणेबाबत आजचे सभेत आढावा घेणेत आला. त्यावेळी झालेल्या चर्चेच्या वेळी सदरहू प्रकल्पाचे आर्किटेक्ट, श्री.उदय काप्रे हे सभेपुढे उपस्थित होते. त्यांनी अंतिम निविदा मसुदा सभेपुढे सादर केला व त्यामधील अटी व शर्तीबाबतची सभेस माहिती दिली. तसेच सदर प्रकल्प हा मोठा व विशिष्ट स्वरुपाचा असल्याने सी-फॉर्म (लम्पसम) निविदा मागविणेत येत असल्याचे सांगितले. त्यावर सविस्तर चर्चा होऊन व निविदा मसुद्याचे अवलोकन करुन त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम)

---

वरील निर्णय क्र.१३९ ते २२३ सर्वानुमते घेण्यात आले.

यानंतर सायंकाळी ०६.३० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| श्रीमती रुबल अग्रवाल (भा.प्र.से.) | (सुरेश हावरे) |
| मुख्यकार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**